# पद्य — कसें — शिकवावें

ठिगळे

म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. नं.

[illegible]
[illegible]
২৪।৬।৫৮

# पद्य
# कसें
# शिकवावें

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम 20964 वि ..........
क्रमांक 278 नों: दि: ..........

लेखक : श्री. मा. ठिगळे
एम्. ए., एल्एल्. बी., बी. टी., डिप्. एड्. (एडिंबरो)
एम्. आर्. एस्. टी., एफ् आर्. जी. एस्. (लंडन)

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 6632

प्रथमावृत्ति ] १९५५ [ किंमत ४ रु.

'सुहास प्रकाशन'
सौ. कमलाबाई ठिगळे
झारेकर गल्ली, अहमदनगर.

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

मुद्रक:—
केशव रामचंद्र मोहिते,
सोना प्रिंटिंग प्रेस,
बिंदु चौक,
कोल्हापूर.

## अर्पण—

जन्ममृत्युसकट ज्याचें जीवन
काव्यमय झालें
त्या
स्वर्गवासी सुधीर यास
हें सुगधी सुमन
सप्रेम अर्पण

२०९२५ वि स्थळ...
२३० नों. दि. ९.०१.१९५६

# अंतरंग

दोन वर्षांपूर्वी मी 'इतिहास कसा शिकावा व शिकवावा' हा छोटासा ग्रथ लिहीला. त्यापूर्वीच 'माझे आवडते शिक्षक' महाराष्ट्राचा कोनाकोपरा धुंडाळीत फिरत होते. त्यांच्या सत्काराने शिक्षकसागर आनंदातिशयानें उफाळून आपल्या भव्य लाटांनीं त्यांना दृढ आलिंगन देत होता. त्यांच्या दृष्टादृष्टीनें दृष्ट लागेल इतकीं स्तुतीसुमनें खंद्या लेखकांनीं मजवर उधळलीं होतीं. त्या सुमनांच्या सुगंधानें सारें वातावरण दरवळून गेलें होतें. तरी पण हा छोटासा ग्रन्थ मी भीतभीतच लिहीला होता. कारण ललित वाङ्मयाचा निकष इतिहासासारख्या शास्त्रास कितपत मानवेल याची मला शंका होती. पण येथेंही मला कल्पनातीत यश मिळालें. ग्रन्थ प्रकाशनानंतर शेंकडों विद्वानांनीं पत्रें पाठवून अभिनंदन केलें. कित्येकांनीं प्रशंसोद्गार काढले. सर्वांनीं तोंड भरून स्तुति केली. महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार यांच्या सारख्या मातबर इतिहास संशोधकानें ग्रंथाचा पुरस्कार करतांना गोडवे गायले. मला धन्यता वाटली.

महामहोपाध्यायांनीं मुक्त कंठानें ग्रन्थाची स्तुति केली असली तरी त्यांच्या आणि माझ्या दृष्टिकोनांत जमीन अस्मानाचा फरक होता. ठराविक चाकोरी मी केव्हांच सोडली होती. माझ्या वैचारिक चाकांच्या खुणा जुन्या खोल चाकोरींत गडप होणार कीं काय या विचारानें मी भयभीत झालों. पण ही भीति लवकरच दूर झाली. विचारवंतांनीं नवीन चाकोरी मळवण्यास अपेक्षेबाहेर मदत केली. मला धीर आला.

या धीराच्या पोटींच ह्या पुस्तकाचा जन्म झाला. गत वर्षींच त्याचें बारसें मोठ्या हौसेनें करावें या विचारानें उचल खाल्ली. पण लगेंच बहु प्रसवेचें चित्र डोळ्यांपुढून सरकून निघून गेलें. तसें होऊ नये

म. ठें. ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ८६३५

म्हणून या पुस्तकाचा वैचारिक सौंदर्य-विकास सर्व दृष्टींनीं करण्यांत तब्बल एक वर्ष गेलें.

प्रकाशित पुस्तकाच्या लोकप्रियतेनें लिखाणास उत्साह चढला असला तरी पद्यांचें अध्यापनावरच पुस्तकच लिहीण्यास अनेक कारणें झालीं. त्यांतील मुख्य म्हणजे या विषयाचीही जुनी चाकोरी टाकाऊ झालेली आहे, धोक्याची झालेली आहे अशी माझ्या मनाची ठाम समजूत होती आणि आहे. जुन्या चाकोरीबाहेर कशी वाट काढावी याची थोडीफार योजनाही मजजवळ होती. जुनी सोडून नवी वाट काढतांना जरासे धक्के बसतील याचीही मला कल्पना होती. पण धक्के देणें आणि खाणें हें जिवंतपणाचेंच लक्षण मी समजतो.

जुन्या चाकोरीचा धक्का सतरा वर्षांपूर्वी मला प्रथम बसला. त्यावेळीं मी मुंबईच्या एस्. टी. कॉलेजमध्यें बी. टी. चें अध्ययन करीत होतो. अध्यापन शास्त्राचा मला गंध नव्हता. फ्रेश ग्रॅज्युएट म्हणूनच कॉलेजमध्यें माझी निवड झाली होती. एम्. ए., एल्. एल्. बी. च्या परीक्षा सहा सहा महिन्याच्या अंतरानें दिल्यामुळें अभ्यासाचा जरा कंटाळा आला होता. त्यामुळें वाचनही फारसें होत नव्हतें. त्याची आवश्यकताही फारशी भासत नव्हती. तेव्हां पांडित्य दाखविण्याच्या भरीस न पडतां सभोंवार दृष्टि ठेवून स्वानुभवावरच अध्यापनाचे कांहीं प्रयोग करण्याचें मीं ठरविलें. यांतच पाठाचें जुनें तंत्र सुटलें, नवें जोडलें गेलें. त्यामुळें कांहीं वेळां प्राध्यापकांकडून टीकास्त्राचे कडक प्रहार खाण्याचे प्रसंग आले. निष्काळजी, कामचुकार अशा अनेक शेलक्या शब्दांनीं माझी पूजा झाली. क्वचित् प्रसंगीं स्तुति सुमनांच्या शेला पागोट्यानें मस्तक लवलें.

अशाच एका प्रसंगीं माझी अतोनात वाहवा झाली. पद्याचा पाठ होता तो. श्री. कृ. पां. कुलकर्णी सारखे विद्वान् व रसिक निरीक्षक

लाभले होते. इयत्ता ३ री ( सध्याची इ. ७ वी ) स "घे कुठार ' ही कविता शिकविली. तासभर काय झालें याचें भान मला नव्हतें. तास संपला, पाठ संपला, मी बाहेर आलों. निरीक्षक महाशयांनीं पाठीवर थाप मारली. ' उभ्या आयुष्यांत मी इतका सुन्दर पाठ पाहिला नाहीं,' एवढें एकच वाक्य त्यांनीं उचारलें. कदाचित् काय बोलावें हें त्यांना तात्काळ सुचलें नसावें. लघवीची सुटी झाली असतांना मुलें एक मिनिट तरी आपापल्या जागेंत बेभान स्थितींत बसलीं असावींत. दुसरे दिवशीं कॉलेजमध्यें येतांना तिसरीचे वर्गातील मुलें वाटेंत भेटलीं. त्यांनीं ' घे कुठार ' म्हणून मला हाक मारली. तेव्हांपासून त्याच नांवानें मी वर्षभर ओळखला गेलों. प्रोफेसर कुलकर्णींनीं मोजक्या शब्दांत डोईजड प्रशंसा केली होती. पण मुलांकडून झालेलें माझें नूतन नामाभिधान मला अधिक मोलाचें वाटलें. हा माझ्या आयुष्यांतील अविस्मरणीय प्रसंग आहे. त्याचें बरेंचसें श्रेय पद्य-पाठाचें जुनें तंत्र झुगारण्यांत व नवीन अवलंबिण्यांत आहे असें मला वाटतें.

या नंतर नक्की पंधरा वर्षांनीं माझी नेमणूक कोल्हापूरच्या श्री महाराणी ताराबाई टीचर्स कॉलेजमध्यें प्राचार्य म्हणून झाली. येथें काम करीत असतांना निरनिराळे पाठ पाहण्याचा योग मला आला. त्यांत पद्याचे पाठही पाहावयास मिळाले. आणि त्यावरून कल्पना आली कीं पद्य पाठांचें तंत्रांत पंधरा वर्षांपूर्वीं आम्ही जेथें होतो तेथेंच अद्यापही आहोंत. या परिस्थितींत पालट करण्याकरितां प्राध्यापकांच्या आदर्श पाठांची प्रथा नव्या योजनांची जोड देऊन अमलांत आणली. मानवी मन जात्याच पुराणप्रिय असल्यामुळें कॉलेजच्या परसूत थोडीशी चलबिचल होणें साहजिक होतें. त्याप्रमाणें झालेंही. या प्रकाराची परतफेड प्राचार्यांकडून करून घेण्याची इच्छा होणें अनैसर्गिक नव्हतें. तशी परतफेडीची मागणी अप्रत्यक्षपणें झालीही. पण या मागणीच्या मागें

आपलीही कांहीं भ्रम दडलेले होते. त्यांतील मुख्य भ्रम म्हणजे एज्युकेशनल इन्स्पेक्टर म्हणून काम करणाऱ्यांना अध्यापनाचा काडीमात्र गंध नसतो, थोडासा गंध असलाच तर एकट्या दुकट्या विषयाचा असतो, शाळेच्या वार्षिक तपासणीचे वेळीं ते उगाच अवास्तव निरर्थक बडबड करतात, वगैरे वगैरे. हा भ्रम कांहीं इन्स्पेक्टर्सच्या बाबतींत खरा असेलही नाहीं असें नाहीं पण सर्वांचे बाबतींत असें म्हणतां यावयाचें नाहीं हें समजत माणसास केव्हांहीं नाकबूल करतां येणार नाहीं. या उलट असें घातुक भ्रम उराशीं बाळगणाऱ्या प्राध्यापकांना इन्स्पेक्टरचें काम तर करतां येत नाहींच नाहीं पण स्वतःचें कामही नीट करतां येत नाहीं असें अनुभवास येणें सिंहस्थ पर्वणीइतकें कठीण नाहीं. असो. या भ्रमाची जाणीव असल्यामुळें पाठाची अप्रत्यक्षपणें केलेली मागणी मी आपण होऊन उघड उघड स्वीकारली. सर्व प्राध्यापकांच्या सर्व विषयांवर झालेल्या आदर्श पाठावर अध्यक्ष या नात्यानें योग्य ती चर्चा मी केली असल्यामुळें इन्स्पेक्टर्सना एखाद्या विषयाशिवाय इतर कांहीं ज्ञान नसतें हा भ्रम अगोदरच कमी झाला होता. माझ्यापुरतेंच बोलावयाचें झाल्यास तो पूर्णपणें नाहींसा झाला होता. पण त्यामुळेंच कीं काय इन्स्पेक्टर्सना बिलकूल शिकवितां येत नाहीं हा भ्रम तरी खरा व्हावा अशी उत्कट इच्छा पुष्कळांना झाली असल्यास नवल नाहीं. त्याकरितां मोठमोठ्या लवाजम्यानिशीं आपापलीं टीकास्त्रें अगोदरच परजून हल्ला चढविण्याची जय्यत तयारी होणें अनैसर्गिक नव्हतें. त्यामुळें सोळा वर्षे वयाची 'परशु कुठार' ही 'यशवंती' मी पोतडींतून काढली. मुलींच्या हायस्कूलमधील इ. ७ वी चा गड चढण्यास सुरवात झाली. गड हस्तगत झाला आणि मीही सही सलामत सुटलों. त्याबरोबर सर्व मुली माझ्या भोंवती गोळा झाल्या. त्यांनीं 'सर तुमचें नांव काय?' असा एकच गिल्ला केला. त्यांतच 'बाई, बाई तुमचें नांव काय' अशीही पृच्छा एक दोघींनीं केल्याचें कानांवर आलें झालें. सर्वांनीं

टीकाळें आपापल्या ठिकाणींच बोथट झालीं. विद्यार्थी-शिक्षकांनीं एक-मुखानें म्हटलें कीं, 'प्राचार्यांच्या खुर्चीला साजेसा पाठ झाला.' या पाठाचा परिणाम त्यांचेवर इतका झाला होता कीं कॉलेजच्या वसति-गृहांतील वृक्ष तोडण्यास सर्वच लाकूडतोडे गोळा झाले आहेत कीं काय असा कांहीं रात्रीं भास होत असे. पाठानंतर वर्षअखेर असा एकही दिवस सुना गेला नाहीं कीं कोणी 'घे कुठार' गुणगुणली नाहीं. पण याहीपेक्षा, विद्यार्थिनींचा आलेला अनुभव अधिक भूषणावह वाटतो. अनुभव नवा नव्हता. मुंबईच्या एल्फिन्स्टन हायस्कूलमधील इ. ३ रीच्या मुलांच्या अनुभवासारखाच तो होता. सध्याकाळीं फिरावयास जात असतांना एका विद्यार्थिनीनें आपल्या मैत्रिणीस माझी ओळख 'घे कुठार' म्हणून करून दिल्याचें मी ओझरतें ऐकलें.

या दोन प्रसंगांच्या अनुभवानें 'पद्य कसें शिकवावें' हेंच पुस्तक लिहीण्याचें मी निश्चित केलें. यांतच आणखी एका नवीन कारणाची भर पडली. गतवर्षी बी. टी. च्या अभ्यासक्रमांत आमूलाग्र बदल झाला. बी. टी. च्या विद्यार्थ्यांना आतां दुय्यम शाळांबरोबरच प्राथमिक शाळां-तील मुलांना शिकविण्याची पाळी आली. त्यामुळें पद्याबरोबरच लोक-गीतें व अभिनय गीतेंही त्यांना शिकवावीं लागलीं. या गीतांच्या पाठपद्धतीची कल्पना कोणीही कोठेंही दिल्याचें निदर्शनास आलें नाहीं. पद्य-पाठाच्या गतानुगतिक पद्धतीच्या पार होण्याचा विडा अगोदरच उचललेला होता. त्यांत ही आणखी नवी भर पडली. त्याकरितां मोठमोठे ग्रंथ वाचण्याच्या फंदांत मी पडलों नाहीं. गेल्या सतरा वर्षांत अधूनमधून बरेंचसें वाचन झालें होतें. अधिक वाचन न करण्याचीं कारणें अनेक आहेत. एकतर या विषयावर योग्य असे ग्रन्थ मराठींत नाहींत असें म्हटल्यास चुकीचें होणार नाहीं. शिवाय इंग्रजींतील या विषयावर ग्रंथ वाचून फारसा फायदा होण्यासारखा नाहीं असें पूर्वीच अनुभवास

आलें होतें. तसेंच भरमसाट वाचण्यापेक्षां निरीक्षण व मनन यांचा उपयोग आयुष्यांत पदोपदीं होतो असेंही दृष्टोत्पत्तीस आलेलें होतें. तेव्हां जें सुचलें तेंच या ठिकाणीं लिहीलें, जें पडताळून पाहिलें तेंच रेखाटलें, जें मनाला पटलें तेंच कागदावर उमटवलें.

काव्य ही काय चीज आहे हें मला माहीत नाहीं. तें कशाशीं खातात याची जाणीव मला नाहीं. काव्य कधीं मला स्फुरलें नाहीं. पण जें दुसऱ्यांना स्फुरलें तें माझ्या हृदयाला जाऊन भिडलें. त्यामुळेंच या पुस्तकाचा मालमसाला तयार झाला. हा मालमसाला बहुधा प्रवासांत तयार झाला. प्राथमिक किंवा दुय्यम शाळांची वार्षिक तपासणी करीत असतांना शिक्षकानें दिलेल्या परिणामकारक पद्य-पाठानें मन वेडावून जायचें. आणि तीच कविता प्रवासांत कळत न कळत गुणगुणली जायची. घोड्यावरून दौड मारतांना किंवा रेल्वेंतून प्रवास करतांना पाहाण्यांत येणाऱ्या नयनमनोहर देखाव्यांनीं या गुणगुण्यांत अधिकच गोडी लागायची. चांदण्या रात्रीं होडींत उताणे पडून निसर्गाची लयलूट करतांना पद्य नेहमींच साद देत असे. मोटारचें चाक ( स्टीअरिंग ) हातांत धरतांनाही पद्याचा कधीं विसर पडला नाहीं.

माझ्या या पद्याच्या आवडीचा वास बऱ्याच कार्यक्षम शिक्षकांना लागला होता. तिचा परिणाम शिक्षक-संमेलनांतही दिसून येऊं लागला. शिक्षक-संमेलन म्हटलें कीं पद्याचा पाठ असलाच पाहिजे असें जवळ जवळ ठरल्यासारखें होतें. अशा संमेलनांतूनही या पुस्तकाचा मालमसाला तयार झाला. पाठ-साहित्याचें थोतांड पद्य-पाठांतून कमी केलें पाहिजे ही कल्पना एका संमेलनानेंच दृढ केली. आणि प्राथमिक शिक्षकांच्या अंत:करणाची ओळखही एका संमेलनानेंच करून दिली. पूर्व खानदेशांतील चोपडे गावापासून सात आठ मैलावर असलेल्या हातेड गांवीं एक शिक्षक संमेलन भरलें होतें. गांवचे लोक शिक्षणप्रिय असल्या-

पद्य शिकविण्यास कुचकामी आहे असें वाटण्यापर्यंत बहुतेक गद्दई-शिक्षकांचे पाठ पडले. पण त्याबद्दल विशेष आश्चर्य वाटलें नाहीं आश्चर्य वाटलें तें कवि शिक्षकांना आलेल्या अपयशाबद्दल. सर्वसाधारण माणसापेक्षां कवींचे अंत:करण संवेदनाक्षम असतें असें मानलें जातें. त्यामुळें स्वत:ची कविता शिकवितांना भावनांच्या हिंदोळ्यावर विद्यार्थ्यांसह बसून बेहोशपणें कवि-शिक्षक झोके घेतील असें वाटलें होतें. घडलें मात्र उलट. पद्यांत भावना मोहरल्या असतांना पाठांत मात्र त्यांच्या अभावानें चुकल्या चुकल्यासारखें वाटत होतें. कवि जसा जन्मजात असावा लागतो, तसा शिक्षकही जन्मजात असावा लागतो. उत्तम कवि उत्तम शिक्षक होईलच असें सांगता येत नाहीं असेंच या अनुभवावरून म्हणावेंसें वाटतें. या अनुभवावरून अशी शंका येते कीं काव्य सहजस्फूर्त असतें कीं श्रमसाध्य असतें. काव्य सहजस्फूर्त असल्यास कवीला निदान स्वत:चें काव्य परिणामकारकपणें शिकवितां आलें पाहिजे असें म्हटल्यास वावगें होणार नाहीं. ज्यांना तसें जमत नाहीं त्यांचें काव्य प ला प आणि ट ला ट जुळवूनच केलेलें असावें असेंच वाटूं लागतें. तें कांहीं असलें तरी एक गोष्ट मात्र खरी कीं कवि हा शिक्षक होऊं शकत नाहीं.

अशा तऱ्हेनें या पुस्तकाचा मालमसाला गेलीं सतरा वर्षें तयार होत होता. या मसाल्यांत स्वानुभवाचें मीठ असल्यामुळेंच तो रुचकर होईल अशी जरी खात्री असली तरी तो सर्वांनाच एकदम आवडणार नाहीं ही भीति जराशी वाटत होती. ही भीति इतिहासाचे अध्यापनावरील पुस्तकानें कमी केली हें मागें सांगितलेंच आहे. तो अनुभव या पुस्तकाचे बाबतींतही येईल अशी अपेक्षा आहे.

पुस्तक लिहावयास घेतांना मात्र दुसरी एक नवीन भीति वाटूं लागली. काव्याला साजेशा भाषेंत आपणास पुस्तक लिहीतां येईल कीं नाहीं हीच ती भीति होय. काव्याच्या पुस्तकाची भाषा काव्यमय

असावी या कल्पनेंतूनच या भीतिचा जन्म झाला. पुस्तकाची भाषा काव्यमय आहे कीं नाहीं तें मला माहीत नाहीं. मी एवढेंच सांगू शकतो कीं त्यांतील शब्द हे अंतरीचे बोल आहेत. ते वाचकांच्या अंतःकरणाला जाऊन भिडावेत येवढीच इच्छा.

एवढ्याशा लहान पुस्तकाला एवढी लांबलचक प्रस्तावना कदाचित् शोभून दिसणार नाहीं. त्यामुळें मला 'ग' ची बाधा झाली आहे असा कोणाला वास येण्याचा संभव आहे. अहंगंडाची घृणाही कोणाला येईल. पण तसा कोणी गैरसमज करून घेऊं नये असें मला नम्रपणें सांगावेंसें वाटतें. मी नुसतें माझें अंतःकरण खोललें व अंतरंग दाखविलें. हेतु हा कीं अंतरंगाच्या ओळखीनें शिक्षणाचे रंग वाचकांच्या हृदयपटलावर चांगले फासले जावेत.

प्रकाशक मुद्रकांचे आभार मानण्याचा पायंडा इतका पडला आहे कीं त्याला कायद्याचें स्वरूप प्राप्त आलें आहे. असे आभार न मानल्यास मी गुन्हेगार ठरण्याचा संभव आहे. पण प्रकाशक पडला घरचा आणि घरांत औपचारिकतेला स्थान नाहीं. तसेंच मुद्रक श्री. के. आर. मोहिते यांनीं इतकें सुबक काम आपुलकीनें केल्यानंतर त्यांना असा परकेपणा दाखवावयाचा कीं काय हाही एक प्रश्नच आहे. अशा कोंडींत मी सांपडलों आहे. ही कोंडी कोण फोडील ?

ज्या हेतुनें ही कलाकृति मी शिक्षक-क्षेत्रांतील जनसमुदायापुढें ठेवीत आहे, तो हेतु तडीस जाऊन गुरुशिष्यांना काव्यानंद लुटावयास मिळून ते सुखी होवोत हीच माझी त्या दयाघन परमेश्वराजवळ शेवटची प्रार्थना. यापेक्षां अधिक मी काय करू शकतो !

विजयादशमी, शके १८७७

विश्वास, शाहूपुरी-कोल्हापूर.
२६।१०।१९५५

लेखक

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | पद्य–शिक्षणाचा हेतु | १७ |
| २ | पद्य कसें शिकवावें<br>( प्रस्तावना व हेतु-कथन ) | ३५ |
| ३ | पद्य कसें शिकवावें [ पुढें चालू ]<br>( पद्यगायन, मूक-वाचन, हेतु-प्रश्न व पद्याचें स्पष्टीकरण ) | ५५ |
| ४ | पद्य कसें शिकवावें [ पुढें चालू ]<br>( रसग्रहण व गृहपाठ ) | ७७ |
| ५ | बाहेरील पद्य व त्याची पाठपद्धति | ८६ |
| ६ | लोकगीत व त्याची पाठपद्धति | १०२ |
| ७ | अभिनय-गीत व त्याची पाठपद्धति | १४१ |
| ८ | पद्य-पाठाचें साहित्य | १५५ |
| ९ | पद्याचा इतर विषयाशीं समन्वय | १६६ |
| १० | पद्याच्या आवडीचा विकास कसा करावा | १७८ |
| ११ | पद्याचा शिक्षक कसा असावा | १९१ |

रा. क्र. ८६३५

# १: पद्य-शिक्षणाचा हेतु

मानवी जीवन हें एक महान् संगीत आहे. मानवी आयुष्य हें एक महाकाव्य आहे. मातेच्या मांडीवर किंवा पाळण्यांत रजवून टाकणारीं शिशु-गीतें, प्रियाराधनेंत पृथ्वीला स्वर्गतुल्य करणारीं प्रियकर प्रेयसीचीं प्रेमगीतें, स्वदेशाचें, पितृभूमीचें पांग फेडण्याकरितां आपलें तेजस्वी रक्त सांडणाऱ्या रणधुरंधराच्या शौर्यानें ओतप्रोत भरलेलीं रण-गीतें, मानवाच्या हृदयांतील खळबळ दिग्दर्शित करून हृदयें हलविणारीं भावगीतें, हृदयें विदारणारीं शोकगीतें, दयाघन परमेश्वराला आळविणारीं भक्ति-गीतें, अशा गीतांचें हें आयुष्याचें महाकाव्य बनलें आहे. साहजिकच मनुष्य वेळीं अवेळीं कळत न कळत हें काव्य गुणगुणत असतो.

या गुणगुणण्यांतच मानवाचें सुखसर्वस्व भरलेलें आहे. या गुणगुणण्यानें तो स्वतःचीं व इतरांचीं अंतःकरणें नाचवतो. या गुणगुणण्यानें तो दुःखाच्या खाईतून वर येतो व दुःखाचे डोंगरही चढून जातो. या गुणगुणण्यांत तो पृथ्वीवर स्वर्गाची उभारणी करतो, आणि गुणगुणतच तो इहलोकची यात्रा संपवितो.

काव्य मानवी जीवनाचा अजोड असा एक मोठा आधार आहे, ओलावा आहे, अमृत आहे, संजीवनी आहे, सर्व कांहीं आहे. या आधाराच्या जोरावर दुःखाचे अफाट सागर मनुष्य तरून जातो. या ओलाव्यामुळें तो आपलें रखरखीत जीवन टवटवीत करतो. या संजीवनीमुळें तो आपल्या अमोल ध्येयसिद्धीकरतां धडपडत असतो. या अमृताच्या घुटक्यामुळेंच तो अमर होतो.

मानवाच्या जन्माबरोबरच, काव्याचा जन्म झाला. त्याच्या उत्पत्तीमध्येंच काव्याचें बीज लावलें गेलें. त्याच्या भल्या-बुऱ्या अनु-

भवांत या बीजाला अंकुर फुटले. त्याच्या आनंदाश्रूचें व दु:खाश्रूचें सिंचनानें त्याचें टवटवीत रोपटें झालें. त्याच्या घामाचें खत या रोपट्यास मिळालें. रोपटें फोफावलें, झाड बनलें. या झाडाच्या शीतल छायेत मानव आपलें जीवन कंठू लागला.

मानवाची काव्याविषयींची आवड अशी नैसर्गिक आहे. आदि-मानव जन्मास आला, त्यावेळीं त्याला भाषा अवगत नव्हती. भाषेचा ठेवा त्याला कालांतरानें मिळाला. भाषेच्या अभावामुळें त्याचें फारसें अडलें नाहीं. त्याचे व्यवहार बंद पडले नाहींत. ते चालूच होते. तो भावनोत्कट झाला म्हणजे निरनिराळ्या आवाजांचे व वेगवेगळ्या सुरांचे प्रलाप काढी, हे प्रलाप म्हणजेच त्याचें काव्य. हे प्रलाप आज जरी आपणांस असंबद्ध वाटत असले तरी त्यांना अर्थ होता. त्यांत संगीत होतें, काव्य होतें.

या प्रलापांना काव्य म्हणण्यांत मी मोठी चूक करतो असें कोणास वाटण्याचा संभव आहे. पण जरा जगरहाटीकडे नजर फेकली, जरा खोलवर विचार केला तर या विधानांची सत्यता पटण्यास कठीण जाणार नाहीं. लहान मूल, त्याला बोलतां येत नसतें. बोलण्याचा अर्थही त्याला कळत नसतो. पण तें एकदां रंगांत आलें म्हणजे चित्रविचित्र आवाज काढून स्वत:चें व इतरांचें रंजन करतें. तेंच त्याचें काव्य. यापेक्षांही लहान मुलाची गोष्ट घ्या. ज्याला निरनिराळे आवाज काढतां येत नाहींत, ज्याचें हसणें अकारण असतें, हातपाय हालवणें हाच ज्याचा खेळ असतो, असें मूल घ्या, आणि त्याच्यापुढें हातवारे करून सुंदर भाषण करा. या भाषणानें तें रडण्याचाच अधिक संभव. फार तर तें भाषण करणाऱ्याकडे टक लावून बघेल किंवा हसेल. पण हातपाय नाचवणार नाहीं कीं ठेका धरणार नाहीं. याच्या उलट त्याच्यापुढें ग्रामोफोन लावा, रेडिओ लावा किंवा स्वतः गाणें म्हणा. गाणें सुस्वर

असेल तर तें आपल्या पायानें ठेका धरील, ताल धरील. या त्याच्या कृतीला मानवाची काव्याविषयींची नैसर्गिक आवड कारणीभूत होते हें स्पष्टच आहे मानसशास्त्राच्या दृष्टीनेंही या कृतीचा कांहीं वेगळा अर्थ होत नाहीं. माणसाच्या आयुष्यांत मानवाच्या विकासांतील टप्प्यांची पुनरावृत्ति होत असते असें म्हणतात. या दृष्टीनें बाल्यावस्था ही मानवाच्या जन्मानंतरची पहिली अवस्था. तेव्हां या अवस्थेंत आदि-मानवाच्या जीवनाचें प्रतिबिंब पडत असल्यास त्यांत आश्चर्य वाटण्याजोगें कांहीं नाहीं.

मानवामध्येंच काव्याची आवड आहे असें नाहीं. पशु-पक्ष्यां-मध्येंही ती दिसून येते. बुलबुल सुस्वर गातो. कोकीळा तर संगीताची राणी. तिचें गाणें मनुष्यालाही मोहून टाकतें. या तिच्या गाण्यांतील अर्थ आपणांस समजत नाहीं म्हणून त्यांत कांहींच अर्थ नाहीं, तें गाणेंच नव्हे, तें फक्त स्वरच आहेत असें म्हणतां येणार नाहीं. तसें असतें तर विवक्षित ऋतुमधील विवक्षित काळांतच ती असें गाणें म्हणाली नसती. बाराही महिने म्हणाली असती. तिच्या भावनांची उत्कटता विविक्षित ऋतुच्या आगमनानें होत असल्यामुळें ती त्याच कालांत गाणें म्हणणें साहजिकच आहे. दुसरें असें कीं, समजण्याचीच कसोटी इतर प्राण्यांनीं मनुष्याच्या गाण्यास लावली तर त्यांनाही त्याचें गाणें नुसते स्वरच वाटण्याचा संभव आहे. असा समजुतीचा घोटाळा दुसऱ्याची भाषा अवगत नसल्यामुळें होण्याचा संभव आहे.

माणूस जरी इतर प्राण्यांच्या भाषा शिकण्यांत मागासलेला असला तरी कांहीं प्राण्यांनीं मनुष्याची भाषा शिकण्यांत बरेंच यश मिळविलें असावें असें वाटतें. निदान मनुष्याच्या विवक्षित सुरांना प्राण्यांच्या भाषेंत विशिष्ट अर्थ असण्याचा संभव दाट आहे. श्रीकृष्ण बासरी वाजवीत असे. बासरीच्या नादमाधुर्यानें त्याचेभोंवती त्याचे खेळगडी

जमा होत, गोपींचा गराडा पडे, तसा गाईंचाही वेढा पडे. पुंगीवर नाग डोलतो ही नुसती ऐकीव गोष्ट नाहीं. सर्वांनीं ती पाहिलेली आहे. यावरून मानवादि सर्व प्राण्यांमध्यें काव्याची आवड नैसर्गिक आहे असेंच सिद्ध होतें.

मानवाची काव्याविषयींची आवड अभिजात आहे, त्याच्या जन्माबरोबरच काव्य जन्मास आलें, हें सर्व खरें असलें तरी त्यावरून काव्याच्या स्वरूपावर फारसा प्रकाश पडत नाहीं. काव्य म्हणजे काय या प्रश्नाचा खुलासा होत नाहीं. काव्याच्या प्रकृतीची नीटशी कल्पना येत नाहीं. काव्याची व्याख्या करण्याचे अनेकांनीं प्रयत्न केले. पण ते यशस्वी झाले असें म्हणवत नाहीं. या प्रयत्नांत काव्याच्या कोणत्या तरी एका अंगाचा विचार केल्याचें आढळून येतें. वस्तुच्या एका भागाचें वर्णन केल्यानें जशी त्या वस्तुची पूर्णपणें कल्पना येत नाहीं, माणसाच्या एका अवयवाच्या वर्णनानें जशी त्याच्या व्यक्तित्वाची ओळख होत नाहीं, तसेंच काव्याच्या एखाद्या अंगाच्या खुलाशानें त्याच्याविषयीं पूर्ण कल्पना येत नाहीं. अर्थात् याबद्दल काव्याचें स्वरूपदर्शन करून देणाऱ्यांना दोष देणें उचित होणार नाहीं. त्यांना जसें दर्शन झालें तें त्यांनीं सांगितलें. काव्याचें स्वरूपच एवढें अफाट आहे, अमर्याद आहे, विराट आहे, अस्पष्ट आहे कीं त्याचें समग्र दर्शन साध्यासुध्या व्यक्तींना होणें कठीण आहे. आणि असें दर्शन क्वचित् एखाद्याला झालें तरी तें अननुभविक विद्यार्थी–विद्यार्थीनींना करून देणें हें त्याहूनही महाकठीण कर्म आहे.

काव्याचें समग्र दर्शन होणें आणि तें इतरांना करून देणें अवघड काम असलें तरी त्याचा असा अर्थ नाहीं कीं त्याच्या दर्शनाचा प्रयत्न कोणी करूं नये. काव्याचें स्वरूप रेखाटण्याचे पुष्कळांनीं आपापल्या मगदुरानुसार व कल्पनाशक्तिनुसार प्रयत्न केले आहेत. त्यांपैकीं कोणास रचनेंत काव्य साठवलेलें आहे असें दिसलें, तर कोणास विशिष्ट शब्दांत व

मोहक अलंकारांत काव्याची पायवाट दिसते. आणि कोणास निर्दोष व अचुक शब्दरचनेंत काव्याचें मर्म प्रतीत होतें. विशिष्ट रचना काव्याला आवश्यक आहे, पोषक आहे हें म्हणणें जितकें निर्विवाद आहे तितकेंच त्या रचनेला काव्य म्हणून संबोधणें सदोष आहे, चुकीचें आहे. विशिष्ट शब्दांनीं काव्याचें स्वरूप खुलतें, त्याला तजेला येतो हें नाकबूल करून चालणार नाहीं. निरनिराळ्या अलंकारांनीं काव्याचा सौंदर्यविकास होतो तें गोंडस दिसतें, गुटगुटीत दिसतें हेंही नाकबूल करण्यांत अर्थ नाहीं. पण या शब्दांना व अलंकारांनाच काव्य म्हणून उराशीं धरणें मात्र चुकीचें आहे. त्यामुळें काव्याच्या भोंवती आभास निर्माण होऊन निराशा पदरीं पडण्याचाच दाट संभव. रचना हा काव्याचा सांगाडा आहे, शरीर आहे, कुडी आहे. विशिष्ट शब्द व मोहक अलंकार हे या सांगाड्यावरचे दागिने आहेत. नुसत्या सांगाड्याला किंवा त्यावरील साजाला किंमत नाहीं. या साजासहित सांगाड्याला किंमत यावयाची असेल तर त्यांत आत्म्याचें अधिष्ठान पाहिजे. आत्म्याशिवाय कुडी केवळ माती ठरते. तसेंच भावनामय विचाराशिवाय रचना निव्वळ कस्पटासमान आहे. तो एक मनुष्याच्या मनाची भुरळ आहे.

काव्यांतील शब्दरचना व अलंकार यांनीं दिपून जाणारे जसे कांहीं लोक आहेत तसेच त्यांतील रस व ध्वनीमुळें गुंगून जाणारेही लोक आहेत. असे लोक काव्यांतील अमाप रसस्वादानें इतके बेहोष होतात, त्यांतील ध्वनिमाधुर्यानें इतकें मोहून जातात कीं ते या रसांना व ध्वनींनाच 'काव्य' 'काव्य' म्हणून डोक्यावर घेऊन नाचतात. अशा बेताल लोकांना कळत नाहीं कीं स्वर माधुर्याची काव्याला आवश्यकता असली तरी त्याचें अटळ व अढळ स्थान संगीत आहे. संगीताला काव्यामध्यें मानाचें स्थान असलें तरी संगीत काव्य होऊं शकत नाहीं. काव्याची जागा संगीत कदापि घेऊं शकणार नाहीं.

संगीताच्या फेऱ्यांत सांपडून त्याच्या कैफानें वाट चुकणारे रसिक जसे आढळतात तसेंच नीरस व फाजील वास्तवतावादी अरसिकही जगांत मोठ्या प्रमाणांत आढळतात. अशा लोकांच्या मतें काव्य म्हणजे केवळ मानवी जीवनावरील टीका आहे काव्यामध्यें मानवी जीवनाची टीका अधुनमधून येते, नाहीं असें नाहीं. पण त्यामुळें समग्र काव्यच टीकाग्रंथ होऊं शकत नाहीं. काव्याला टीकाग्रंथाचें स्वरूप देणें म्हणजे त्याचेवर मोठा अन्याय करण्यासारखें आहे. टीकाच करावयाची झाली तर ती पद्यांत करण्याचीही फारशी जरूरी नाहीं. ती गद्यांतही होऊं शकतें. एवढेंच नव्हे तर गद्यांत ती अधिक भेदक व परिणामकारक होण्याचा संभव आहे. कारण गद्य व टीका या उभयतांचें स्वरूप बरेचसें मिळतें जुळतें आहे.

काव्य म्हणजे केवळ मोहक रचना नाहीं, शब्दसंपदा नाहीं, नेत्र-दीपक अलंकार नाहीं, निशा चढविणारे रस नाहींत कीं गुंगून टाकणारे सुस्वर नाहींत. हें खरें असलें तरी या नकाराच्या पाढ्यानें काव्याचें स्वरूप उकलण्यास मदत होत नाहीं. उलट काव्याचें स्वरूप उलगडणें फार कठीण आहे असें वाटूं लागतें. आणि त्याची व्याख्या करणें अगदीं अशक्य वाटतें. पण तें वाटतें तितकें कठीण मात्र नाहीं. ज्यांनीं काव्य थोडेंफार वाचलें आहे, त्याचा अमृतानुभव घेतला आहे तो चटकन सांगेल कीं काव्याचें सिंहासन भावना आहे. भावनांच्या हिंदोळ्यावर काव्याची प्रतिष्ठापना झाली आहे. भावना काव्याचा आत्मा आहे. आणि हें म्हणणें मान्य केल्यास काव्याचें स्वरूप आपोआप स्पष्ट होतें. भावनांचें उगमस्थान अंतःकरण आहे. अंतःकरणांत भावना एकवटल्या, हसूं खेळूं लागल्या, नाचूं बागडूं लागल्या, पिंगा घालूं लागल्या, थैमान मांडूं लागल्या कीं काव्याचा जन्म होतो. काव्य दुसरें तिसरें कांहीं नसून 'अंतःकरणाचा उमाळा' आहे. हा अंतःकरणाचा उमाळा ज्या

मानानें उफाळून निघेल त्यावर काव्याची सरसता अवलंबून असते. भावनांनीं अंतःकरणाचा बांध फोडून बेफाम वेगानें त्या उफाळू लागल्या म्हणजे जिवंत काव्य जन्मास येतें, चिरंतन काव्याची निर्मिती होते.

काव्याला अंतःकरणाचा उमाळा म्हटल्यानंतर साहजिकच असा प्रश्न विचारला जाण्याचा संभव आहे कीं काव्यामध्यें शब्दरचनेला कांहीं महत्त्व आहे कीं नाहीं ? काव्य भावनांचा खेळ असला तरी या खेळाचें तोंड वाचाच उघडतें कीं नाहीं ? मग काव्याला अंत:करणाचा नुसता उमाळा म्हणून कसें चालेल ? वर वर विचार केल्यास या प्रश्नांचीं उत्तरें देणें कठीण आहे, एवढेंच नव्हे तर शब्दरचनेची महति मान्य करणें भाग आहे. पण जरा खोल विचार केल्यास या प्रश्नांतील मर्म उमगून त्यांचीं उत्तरें देणें अगदीं सोपें आहे. काव्यामध्यें भावना व शब्दरचना या दोघांनाही स्थान आहे. पण त्यांत भावनेस फार उच्च स्थान असून शब्दरचनेस तितकेंच गौण स्थान आहे. एखादा पंडित आपल्या शब्द-भांडाराचें प्रदर्शन करीत भावनाविरहित काव्यरचना करू लागला तर ते खरेंखुरें काव्य होणार नाहीं. नुसतें 'प' ला 'प' व 'ट' ला 'ट' जुळवून काव्याची निर्मिती होत नाहीं. या उलट एखाद्याजवळ शब्दसंपत्ति थोडी असली आणि अंत:करणांत भावनांचा सुळसुळाट झाला, खळखळाट झाला तर हा खळखळाट त्याच्या जीभेवर कल्पनातीत नवलपूर्ण शब्द नाचावयास लावतो अगोदर भावना, नंतर भाषा हा नैसर्गिक नियम आहे. अशिक्षित बाई जात्यावर बसली आणि जीवनांतील सुखदुःखाच्या प्रसंगांनीं तिच्या भावना उचंबळून आल्या कीं जिवंत काव्याची सरिता तिच्या तोंडांतून वाहू लागते. मूल जन्मास येतें तें भावना बरोबर घेवून येतें, भाषा घेवून येत नाहीं. आदिमानव जन्मास आला त्यावेळीं भाषेचें अस्तित्व नव्हतें. त्याच्या भावनामय प्रलयांतून भाषेचा जन्म झाला. भावना आणि भाषा यांमध्यें असें जमीन अस्मानाचें अंतर आहे, दोन ध्रुवांइतकें अंतर आहे. त्यांचें हें अंतर काव्यामध्येंही कायम आहे.

भावनांचा प्रभाव असा महान् आहे. पण या प्रभावी भावनांचा खळबळाट अंतःकरणांत कां निर्माण होतो ? अंतःकरण सागरासारखें आहे. तें फार खोल आहे. त्याच्या तळाशीं कल्पनातीत शांतता पसरली आहे. त्याचा पृष्ठभाग तसा अशांत दिसत नाहीं. पण त्याच्या जीवनांत वादळ सुरू झालें कीं ही अमर्याद शांतता चुटकीसरशी एका क्षणांत कोठच्या कोठें लोपून जाते आणि तिची जागा अक्राळविक्राळ भावना बळकावून बसतात. भावनांच्या या तांडवनृत्यानें समुद्रमंथन होतें आणि त्यांतून काव्याचें रत्न लाभतें. सागरासारख्या विशाल व शांत अंतःकरणाला हेलकावे देण्याचें, त्यांत वादळ निर्माण करण्याचें कार्य मानवी जीवन व त्यांतील सुखदुःखाचे प्रसंग करीत असते. तेव्हां काव्याचा विषय दुसरा तिसरा कांहीं नसून सुखदुःखाच्या हिंदोळयावरील मानवी जीवन हाच आहे. मानवी जीवन इतकें व्यापक आहे, विशाल आहे, अफाट आहे, अमर्याद आहे कीं त्याचा थांगपत्ता लागत नाहीं. मानवी जीवनाच्या या अथांग व अतर्क्य स्वरूपामुळें सर्व मानव जातीनें युगानुयुगें काव्य केलें तरी तिला विषयाची वाणवा कदापि भासणार नाहीं. मानवी जीवनाचा झरा जोपर्यंत जिवंत आहे तोपर्यंत काव्याची नदी सुकणार नाहीं. जगाच्या अंतापर्यंत ती सतत वाहतच राहील.

मानवी जीवन व शिक्षण यांचा संबंध फार निकटचा आहे. जीवनाचें प्रतिबिंब शिक्षणांत पडतें. आणि शिक्षण जीवन विकसीत करण्यास कारणीभूत होतें. जीवन व शिक्षण यांमधील क्रिया व प्रतिक्रिया सतत चालू असतात आणि त्यामुळेंच मानव आपला अखंड 'प्रगतिपथ अविरतपणें चालवूं शकतो. मानवी जीवन काव्याचा विषय असल्यामुळें त्याचाही संबंध शिक्षणाशीं येऊन मानवाला आपल्या प्रगतीचा मार्ग चोखाळण्यास त्याची चांगलीच मदत होते. सर्वसाधारणपणें 'मानवी जीवन सुखी करण्याकरितां, समृद्ध करण्याकरितां काव्याचा उपयोग होत

असला तरी त्यामुळें काव्यशिक्षणाच्या विशिष्ट हेतूंची पूर्ण कल्पना येत नाहीं. काव्यशिक्षणाच्या विशिष्ट हेतुवर त्याचें शिक्षणक्षेत्रांतील स्थान अवलंबून असल्यामुळें साधकबाधक रीतीनें त्याचा उहापोह करणें अत्यावश्यक आहे.

काव्यशिक्षणाचे किंवा पद्यशिक्षणाचे अनेक हेतु अनेकांनीं प्रतिपादिले आहेत. त्यांपैकीं ज्ञानार्जन हा प्रमुख हेतु मानला जातो. पण हा हेतु मान्य करण्यांत बऱ्याच अडचणी असून त्यांकडे दुर्लक्ष करून तो मान्य केल्यास पद्याविषयीं दिशाभूल होण्याचा संभव आहे. पद्यशिक्षणानें ज्ञानामध्यें भर पडते हें निर्विवाद आहे. पण त्यामुळें ज्ञानार्जन पद्यशिक्षणाचा हेतु होऊं शकत नाहीं. कारण ज्ञानार्जनाकरितां पद्यापेक्षां इतर विषयांचाच उपयोग अधिक होतो असा अनुभव आहे. ज्ञानाचा जेवढा साठा अर्थशास्त्र, राजकारणशास्त्र, समाजशास्त्र, नागरीकशास्त्र, इतिहासादि गद्य विषयांमध्यें सांपडतो त्याच्या कितीतरी हिश्यानें कमी पद्यांत आढळतो. तेव्हां केवळ ज्ञानार्जनाकरितां हे विषय शिकणें अधिक श्रेयस्कर आहे. या पलीकडे जाऊन म्हणावयाचें झाल्यास केवळ ज्ञानार्जनच करावयाचें झाल्यास नुसत्या ज्ञानकोशाचा अभ्यास केला तर पद्यशिक्षणापेक्षां कितीतरी पटीनें अधिक ज्ञान त्यापासून मिळेल व पद्याकडे ढुंकून बघण्याचीही जरूरी भासणार नाहीं.

वरील विवेचनावरून पद्याचा हेतु ज्ञानार्जन आहे असें मानणाऱ्यांची कांहीं तरी गफलत झाली आहे, गैरसमजूत झाली आहे, दिशाभूल झाली आहे हें स्पष्ट आहे. या गैरसमजुतीचा उगम पद्यानें एकेकाळीं गाजविलेल्या अधिराज्यांत आहे. पुरातनकाळीं मुद्रणकला मानवाला अवगत नव्हती त्यामुळें गद्यापेक्षां पद्यांत फार मोठ्या प्रमाणांत ज्ञान साठविणें शक्य असे. या पद्यातील ज्ञानाचें लोण पाठांतरानें एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे सहजगत्या जात असे. पद्याच्या उपयुक्ततेमुळें पद्य

ज्ञानार्जनाचें एक प्रमुख साधन बनलें. पद्यरचनेचा हेतुही ज्ञानार्जन व ज्ञानदान असे. पण पुढें मानवानें आपल्या बुद्धिसामर्थ्यावर अनेक अजब शोध लाविले. त्यांत मुद्रणकलेचा शोध लागला. या शोधामुळें गद्य-वाङ्मयाचा प्रसार झपाट्यानें झाला. गद्यामुळें सर्वसाधारण जनतेला ज्ञानार्जन करणें अधिक सोपें झालें. आणि ज्ञानार्जनांतील पद्यरचनेच्या स्थानाला सुरुंग लागून तें अस्थिर झालें. मुद्रणकलेच्या परिणामकारक शोधानें ज्ञानार्जनाच्या साधनांत घडवून आणलेली क्रांति कित्येकांना स्पष्टपणें कळून न आल्यामुळें पद्यरचनेच्या मूळ हेतुवरच ते चिकटून बसले असें म्हणण्यास प्रत्यवाय दिसत नाहीं. शिवाय असा हेतु पद्यास चिटकवतांना पद्यांतील भावनांच्या अढळ स्थानाकडेही त्यांचें दुर्लक्ष झालें असें म्हटल्याशिवाय राहावत नाहीं यावरून ज्ञानार्जन हा पद्य-शिक्षणाचा हेतु आजच्या काळांत मानणें अयोग्य आहे याची निराळी ग्वाही देण्याचें कारण उरत नाहीं.

प्राचीन काव्याध्ययनाची पूर्वतयारी करणें हा एक पद्य-शिक्षणाचा दुसरा हेतु कांहीं थोड्या लोकांकडून पुढें मांडला जातो. आधुनिक काव्याबरोबर प्राचीन काव्य शिकणें आवश्यक आहे. प्राचीन काव्याच्या अभ्यासानें अवघड शब्दांची ओळख होऊन शब्दसंपदा वाढते, त्यांतील अन्वयार्थांच्या व्यायामानें मेंदूला बळकटी येते, त्यांतील सुभाषित रत्नांच्या लुटीवर वक्तृत्वाचा नवा ससार उभारता येतो, त्यांतील नीतितत्त्वांनीं व्यक्ति व समाज यांच्या स्वैर वर्तनाला आळा बसून दोघांचीही नैतिक पातळी वाढते, असे अनेक मुद्दे प्राचीन काव्याच्या अभ्यासाला चालना देण्याकरितां पुढें मांडण्यांत येतात. यांतील कांहीं मुद्दे पटण्यासारखेही आहेत. पण प्राचीन काव्यशिक्षणाच्या आवश्यकतेबद्दल कोणाचेंही दुमत नाहीं. तें शिकविलें गेलें पाहिजे असेंच कोणीहि म्हणेल. प्रश्न आहे तो काव्य-शिक्षणाच्या हेतुबद्दल. काव्यशिक्षणाच्या हेतुबद्दल विचार करितांना प्राचीन

काव्यशिक्षणाचे पुढें मांडलेले हेतु फारच तोकडे पडतात असें निदर्शनास येतें. इतर साधनांनींही शब्दसंपत्ति वाढविता येते. इतर बौद्धिक विषयांच्या अभ्यासांनीं मेंदूला खाद्य पुरवतां येतें. त्याकरितां प्राचीन काव्या-ध्ययनाची आवश्यकता नाहीं.

दुसरें असें कीं या विचारसरणींत एक मोठा दोष दडून बसला आहे. त्यांत काव्याचा हेतु ठरवितांना त्याची चिरफाड करून प्राचीन काव्य व आधुनिक काव्य असे दोन अलग भाग केलेले आहेत. आणि एका भागाची ओळख करून देण्याकरितां दुसरा भाग शिकवावयाचा असें प्रतिपादिलें आहे. म्हणजे नवें काव्य शिकविण्याचा हेतु जुन्या काव्याच्या अभ्यासाला लागणारी पार्श्वभूमि तयार करणें असा स्पष्ट सांगितला आहे. असा हेतु स्वीकारतां येणार नाहीं. त्याला कारणेंही अनेक आहेत. एकतर जुनें काव्य व नवें काव्य यांमध्यें फार मोठें अंतर आहे. त्यांमध्यें साम्य फारसें नाहींच म्हटलें तरी चालेल. एकामध्यें अवघड शब्दांचा भरणा तर दुसऱ्यामध्यें वेड लावणाऱ्या शब्दांची कसरत. एकामध्यें वृत्तांचें अवडंबर माजवून त्याच्या पोलादी कवचामध्यें काव्याला जखडून टाकलेलें दिसतें तर दुसऱ्यांचें हें कोंदण लवचीक असून तें काव्याला शोभा देतें. एकाच्या पांडित्यपूर्ण शब्दलालित्याच्या प्रभावानें डोकें सुन्न होतें तर दुसऱ्याचा भावनांचा अविष्कार अंतःकरणास भिडून त्याला गुदगुल्या करतो. एवढें महदंतर दोन काव्यांमध्यें असल्यानंतर एकाचा अभ्यास दुसऱ्यास पूरक होण्याचा संभव नाहीं. दुसरें असें कीं काव्याची दोन भागांत चिरफाड करणेंच तत्त्वतः अयोग्य आहे. काव्यशिक्षणाच्या हेतुचा विचार करतांना समग्र काव्याच्या शिक्षणाचा हेतु मनांत धरला पाहिजे, त्याच्या निरनिराळ्या भागांचा नव्हे. अर्थातच प्राचीन काव्याध्ययनाची पूर्वतयारी म्हणून पद्य-शिक्षणाचा हेतु कदापि मान्य होण्यासारखा नाहीं.

पद्य-शिक्षणाचा आणखी एक हेतु सांगितला जातो. तो म्हणजे भाषाज्ञान. हा हेतुही मान्य होण्यासारखा नाहीं. पद्याचें अभ्यासानें भाषाज्ञानांत भर पडते हें खरें. पद्यामध्यें नवीन नवीन शब्द आल्यामुळें, पद्याला वृत्तांच्या कोंदणांत बसविल्यामुळें, पद्याच्या अंगावर इतस्ततः अलंकारांचें लेणें चढविल्यामुळें भाषाज्ञान वाढविण्यास त्यांची मदत होते हें नाकबूल करून चालतां येणार नाहीं. पण गद्याच्या अभ्यासानें होणाऱ्या भाषाज्ञानाशीं तुलना केली असतां पद्याच्या शिक्षणापासून मिळणारें भाषाज्ञान फारच तुटपुंजें असल्याचें आढळून येतें. कांहीं कांहीं वेळां तें इतकें तुटपुंजें असतें कीं त्याच्या पासंगालाही तें पुरेसें नसतें. खरेंखुरें भाषाज्ञान मिळवावयाचें असेल तर गद्याशिवाय दुसरा महत्त्वाचा विषय नाहीं. गद्य वाङ्मयाचे प्रकार इतके विविध व मनोरंजक आहेत कीं, त्या प्रत्येकाचा सखोल अभ्यास करावयाचा म्हटलें तर उभें आयुष्य वेंचूनही तो संपेल कीं नाहीं याची शंका वाटते. निबंध, लघुनिबंध, कथा, लघुकथा, स्वगत भाषण, प्रगट भाषण, चरित्र, आत्मचरित्र, नाटक, नाट्य-छटा, कादंबऱ्या अशा अनेक वाङ्मय प्रकारांत भाषाज्ञानाचें असंख्य अगडबंब गलिव्हर पडलेले आहेत. या गलिव्हरांच्यापुढें पद्याच्या अभ्यासापासून होणारें भाषाज्ञान अगदीं छोट्या लिलिप्युटियन प्रमाणें आहे.

पद्य-शिक्षणाचा हेतु भाषाज्ञान आहे असें मानणाऱ्यांमध्यें आणखी एक ढोबळ दोष दिसून येतो. पद्य-शिक्षणानें होणारें भाषाज्ञान तुटपुंजें दिसूं नये म्हणूनच कीं काय ते पद्याच्या अध्ययनांत प्रत्येक नवीन शब्दाचा अर्थ सांगण्याचा अट्टाहास धरतात, त्याची व्युत्पत्ति लावण्याचा हेका धरतात, प्रत्येक वृत्ताची भारूड माहिती देण्याचा प्रयत्न करतात, प्रत्येक अलंकाराची फोड करण्याचा चंग बांधतात. अशा प्रकारचा त्यांचा अट्टाहास कांहीं वेळां इतक्या पराकोटीस पोहोंचतो कीं पद्य-शिक्षणांत राम उरत नाहीं, त्यांत काव्यच राहत नाहीं. पद्य-शिक्षणाला असें विकृत

स्वरूप येण्याचें कारण पद्य-शिक्षणाच्या धरलेल्या चुकीच्या हेतुमध्यें जसें आहे तसें पद्याकडे पाहण्याच्या दृष्टिकोनांतही आहे. भाषाज्ञानाच्या मागें लागल्यामुळें काव्यांतील रस त्यांना दिसत नाहींत. भाषासौंदर्याकडे दृष्टि लागल्यामुळें भावसौंदर्याकडे त्यांचा कानाडोळा होतो. काव्यामध्यें भावसौंदर्याला अत्युच्च स्थान असल्यामुळें पद्य-शिक्षणाचा हेतु भाषाज्ञान कदापि होणार नाहीं.

पद्य-शिक्षणाचा हेतु बोधदान आहे असें कधीं कधीं कांहीं नीतीचे पूजक कानीं कपाळीं ओरडून सांगत असतात. अशा नीतिमार्तंडांची संख्या मुळांतच कमी असली आणि दिवसेंदिवस ती घटत असली तरी नीतिमत्तेचा कैफ त्यांना एवढा चढलेला असतो कीं त्या कैफांत समाजामध्यें वाटेल तसा धांगडधिंगा घालण्यास ते कचरत नाहींत. अशा कमळ्या लोकांची अशी समजूत झालेली दिसते कीं काव्याच्याद्वारां बोध केला नाहीं, उपदेश केला नाहीं, नीतितत्त्वांची दीक्षा दिली नाहीं तर सबंध समाज भ्रष्ट होईल, अनीतिमान होईल, सब गोलाकार होईल. केवळ उपदेशानें, नीतितत्त्वाच्या शिकवणीनें समाजाची नीति सुधारेल कीं नाहीं हा प्रश्न विवाद्य आहे. नुसत्या नीतितत्त्वांच्या शिकवणीनें समाज सुधारतो असें जरी क्षणभर मानलें तरी नीतितत्त्वाचें रोपटें काव्याच्या कुंडींतच लावलें पाहिजे, तेथेंच तें वाढलें पाहिजे, विकसित झालें पाहिजे, फळा फुलांनीं बहरलें पाहिजे या अट्टाहासाचें कारण उमगत नाहीं. तसें पाहिलें असतां पद्यामध्यें त्याची गोडी विशेष कमी न करतां अप्रत्यक्षपणें एखादें अर्थें नीतितत्त्व गुंफणें शक्य होईल, नाहीं असें नाहीं. पण त्यामुळें समाजाला नैतिक अधिष्ठान किंतपत मिळवून देतां येईल याबद्दल जबर शंका आहे. अशा नीतितत्त्वाच्या अंतर्भावानें हातांशीं विशेष कांहीं न लागतां पद्यांतील भावसौंदर्यास बाध येण्याचा मात्र संभव अधिक आहे. दुसरें असें कीं बोधदानास काव्यापेक्षां धर्मशास्त्र व नीतिशास्त्रा-

सारखे ग्रंथ कितीतरी पटीनें अधिक उपयुक्त आहेत. त्याचा उपयोग सर्रास करावा. ज्यांना बोधदानानें समाजाची नीतिमत्ता सुधारावयाची असेल त्यांनीं खुशाल धर्मशास्त्र पाठ करावें, नीतिशास्त्र कोळून प्यावें. काव्याला मात्र स्पर्श करू नये.

बोधदानाचें वेड जसें कांहीं लोकांना आहे. तसें त्याचें वावडेंही कित्येकांना आहे. या दुसऱ्या प्रकारच्या लोकांची सख्या फार मोठी असून ती दिवसेंदिवस सारखी फुगत आहे. या लोकांनीं 'बोधा'ला वाळींत टाकलें आहे, अस्पृश्यांत त्याची गणना केली आहे. या लोकांची प्रकृति इतकी नाजूक झाली आहे कीं 'बोध' या शब्दाच्या उच्चाराबरोबर त्यांचें पथ्य बिघडतें आणि तळव्याची आग मस्तकांत जाऊन सर्व देहाची लाही लाही होते. या लोकांचें म्हणणें असें कीं काव्यांतील चित्र वास्तविक असावें, त्यांत बोधाची कृत्रिमता नसावी. काव्यांत बोध मिसळला तर काव्यच उडून जातें आणि बोधालाही वेगळयाच रंगाची छटा येते. तेव्हां काव्यांतून बोधाचें उच्चाटण झालेंच पाहिजे.

बोधदानाचे पूजक व भजक यांच्या या विचारसरणीकडे पाहिलें म्हणजे हसूही येतें आणि विशादही वाटतो. कारण मानवी जीवन बोधमय नाहीं, म्हणून त्यांत बोधाला स्थान नाही असें म्हणवत नाहीं. काव्य मानवी जीवनाचें खरेंखुरें चित्र असेल तर त्यांत वास्तवतेबरोबर बोधाचाही समावेश व्हावयास पाहिजे. कारण बोधही थोड्याफार प्रमाणांत एक प्रकारची वास्तविकताच आहे. याचा असा अर्थ नव्हे कीं प्रत्येक पद्यांत बोधामृताचा घट झांकून ठेविला पाहिजे. माझें एवढेंच म्हणणें कीं काव्याला बोधाचें वावडें फार मोठ्या प्रमाणांत नसावें. तसें तें असेल तर काव्यच कृत्रिम होईल, नटवें होईल, फसवें होईल.

काव्याचा बारकाईनें अभ्यास करून निर्विकारपणें विचार केल्यास असें दिसून येण्याचा संभव आहे कीं वाटतें त्यापेक्षा कितीतरी अधिक

प्रमाणांत काव्यामध्यें बोधामृत अप्रत्यक्षपणें भरलेलें आहे. लावणी व शाहिरी काव्य हा त्याचा सबळ पुरावा आहे. इतर ठिकाणींही हेंच आढळेल. काव्यापासून बरें कोणतें, वाईट कोणतें हें कळण्यास मदत होत नाहीं, असें कोणी म्हणत असल्यास तें ढोंगीपणाचें आहे. ही वास्तवता कां कू न करतां स्वीकारल्यास प्रश्न एवढाच उरतो कीं बोध केव्हां व कसा करावयाचा. जाणत्या माणसाला सरळ सरळ प्रत्यक्षपणें केलेला उपदेश रुचत नाहीं असा प्रत्यक्ष बोध प्रौढां-च्याकरितां केलेल्या काव्यांत नसावा असेंच कोणीहि म्हणेल. पण बालकांची स्थिति प्रौढांप्रमाणें नसते. त्यांना प्रत्यक्षपणें वा अप्रत्यक्षपणें कसाही बोध केला तरी चालतो, कारण तीं वडीलधाऱ्यांना देवासमान मानतात, त्यांचा शब्द तीं वेदवाक्य मानतात. या सर्व गोष्टींचा फायदा घेऊन खालच्या वर्गांतील मुलांना थोडीं बोधपर पद्यें शिकविण्यास हरकत नाहीं. अशीं पद्यें निवडतांना एक खबरदारी घेणें मात्र आवश्यक आहे. ती म्हणजे निवडलेलीं पद्यें 'एका कोळियानें एकदां आपुलें' किंवा 'बरें सत्य बोला यथा तथ्य चाला,' 'क्रियेवीण वाचाळतां व्यर्थ आहे' अशीं नीरस असू नयेत.

कल्पनाशक्ति व विचारशक्ति यांचा विकास करणें हा एक पद्य-शिक्षणाचा हेतु मानला जातो, पद्य शिक्षणानें कल्पनाशक्तीवर चांगलाच ताण पडून तिचा विकास फार मोठ्या प्रमाणांत होतो. विचारशक्तीचा विकास गद्याचें अध्ययनानें जितका होतो तितका पद्य-शिक्षणानें होत नसला तरी तो बराच होतो हें मान्य करावें लागेल. कल्पनाशक्ति व विचारशक्ति यांचा विकास पद्य-शिक्षणानें होत असला तरी पद्य-शिक्षणाचा मुख्य हेतु हा विकास घडवून आणणें आहे असें धरून चालणार नाहीं. या शक्तींचा विकासच केवळ करावयाचा असेल तर इतर विषयांच्या द्वारेंही करतां येईल. 'विचारशक्तीस चालना देणारा तर्कशास्त्राशिवाय दुसरा चांगला

विषय नाहीं. अंकगणित, भूमिति, कायदा यांसारख्या विषयांच्या अध्ययनानें विचारशक्तीस चांगलीच धार लागते. वर्तमानपत्रांतील साधीं शब्दकोडीं सोडविल्यानेंही विचारशक्ति विकसित होते. कल्पनाशक्तीची भरारी कोठेंही मारतां येतें. फरक एवढाच कीं कल्पनाशक्तीचे हवेंतील मनोरे काव्यांत जितके मनोहर दिसतात, उठावदार दिसतात, तितके तिचे वाळूवरील किल्ले गद्यांत दिसत नाहींत. असें असलें तरी कल्पनाशक्तीचा विकास हा पद्य-शिक्षणाचा हेतु होऊं शकत नाहीं.

मग पद्य-शिक्षणाचा हेतु तरी काय आहे ? काव्याच्या श्रवणानें माणसास समाधान होतें, त्याच्या वाचनानें त्याला हायसें वाटतें, त्याच्या गायनानें त्याचें अंतःकरण आनंदानें फुलून जातें. हें समाधान शीगेस पोहोंचवून, या आनंदाची वृद्धि करणें, मानवी जीवन आल्हाददायक करणें हा पद्य-शिक्षणाचा मुख्य हेतु आहे. काव्य श्रवणानें किंवा काव्य गायनानें सर्वांना सारखा आनंद होत नाहीं. कारण सर्वांचीं अंतःकरणें सारखींच संवेदनक्षम नसतात. शिवाय जीवनांतील बरेवाईट अनुभव सर्वांना सारखे आलेले नसतात. आपणास आलेल्या अनुभवाचें प्रतिबिंब काव्यांत पडलेलें असेल तर तें अंतःकरणास हालवून सोडून, त्याला गुदगुल्या करून आनंदसागरांत डुंबायला लावील, आणि केवळ दुसऱ्यांच्या अनुभवाचे पडसाद उमटलेलें असतील तर तें आनंदसागराच्या कांठाशीं घोट्याएवढ्या पाण्यांत बुडी मारायला लावील. आनंदसागरांत सर्वांना डुंबत ठेवून त्यांचें जीवन सुखी करणें हा पद्य-शिक्षणाचा मुख्य हेतु आहे. पद्य-शिक्षणानें दुसऱ्यांविषयीं सहानुभूति वाटते, दुसऱ्याच्या सुखदुःखाशीं समरस होतां येते, दुसऱ्याच्या भावनाशीं तन्मय होतां येते. यामुळें पद्य-शिक्षणाचा हा हेतु साध्य होण्यास सुलभ जातें.

यांवर असा आक्षेप येण्याचा संभव आहे कीं सर्वच पद्यें कांहीं आनंदनिर्मिति करूं शकत नाहींत. कांहीं पद्यें शोकपर्यवसायीही असतात.

क्रमांक ... वि ... नों. दि. ...

अशीं पद्यें जीवनांत आल्हाद निर्माण करणें कदापि शक्य नाहीं. या आक्षेपांत बरेंच सत्य आहे यांत संशय नाहीं. पण त्याबरोबरच हेंही खरें आहे कीं शोकपर्यवसायी काव्य आनंदाची निर्मिति प्रत्यक्षपणें करीत नसलें तरी त्यामुळें दु:खानें भरलेलें अंत:करण हलकें होतें, अंत:करणावरील दु:खाचा बोजा आपोआप उतरला जातो आणि दु:खी माणसाला जीवन सुसह्य होतें. ही काव्याची कमाई कांहीं कमी महत्त्वाची नाहीं.

आनंद अनेक प्रकारचा आहे. दुर्मति रावणानें सत्त्वशील रामाला त्रास देण्यांत आनंद मानला. कैकेयीला रामाच्या वनवासांत आनंद वाटला. दुर्योधनाला पांडवांना देशोधडी पाठविण्यांत व द्रौपदीची विटंबना करण्यांत आनंद वाटला. रावणाच्या प्रकृतीचे लोक जगामध्यें आहेत. दुर्योधनासारख्या दुष्ट लोकांचा भरणाही जगांत कांहीं कमी नाहीं. रावणाच्या राक्षसी आनंदानें, आसुरी आनंदानें हे लोक बेहोष होणें साहजिक आहे. मग अशा आसुरी आनंदाची निर्मिति करावयाची कीं काय ? याचें एकच उत्तर. नाहीं, नाहीं, नाहीं. कारण दुसऱ्यांना त्रास देण्यांत, दुसऱ्यांना दु:खाच्या खाईंत लोटण्यांत, दुसऱ्यांचें जीवन रखरखीत व असह्य करण्यांत जो आनंद निर्माण होतो, तो मुळीं आनंदच नाहीं. ज्यामुळें कोणासही दु:ख न होतां सर्वांना सुखच होईल तो खरा आनंद. असा सात्त्विक आनंद, निर्मळ आनंद, निरामय आनंद, काव्यांत निर्माण झाला पाहिजे. म्हणजे त्याची वाढ पद्य-शिक्षणानें आपोआप होऊन मानवी जीवन आल्हाददायक होईल.

सात्त्विक आनंद निर्माण करणें बरेंच अवघड काम असलें तरी तें अशक्य कोटींतलें नाहीं. सात्त्विक आनंदाची निर्मिति करावयाची असेल तर एक पथ्य पाळलें पाहिजे. तें म्हणजे काव्य सत्यं-शिवं-सुंदरं पाहिजे. सत्य, मांगल्य व सौंदर्य या वेगवेगळ्या गोष्टी नसून एकाच गोष्टीच्या

निरनिराळ्या बाजू आहेत. सत्य सुंदर आणि मंगल असतें. सत्य सौंदर्याशिवाय मांगल्याची पूर्णता होत नाहीं. आणि सौंदर्य असत्य असूं शकत नाहीं, अमंगल असू शकत नाहीं. सत्य-शिव-सुंदर या त्रिकोणी निकषावर आनंदाची निर्मिति घासून तिची सात्विकता, निर्मळता, निरामयता सिद्ध झाली पाहिजे. या कसोटीला उतरलेल्या काव्यांत त्रिकालाबाधित सत्याचा विजय झालेला दिसेल, तें सुंदर असेल, त्यांत मांगल्याचा सुगंध दरवळत असल्याचें अनुभवास येईल. अशा काव्याच्या अध्ययनानें मानवाला सत्यदर्शन होऊन, त्याला सर्व गोमटें व मंगल दिसून तो आनंदसागरांत डुबत राहिल्याशिवाय राहणार नाहीं.

# २. पद्य कसें शिकवावें

( प्रस्तावना व हेतुकथन )

शैक्षणिक क्षेत्रांत आजचें युग अध्यापनशास्त्राचें आहे असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. विशेषतः भारतामध्यें अध्यापनशास्त्रयुगाचा महिमा फार गायिला जात असल्याचें निदर्शनास येतें. अध्यापनशास्त्राचें स्तोम पूर्वीं कधींही नव्हतें इतकें तें आज माजल्यासारखें दिसतें. पाठ-पद्धतीचें अवडंबर आज जितकें विस्तृत झालें तितकें यापूर्वीं केव्हांच नव्हतें. प्राचीनकाळीं केवळ अध्ययनाला महत्त्व दिलें जात होतें. अध्यापन-शास्त्राचा उदय व विस्तार हें अध्ययनाच्या वाढत्या महत्त्वाचेंच द्योतक आहे. अध्ययनाकरितां अध्यापनशास्त्र आहे. अध्ययन साध्य आहे. अध्यापन साधन आहे. पण आज साध्यापेक्षां साधनालाच अवास्तव महत्त्व दिलें जात असल्याचें दृष्टोत्पत्तीस येतें. अध्यापनाला फाजील महत्त्व दिलें गेल्यामुळें अध्ययनाच्या साध्याप्रत यशस्वी रीतीनें पोहोंचतां आलें असतें तर कुरकूर करण्यास विशेष जागा नव्हती. पण प्रकार उलट होत चालल्यामुळें विषाद वाटतो. अध्यापनशास्त्राच्या बडे-जावामुळें आपली दिशाभूल होत चाललेली आहे. आपण साध्याच्या निकट जाण्याऐवजीं त्यापासून दूर दूर जात आहोंत. साधनाच्या मागें लागल्यामुळें साध्य विसरत चाललें आहे कीं काय याची शंका येतें.

अध्यापनशास्त्र अतिशय उपयुक्त शास्त्र आहे. अध्यापनशास्त्राचे नियम मानसशास्त्राच्या भरभक्कम पायावर आधारलेले आहेत. ते सर्व-सम्मत आहेत. ते अनुभवाच्या निकषावर घासलेले आहेत. शास्त्रीय कसोटीस उतरलेले आहेत. दिशाभूल होते ती नियमांच्या अशास्त्रीयतेमुळें नव्हे, खोटेपणामुळें नव्हे, तर ते हाताळणाऱ्यांच्या गबाळपणामुळें, गाफील-पणामुळें, नाटकी स्वभावामुळें. दोष अध्यापनशास्त्राचा नसून त्याचा

उपयोग करणाऱ्यांचा आहे. अध्यापनशास्त्राचा वरवर अभ्यास करून साध्य हातीं लागणार नाहीं. त्याकरितां त्याचा सखोल अभ्यास करावयास पाहिजे. सखोल अभ्यासानें मिळविलेलें ज्ञान प्रत्यक्ष अध्यापन करीत असतां वापरलें पाहिजे. असा त्याचा नियमानें नेहमीं वापर झाला म्हणजे इच्छित ध्येय साध्य झाल्याशिवाय राहणार नाहीं. असा मनापासून अध्यापनशास्त्राचा वापर करण्याची पोटतिडीक निर्माण झाली पाहिजे. अध्यापनाची तळमळ लागण्यास कर्तव्याची आंच माणसाला असली पाहिजे. पोटतिडिकेचा प्रभाव आजच्या शैक्षणिक संस्थांमध्यें किती प्रमाणांत पडतो हें पाहण्यासारखें आहे. कर्तव्याची आंच कोणामध्यें किती आहे हें ज्याच्या त्याच्या अध्यापनकलेवरून व शैक्षणिक कार्यावरून सहज लक्षांत येण्यासारखें आहे. भरीव व परिणामकारक अध्ययन होण्याचें दृष्टीनें अध्यापनशास्त्राच्या यशाकडे पाहिल्यास पदरीं निराशा पडण्याचाच अधिक संभव आहे. याचा दोष अध्यापनशास्त्र हाताळणाऱ्यांकडे बराच जातो हें सांगितलेलेंच आहे. शिकवितांना अध्यापनशास्त्राचा उपयोग स्वतःच्या समाधानाकरितां न करतां दुसऱ्याच्या समाधानाकरितां करण्याची प्रवृत्ति बळावत चालल्याचा अनुभव येतो. त्यामुळें अध्यापनशास्त्राचा उपयोग ट्रेनिंग कॉलेजमध्यें व कधीं काळीं शाळेच्या वार्षिक तपासणीचे वेळीं किंवा शाळेला पाहुण्यांची भेट होण्याचे वेळींच फक्त होतो. अशा सणावाराला पांच पायऱ्यांचें पाठपद्धतीचें पंचपक्वान्न अध्यापकांना सवय नसल्यामुळें जुळत नाहीं. त्यामुळें तें रुचकर होत नाहीं, तें मुलांच्या पचनीं पडत नाहीं. सर्व गोंधळ माजतो. विषय मुलांना नीट कळत नाहीं. अध्यापन नीरस होतें. अध्यापनशास्त्राचें नाटक होतें. अध्यापकाचें हंसें होतें.

अध्यापनाच्या नाटकाचें मूळ शोधावयास गेल्यास तें अध्यापकांच्या गैरसमजुतीमध्यें सांपडतें. पाठपद्धति ट्रेनिंग कॉलेजमध्यें शिकविली

जाते, तेव्हां ती अमलांत आणलीच पाहिजे या अट्टाहासांत तें मूळ दया धरून बसलेलें आहे. पाठपद्धतीच्या गुलामींत तें रोवलें गेलें आहे. ही गैरसमजूत प्रथम नाहींशी केली पाहिजे. पाठपद्धति अध्यापन परिणामकारक करण्याकरितां आहे. पाठपद्धतीशिवाय एखाद्याला अध्यापन परिणामकारक करतां येत असेल तर पाठपद्धतीचा हेका धरण्याचें कारण नाहीं. जन्मजात शिक्षकाला पाठपद्धतीचें बंधन नाहीं. त्याची पद्धति हेंच अध्यापनशास्त्र. पाठपद्धतीची चाकोरी सर्वसामान्य शिक्षकांकरितां आहे तिचा जुलूम सर्वांवर सारखा करण्याचें कारण नाहीं. जें शिकवावयाचें तें मुलांच्या अंतःकरणापर्यंत जाऊन भिडलें, तेथें वज्रलेप झालें, मुलांना चांगलें समजलें म्हणजे झालें, मग त्याकरितां कोणती पद्धति कोणीं कशी वापरली हें पाहण्याचें कारण नाहीं. ज्या पद्धतीमुळें मुलांची समजूत सहजरीतीनें पटते ती पद्धति उत्कृष्ट होय. हें गमक जाणलें तर अध्यापन यशस्वी झाल्याशिवाय राहणार नाहीं. पाठपद्धतीचें स्वातंत्र्य हा अध्यापनकलेचा पाया आहे, अध्यापनशास्त्राचा कळस आहे. या स्वातंत्र्याचा उपभोग घेतांना एक नियम मात्र पाळला पाहिजे जी पद्धति अवलंबिली जाईल तिला शिक्षणशास्त्राचें अधिष्ठान पाहिजे, मानस-शास्त्राचें अधिष्ठान पाहिजे.

पाठपद्धति म्हटली कीं विषयाची प्रस्तावना, हेतुकथन, प्रतिपादन, आवृत्ति, गृहपाठ या पांच पायऱ्या आल्याच. सप्तपदी झाल्याशिवाय जसा वधुवरांचा विवाह शास्त्रोक्त ठरत नाहीं तशी पाठपद्धतीची पंचपदी पार पडल्याशिवाय तिचें पाठाशीं लग्न लागलें असें अध्यापनशास्त्र म्हणत नाहीं. सप्तपदीचें शल्य मनाला बोंचतें म्हणूनच कीं काय या पंचपदींत शिक्षकाचें नमुनेदार वाचन व विद्यार्थ्यांचें मूकवाचन अशा दोन पायऱ्यांची भर घालून तिची पूर्तता केल्याचें दृष्टोत्पत्तीस येतें. पंचपदीचा किंवा सप्तपदीचा पुरावा आवश्यक मानला जातो. वर्गांत असा पुरावा देण्याची

प्रथा रूढ झाली असून तिचा उपयोग समासमारंभांना होत असल्याचें प्रत्ययास येतें. हा पुरावा दिला जात असतांना पुरावा कां द्यावयाचा, कसा द्यावयाचा, केव्हां द्यावयाचा याची विशेष दखल घेतली जात नसल्याचें प्रत्ययास येतें. केवळ गतानुगतिक न्यायानेंच त्याची वासलात लाविली जाते. पांच पायऱ्या उभारून पाठपद्धतीचा केवळ आत्मा-विरहीत सांगाडा तयार होत असल्यामुळें पाठ पडून अपयश येणें अपरिहार्य होतें. प्रस्तावना हा पाठाचा पाया आहे. यावर पाठाची भव्य इमारत बांधावयाची असेल तर तो भक्कम भरला पाहिजे. विषयाला अनुरूप अशा वातावरणाची निर्मिति यशस्वी रीतीनें प्रस्तावनेंत झाली म्हणजे तिचा पाया भक्कम भरला जातो योग्य वातावरणाची निर्मिति करीत असतांना कोणते कुशल प्रश्न विचारून ती केली जाते या प्रश्नांनाही महत्त्व आहे 'ज्ञाताकडून अज्ञानाकडे' या तत्त्वाचा उपयोग येथें करणें अत्यावश्यक होऊन बसतें. प्रस्तावनेस तीन मिनिटांपेक्षां अधिक वेळ देऊं नये असा दंडक आहे, आणि तो योग्यही आहे. हा दंडक मोडला गेल्यास पाठाचा पाया भक्कम होण्याऐवजीं ढासळण्याचा अधिक संभव असतो प्रस्तावनेची पुढची पायरी हेतुकथन होय. प्रस्तावनेंत वातावरण निर्मिति झाली म्हणजे आपण कोठें जाणार आहोंत तें मुलांना स्पष्ट केलें पाहिजे. तसें स्पष्टीकरण झालें नाहीं तर मुलें गोंधळतात. त्यांच्या मनांत पाठाच्या हेतुविषयीं नाना तर्क येऊन त्यांचें पाठाकडचें लक्ष कमी होतें हेतुकथनाच्या पुढची पायरी प्रतिपादनाची. प्रतिपादनाचें स्वरूप व पद्धति पाठाच्या विषयावर अवलंबून असते. प्रतिपादनांत स्वतःचें कौशल्य दाखविण्यास चांगलाच वाव असतो. कौशल्याबरोबर आपली विद्वत्ता दाखविण्यासही पुष्कळ वेळ असतो. कारण पस्तीस मिनिटांच्या तासांत प्रतिपादनास वीस पंचवीस मिनिटें मिळतात. प्रतिपादनानंतर पांच सात मिनिटांत शिकविलेल्या पद्याचें रसग्रहण करावयाचें असतें. रसग्रहणाची रूपरेषा शिकविलेल्या पद्याच्या

स्वरूपावर व मुलांच्या मगदुरावर बहुधा अवलंबून असते. ठराविक सांच्याचें रसग्रहण केल्यानें मुलें कंटाळतात. एकंदरींत पाठ कसा झाला हें रसग्रहणामध्यें मिळणाऱ्या उत्तरांवरून सहज कळून येतें. याकरितां मुलांना कंटाळा न येईल असें रसग्रहण करणें अधिक श्रेयस्कर प्रतिपादनांत विचारलेलेच प्रश्न जसेच्या तसे रसग्रहणांत विचारल्यासही पाठ पडण्याचा संभव असतो. म्हणून असे प्रश्न शक्यतों टाळावे. रसग्रहणानंतर गृहपाठ द्यावयाचा असतो. वास्तविक पाठ परिणामकारक झाला असल्यास गृहपाठाची जरूरी नाहीं पण गृहपाठामुळें मुलांना नवीन विषयाचें ज्ञान ग्रहण करण्यास व तें वाढविण्यास गृहपाठाचा उपयोग होतो हें निर्विवाद आहे. गृहपाठ घाईनें देऊं नये.

पद्य-पाठाचें टांचण वरील पांच पायऱ्यांना अनुलक्षून तयार करावयाचें असतें. शिक्षक अध्यापनशास्त्र आत्मसात् करीत असतां टांचण तयार करणें हितावह व आवश्यक आहे. पण एकदां तो अध्यापनांत तरबेज झाल्यावर प्रत्येक पाठाचें टांचण करणें अनावश्यक आहे, तसेंच तें अशक्य आहे. टांचण लिहिणें अनावश्यक व अशक्य असलें तरी टांचणाची सांखळी शिक्षकाला मनांत तयार ठेवावीच लागते. त्याशिवाय त्याला व्यवस्थित शिकवितां येत नाहीं.

मानसशास्त्र हें अलीकडचें शास्त्र आहे. शिक्षणशास्त्र तर त्याहीपेक्षां अलीकडचें आहे. शिक्षणशास्त्र हें मानसशास्त्रावर आधारलेलें आहे. हीं दोन्हीं शास्त्रें नवीन असल्यामुळें शिक्षणपद्धतीचें बंड पूर्वी नव्हतें. पद्य पाठ करून, मनन करून मुलांनीं लक्षांत ठेविलें म्हणजे पुरें होत असे. पद्य मुलांना कळलें कीं नाहीं याकडे विशेष लक्ष दिलें जात नसे. पद्य पाठ करण्यावरच अधिक भर असल्यामुळें या पद्धतीस ' पठण पद्धति ' म्हणण्यास हरकत नाहीं. भाषेच्या क्रमिक पुस्तकांतील कविता, मुलांना घरीं पाठ करावयास सांगून त्या शाळेंत तोंडपाठ म्हणवून घेतल्या कीं

पद्याचें अध्यापन झालें ! ही पद्धति निरनिराळया देशांत अशींच वर्षे प्रचलित होती असें मिळालेल्या दाखल्यावरून सिद्ध होतें. भारत तर पठणपद्धतीचें माहेरघरच आहे. आजही ही पद्धति कचित ठिकाणीं कां होईना अंमलांत आणली जात असल्याचें दिसतें या पद्धतीचा स्वीकार हें शिक्षकाच्या आळसाचें द्योतक आहे असें म्हटलें तरी चालेल. कारण शिक्षक ट्रेंड असो वा अन्‌ट्रेंड असो आधुनिक शिक्षणपद्धतीचें लोण शाळेच्या कोनाकोपऱ्यापर्यंत इतकें जाऊन पोहोंचलें आहे कीं तें शिक्षकांना माहीत नाहीं असें म्हणवत नाहीं. आधुनिक शिक्षण-पद्धतीची स्थूल-मानानें कां होईना कल्पना असतांना शिक्षक ' पठण पद्धति ' सारखी टाकाऊ व निरस पद्धति पद्याच्या बाबतींत अवलंबित असेल तर त्यामुळें त्याचा आळशी स्वभावच नुसता कळून न येतां त्याच्या शिक्षणासारख्या पवित्र धंद्यावरील निष्ठेसही बाध येतो, असें म्हटल्याशिवाय राहवत नाहीं. पठण पद्धतीनें विद्यार्थी पद्य बिनचूक धडधडा म्हणून दाखवितात, त्यांतील गोष्टवाऱ्यावरील कांहीं प्रश्नांचीं उत्तरेंही तडकाफडकी देतात, पण यावरून पद्यातील कल्पना त्यांना कळल्या असें होत नाहीं, त्यांतील मर्म त्यांना उमगलें असें म्हणवत नाहीं, त्यांतील सौंदर्याचा आस्वाद त्यांनीं घेतला असें प्रत्ययास येत नाहीं. ' पोपटपंची ' शिक्षण होऊं शकत नाहीं. घोकंपट्टी ही शिक्षणांतील शास्त्रीय पद्धति कदापि होऊं शकणार नाहीं. कारण अशा पद्धतीमुळें पद्याचा तिटकारा करण्यास मुलें शिकतात. म्हणून ही पद्धति त्याज्य मानली पाहिजे.

पठणपद्धतीइतकीच दुसरी त्याज्य पद्धति ' अन्वयार्थ पद्धति ' ही आहे. या पद्धतीमध्यें शिक्षक पद्याचें तासाला मुलांना आळी-पाळीनें पद्याचें एकेक कडवें मोठ्यानें वाचावयास सांगतो व त्या कडव्याचा अन्वयार्थ लावून घेतो, अवघड शब्दांचा अर्थ आणि लहर लागलीच तर कडव्यामधील कल्पनेची सांगोपांग चर्चा करतो. हें रहाट-

गाडगे तास संपेपर्यंत चालू राहते. या पद्धतीचें दुष्परिणाम पठण-पद्धतीसारखेच घातक आहेत. पद्य वाचणाऱ्या मुलांखेरीज इतर मुलांचें लक्ष वाचनाकडे लागत नाहीं. पद्याच्या अन्वयार्थानें मुलांना पद्याचें मर्म उमगत नाहीं, त्यांतील मख्खी समजत नाहीं, त्यांतील खुमारी कळत नाहीं. सबंध तास कंटाळवाणा जातो. पद्याविषयीं तिटकारा उत्पन्न होतो. आश्चर्याची गोष्ट अशी कीं, चालू अध्यापनयुगांत देखील भारतामध्यें शेंकडा ५० पेक्षां अधिक शाळांतून प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणें ही पद्धति अमलात आणली जात असल्याचें दिसून येईल. यावरून अध्यापन-शास्त्राविषयीं नुसता बोलबाला होत आहे; तें कृतीमध्यें उतरलें जात नाहीं हें स्पष्ट आहे. या परिस्थितीचें कारण या क्षेत्रांत काम करणाऱ्यांच्या आळशी स्वभावाबरोबरच त्यांची उदासीन वृत्ति असण्याचा दाट संभव आहे.

वर विवेचन केल्याप्रमाणें शिक्षणशास्त्रास मान्य नसलेल्या अशा कांहीं पद्धति आज अमलात आहेत. त्या सर्व पद्धतींचें सविस्तर वर्णन करण्याची येथें जरूरी नाहीं. त्या त्याज्य असल्यामुळें आज ना उद्यां त्यांचें उच्चाटन शिक्षण क्षेत्रांतून होणारच आहे. तें लवकर होवो अशी आशा व्यक्त करून आपण पद्याच्या अध्यापनाच्या शास्त्रशुद्ध पाठ-पद्धतीचा पायरीपायरीनें विचार करू.

इतर विषयांच्या पाठपद्धतीप्रमाणेंच पद्याच्या पाठ-पद्धतीची पहिली पायरी प्रस्तावना आहे. प्रस्तावना पाठाचा पाया आहे, हें पूर्वी सांगितलेलेंच आहे. हा पाया व्यवस्थितपणें भरला गेला तरच पाठाच्या नयनमनोहर इमारतीचें दृश्य पाहावयास सांपडतें. हा पाया भरण्यांत कुचराई झाली, चूक झाली तर पाठाची इमारत कोसळावयास वेळ लागत नाहीं. प्रस्तावनेंत कुचराई करणें, किंवा चूक करणें म्हणजे पाठाच्या अपयशाचा पाया घालणें होय. प्रस्तावनेचा यशस्वी पाया वातावरणाची

निर्मिति करून घ्यावयाचा असतो. पद्याखेरीज इतर विषयांत हा पाया भक्कम उभारणें अवघड जात नाहीं. कारण वातावरणाची निर्मिति करणें सोपें जातें. पण पद्याचें तसें नाहीं. पद्यांत रेखाटलेल्या वातावरणाची निर्मिति वर्गांत करणें आणि तेंही थोडक्या वेळांत करणें, मोजक्या वेळांत करणें म्हणजे महाकठीण कर्म. शिवाय पद्यातील वातावरण वास्तवतेला धरून असतेंच असें नाहीं, त्यांतील रेखाटलेलीं चित्रें खरीखुरीं असतीलच असें नाहीं, त्यांतील प्रसंग सर्वांनीं अनुभवलेले असतील असेंही नाहीं, त्यांतील कल्पनेच्या भरारीबरोबर उड्डाण करण्यास गरुडाचें सामर्थ्य सर्वांना असतेंच असेंही नाहीं. यामुळें पद्याची प्रस्तावना करणें अधिकच कठीण पडतें. योग्य प्रस्तावना करणें अवघड असल्यामुळें त्यांतच शिक्षकाचें शिकविण्याचें कसब भरलेलें आहे, त्यांतच त्याचें कौशल्य सामावलेलें आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. जो परिणामकारक प्रस्तावना करू शकतो त्याचा पद्याचा पाठ यशस्वी झाला असें समजावें. इतका प्रस्तावनेचा परिणाम एकदर पाठावर सहजासहजीं होतो.

पाठ-पद्धतीमध्यें प्रस्तावनेचें इतकें मोठें महत्त्व तिच्या उपयुक्ततेमुळें सिद्ध झालें असतांही पद्याचे पाठांतून तिची हकालपट्टी करण्याचे प्रयत्न जाणून बुजून सुचविले जात असल्याचें अनुभवास येतें. 'कवीच्या प्रतिभेवर विश्वास ठेवून एकदम कविता शिकवावयास लागा, प्रस्तावनेच्या फंदांत पडूं नका,' असा टाहो वेळीं अवेळीं फोडण्यांत येतो. असा टाहो फोडणाऱ्यांना मानसशास्त्राची ओळख नाहीं, शिक्षणशास्त्र कशाशीं खातात तें माहीत नाहीं, प्रस्तावनेच्या शास्त्रशुद्ध पायाच्या खोलीची कल्पना नाहीं, तिच्या व्यावहारिक उपयुक्ततेची जाणीव नाहीं असें खेदानें म्हणावें लागतें. पद्यांत वातावरणास किती उच्च स्थान आहे याचीही कल्पना त्यांना नसावी. आणि या सर्वांची कल्पना असून जर असा टाहो फोडण्यांत येत असेल तर तो टाहो फोडणाऱ्यांच्या

अध्यापनांतील अपयशामुळें असण्याचा संभव आहे. ज्यांचा स्वत:च्या शिक्षणशैलीवर भरंवसा नाहीं, ज्यांना आत्मविश्वास नाहीं, ज्यांची प्रस्तावना यशस्वी होत नाहीं असेंच लोक प्रस्तावनेविरुद्ध गिल्ला करून तिला गाडून टाकण्याचे प्रयत्न करीत असण्याचा संभव आहे. किंवा अशा लोकांनीं पद्य स्वत. कधीं शिकविलें नसावें, केवळ पुस्तकें वाचून तें कसें शिकवावें याची कल्पना करून घेतलेली असावी. भांडोत्री अनुभवावर विश्वास ठेवण्यांत अर्थ नाहीं. ' आधीं केलें मग सांगितलें ' असा प्रत्यय त्यांच्या शिकवणींतून होत नसल्यामुळें प्रस्तावनेची हकालपट्टी मान्य करतां येत नाहीं. प्रस्तावना अत्यावश्यक आहे. ती सौंदर्य-परिपोषक झाली पाहिजे, काव्य विषयास साजेशी झाली पाहिजे, सूचक झाली पाहिजे, अन्वर्थक झाली पाहिजे. तिची हकालपट्टी करणें अयोग्य आहे, अशास्त्रीय आहे, अज्ञानाचें आहे.

प्रस्तावनेची पद्याचें पाठांतून हकालपट्टी सुचविली जाण्याचें आणखी एक कारण देतां येईल. प्रस्तावनेला धाब्यावर बसवायला निघालेल्या तज्ज्ञांमध्यें तिच्या अर्थाविषयींच गैरसमज असल्याचें आढळून येतें. तिच्या निश्चित स्वरूपाचें व कार्याचें संपूर्ण अज्ञानच त्यांच्यामध्यें दिसून येतें. प्रस्तावना म्हणजे पूर्वज्ञान जागृत करण्याची पायरी असें बेधडक ते सांगून टाकतात. आणि तें अंशत: खरेंही आहे. पाठाच्या सुरवातीस मुलांचें शिकविल्या जाणाऱ्या विषयाविषयीं असलेलें पूर्वज्ञान अजमावून तें जागृत करण्याचें कार्य प्रस्तावनेंतच करावयाचें असतें. सामान्यत: कोणत्याही विषयाच्या अध्यापनास त्याची मदत होते. पण पद्याचें अध्यापनास नुसतें पूर्वज्ञान जागृत करून चालत नाहीं. पद्य-पाठांत वातावरणनिर्मितीस अतिशय महत्त्व आहे. योग्य वातावरणाची निर्मिति करण्यास पूर्वज्ञानाच्या जागृतीनें मदत होते हें नाकबूल करून चालणार नाहीं. पण योग्य वातावरणाच्या अभावी पद्याची प्रस्तावना पूर्ण होत

नाहीं हेंही तितकेंच खरें आहे. यावरून वातावरण निर्मितीचा प्रश्न डोळ्यापुढें उभा न राहिल्यामुळें हे तज्ज्ञ म्हणविणारे कविता-शिक्षक प्रस्तावनेवरच बोळा फासायला निघाले हें स्पष्ट दिसून येतें.

प्रस्तावनेचें स्वरूप व कार्य याविषयीं असलेल्या अज्ञानानें प्रस्तावनेच्या प्रकारांतही अनेक घोटाळे माजविले आहेत. प्रस्तावना करण्याचे जे अनेक प्रकार किंवा पायंडे आज रूढ झालेले आहेत ते योग्य आहेत असें म्हणवत नाहीं. एवढेंच नव्हे तर हे पायंडे वातावरण निर्मितीच्या निकषावर घासून पाहिले तर ते हिणकस आहेत, अशुद्ध आहेत, अशास्त्रीय आहेत, सदोष आहेत असें सिद्ध झाल्याचें प्रत्ययास येतें. शिकविल्या जाणाऱ्या पद्यांतील कठीण शब्दांचा अर्थ सांगूनच पुष्कळ वेळां प्रस्तावना केली जाते. आणि अशी प्रस्तावना करणें हा पद्याची प्रस्तावना करण्याचा शास्त्रशुद्ध प्रकार म्हणून मानला जातो. या प्रकारास ' कठीण शब्द स्पष्टीकरण पद्धति ' असें नामाभिधान लाभलें आहे. विशेषतः जुनें काव्य शिकवितांना प्रस्तावनेचा हा प्रकार हमखास उपयोगांत आणावा असें आग्रहानें प्रतिपादिलें जातें. शिवाय वरच्या वर्गांतही हा प्रकार अंमलांत आणावयास हरकत नाहीं असें म्हटलें जातें वास्तविक कठीण शब्दाला सोपा प्रतिशब्द देण्यांत, त्याची व्युत्पत्ति लावण्यांत, सामासिक शब्दांची फोड करण्यांत, संधि सोडविण्यांत काव्याला पोषक असें वातावरण कोठें व कसें निर्माण होतें हेंच कळत नाहीं. शब्दार्थांच्या फेऱ्यांत सांपडल्यानंतर मुलांचा जीव इतका आंबतो, त्यांना पद्य-शिक्षण इतकें रूक्ष व रखरखीत वाटतें, कीं पद्याला पोषक असें नवीन वातावरण निर्माण होण्याऐवजीं असलेलें अनुकूल वातावरणच नाहींसें होतें. तसेंच वरच्या वर्गांत ही पद्धति अमलांत आणण्यांची शिफारस कां केली गेली त्याचें कारणही कळत नाहीं. वरच्या वर्गांत पद्य-पाठास योग्य असें वातावरण प्रस्तावनेमध्यें निर्माण करण्याची आवश्यकता नाहीं असें सुचवावयाचें

असल्यास न कळे. पण ही सूचना देखील सदोष आहे. वातावरण निर्मितीचें बाबतींत ' लहान-मोठा ' भेदभाव करणें योग्य नाहीं. पद्य बालकांना शिकवावयाचें असो, तरुणांना शिकवावयाचें असो वा म्हाताऱ्यांना समजावून सांगण्याचें असो, प्रस्तावनेंत योग्य वातावरण निर्माण केलेंच पाहिजे. ' कठीण शब्द स्पष्टीकरण पद्धति ' मध्यें हें होत नसल्यामुळें ती त्याज्य ठरते.

प्रस्तावनेचा दुसरा त्याज्य प्रकार म्हणजे कविचरित्रकथनपद्धति. या पद्धतीविषयीं मखलाशी करतांना असें सांगितलें जातें कीं कवितेची प्रस्तावना करतांना कवि-चरित्र सांगण्याचा मोह शिक्षकास स्वाभाविकपणें होतो. कविता व कविचरित्र यांचा एकमेकांशीं संबंधही पुष्कळ वेळां असतो, म्हणून कवीचें चरित्र सांगून प्रस्तावना करणें योग्य. पण या म्हणण्यांत सत्यांश फार कमी आहे. तसेंच तें अव्यवहार्यही आहे. कविता शिकवितांना कवीचें चरित्र सांगण्याचा मोह होणें हेंच मुळीं अस्वाभाविक आहे. असा मोह ज्या शिक्षकास होतो त्याचें शिक्षण-पद्धतिविषयक ज्ञान तोकडें आहे, त्याची चूक होत आहे, त्याची दिशाभूल होत आहे, त्याचें मन चमत्कारिक बनलें आहे असें समजावयास कांहीं हरकत नाहीं. कारण कविचरित्राचा मोह मनाची वृत्ति नव्हे, सहज-प्रवृत्तीही नव्हे. असा मोह होण्याचें कारण एक तर त्याला कवीविषयीं खूप माहिती असेल, जिव्हाळा असेल आणि या माहितीचा उपयोग वेळीं अवेळीं करण्याची संवय त्याला जडली असली पाहिजे, किंवा ट्रेनिंग कॉलेजमधील सारासार विचार न करणाऱ्या प्राध्यापकांनीं, छापलेला मजकूर खरा असलाच पाहिजे, अशा समजुतीच्या प्राध्यापकांनीं त्याची गैरसमजूत करून दिली असली पाहिजे. दुसरें असें कीं कवीचें काव्या-मधील स्थान अतिशय उच्च असलें, ॰ध्रुवताऱ्याप्रमाणें अढळ असलें तरी त्याचें चरित्र आदर्श आणि उद्बोधकच असेल असें नाहीं. त्याचें विचार

कल्पनातीत उच्च असले तरी त्याचे आचार तसे असतीलच असेंही नाहीं. ते विचाराच्या अगदीं उलट असण्याचाच संभव अधिक. कवि हा एक वेडा प्राणी आहे, विचित्र प्राणी आहे, अव्यवहार्य प्राणी आहे, अनिष्ट प्राणी आहे, त्याच्या सावलीला उभे राहणें पाप आहे, त्याला दुरूनच नमस्कार करा, असें समाजाचें मत त्याच्याविषयीं होण्यास कांहीं तरी कारणें झालींच असलीं पाहिजेत. कवीविषयींचें समाजाचें हें मत इतकें दृढ आहे, पक्कें आहे कीं त्याचा ठसा कथाकादंबऱ्यांतही उमटला आहे. कवि या आपल्या अगच्या विशेष गुणांनीं ललितवाङ्‌मयांत अमर झाला आहे. अशा कवीचें चरित्र अजाण, अननुभवी व अल्पवयी मुलांना सांगणें कितपत श्रेयस्कर आहे याबद्दल विचार केल्यास तें सांगणें इष्ट होणार नाहीं असाच कौल मिळेल असें वाटतें.

यावर कांहीं विद्वानांचें म्हणणें असें पडतें कीं पद्य शिकवितांना कविचरित्र सांगण्याची जरूरी नाहीं हें खरें आहे. पण शिकविली जाणारी कविता कवीच्या चरित्रावर प्रकाश पाडणारी असेल अथवा कविचरित्रांतील एखादा धागादोरा कवितेमध्यें अडकलेला असेल तर कविचरित्र सांगून प्रस्तावना करणें, कविता समजावून देण्याच्या दृष्टीनें अत्यावश्यक आहे. आपल्या म्हणण्याच्या पुष्ट्यर्थ ते असेंही उदाहरण देण्याचा संभव आहे कीं रे. टिळकांची ' पाखरा येशील का परतून ? ' ही कविता कै. बालकवि ठोंबरे यांच्या नावाचा उल्लेख प्रस्तावनेंत केल्यावांचून नीटशी शिकविलीच जाणार नाहीं. पण त्यांचें हें म्हणणें पटण्यासारखें नाहीं. कारण कवीच्या अनुभवांचीं चित्रें जरी काव्यांत असलीं तरी असे अनुभव फक्त कवींनाच येत असतात असें नाहीं, ते इतरांनाही येतात. इतरांना असें अनुभव येतात म्हणूनच कवीचें काव्य लोकप्रिय होतें, त्याचा उदोउदो होतो. कवीचे अनुभव इतरांहून वेगळे असतील तर त्याच्या काव्याला कुत्रा विचारणार नाहीं. रे. टिळकांची ही कविता रूपकात्मक असून

कवितेतील पाखरूं हें कै. बालकवि ठोंबरे यांच्यावरील रूपक आहे हें निर्विवाद आहे. त्यांच्या निधनानें रे. टिळकांना झालेल्या दुःखातिशयाच्या झटक्यांत या कवितेचा जन्म झाला हेंही सत्य आहे पण ही कविता ऐकतांना श्रोत्यांची तल्लीनता होते, त्यांच्यामध्यें सहानुभूति निर्माण होते, ती सर्वसामान्य वियोग दुःखाच्या जाणीवेमुळें, बालकवींच्या वियोगामुळें नव्हे. वियोगाची जाणीव ज्यास अनुभूतिपूर्ण होत असेल त्यावर या कवितेचा परिणाम अतिशय होणार. त्याकरितां बालकवींचे टिळकांशीं नातें सांगण्याची आवश्यकता नाहीं माझ्या या म्हणण्यांतील आशय कळूनही या प्रसंगाची माहिती सांगण्याचा मोह आवरत नसेल तर निदान शिक्षकानें ही माहिती प्रस्तावनेंत तरी सांगू नये. सांगावयाचीच झाल्यास रसग्रहणाचेवेळीं ओझरता उल्लेख करून सांगावी.

कविचरित्र पद्धतीबद्दल आणखी असेंही सुचविलें जातें कीं या पद्धतीचा अवलंब संतकवींची कविता शिकवितांना करावा. कारण संतकवींची कविता आत्मनिष्ठ आहे. कविता आत्मनिष्ठ असेल, तिच्यामध्यें आत्मप्रत्ययाचे पडसाद उमटले असतील, स्वानुभवाचे बोल उतरले असतील तर कविचरित्र प्रस्तावनेंत सांगावें. पण हीही सूचना बुद्धीला पटण्यासारखी नाहीं. कविता आत्मनिष्ठ असते म्हणूनच ती लोकांना आवडते. कवीइतके अनुभव इतरांना कदाचित् येत नसतील. पण थोड्याफार प्रमाणांत सर्वांनाच हे अनुभव येत असतात. तेव्हां कविचरित्र प्रस्तावनेंत सांगून कांहीं फार मोठा कार्यभाग होणार आहे असें नाहीं. याही बाबतींत असें म्हणतां येईल कीं कविचरित्र सांगण्याचा मोह आवरतां येत नसेल तर तें रसग्रहणांत सांगावयास हरकत नाहीं.

कविचरित्रकथनपद्धतीच्या उपयोगाबद्दल आणखी एक सूचना केलेली आढळते, ती म्हणजे या पद्धतीचा अवलंब फक्त वरच्या वर्गांत करावा. "अशी सूचना करणाऱ्यांची हरकत तिचा वापर खालच्या वर्गांत

करण्याबद्दल फार मोठी आहे. कां तर कविचरित्र सांगत बसल्यानें मुलांच्या कविता ऐकण्याच्या उत्साहावर विरजण पडतें. खालच्या वर्गांतील मुलांच्या उत्साहावर विरजण पडतें आणि वरच्या वर्गांतील मुलांच्या उत्साहावर पडत नाहीं ! कां त्यांना उत्साहच नसतो ! काय म्हणायचें आहे तरी यांना ! ते कांहीं म्हणोत. पण त्यांचें म्हणणें पटण्यासारखें नाहीं असें आम्ही म्हणतच राहणार. कारण उघड आहे. पद्याचें पाठपद्धतीला छोटीं मुलें व मोठीं मुलें असा भेदभाव माहीत नाहीं. पद्य-पाठपद्धतीस सर्व सहृदय माणसें सारखींच, कारण पद्याची घडणच मुळीं हृदयाच्या ऐरणीवर केलेली असते.

पद्य-पाठांतील प्रस्तावना करण्याची तिसरी त्याज्य पद्धति म्हणजे गोषवारापद्धति. या पद्धतीमध्यें शिकवावयास घेतलेल्या पद्याचा गोषवारा प्रस्तावनेदाखल थोडक्यांत सांगितला जातो. असें करण्यानें मुलाची पद्याबद्दलची उत्कंठा मारून टाकली जाते, त्यांचें औत्सुक्य धुळीस मिळविलें जातें, त्यांना मिळणाऱ्या आल्हादास मूठमाती दिली जाते. उत्कंठा हा कोणत्याही परिणामकारक शिक्षण पद्धतीचा पाया आहे. उत्कंठा ज्या प्रमाणांत वाढविली जाईल त्या प्रमाणांत पाठ अधिक यशस्वी होतो. उत्कंठा सर्व आबालवृद्धामध्यें कमी अधिक प्रमाणांत सांपडतें. ती एक सहजप्रवृत्ति आहे. शिक्षण-क्षेत्रांमध्यें ही सहजप्रवृत्ति मोठी कामगिरी बजावीत असल्यामुळें तिला मोठें मानाचें स्थान मिळालें आहे. तिच्यामुळेंच पाठामध्यें आकर्षण उत्पन्न होऊन त्याच्याकडे मुलांचें अवधान लागतें. या तिच्या करामतीचा योग्य उपयोग करून घेण्याऐवजीं तिची उचलबांगडी करणें असमंजसपणाचें आहे, तिचें निर्मूलन करणें वेडेपणाचें आहे. उत्कंठा पाठाच्या यशाची नांदी मानली तर आल्हाद या यशाची तुतारी आहे. नांदीच बेसूर झाली, बदसूर झाली, कर्णकटु झाली तर तुतारी फुटेल, ती वाजणारच नाहीं.

या सर्व महादोषांची जाणीव म्हणूनच कीं काय असें सुचविलें जातें कीं गोषवारापद्धति सरीस अमलात आणण्यास अयोग्य असली तरी पद्य कथनपर असेल, लांबलचक असेल तर तिचा उपयोग करण्यास हरकत नाहीं. मात्र खालच्या वर्गांत तिचा उपयोग करणें अयोग्यच होईल. कविता लहान असली काय किंवा लांबलचक असली काय तिचा गोषवारा सुरवातीसच सांगितल्यानंतर तिच्याबद्दल औत्सुक्य राहत नाहीं.* मुलें लहान असलीं काय किंवा मोठीं असलीं काय गोषवारा त्यांना अगोदरच कळल्यामुळें त्यांचें लक्ष पाठाकडे लागणार नाहीं, पद्याच्या पाठांत त्यांना आल्हादप्राप्ति होणार नाहीं. कथनपर कवितेचे किंवा लांबलचक कवितेचे योग्य टप्पे पाडतां येणें शक्य आहे, योग्य तुकडे पाडणें शक्य आहे. कवितेचा मतलब अगोदर न सांगतां कविता टप्याटप्यांनीं शिकविणेंच श्रेयस्कर आहे.

गोषवारापद्धतीची सुधारून काढलेली दुसरी एक आवृत्ति आहे. तिला परिचयपद्धति म्हणतात. या पद्धतीनुसार पद्य-पाठाचें प्रस्तावनेमध्यें, शिकविल्या जाणाऱ्या पद्याचा मतलब सविस्तरपणें न सांगतां त्रोटकपणें एक दोन वाक्यांत सांगण्यांत येतो. तसेंच कवीचीही त्रोटक ओळख अशीच एक दोन वाक्यांत करून दिली जाते. यावरून परिचयपद्धति म्हणजे कविचरित्रकथनपद्धति व गोषवारापद्धति यांचें मिश्रण आहे हें स्पष्ट आहे. मिश्रणाचें घटक त्याज्य असल्यानतर, टाकाऊ असल्यानंतर मिश्रणही टाकाऊ होणार हें अधिक विशद करून सांगण्याची जरूरी नाहीं.

पद्य-पाठाच्या प्रस्तावनेच्या सर्व सदोष प्रकारांमध्यें उच्चांक मिळविणारा दुसरा एक प्रकार आहे. त्यास चर्चापद्धति म्हणतात. या प्रकारांत अध्यापनास घेतलेल्या पद्यांतील विषयावर प्रस्तावनेंत सखोल चर्चा केली जाते. त्या विषयाला दुसरी बाजू असल्यास त्यावरही पूर्णपणें चर्चा केली जाते. कांहीं वेळां पद्यांतील विषय प्रत्यक्षपणें चर्चेस

न घेता, त्या विषयाशीं संलग्न अशी दुसरी बाजू चर्चेस घेतली जाते, निरनिराळ्या प्रश्नांच्याद्वारें त्या बाजूबद्दल विद्यार्थ्यांचें विवक्षित मत बनविलें जातें, आणि मग कवीस ही रास्त बाजू कां पटत नाहीं असें हळूंच विचारलें जातें. ही चर्चा इतकी सखोल होते, इतकी साधकबाधक होते, इतकी परिपूर्ण होते कीं पद्यामधील वातावरणाचा भग होतो, त्यांतील औचित्याचा नाश होतो, त्यांत शिकवावयासच कांहीं उरत नाहीं, त्याकडे लक्ष वेधण्यास औत्सुक्याची वाणवा पडते, त्यापासून लुटावयाच्या आल्हादाचा लोप होतो, त्यांतील आनदसागर सुकून जातो. असें झालें म्हणजे मुलें गोंगाट करतात, तोंडास येईल तें बोलतात, नाना तऱ्हेचे सुसंबद्ध व असबद्ध प्रश्न विचारून शिक्षकाचें तोंड बद करतात, आणि त्यामुळें शिक्षकाचें चांगलेंच हसें होतें. हा सर्व प्रकार पाठाच्या सुरवातीसच होत असल्यामुळें पाठाचा खेळखंडोबा व्हावयास उशीर लागत नाहीं. म्हणून टाकाऊपणांत ही पद्धति अग्रगण्य मानावयास कांहींच हरकत दिसत नाहीं.

कांहीं वेळा चित्रांचें साह्यानें पद्य-पाठाची प्रस्तावना केली जाते. ही पद्धति चित्रदर्शनपद्धति म्हणून ओळखली जाते. विशेषत: या पद्धतीनें प्रस्तावना खालच्या वर्गांत म्हणजे इयत्ता ३ री अखेर करण्यास हरकत नाहीं असें सांगितलें जातें. चित्र पद्यांतील मध्यवर्ति कल्पनेस धरूनच रेखाटलेलें असतें. असें चित्र प्रस्तावनेंत दाखविलें गेल्यामुळें पद्याचा मतलब अगोदरच मुलांना कळतो. त्यामुळें पद्यांतील नाविन्यच नाहींसें होतें. याचा परिणाम व्हावयाचा तोच होतो.

जरा बारकाईनें विचार केला तर चित्रदर्शनपद्धति व गोषवारापद्धति यांमध्यें फारसा फरक नाहीं. गोषवारापद्धतीमध्यें वाचासामर्थ्यानें सारांश सांगितला जातो आणि कर्णसामर्थ्याच्या जोरावर तो ग्रहण केला जातो. चित्रदर्शन पद्धतीमध्यें चित्रकलेच्या साह्यानें हा सारांश स्पष्ट केला जातो

आणि नेत्रांच्या अलोट सामर्थ्यानें तो ग्रहण केला जातो. परिणामकारक ग्रहणशक्तीचे प्राप्तीकरितां कानांपेक्षां डोळेच जास्त प्रभावी ठरतात हें सर्वमान्य आहे. याचाच अर्थ असा कीं चित्रदर्शनपद्धतीमध्यें काना-ऐवजी डोळ्यांचा उपयोग अधिक होत असतांना पद्याचा सारांश मुलांना उठावदारपणें कळत असल्यामुळें ती गोषवारापद्धतीपेक्षां अधिक त्याज्य मानावयास पाहिजे.

यावर असें म्हटलें जाण्याचा संभव आहे कीं लहान मुलांना चित्रें आवडतात. चित्रांच्या साह्यानें दिलेलें ज्ञान भक्कम होतें, तें कधीं विसरलें जात नाहीं, पुसट होत नाहीं. चित्रांच्या उपयुक्ततेबद्दल कोणाचेंच दुमत नाहीं. प्रश्न एवढाच आहे कीं त्यांचा उपयोग केव्हां आणि कसा करा-वयाचा. या प्रश्नाचें एकच उत्तर कीं चित्रांना पद्यपाठांत स्थान नाहीं. प्रस्तावनेंत तर नाहींच नाहीं. इतर विषय शिकवितांना त्यांचा भरपूर उपयोग करावा. पण पद्य-पाठांत त्यांचा उपयोग करणें अयोग्य आहे. या बाबतींत लहान मुलें व मोठीं मुलें अशी वयवारीनें विभागणी करण्याचें कारण नाहीं. मुलें लहान असोत, कीं मोठीं असोत पद्यांत रेखाटलेलें चित्र त्यांच्या डोळयापुढें तरळलें पाहिजे. चर्मचक्षुंना दिसणारीं चित्रें त्यांच्या मनश्चक्षुपुढें उभीं राहिलीं पाहिजेत. अशीं चित्रें मनश्चक्षुपुढें उभें करणें हें सोपें काम नाहीं. तें जातिवंत शिक्षकांशिवाय इतरांना जुळत नाहीं. पण काम अवघड आहे, कौशल्याचें आहे, न जुळणारें आहे म्हणून कोणी प्रयत्नच करूं नये असें नाहीं. प्रस्तावनेंत चित्रें दाख-विल्यामुळें या प्रयत्नांना अडथळा येतो, त्यांना मोडता घालण्यांत येतो, कसबी शिक्षकाची पिच्छेहाट केली जाते, हें अधिक विस्तारानें सांगण्याची जरूरी नाहीं.

पद्य-पाठास योग्य अशा प्रस्तावनेचा एकच प्रकार आहे असें मला स्वानुभवानें वाटतें. तो म्हणजे पद्यास पोषक असें वातावरण प्रस्ता-

CE36

वनेमध्यें प्रश्न विचारून निर्माण करण्याचा. या प्रकारास 'भावानुकूल वातावरणनिर्मितिपद्धति' असें म्हटलें जातें. हा प्रकार मानसशास्त्रास मान्य आहे, शिक्षणशास्त्रास सम्मत आहे तसाच तो प्रस्तावनेच्या हेतूस मिळता जुळता आहे. पद्याच्या प्रस्तावनेचा मूळ हेतु योग्य वातावरणाची निर्मिति करणें हाच आहे. आणि या पद्धतीनुसार पद्यांत उमटलेल्या भावांना साजेसेंच वातावरण प्रस्तावनेमध्यें निर्माण करावयाचें असतें. हें वातावरण पद्यांतील विषयास, भावनेस व रसास अनुरूप असें प्रश्न विचारून करावयाचें असतें. उदा० 'खबरदार जर टाच मारुनी' या कवितेमधील वीररस प्रस्तावनेंत ओतला पाहिजे 'बा, नीज गडे नीज गडे लडिवाळा' यांतील निराश्रित मातेचें कारुण्य त्यांत दिसलें पाहिजे. 'केवढें हें क्रौर्य' यांतील असहायता व क्रूरता दिग्दर्शित झाली पाहिजे. असें योग्य वातावरण प्रस्तावनेमध्यें निर्माण झालें, म्हणजे पद्यांतील भावाचे आकलन होण्यास विद्यार्थ्यांना मदत होते. अशा रीतीनें प्रस्तावना करणें बरेंच कठीण असतें. शिक्षक कुशल असल्याशिवाय, कलवी असल्याशिवाय, जातिवत असल्याशिवाय आणि तो शिकविल्या जाणाऱ्या पद्याशीं तादात्म्य पावल्याशिवाय, त्यांतील विषयांशीं तन्मय झाल्याशिवाय, त्यांतील रसांत वाहवत गेल्याशिवाय अशी प्रस्तावना करणें अशक्य होतें.

पद्य-पाठास योग्य असें वातावरण प्रस्तावनेंत निर्माण करीत असतांना एक गोष्ट ध्यानांत ठेवणें आवश्यक आहे. ती म्हणजे असें वातावरण निर्माण करीत असतांना आवश्यक असणारें भावनोद्दीपन विद्यार्थ्यांच्या ठिकाणीं अत्युत्कटत्वानें करूं नये. तसें तें केलें तर विद्यार्थ्यांचीं अननुभविक मनें बावरतील, हळवीं मनें हेलावतील, कोमल मनें करपतील. याचा एवढाच अर्थ कीं भावनोद्दीपन अतिशयोक्तीपूर्ण असूं नये. तें पद्यांतील भावांच्या योग्य प्रमाणांत असतांना मुलांच्यावर

असे परिणाम होत असतील तर खुशाल होवोत. नव्हे ते झालेच पाहिजेत. वीररसाची कविता शिकवितांना मुलांचे बाहु स्फुरलें पाहिजेत, त्यांची छाती पुढें आली पाहिजे वात्सल्यरसाची कविता शिकवितांना त्यांचें अंतःकरण प्रेमानें भरून आलें पाहिजे, ओथबलें पाहिजे. आनंद पर्यवसायी कवितेचें अध्यापन करीत असतां त्यांचें अंतःकरण थयथय नाचलें पाहिजे, त्यांचे चेहरे खुलले पाहिजेत, त्यांच्या डोळयांत आनंदाश्रु आले पाहिजेत या उलट दुःखपर्यवसायी कवितेचें अध्यापन चालू असतां त्यांचें अंतःकरण करपलें पाहिजे, त्यांचे चेहरे काळवडले पाहिजेत, त्यांच्या डोळ्यांतून दुःखाश्रु टिपकले पाहिजेत. दुःखाश्रु हीच यशस्वी शिक्षकाची बिदागी, आनंदाश्रु हीच त्याची कमाई.

अशा तऱ्हेनें योग्य प्रस्तावना झाल्यानंतर तावडतोब हेतुकथन करावयाचें असतें. हेतुकथन ही पद्य-पाठांतील दुसरी पायरी होय. ही पायरी एक मिनिटांत सहज चढतां येतें. हेतुकथनामध्यें आपण काय शिकणार आहोंत, कोठें जाणार आहोंत, कशासाठीं जाणार आहोंत, हें स्पष्टपणें सांगावयाचें असतें पद्य-पाठांतील हेतुकथन करणें सोपें आहे. आपण अमुक कविता शिकणार आहोंत असे सांगितलें म्हणजे पुरें. हेतुकथन सोपें असलें तरी तें अतिशय महत्त्वाचें आहे. तें पाठाचें ध्येय निश्चित करतें आणि मार्गही दाखवितें. तें पाठाच्या मोटारचें स्टीअरिंग आहे, पाठ-नौकेचें सुकाणू आहे, ध्रुवतारा आहे.

हेतुकथनाचें एवढें महत्त्व असल्यामुळें मुलांना तें केवळ तोंडीं सांगून भागत नाहीं तोंडी सांगितल्याबरोबर लगेच तें फळयावर लिहावयाचें असतें. कारण पाठाचा ध्रुवतारा हा नेहमीं मुलांच्या डोळयांसमोर असावयास पाहिजे. कित्येक वेळां शिक्षक हेतुकथन घाईघाईनें करतात व तें फळयावर लिहावयास विसरतात. कांहीं जण तें फळयावर मुद्दामच लिहीत नाहीं. कारण रसग्रहणांत त्यांना विद्यार्थ्यांकडून कवितेस नांव

देवबून घ्यावयाचें असतें. पाठाचा हेतु फळयावर न लिहिण्याचें कारण काहीं असलें तरी तें अक्षम्य आहे. पाठाचा हेतु फळयावर लिहिलाच पाहिजे.

20985 दि
क्रमांक २३८ नं. दि

# ३. पद्य कसें शिकवावें (पुढें चालू)

[ पद्य-गायन, मूकवाचन, हेतुप्रश्न व पद्याचें स्पष्टीकरण ]

पद्याचे पाठांत हेतुकथनानंतर पद्य-गायनाचा टप्पा येतो. हा टप्पा प्रस्तावनेइतकाच किंबहुना त्याहूनही अधिक महत्त्वाचा आहे असें अनुभवानें सिद्ध केलें आहे. पाठाच्या यशस्वितेची अर्धीअधिक मदार कर्णमधूर पद्य गायनावर अवलंबून असते. प्रस्तावनेमध्यें व्यवस्थितपणें यशाचा पाया घातल्यानंतर पाठाची सुंदर इमारत बांधण्यास पद्य-गायनापासूनच प्रारंभ करावयाचा असतो. पद्य-गायन पडलें, वेसूर झालें, तर पद्याचा पाठ कंटाळवाणा होणार, नीरस होणार हें जवळ जवळ ठरल्यासारखें असतें या उलट गोड, सुरेल पद्य-गायनानें मुलांच्या मनाची एकदां का पकड घेतली कीं मग पुढें पाठांतील तंत्रांत एखादी घोडचूक झाली तरी तिचा परिणाम पाठावर विशेष न होता पाठ उठावदार व परिणामकारक होतो. प्रस्तावनेंत पडलेले पद्य-पाठ, तसेंच प्रतिपादनांत अपयशी झालेले पद्य-पाठ, केवळ परिणामकारक पद्य-गायनाचे जोरावर यशस्वी झाल्याची अनेक उदाहरणें आहेत. पाठाच्या निरनिराळ्या पायऱ्यांतील तांत्रिक दोष पोटांत घालण्याची पद्य-गायनाची शक्ति अचाट आहे, अफाट आहे, अजब आहे, अमोल आहे.

पद्य-गायनाच्या या अमोल शक्तीचा उपयोग योग्य तऱ्हेनें व्हावयास पाहिजे. पद्य-गायनांतील या अमोल ठेव्याचा वापर काटकसरीनें व्हावयास पाहिजे. आपलें पद्य-गायन कर्णमधूर असतें, तें ऐकणाऱ्यांच्या अंतःकरणाची पकड घेऊं शकतें म्हणून एखादा शिक्षक पाठाच्या तंत्राकडे कानाडोळा करून केवळ अनेक वेळां उठल्यासुटल्या पद्य गात राहील तर त्याच्या पदरांत अपयशाची मोट पडल्याशिवाय राहणार नाहीं. ऊस गोड झाला म्हणून कोणी मुळासकट खात नाहीं. तसें पद्य-गायन गोड

असलें तरी त्याला असलेली मर्यादा सोडतां कामा नये. पद्य-गायना-लाही मर्यादा आहे. ती म्हणजे कोणतेंही पद्य दोनपेक्षां अधिक वेळां लागोपाठ न म्हणणें. पद्य-गायनाची ही मर्यादा पाळली गेलीच पाहिजे

पद्य-गायनाला घातलेली ही मर्यादा सहेतुक आहे, आणि योग्यही आहे. पद्य-गायनांत शिक्षकानें दोन गोष्टी साधावयाच्या असतात. त्या म्हणजे पद्याची चाल मुलांच्या मनांत घुमविणें, आणि पद्यांतील उत्कट भाव त्यांच्या हृदयावर उमटविणें, त्यांतील मध्यवर्ति कल्पनेची त्यांना स्थूलमानानें कल्पना आणून देणें. या दोन गोष्टी दोन निरनिराळया वेळीं मुलांच्या निदर्शनास आणून देण्याकरितां पद्य लागोपाठ दोन वेळां म्हटलें जातें. याचा अर्थ असा नाहीं कीं प्रत्येक पद्य दोन वेळां म्हणावें पद्य अवघड असेल, त्यांत विचाराची गुंतागुंत असेल तर तें दोन वेळांही म्हणण्यास हरकत नाहीं. या उलट तें सोपें असेल, धावतें असेल, तर तें एकदांच म्हटलें पाहिजे. विचारात्मक कविता साधारणतः कळण्यास जड पडत असल्यामुळें त्या दोन वेळां म्हणाव्यात व वर्णनात्मक कविता सहजासहजीं समजण्यासारख्या असल्यामुळें त्या एकदां म्हणा-व्यात असा सर्वसाधारण नियम घालावयास प्रत्यवाय दिसत नाहीं.

दोन वेळां पद्य म्हणावयाची पाळी आली असतां प्रथमतः म्हटल्या जाणाऱ्या पद्याचा उद्देश प्रामुख्यानें त्याची चाल मुलांच्या मनांत घुम-विण्याचा असतो, त्याचें नादमाधुर्य त्यांच्या गळीं उतरवण्याचा असतो. दुसऱ्या वेळीं पद्य म्हटलें जातें तें अर्थमाधुर्याकरितां, पद्यांत प्रतिपादिलेल्या विषयांचा परिचय करून देण्याकरितां. म्हणून प्रथम पद्य म्हणत असतां मुलें डोलली पाहिजेत, त्यांच्या अंतःकरणांत उमटणाऱ्या स्वरांच्या आंदोलनानें व भावनांच्या वादळानें तीं बेफाम झालीं पाहिजेत, स्वतःला विसरलीं पाहिजेत. दुसरे वेळीं पद्य म्हणत असतां पद्यांतील विषय,

आशय व भावना त्यांच्या अंतःकरणांत कोरल्या गेल्या पाहिजेत आणि असें झाल्याचा दाखला त्यांच्या चेहऱ्यांनीं दिला पाहिजे.

पद्य-गायनाचे बाबतींत आणखी एक मुद्दा विवाद्य होऊन बसला आहे. तो म्हणजे शिक्षकाचें पद्य-गायन चालू असतां विद्यार्थ्यांनीं आपलीं पुस्तकें उघडून त्यांतील कविता बघावी कीं तीं मिटून ठेवून नुसतें शिक्षकाचें पद्य-गायन ऐकावें. मुद्दा साधा आहे, सरळ आहे. पण यावर इतकी बाचाबाची झाली आहे, हल्लकल्लोळ उडाला आहे, वादळ उठलें आहे कीं त्याबद्दल कल्पना करवत नाहीं. या मुद्यावर इतकीं रणें माजलीं, वाचेच्या तीक्ष्ण तलवारी रोखल्या गेल्या, टीकेची भालाफेक झाली, तोंडाच्या तोफखान्यांतून इतके वायगोळे सोडले गेले, इतके वाग्बाण सुटले कीं कित्येकांचीं तोंडें फुटलीं, अंतःकरणें फाटलीं, हृदयें विदारलीं, भगदीं रक्तबंबाळ झालीं. एवढें झालें तरी मूळ प्रश्न सुटला नाहीं. असें कां व्हावें ? साधा प्रश्न कां सुटू नये ? या प्रश्नाचें उत्तर फार सोपें आहे. तें शिक्षणतज्ज्ञ म्हणविणाऱ्यांच्या 'मीपणां'त सांपडतें. आम्ही विद्वान् लोक इतके पट्टीचे विद्वान् आहोंत कीं जगामध्यें आमच्यापेक्षां अधिक जाणणारे कोणी आहेत असें आम्हांला कधीं वाटतच नाहीं; नव्हे ही कल्पना देखील आम्हाला सहन होत नाहीं. आमच्या मानानें इतरांना कांहींच कळत नाहीं, अशी आमची भावना झाल्यामुळें दुसऱ्यांचें म्हणणें ऐकून घेण्याची वृत्ति आमच्यामध्यें उरली नाहीं, शिष्टाचार राहिला नाहीं, सहिष्णुता शिल्लक राहिली नाहीं, माणुसकीचा मागमूस राहिला नाहीं. आम्ही कूपमंडूक वृत्तीनें शिक्षण-क्षेत्राच्या डबक्यांत खिचपत पडलों आहोंत. या डबक्याच्या बाहेरील उघड्या जगांतील शुद्ध वातावरणांत जे येतील ते हा प्रश्न हां हां म्हणतां सोडवतील असा भरंवसा वाटतो. काव्यगायनाच्या हेतुची पूर्ण ओळख झाली असल्यास हा प्रश्न चुटकीसरशी सुटण्यासारखा आहे.

कवितागायन नादमाधुर्य व अर्थमाधुर्याकरितां करावयाचें असतें कविता गायन नादमाधुर्याकरितां होत असतांना विद्यार्थ्यांचें लक्ष कवितेच्या चालीकडे, शिक्षकाच्या आवाजाकडे, हावभावाकडे आणि त्यापासून होणाऱ्या भावनोद्दीपनाकडेच पाहिजे. तें पुस्तकाकडे किंवा इतर कोठें वेधल्यास कविता गायनाच्या ध्येयावरच गदा आणल्यासारखें होतें. कारण त्यामुळें कविता गायनाचा हेतु साध्य न होतां वर्गांत गडबड होते, गोंगाट माजतो. मुलांच्या गुणगुणण्यामुळें वर्गाला भ्रमर वाटिकेची कळा येते. पुस्तकांच्या फडफडत्या पानांनीं आणि मुलांच्या वाचेच्या चाळ्यांनीं कधीं कधीं शिक्षकाचा जीव गुदमरतो, त्याची जीभ कोरडी पडते, आंत ओढली जाते. आणि मग तोंडाबाहेर शब्दच उमटत नाहीं.

कविता वाचन अर्थमाधुर्याकरितां असेल तर मात्र पुस्तकें उघडीं ठेविलीं पाहिजेत. कारण स्पष्ट आहे. अवघड शब्द, विशेष अर्थाचे शब्द, कवितेचा विषय, मतलब, वगैरे डोळ्याखालून गेला म्हणजे समजण्यास तो सोपा होतो. अर्थ समजून घेण्याची मुलांना उत्कंठा लागत असल्यामुळें, काव्यसौंदर्य पिपासेनें ते व्याकुळ झालेले असल्यामुळें, अर्थमाधुर्याकरितां करावयाचें कविता गायन पुस्तकें उघडीं ठेवून केलें तरी त्यामुळें वर्गांत गोंगाट होण्याचा संभव नसतो.

यावर असा प्रश्न विचारला जाण्याचा संभव आहे कीं ज्या पद्य-पाठांत दोन वेळां पद्य म्हणावयाचे असतें, त्यावेळीं प्रथम पुस्तकें मिटून व नंतर तीं उघडीं ठेवून म्हटलें जाईल; पण ज्या पाठांत एकदांच पद्य-गायन व्हावयाचें असेल तर त्यावेळीं काय करावयाचें ? सकृत दर्शनीं प्रश्न अवघड वाटला, बुचकळ्यांत टाकणारा वाटला, तरी त्याचें उत्तर सोपें आहे. ज्यावेळीं पद्य सोपें असेल, त्याच वेळीं पद्य-गायन एकदां करण्याची सवलत आहे. पद्य सोपें असल्यामुळें अर्थमाधुर्याकरितां त्याची पुनरावृत्ति करण्याची आवश्यकताच राहत नाहीं. पद्याचा अर्थ सहजा-

सहजीं ध्यानांत येत असल्यामुळें याबाबतींत पद्य-गायन नादमाधुर्याकरितांच करावयाचें असतें हें सहज पटण्यासारखें आहे. नादमाधुर्याचा आस्वाद त्याचा भंग न होऊं देतां घ्यावयाचा म्हणजे पुस्तकें मिटलेलींच पाहिजेत.

पद्य-गायनांत दुसरा एक प्रश्न कधीं कधीं उत्पन्न होतो. तो म्हणजे शिक्षकानें पद्य संपूर्ण म्हणावें कीं अपूर्ण म्हणावें. या प्रश्नाचा संबंध पद्य-गायनाला दिलेल्या वेळेंत आहे. पद्य-गायनाला साधारणतः तीन ते पांच मिनिटें द्यावयाचीं असतात. कविता लहान असेल, तासांत संपणारी असेल, तर दिलेला वेळ पुरेसा होतो. पण ती लांबलचक असेल, ती अभ्यासायला दोन चार तास लागणार असतील तर दिलेला वेळ अपुरा पडणें साहजिक आहे. अपुऱ्या वेळेकडे दुर्लक्ष करून असें लांबलचक पद्य म्हटलें तर पद्याचा स्थूलाभ्यास, सूक्ष्माभ्यास यांना त्याचा तडाखा जाणवतो व पाठाच्या इतर पायऱ्यांनाही बाध येतो. शिवाय पुढील तासांत शिकविल्या जाणाऱ्या भागांचें प्रदर्शन केलें जात असल्या-मुळें त्यांतील औत्सुक्य कमी होऊन त्याचा पुढील पाठावरही परिणाम होतो. हे सर्व दोष टाळण्याचा एकच उपाय आहे. तो म्हणजे अर्थाच्या स्वयंपूर्णतेच्या दृष्टीनें लांबलचक पद्याचे योग्य तुकडे पाडून त्यांतील एकेक आळीपाळीनें शिकवावयाचे ज्या तासाला जो तुकडा शिकवावयाचा असेल तेवढाच त्या तासाला चालीवर म्हणावयाचा, हें आणखी उघड करून सांगण्याची जरूरी आहे असें वाटत नाहीं.

पाठ जास्तींत जास्त यशस्वी करण्याचें दृष्टीनें पद्य-गायन करतांना निरनिराळ्या प्रकारची खबरदारी घ्यावयास पाहिजे. त्यांतील पहिली खबरदारी म्हणजे पद्याला योग्य चाल लावणें. पद्यांतील नादमाधुर्य त्याला लावलेल्या चालींतून व्यक्त होत असतें. पद्याची चाल चित्ता-कर्षक असावी, श्रुतिमनोहर असावी, त्याबरोबरच ती पद्यांतील वर्ण्य

विषयास, भावनेस व रसास साजेशी असावी. तसेच ती सोपी असावी, मुलांना ती सहज म्हणतां यावी.

शिक्षकानें सोपी चाल अवघड केल्याचीं उदाहरणें पुष्कळ सांपडतील. चालींतील काठिण्याचें कारण त्याच्या गायकींत असण्याचा संभव आहे. शिक्षकाला संगीताची आवड असेल, माहिती असेल, तर तो वर्गांतसुद्धां गायकी पद्धतीनें पद्य म्हणावयास सुरवात करतो. अशा तऱ्हेनें पद्य म्हणतांना गायकीतील अनावश्यक दोष पद्य-गायनांत आपो-आप येतात. शिक्षकाचा आवाज व शब्द पुष्कळ वेळां अस्पष्ट येतात आणि त्यामुळें अर्थबोध होण्यास कठीण पडून मुलांचें लक्ष इतर गोष्टींकडे पांगते. पद्य गायनांत कृत्रिमता येत असल्यामुळें भावनोद्दीपनाच्या कार्यांस बाध येऊन पद्य नीरस वाटूं लागतें. एकच ओळ पुनः पुन्हां घासून घासून घसा ताणून म्हटली जाते. एकच ओळ वारंवार म्हटली गेल्यामुळें मुलांना कंटाळा येऊन ती टिवल्याबावल्या करूं लागतात; आणि पाठाचा विचका होतो. या ठिकाणीं एवढें नमूद करावेसें वाटतें कीं एकाच ओळीची पुनरावृत्ति करावयाची नसली तरी ध्रुवपद प्रत्येक कडव्याच्या शेवटीं म्हणण्यास त्यामुळें आडकाठी येत नाहीं. सारांश एवढाच कीं पद्य-गायनांत अकारण गेयता आणून वर्गाला संगीतालयाचें स्वरूप आणूं नये व मुलांचें लक्ष अर्थ व भावनेवरून संगीताकडे झुकवूं नये.

संगीताचा पगडा शिक्षकावर बसल्यास पद्य-गायनांत आणखी एक दोष डोकावण्याचा संभव असतो पद्याला लावलेली चाल व्यवस्थितपणें म्हणून दाखविण्याकरितां पुष्कळ वेळां पद्यांतील शब्द •ऱ्हस्वाचे दीर्घ व दीर्घांचे ऱ्हस्व केले जातात. व्याकरणदृष्ट्या शब्दांचा चुकीचा उच्चार करणें गायकींत कदाचित् मान्य असेल, पण पद्य-पाठांत तें मान्य नाहीं. कारण पद्य-पाठ हा एक शिक्षणाचा भाग आहे. आणि शिकवावयाचें तें बिनचूक असलें पाहिजे.

पद्य-गायन करतांना शारीरिक हालचाली करण्याची कित्येकांना सवय असते. गातांना अंगविक्षेप केले नाहींत तर त्यांना सुनेसुने वाटतें, त्यांच्या गाण्यांत रंग भरत नाहीं या अंगविक्षेपाच्या अभावीं मैफलींत कदाचित् रंग भरत नसेल पण या अंगविक्षेपामुळें वर्गात रंगभंग झाल्याचीं उदाहरणें अनेक देतां येतील. अशा विक्षेपाची खरोखर जरूरीही नाहीं. फार तर अगदीं खालच्या वर्गांत म्हणजे इ. १ व २ मध्यें योग्य असे हावभाव केल्यास पुरे. वरच्या वर्गांतून अंगविक्षेपाचें उच्चाटण झालें पाहिजे.

शारीरिक हालचालीमुळें पद्यांतील भावना स्पष्ट करण्यास मदत केली जाते असें म्हटलें जातें पद्यांतील भावना खरोखर कशानें स्पष्ट होत असतील तर आवाजाच्या चढउतारानें. आवाजांत योग्य तो चढउतार केला तर आर्तता, आतुरता, अनुकंपा, अभिमान, आश्चर्य, औत्सुक्य, प्रेम त्वेश, द्वेष, तिरस्कार, भीति इत्यादि भावनांचा आविष्कार सहजा-सहजीं करतां येतो. वेड्यावाकड्या अंगविक्षेपापेक्षां आवाजांतील चढ-उतारानें भावनांचा आविष्कार करणें सुसंस्कृतपणाचें व सभ्यपणाचें लक्षण आहे हें कोणीही अमान्य करणार नाहीं.

हें सर्व करीत असतांना पद्य-गायनाचे बाबतींत शिक्षकानें आणखी एक खबरदारी घेतली पाहिजे पद्यांत असलेल्या भावाचें दिग्दर्शन त्याचे चेहऱ्यावर झालें पाहिजे. पुष्कळ वेळां या मुद्याकडे शिक्षकाचें दुर्लक्ष होतें. आणि पद्यांतील भावाच्या अगदीं उलट असे भाव त्याच्या चेहऱ्यावर दिसतात. ' आनंदी आनंद गडे, इकडे तिकडे चोंहीकडे ' ही कविता गात असतां शिक्षकाचे चेहऱ्यावर आनंदाच्या छटेऐवजीं गांभीर्याचा भावच मी पुष्कळ वेळां पाहिलेला आहे, त्याचें अंत:करण आनंदानें उड्या मारण्याऐवजीं सुस्तावलेलेंच मी पाहिलेलें आहे, तो आनंदानें बेहोष होण्याऐवजीं भयभीत झाल्याचा देखावाच मी पाहिलेला

आहे. असें होणें योग्य नाहीं. पद्यांतील भाव शिक्षकाचे चेहऱ्यावर उमटले पाहिजेत

हे भाव नुसत्या शिक्षकाच्या चेहऱ्यावर उमटून भागणार नाहीं. ते विद्यार्थ्यांच्या मुखवट्यावरही तरळले पाहिजेत मुलें शिक्षकाचा आरसा आहेत या आरशांत शिक्षकाचें प्रतिबिंब जसेंच्या तसें पडलें पाहिजे. शिक्षकाच्या डोळयांत दिसणारें आनंदाश्रु मुलांच्या डोळयांत चमकले पाहिजेत शिक्षकाच्या डोळयांतील दुःखाश्रु मुलांच्या डोळयांतून टिबकले पाहिजेत. असें झालें तरच पद्य-गायन योग्य झालें असें म्हटलें पाहिजे.

शिक्षकाचें पद्य-गायनानंतर मूकवाचन द्यावयाचें असतें. मूक-वाचन गद्य-पाठांत किंवा पद्य-पाठांत महत्त्वाचें मानलें जातें. मूकवाचन ही एक कला आहे ती अभ्यासानें आत्मसात करतां येते, सवयीनें साध्य करतां येते. ही कला बरीच कष्टसाध्य असल्यामुळें ती आत्मसात करण्याकरितां बऱ्याच नियमांचें पथ्य पाळावें लागतें.

मूकवाचन याचा अर्थ सरळ आहे, स्पष्ट आहे. मूकवाचन म्हणजे मुकेपणानें वाचणें, मनांत वाचणें. मूकवाचन यास केव्हां केव्हां मनांतील वाचनही म्हणतात. अर्थात् मूकवाचन चालू असतां ओठाची हालचाल-सुद्धां होतां कामा नये, मग गुणगुण तर बाजूलाच राहो. पण या नियमाचें पालन काटेकोरपणें होत नाहीं असें अनुभवांतीं म्हणावें लागतें. त्यामुळें वर्गांत अशांतता माजते. त्याला एखाद्या वट-वृक्षाचें स्वरूप येतें. या वटवृक्षावर जणूं काय पहाटेच्या वेळची पक्षांची किलबिल चालू असल्याचा भास होतो. याचा परिणाम व्हायचा तोच होतो. पाठास उतरती कळा लागते.

मूकवाचनांत निर्भेळ शांतता राखली गेली पाहिजे. कारण मुलां-कडून विषयाचें ग्रहण परिणामकारकपणें याच वेळीं होण्याचा संभव

असतो यावेळीं फक्त डोळयांनीं वाचावयाचें असतें, अंतःकरणानें त्यांना साथ द्यावयाची असते, आणि डोक्यानें शांतपणें ग्रहण करावयाचें असतें. असें झालें नाहीं तर मुलांना विषय कळण्यास त्रास होतो. व त्याचा परिणाम पद्याच्या प्रतिपादनावरही होतो. अर्धवट किंवा न समजलेला विषय समजावून द्यावयाचा असल्यामुळें प्रतिपादन लांबतें, कंटाळवाणें होतें

मुलांचें मूकवाचन चालू असतां शिक्षकानें काय करावयाचें याबद्दल बरेंच अज्ञान दिसून येतें. अशावेळीं शिक्षकही बहुधा मुका होतो. तो मुखस्तंभासारखा खुर्चीस खिळून घेतो, किंवा टेबलाजवळ खडी तालीम देत असतो. असें करणें गैर आहे मूकवाचनाचे वेळीं शिक्षकाला महत्वाचें काम करावयाचें असतें. यावेळीं त्यानें वर्गांत फिरून विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक अडचणींचें निरसन करावयाचें असतें अशा वैयक्तिक अडचणींत कांहीं कठीण शब्दांचा अर्थ सांगणें, कांहीं संधियुक्त शब्दांची फोड करणें, कांहीं सामासिक शब्दांचें स्पष्टीकरण करणें, इत्यादींचा समावेश होतो. या कृतीमुळें विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक अडचणी दूर होत असल्यामुळें पद्याचा स्थूलाभ्यास किंवा सूक्ष्माभ्यास चालू असतां विद्यार्थ्यांकडून योग्य व झटपट उत्तरें मिळतात आणि पाठाची गाडी भरधांव धांवते.

मूकवाचन चालू असतां सर्वच नवीन अवघड शब्दांचा अर्थ प्रत्येक मुलास वैयक्तिकपणें सांगणें अशक्य आहे, अयोग्यही आहे. पद्यांतील जे नवीन शब्द बहुतेक मुलांना अडतात ते यावेळीं समजावून द्यावयाचे नसतात. जे शब्द सर्वांना अडतात त्यांचें स्पष्टीकरण शिक्षकाचें पद्यगायन झाल्याबरोबर लगेच मूकवाचन देण्यापूर्वी सामुदायिकरीतीनें करावयाचें असतें. हें स्पष्टीकरण त्या त्या शब्दांच्या भोंवती असलेलें वातावरण निर्माण करून केल्यास परिणामकारक होतें. तें न जुळल्यास, अशक्य झाल्यास सुटे शब्द घेऊन त्यांचा अर्थ सांगण्यास हरकत नाहीं.

हे नवीन शब्द फक्त फळयावर लिहावयाचे असतात. त्यांचा अर्थ मात्र लिहावयाचा नसतो. उद्देश हा कीं मुलांच्या स्मरणशक्तीस ताण देऊन ते तेथल्या तेथें त्यांच्या लक्षांत रहावेत. हे शब्द लिहितांना एक खबरदारी घ्यावयास पाहिजे. सर्व शब्द एकदम फळयावर लिहूं नयेत. जसजसें शब्दांचें स्पष्टीकरण होईल तसतसा एकेकटा शब्द फळयावर लिहावा.

मूकवाचन कोणत्या वर्गांना द्यावें या प्रश्नाबद्दल बरेंच दुमत असल्याचें आढळून येतें. कांहींच्या मतें तें इ. ३ पासून पुढें द्यावें तर इतरांच्या मतें तें इ ५ वी पासून पुढें द्यावें. मूकवाचनाच्या स्वरूपाची पूर्ण कल्पना आली असेल तर हा प्रश्न सोडविणें फारसें कठीण जाणार नाहीं. मूकवाचन ही एक कला आहे. ती आत्मसात करण्यास संवय व्हावी लागते, या दृष्टीनें इ. ३ री पासून तें सुरू करावें असें कोणी म्हणत असेल तर त्यांत दुसरी मोठी चूक होत आहे. मूकवाचन देतांना मुलांना खडखड वाचतां येतें असें गृहीत धरलें जातें. खडखड वाचतांना त्यांना त्याचा अर्थ समजतो हेंही गृहीत धरलें जातें. लक्ष केंद्रींत करण्याची शक्ति त्यांच्यामध्यें आलेली असते असें मानलें जातें. मूकवाचन चालू असतां विषयाचा आशय ग्रहण करण्याइतकी त्यांची बुद्धि तल्लख झाली आहे असें मानलें जातें. इ. ३ री पर्यंतच्या मुलांकडे पाहिलें तर या गृहीत धरलेल्या गोष्टी त्यांच्यामध्यें अभावानेंच सांपडतात असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. इ. १ व २ च्या मुलांना धड वाचतांही येत नाहीं. कारण त्यांचें गटज्ञानही पुरें झालेलें नसतें. जोडशब्दांचीही चांगली ओळख झालेली नसते. इ. ३ रीच्या मुलांना कुठें अस्खलित वाचतां येऊं लागतें. या अस्खलितपणाची वाढ करण्यास एक वर्षाचा काल कांहीं जास्त होणार नाहीं. तेव्हां इ. ४ पासून मूकवाचन देण्यास हरकत नाहीं असें वाटतें.

इ. ५ वी पासून मूकवाचन द्यावें असें म्हणणारे बहुतेक दुय्यम

शाळांतील शिक्षक आढळतात. त्यांचें म्हणण्यात असें येतें कीं मूकवाचन ही कला असल्यामुळें तिची संवय मुलांचीं मनें साधारणतः पक्व झाल्याशिवाय लावूं नये. त्यांचें हें म्हणणें पटण्यासारखें कसें नाहीं हें वरील विवेचनावरून स्पष्ट होईल. दुय्यम शाळेंतील शिक्षकांचा प्राथमिक शाळांशीं किंवा त्यांतील शिक्षकांशीं क्वचित् संबंध येतो. त्यामुळें प्राथमिक शाळेंत शिकविल्या जाणाऱ्या अभ्यासक्रमाचें ज्ञान, त्यांत अवलंबिलेल्या शिक्षण-पद्धतींचें ज्ञान, त्यांना सहसा नसतेंच म्हटलें तरी चालेल. प्राथमिक शाळेंतील मुलें टाकाऊ असतात, शिक्षक निर्बुद्ध असतात, अभ्यासक्रम कुचकामाचा असतो असाच त्यांचा समज झालेला असतो. हा समज गैर असल्यामुळें, अयोग्य असल्यामुळें, त्याला अनुभवाचा वास नसल्यामुळें तो विचारांत घेण्याचें कारण नाहीं. सर्व गोष्टींचा विचार करून असें स्पष्ट सांगावेंसें वाटतें कीं इ. ४ पासून मूकवाचन देणेंच योग्य आहे.

मूकवाचनाचें सव्यापसव्य टाळण्याकरितां कीं काय न जाणें, कांहीं विद्वान् पद्य-पाठांतील मूकवाचनाच्या अस्तित्वावरच घाला घालतात, त्याच्या अस्तित्वावरच गदा आणतात. त्यांच्या बोलण्यांत असें येतें कीं शिक्षकाचें पद्य-गायन व्यवस्थित झाल्यानंतर व पद्याचें सविस्तर स्पष्टीकरण प्रतिपादनांत होणार असल्यामुळें मूकवाचनाचा मधला टप्पा गाळणेंच श्रेयस्कर आहे. शिवाय मूकवाचन चालूं असतां मुलें वाचीत नाहींत, तीं गडबड करतात. वाचल्यास मोठ्यानीं वाचतात. अशा वेळीं 'शांतपणें वाचा' असें म्हणण्याशिवाय दुसरा मार्ग शिक्षकास उरत नाहीं. त्याला मुलें कह्यांत ठेवतां येत नाहींत. तेव्हां मूकवाचनास पद्यपाठांतून गचांडी दिली कीं मूकवाचनाचे दुष्परिणाम आपोआप थांबतील व पाठ उठावदार होईल. या विद्वानांचें हें म्हणणें पटण्यासारखें नाहीं. कारण त्यांनीं दाखविलेले दोष मूकवाचनाचें तंत्रांतील नसून तें तंत्र हाताळणाऱ्यांमधील आहेत. 'मूकवाचनाचें पथ्य पाळलें नाहीं, त्याचे नियम पाळले नाहींत

म्हणजे हे दोष निर्माण होतात. तेव्हां शिक्षकाचे दोष शिक्षण-पद्धतीवर लादणें योग्य होणार नाहीं. शिक्षकांतील दोष निघाले कीं पाठांत मूकवाचनाचा प्रभाव पडल्याशिवाय राहणार नाहीं.

मूकवाचन नको म्हणणाऱ्यांना शास्त्राची बैठक दिसत नाहीं, मानसशास्त्राची ओळख दिसत नाहीं, शिक्षणशास्त्राची तोंडओळख दिसत नाहीं. या शास्त्राधारें बारकाईनें विचार केला तर शिक्षकाचें नमुनेदार वाचन किंवा गायन, मुलांचें मूकवाचन व स्पष्टीकरण या टप्प्यांची एक न तुटणारी सांखळी आहे असें निदर्शनास येतें हे टप्पे या पाठांतील सांखळीच्या कड्या आहेत. या कड्या मोठ्या कौशल्यानें सांधलेल्या आहेत. परिणामकारक पद्य-गायनांत पद्याचा आशय साधारणतः ५० टक्के कळतो असा सर्वांचा अनुभव आहे. मूकवाचनांत पद्याचा न समजलेला आशय समजून घेण्याचा प्रयत्न मुलांनीं करावयाचा असतो. तो समजावून घेण्याकरितां आपल्या वैयक्तिक अडचणींचें निरसन तीं करून घेत असतात. अशा वैयक्तिक अभ्यासानें पद्याचा आशय आणखी स्पष्ट होण्यास मदत होऊन त्याची समजूत आणखी ३० टक्यांनीं अधिक होते. उरलेल्या २० टक्के आशयाची फोड स्पष्टीकरणांत शिक्षकानें करून द्यावयाची असते. ही आशयाची टक्केवारी प्रत्येक मुलाचें बाबतींत खरी ठरेलच असें नाहीं, कारण मुलें कमी अधिक बुद्धिवान् असतात. तसेंच तीं सर्व पद्यांचे बाबतींतही खरी न ठरण्याचा संभव आहे. कारण पद्यें कमी अधिक कठीण असतात. पण सर्वसाधारणपणें ही टक्केवारी योग्य आहे असें अनुभवास येतें. अनुभवांतूनच ती जन्मास आली आहे.

पद्य-पाठांतून मूकवाचनाचें उच्चाटण करणें अयोग्य असलें, अशास्त्रीय असलें, अशक्य असलें, तरी कांहीं ठिकाणीं अपवाद करण्यास हरकत नाहीं. कारण एकप्रकारें अपवादानेंच नियमाची सिद्धता होत असते. असा अपवाद सोप्या पद्याचें बाबतींत करतां येईल. वर्णना-

त्मक पद्यें साधारणतः सोपीं असतात. तसेंच कांहीं कथनपर पद्येंही सोपीं असतात. अशीं सोपीं पद्यें शिकवितांना मूकवाचनाचा टप्पा जरूर गाळावा. पण तो सरास सर्व इयत्तांमध्यें गाळूं नये. खालच्या वर्गांत तो गाळूं नये. वरच्या वर्गांत गाळावा. कारणें उघड आहेत. एकतर पद्य सोपें असतें व दुसरें वरच्या वर्गांतील मुलांची बुद्धि तें समजून घेण्यास पात्र झालेली असते.

मुलांना मूकवाचन देतांना तें आपण कां देतो, कशाकरितां याची चौकशी शिक्षकानें केली पाहिजे, याचा पत्ता त्यानें लाविला पाहिजे, याचा तल्लास त्यानें घेतला पाहिजे. केवळ पाठाच्या सप्तपदींतील तें एक पाऊल म्हणून शिक्षक गप्प बसला तर त्याची फसवणूक झाल्याशिवाय राहणार नाहीं. आतां मूकवाचनाचा टप्पा आहे, म्हणून आतांच वाचलेला किंवा गायलेला भाग तुम्ही मनांत वाचा असें जर शिक्षक म्हणू लागला तर मुलें त्याचें ऐकणार नाहींत. तीं मनापासून वाचणार नाहींत. वाचीत आहेत असें दाखवितांना तें खोड्या काढतील, गडबड करतील, अनेक तऱ्हेच्या माकडचेष्टा करतील, आणि त्याबद्दल त्यांना दोष देणेंही फारसें योग्य ठरणार नाहीं. मूकवाचन सहेतुक असतें. त्यांत कांहीं तरी साध्य असतें. हें साध्य मुलांच्या डोळ्यांपुढें ठेवल्यास मुलें आपलें लक्ष मूकवाचनावर केंद्रित करतात. आणि मग वर्गांत गोंगाट होण्याची भीति आपोआप दूर होते. हें साध्य हेतु-प्रश्नांच्या रूपानें मुलांच्यापुढें ठेवावयाचें असतें. हेतुप्रश्नांचीं उत्तरें शोधून काढण्याच्या दृष्टीनें तुम्ही 'अमुक पद्य' वाचा असें मुलांना सांगितल्यानें तीं मूकवाचनांत गढून जातात. हेतुप्रश्नांचीं उत्तरें शोधून काढण्यांत तीं गर्क होतात, दंग होतात.

हेतुप्रश्नांची आवश्यकता इतकी स्पष्ट असतांना, त्याचें प्रयोजन इतकें स्पष्ट असतांना, शिक्षण-क्षेत्रांत वावरणारे कांहीं लोक हें ओळखत

नाहींत असें अनुभवास येतें या लोकांच्या मतें मुलांना मूकवाचन देतांना हेतुप्रश्न देण्याची जरूरी नाहीं. मूकवाचन झाल्यावर फार तर एखादा सामान्य प्रश्न विचारून वाचलेला भाग त्यांना कितपत कळला हें ताडून पाहावें. तें आणखी असेंही प्रतिपादतात कीं प्रत्येक ठिकाणीं हेतुची पूर्तता करण्याचें कारण नाहीं, प्रत्येक ठिकाणीं साध्याचा बडेजाव करण्याचें कारण नाहीं. मूकवाचनाचें आपलें कर्तव्य मुलांनीं केलें पाहिजे. मला वाटतें असें म्हणणाऱ्यांवर भगवद्गीतेच्या तत्त्वज्ञानाचा बराच परिणाम झालेला असावा. ‘ कर्मण्यवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ’ या पद्य-पंक्तीच्या फन्द्यात ते पडले असावेत. या उच्च तत्त्वांचा त्यांना कैफ चढलेला असावा. त्याशिवाय ते असें बडबडणार नाहींत. या तत्त्व-ज्ञानाचा उपयोग सामान्य माणसांना दैनंदिन जीवनांत कितपत होतो याबद्दलची साशंकता अनेकांकडून प्रदर्शित केली जाते. या साशंकतेकडे दुर्लक्ष करून या तत्त्वाचा उपयोग या व्यवहारी जगांत माणसांवर होतोच असें कोणी अट्टाहासानें म्हणत असल्यास प्रश्न वेगळा. पण त्यांचें हें म्हणणें मान्य करूनही, असें त्यांना बजवावयास कांहींच हरकत नाहीं कीं असा परिणाम माणसावर होत असल्यास तो मुलांवरही होईल असें नाहीं. कारण तत्त्वज्ञानी होण्याचें त्यांचें हें वय नसतें. त्यांची प्रत्येक कृति सहेतुक असते. म्हणून हेतुप्रश्न दिलेच पाहिजेत. मूकवाचन म्हटलें कीं त्याबरोबर हेतुप्रश्न आलेच. एवढी ही जोडी अभेद्य आहे, चिरकालीन आहे.

पद्य-पाठांत दिल्या जाणाऱ्या हेतुप्रश्नांवर ओझरती नजर टाकल्यास असें निदर्शनास येतें कीं त्यांची संख्या निदान दोन तरी असते आणि केव्हां केव्हां ती पांचापर्यंत फुगते. तें पद्याच्या कोणत्यातरी भागावर विचारलेले असतात. त्यांत पद्यांतील मुख्य कल्पना आलेली असतेच असें नाहीं. त्यांपासून पद्याचा गोषवारा कळण्यास मदत होते असेंही

नाहीं. प्रायमरी टीचर्स ट्रेनिंग कॉलेजमध्यें जा कीं सेकंडरी टीचर्स ट्रेनिंग कॉलेजमध्यें जा, कुठेंही जा हेंच आढळून येईल. पद्य-पाठांत हेतुप्रश्न द्यावयाचें असतात म्हणून दिले जातात, त्यावर फारसा विचार केला जात नाहीं असें म्हणण्यास प्रत्यवाय दिसत नाहीं. वास्तविक हेतुप्रश्न पद्यांतील मध्यवर्ति कल्पनेवर आधारलेले असावयास पाहिजेत. पद्यात मध्यवर्ति कल्पना एकच असते. ती एकच असते म्हणून तर तिला 'मध्यवर्ति' असें नामाभिधान प्राप्त झालें आहे. हेतुप्रश्न अशा एकुलत्या एक मध्यवर्ति कल्पनेवर आधारावयाचा असल्यामुळें तोही एकच राहील, त्याची संख्या एकापेक्षां अधिक होणार नाहीं, हें उघड आहे. हें सूर्य-प्रकाशाइतकें खरें असूनही त्याकडे कोणी लक्ष देत नाहीं, म्हणून सर्व घोटाळा निर्माण होतो.

पद्य-पाठांत एकापेक्षां अधिक हेतुप्रश्न असूं नयेत हा नियम काटे-कोरपणें पाळला पाहिजे. विचारात्मक कवितेमध्यें तो तंतोतंत पाळतां येणें शक्य आहे. पण वर्णनात्मक कवितेमध्यें तो पाळणें कठीण जातें. कारण वर्णनात्मक कवितेमध्यें कांहीं कांहीं वेळां मध्यवर्ति कल्पनाच नसते, निव्वळ वर्णन असतें, तर उलट कांहीं वर्णनात्मक पद्यांत कल्पनांचा वेहद सुळसुळाट झालेला असतो आणि त्या सर्व कल्पना सारख्या महत्त्वाच्या आणि अलग असल्यामुळें एक हेतुप्रश्न देण्यास कठीण पडतें. अशा ठिकाणीं अपवादात्मक एकापेक्षां अधिक हेतुप्रश्न द्यावयास हरकत नाहीं. तरी पण त्यांची संख्या तीनपेक्षां अधिक न होऊं देण्याची खबरदारी घ्यावी.

हेतुप्रश्न फळयावर लिहून द्यावेत कीं शिक्षकानें तोंडीं वर्गांत सांगावेंत याबद्दल दुमत असल्याचें प्रत्ययास येतें. आणि त्याचा परिणाम म्हणूनच कीं काय सध्यां कांहीं पद्य-पाठांत हेतुप्रश्न फळयावर लिहून दिले जातात तर कांहीं पद्य-पाठांत तें तोंडीं सांगितले जातात. या दुमतामुळें हे दोन

प्रघात पडत चालले आहेत, पायंडे घातले जात आहेत असें म्हणावयास हरकत नाहीं. पण ही परिस्थिति अयोग्य आहे असें कोणीही अमान्य करणार नाहीं. म्हणून या प्रश्नाचा सोक्षमोक्ष लावणें अत्यावश्यक आहे.

थोडा बारकाईनें विचार केला तर असें दिसून येईल कीं हेतुप्रश्नांचें उत्तर शोधून काढण्याकरितां तो मुलांच्या आठवणींत राहिला पाहिजे, त्यांच्या मनांत घुमला पाहिजे. मूकवाचन करीत असतांना मुलांना निरनिराळ्या अडचणींचें निरसन करून घ्यावयाचें असतें. अडचणींचें निरसन करून न घेतल्यास पद्याचा गाभा कळण्यास कठीण जातें. असें निरसन करून घेतांना मुलांचें मन द्विधा होऊन त्याचा परिणाम त्यांच्या स्मरणशक्तीवर न कळत होण्याचा संभव असतो पाठाच्या एकदर वातावरणाचा विचार केल्यास या विधानास दुजोराच मिळेल. आणि अशाप्रकारें हेतुप्रश्नाचें विस्मरण झाल्यास तो शिक्षकाला किंवा आपल्या जवळील मित्राला विचारण्याची पाळी मुलांवर येईल आणि पाठांत व्यत्यय येईल. शिवाय हेतुप्रश्न शिक्षक तोंडीं सांगत असतांना वर्गांतील सर्व चाळीस-पन्नास मुलांचें अवधान त्याकडे असेलच असेंही नाहीं. ज्यांचें अवधान नसेल त्यांना हा प्रश्न पुन्हा शिक्षकाला किंवा आपल्या मित्राला विचारावाच लागेल. आणि त्यामुळें गोंगाट होईल. हें सर्व टाळण्याकरितां हेतुप्रश्न तोंडीं न देतां फळयावर लिहून देणेंच योग्य ठरतें. म्हणून हेतुप्रश्न कदापि तोंडीं देऊं नये, फळयावरच लिहावा.

हेतुप्रश्न लिहिण्याच्या बाबतींत दुसरा एक विवाद्य मुद्दा आहे. हेतुप्रश्न लिहिण्याचें ठरल्यानंतर तो कशावर लिहावा, कोठें लिहावा याबद्दल तो आहे. हेतुप्रश्न वर्गांत मुलांच्या समक्ष फळयावर लिहावा कीं घरून मेणकापडाच्या गुंडाळी फळयावर घरून लिहून आणावा याबद्दल आहे. सध्यां कांहीं शिक्षक वर्गांत फळयावर तो लिहितांना आढळतात तर कांहीं तो घरून लिहून आणतांना आढळतात. दोन्हीही प्रकार अमलांत

असल्याचें प्रत्ययास येत असलें तरी या प्रकारांपैकीं अधिक चांगला कोणता हें ठरविणें श्रेयस्करच होईल.

पांचसात शब्दांचा हेतुप्रश्न गुंडाळा फळयावर लिहून आणण्याची प्रथा कां पडली तेंच कळत नाहीं. वास्तविक पांचसात शब्द फळयावर लिहावयास फारसा वेळ लागत नाहीं त्यामुळें पद्य-पाठाची गति कमी होत नाहीं, त्याचें वातावरण बिघडत नाहीं. असें असतांना ही प्रथा पडली हें विशेष आहे. पण यांत आश्चर्यकारक कांहीं नाहीं. विचारांतीं असें दिसून येईल कीं या प्रथेचें मूळ पाठसाहित्याच्या फाजील महत्त्वांत आहे, त्याच्या स्तोमांत आहे पाठसाहित्याचें हें स्तोम माजविण्यांत प्राध्यापकवर्गानेंहीं कांहीं कमी हातभार लावला नाहीं. प्राध्यापकवर्गाला आपणावरील हा गंभीर आरोप कदाचित् सहन होणार नाहीं. आणि त्यांतील कांहीं प्राध्यापक हें कटु सत्य स्वीकारण्याऐवजीं या दोषाचें माप दुसऱ्याचें पदरांत टाकण्याचा प्रयत्न करतील., ते म्हणतील कीं शिक्षकाचें हस्ताक्षर वाईट असल्यामुळें ही प्रथा पडली. वाईट हस्ताक्षर असलें म्हणजे शिक्षक घरीं सावकाशपणें हेतुप्रश्न गुंडाळया फळयावर लिहितो किंवा दुसऱ्या कोणाकडून तो लिहून घेतो. आणि असें जर शिक्षक करीत असला तरी त्यांत कांहीं वावगें नाहीं पण प्राध्यापक महाशयांचें बोलणें बुद्धीस पटण्यासारखें नाहीं. दुसऱ्याकडून लिहून घेऊन मी लिहिलें असें भासविणें केव्हांही वाईटच, पण सर्वांत वाईट गोष्ट अशी कीं हा भास शेवटपर्यंत कायम ठेवतां येत नाहीं. पद्यांतील कठीण शब्द शिक्षक जेव्हां वर्गांत फळयावर लिहितो तेव्हां घरून लिहून आणलेल्या अक्षरांशीं त्यांची तफावत पडत असल्यामुळें तो उघडा पडतो, ढोंगी ठरतो. यावरून असें म्हणतां येईल कीं प्राध्यापकांनीं कोणाचें आड लपण्याचा डाव टाकून देऊन दोष कबूल करावा आणि तो सुधारावा. पाठसाहित्याचा बडेजाव न माजवतां पद्य-पाठांत हेतुप्रश्न वर्गांत फळयावरच लिहावयास पाहिजे असें त्यांनीं प्रतिपादावें.

हेतुप्रश्नाचें उत्तर मूकवाचन संपल्याबरोबर घ्यावयाचें असतें. साधारणपणें वर्गातील निम्म्यापेक्षां अधिक मुलांचे हात उत्तर देण्याकरितां वर झाले म्हणजे बहुतेक मुलांचें मूकवाचन संपलें असें समजून मुलांकडून उत्तर घ्यावयास हरकत नाहीं. पद्याचें मूकवाचनास सामान्यत: तीन चार मिनिटें वेळ लागतो. कांहीं वेळां मूकवाचनाच्या वेळांत बचत करण्याच्या दृष्टीनें म्हणा, किंवा इतर कांहीं कारणामुळें म्हणा सर्व मुलांचें मूकवाचन संपण्यापूर्वीच एखाद्या दुसऱ्या मुलाचा हात वर दिसला कीं शिक्षक त्याचेकडून उत्तर घेतो. असें करण्यानें पाठावर अनिष्ट परिणाम होतो. सर्व मुलांचें वाचन न संपल्यामुळें त्यांना मध्यवर्ति कल्पनेचा समज पडत नाहीं व इतर प्रश्नांचीं उत्तरेंही नीट देणें पुढें त्यांना जमत नाहीं. उत्तरें न आल्यामुळें पाठ पडणें अपरिहार्य होऊन जातें. या उलट कांहीं शिक्षक मूकवाचनाला वाजवीपेक्षां अधिक वेळ देतात. अधिक वेळ देण्याचीं कारणें बहुधा पाठाची अपुरी तयारी, शिक्षकाचा आळस, किंवा आत्मविश्वासाचा अभाव हींच असतात. मूकवाचनाला वाजवीपेक्षां अधिक वेळ दिल्यानेंही पाठांत अपयश येतें. मुलांचें मूकवाचन संपल्यामुळें त्यांना व्यवसाय राहत नाहीं त्यामुळें त्यांचें लक्ष वर्गात चोहोंकडे पांगतें, ते टिवल्याबावल्या करूं लागतात, बेशिस्त वागतात. मग शिक्षकाला वर्गातील शिस्त टिकविणें कठीण होऊन बसतें. याकरितां मुलांचें मूकवाचन संपतें न संपतें तोंच हेतुप्रश्नाचें उत्तर घेणें श्रेयस्कर.

हेतुप्रश्नाचें उत्तर मूकवाचन संपल्याबरोबर तावडतोब न घेतां पद्याचा स्थूलाभ्यास चालू असतां ओघांत जेव्हां संदर्भ येईल तेव्हां घ्यावें असें कांहीं विद्वानांचें म्हणणें असल्याचें दिसून येतें. आपलें म्हणणें पटवून देण्याकरितां तें अशी विचारप्रणाली मांडतात कीं हेतुप्रश्नाचें एक-एकटें उत्तर मूकवाचनानंतर तावडतोब घेतलें तरी स्थूलाभ्यासांत तोच

प्रश्न विचारावा लागून तेंच उत्तर घ्यावें लागतें. असा एकच प्रश्न दोन वेळां विचारल्यानें मुलांना कंटाळा येऊन पाठास जरा बाध येण्याचा संभव आहे. या विद्वानांचें म्हणणें पटण्यासारखें नाहीं. हेतुप्रश्नाची पुनरावृत्ति झाल्यामुळें पाठाच्या यशावर परिणाम होण्याचें कारण नाहीं. मुलांना कंटाळा येण्याचेंही कारण नाहीं. कारण एकच प्रश्न लागोपाठ विचारला जात नाहीं. निरनिराळया संदर्भानें तो विचारला जातो. शिवाय तोच प्रश्न नवीन शब्दांत पुन्हां विचारण्याचें स्वातंत्र्य शिक्षकाला आहेच. त्यानें या स्वातंत्र्याचा सदुपयोग केला तर कंटाळा येण्याचें मूळच उपटून टाकल्यासारखें होईल. दुसरें असें कीं दिलेल्या हेतुप्रश्नाचें उत्तर शोधून काढण्यासाठीं तुम्ही मनांत वाचा असें शिक्षक मुलांना सांगून मोकळा झालेला असतो, हें आमचे विद्वान् विसरलेले दिसतात. आपण दिलेल्या सूचनेस चिकटून रहावयाचें असेल, विसंगती टाळावयाची असेल तर हेतुप्रश्नाचें उत्तर मूकवाचनानंतर लगेंच घेतलें पाहिजे. तसें न केल्यास शिक्षकाचें सूचनेंत सत्यांश नसतो, तो दिलेलें वचन पाळीत नाहीं, म्हणून पुढें होणाऱ्या पाठांत शिक्षकाचे सूचनेकडे दुर्लक्ष करून मुलें पद्य मनांत वाचणार तर नाहींतच पण शिक्षकाचे बोलण्यावर विश्वासही ठेवणार नाहींत. अशा अविश्वासाचें वातावरणांत भरीव शिक्षण होणें दुरापास्त होईल हें अधिक फोड करून येथें सांगण्याची जरूरी आहे असें वाटत नाहीं.

हेतुप्रश्नाचें उत्तर मुलांकडून घेतल्याबरोबर पद्याचें स्पष्टीकरणास हात घालावयाचा असतो. पुष्कळ वेळां शिक्षकाचें याकडे दुर्लक्ष होतें, व तो हेतुप्रश्नाच्या आलेल्या उत्तराची अकारण अनेक वेळां पुनरावृत्ति तरी करतो किंवा त्यावर आपलें भाष्य तरी करतो, किंवा चांगलें लांबलचक व्याख्यान तरी झोडतो. त्यामुळें पाठाचा बेरंग होऊन मुलांचें लक्ष पद्याचे अभ्यासावरून उडून इतर गोष्टीकडे पांगतें.

कांहीं शिक्षक पद्याचें स्पष्टीकरण चुकीचे पद्धतीनें करतात. हेतु-प्रश्नाचें उत्तर घेतल्याबरोबर ते एकदम असे प्रश्न विचारावयास लागतात कीं त्यांचीं उत्तरें शोधून काढण्याकरितां मुलांना पद्याचें पहिल्या अक्षरा-पासून शेवटच्या अक्षरापर्यंत सारखी दृष्टी फिरवावी लागते. या डोळ्यांच्या व्यायामाचा त्यांना लवकरच कंटाळा येतो व नंतर तीं उत्तरेंच देईनाशीं होतात.

पद्याच्या स्पष्टीकरणाची योग्य पद्धति म्हणजे हेतुप्रश्नाचें उत्तर घेतल्याबरोबर पद्याचें एकेक कडवें प्रथम वाचावयाचें असा शब्दप्रयोग मुद्दाम केलेला आहे. यावेळीं कडवें गायचें नसतें, कारण स्पष्टीकरणांत अर्थाला महत्त्व असून कडव्याच्या वाचनानेंच पद्यांतील अर्थ सहजासहजीं समजण्यास मदत होते. कडवें वाचून झाल्यानतर त्यांत असणाऱ्या मुख्य कल्पनेवरच प्रथम प्रश्न विचारावयाचा असतो आणि नतर ही मुख्य कल्पना सुस्पष्ट होण्याकरितां तिच्या अनुषगानें इतर प्रश्न विचारावयाचे असतात. असें स्पष्टीकरण करीत असतां मध्येंच एखादा नवीन अवघड शब्द मिळाल्यास त्याकडे मुलांचें लक्ष वेधण्याकरितां तेवढाच तो फळ्यावर लिहावयाचा असतो. अशा पद्धतीनें पद्याचा सपूर्ण अभ्यास पंधरा वीस मिनिटांत करावयाचा असतो.

पद्याचें स्पष्टीकरण स्थूलाभ्यास व सूक्ष्माभ्यास या दोन टप्प्यांनीं कांहीं जण करीत असल्याचें आढळून येतें. प्रथम स्थूलाभ्यासामध्यें सबंध पद्यावर गोषवाऱ्याचे प्रश्न विचारावयाचे आणि नंतर सूक्ष्माभ्यासा-मध्यें पुन्हां एकदां गोषवाऱ्याच्या प्रश्नांसहित बारीकसारीक प्रश्न विचा-रावयाचे अशी पद्धति अमलांत आणीत असल्याचें आढळून येतें. पण ही पद्धति सदोष वाटते. एकतर प्रश्नांची पुनरावृत्ति त्यांत अटळ आहे. पुनरावृत्तिमुळें मुलांचें पाटाकडे दुर्लक्ष होतें. तसेंच स्थूलाभ्यासामध्यें पद्यांतील विषयाचा गाभा मुलांना कळल्यामुळें सूक्ष्माभ्यासाकडे त्यांचें

लक्ष लागत नाहीं. अशा तऱ्हेनें अवधानाचाच अभाव झाल्यानंतर योग्य उत्तरें न मिळणें, तडकाफडकीं उत्तरें न मिळणें, वर्गांत गडबड होणें वगैरे प्रकार होणें अपरिहार्य होऊन बसतें तेव्हां सबंध पद्याचा स्थूलाभ्यास व सूक्ष्माभ्यास वेगवेगळा न घेतां एकेक कडव्याचा स्थूलाभ्यास व सूक्ष्माभ्यास एकदम घेतल्यास पाठाकडे मुलांचें शेवटपर्यंत लक्ष राहून तो यशस्वी होतो असा अनुभव आहे.

पद्य-पाठांचें स्पष्टीकरण चालू असतां कांहीं गोष्टी लक्षांत ठेवणें आवश्यक आहे. स्पष्टीकरणांत गद्यांत विचारलेल्या प्रश्नांचें उत्तर पद्यांत घेण्याची घातुक पद्धति पडत चाललेली आहे ती बंद करावयास पाहिजे. ' माझ्या प्रश्नाचें उत्तर ज्यामध्यें आहे त्या ओळी वाच पाहू ' असा प्रश्न हमखास चार दोन वेळां आल्याशिवाय पद्याचा पाठ पुरा होतच नाहीं. असा प्रश्न विचारणें म्हणजे आळसाला उत्तेजन देणें होय. शिक्षकानें प्रश्नांची सांखळी मनामध्यें तयार करून ठेवल्यास त्याला असले प्रश्न विचारण्याची पाळी येणार नाहीं; आणि तसें तें विचारणें आवडणारही नाहीं. पद्याचा जरी पाठ असला तरी प्रश्नोत्तरें सभाषणपद्धतीनें गद्यांतच झालीं पाहिजेत.

दुसरीही सदोष गोष्ट कांहीं पद्य-पाठांत आढळते. ती म्हणजे पद्यांत आलेल्या नवीन शब्दांचा किंवा वाक्प्रचारांचा वाक्यांत उपयोग करण्यास मुलांना सांगणें. असें करण्यास सांगणें अयोग्य आहे, अशास्त्रीय आहे. पद्य-पाठांत वातावरणास फार महत्त्व आहे. शब्दांचा वाक्यांत उपयोग करण्यास सांगणें म्हणजे या वातावरणाचा भंग करण्यासारखें आहे. शिवाय असें करण्यानें पाठाच्या गतीमध्यें मदतता येते. त्यामुळें पाठ मुलांना कंटाळवाणा वाटूं लागतो आणि शेवटीं त्यांचें त्याच्याकडे दुर्लक्ष होतें. म्हणून हा दोष टाळण्याची खबरदारी घेतली पाहिजे.

कधीं कधीं पद्यांतील समास व संधि यांची फोड करण्यावर एवढा भर दिला जातो कीं हा पद्याचा पाठ नसून व्याकरणाचा आहे असा भास होतो. त्यामुळें पाठांतील काव्यमय वातावरण बिघडून रसहानि होते. म्हणून समास संधि यांचें स्पष्टीकरण करतांना खोलांत जाण्याचें टाळावें, व पाठाची गति अखंड राहील असें वर्तावें.

पद्य-पाठाच्या स्पष्टीकरणांत आढळणारा चौथा दोष म्हणजे प्रश्नोत्तरांत कृत्रिम भाषेचा वापर. पुष्कळवेळां नेहमींच्या बोलण्याच्या भाषेंत शिक्षक प्रश्न विचारीत नाहींत. मोठमोठे बोजड शब्द वापरून आपल्या विद्वत्तेचें प्रदर्शन करण्याचा मोह त्यांना आवरता येत नाहीं. एवढेंच नव्हे तर विद्यार्थ्यांनींही अशाच पांडित्यपूर्ण भाषेंत बोलावें अशी त्यांची अपेक्षा असते. पण तें विद्यार्थ्यांना शक्य होत नसल्यामुळें पद्यांतील भाषा त्यांनीं उचलावी असा अट्टाहास ते धरून बसतात. आणि याचा परिणाम असा होतो कीं आई, बाप, बहीण, भाऊ, नवरा, बायको असे सोपे व परिचित शब्द सोडून त्याऐवजीं माता, पिता, बंधु, भगिनी, पति, पत्नी असे शब्द संभाषणांत वापरले जातात. असे शब्द वापरले जात असल्यानें पद्याचें अध्यापन म्हणजे दैनंदिन जीवनाची फारकत ही समजूत मुलांमध्यें बळावते. तेव्हां ही कृत्रिमता काढून टाकली पाहिजे. एवढेंच नव्हे तर आपण गप्पा मारतांना जी घरगुती भाषा वापरतो तिचा वापर पद्य-पाठांत व्हावयास पाहिजे. बोलभाषेचा प्रभाव पद्य-पाठाच्या स्पष्टीकरणांत पडल्याशिवाय तें अंतःकरणापर्यंत जाऊन भिडणार नाहीं.

... ग्रंथ संग्रहालय ... स्थळप्रत
अनुक्रमांक 20965 वि. ...
क्रमांक ...२३९... नों: दि. १९.५.५८

# ४. पद्य कसें शिकवावें (पुढें चालू)

## [ रसग्रहण व गृहपाठ ]

प्रतिपादनानंतर पद्य-पाठांतील अत्यंत महत्त्वाचा टप्पा जो रसग्रहण तो येतो. प्रस्तावना पाठाचा पाया घालते तर रसग्रहण त्यावर कळस चढवतें. रसग्रहण पाठावर कल्हई चढवतें, त्याला चकाकी आणतें, शोभा आणतें. रसग्रहण पडलें तर सबंध पाठ पडतो, कंटाळवाणा होतो, नीरस होतो. या उलट मागील टप्यांत पडलेल्या पाठास योग्य वळण देण्यास, त्यास योग्य मार्गावर आणण्यास रसग्रहणाचा फार उपयोग होतो. सुरवातीच्या पायऱ्यांत अयशस्वी झालेल्या पाठाकडे रसग्रहणानें यश खेंचून आणल्याची कित्येक उदाहरणें देतां येतील. म्हणून रसग्रहणाचा हा टप्पा म्हणजे शिक्षणकलेचें कसब दाखविण्याचा उत्कृष्ट मोका होय असें म्हटल्यास त्यांत बिलकूल अतिशयोक्ति नाहीं. हा मोका साधला कीं शिक्षण-क्षेत्रांत शिक्षकाच्या कीर्तीचा डंका वाजला म्हणून समजा.

शिकविलेला पाठ मुलांना किती समजला हें रसग्रहणांत प्रामुख्यानें अजमावयाचें असतें. असा अजमास काढणें, आढावा घेणें इतर विषयांच्या बाबतींत आवृत्तिनंतर चारदोन प्रश्न विचारून सहज करतां येतें, तसें पद्य-पाठांत करतां येत नाहीं. कारण पद्य-पाठांत केवळ मजकुरावर भर देऊन चालत नाहीं त्यांतील भावनाही विचारांत घेतल्या पाहिजेत. मुलांनीं केवळ मजकुरावरच्या प्रश्नांचीं उत्तरें चांगलीं दिलीं, आणि भावनांचा ठसा त्यांच्या अंतःकरणावर उठला नसेल तर पाठ यशस्वी झाला असें म्हणतां येणार नाहीं. पद्य-पाठांत मुलांना आल्हाद-प्राप्ति झाली पाहिजे, आनंदाची लयलूट त्यांनीं केली पाहिजे, आनंदसागरांत ते डुबले पाहिजेत. काव्यमय वातावरणांत पद्यांतील भावनांनीं मुलांच्या अंतःकरणाची पकड घेतली नाहीं तर त्यांना खरा आल्हाद प्राप्त होणार

नाहीं, त्यांना आनंदाची लयलूट करतां येणार नाहीं. आल्हादप्राप्तीचा कळस रसग्रहणानें चढविला कीं पाठ मस्त झाला असें म्हणावयास कांहींच हरकत नाहीं.

काव्याचें रसग्रहण करण्याच्या प्रचलित पद्धति नानाविध आहेत, त्या अशा :— (१) मुलांना आवृत्तिजन्य गोषवाऱ्याचे प्रश्न विचारणें. (२) पद्याचा गोषवारा पाटीवर किंवा वहीवर लिहावयास सांगणें. (३) ध्वनि-वाचक, सूचक व औचित्यपूर्ण विशेष शब्दांविषयीं प्रश्न विचारणें. (४) नवीन विशेष शब्दांचा वाक्यांत उपयोग करणें. (५) फळ्यावर लिहिलेल्या वाक्यांतील मोकळी जागा भरणें. (६) कवितेस नांव देणें भाषासौंदर्य लुटणें, (७) नर्मचक्षुपुढें कवितेमधील प्रसंगांचीं चित्रें आणणें. (८) मुलांनीं कविता म्हणणें. (९) शिक्षकांनीं कविता म्हणणें. (१०) त्याच विषयावरील दुसऱ्या कवितेशी तुलना करणें. यांपैकीं अव-लंबण्यास श्रेयस्कर पद्धति कोणत्या ते आतां सकारण पाहू.

रसग्रहणाचा सर्वांत चांगला धोपटमार्ग म्हणजे कविता गोड गळयांत आकर्षक चालीवर म्हणणें. कविता शिक्षकानें म्हणावी किंवा ती मुलां-कडून म्हणवून घ्यावी. शिक्षकानें कविता-गायन केल्यास पाठाच्या रसग्रहणाच्या यशाविषयीं शंकाच बाळगावयाला नको. शिक्षकाचें सुरवातीचें कविता—गायन परिणामकारक झालें असेल तर त्याचें रसग्रहणांतील कविता गायन बहारीचें व्हावयास पाहिजे. पाठ जर चांगला रंगला तर रस-ग्रहणांतील कविता-गायन हें प्रस्तावनेनंतरच्या कविता-गायनापेक्षां खात्रीनें अधिक उठावदार होतें. शिक्षकाला काव्यगायनाची आवड असली, त्यांतील कसब त्याला अवगत असलें, तर त्यानें रसग्रहणांत कविता अवश्य म्हणावी.

पण शिक्षक काव्य-गायनांत तरबेज नसेल, त्याच्यामध्यें आत्म-विश्वासाचा अभाव असेल, त्याला न्यूनगंडानें पछाडलें असेल, तर त्यानें

स्वतः कविता न म्हणतां मुलांना म्हणावयास सांगावी. वरचे वर्गांत एकेकट्या मुलांना वैयक्तिकपणें आळीपाळीनें कविता म्हणावयास सांगावी. मुलांच्या म्हणण्यांत पाठाच्या यशाची छटा सहज पडते. खालचे वर्गांतील मुलांना सामुदायिक पद्धतीनें कविता म्हणावयास सांगावयाची असते. शिक्षकानें कवितेची एकेक ओळ किंवा तिचा योग्य भाग अगोदर म्हणावयाचा व नतर विद्यार्थ्यांनीं म्हणावयाचा अशी ही पद्धति *होय. सांघिकरित्या कविता म्हटली जात असतां शिक्षकानें योग्य व स्पष्ट आवाजांत ती म्हटली पाहिजे. तसेंच सर्व मुलांनीं ती एकदम म्हटली पाहिजे, मागेंपुढें म्हणतां कामा नये. हे सर्व दोष टाळण्याकरितां कवितेस सोपी चाल लावली पाहिजे. पण याहीपेक्षां अधिक महत्त्वाची दक्षता घेणें म्हणजे कवितेची चाल रसग्रहणांत कायम ठेवणें, ती न बदलणें. पुष्कळ वेळां असा अनुभव येतो कीं शिक्षक सुरवातीचे कविता गायनास एक चाल लावतो व रसग्रहणांतील कविता गायनास दुसरीच चाल लावतो. या दुहेरी चालीमुळें मुलांचा घोटाळा होतो. पहिली चाल मनांत घुमत असल्यामुळें त्यांना दुसरी चाल उचलतां येत नाहीं, आणि दुसरी चाल एकदम पुढें आल्यामुळें पहिली चाल पुसट होते. याकरितां कोणत्याही परिस्थितींत शिक्षकानें कवितेची चाल बदलूं नये. पण विद्यार्थ्यांना हें बंधन घालणें अनिष्ट आहे. या उलट त्यांना सुचलेल्या चालीवर कविता म्हणण्यास त्यांना मुभा दिली पाहिजे. या सवलतीचा फायदा घेऊन एखाद्या विद्यार्थ्यानें वैयक्तिकरित्या कविता म्हणत असतां शिक्षकाचे चालीपेक्षां अधिक वरचढ चाल लाविली तर तो पाठाच्या यशाचा दाखला आहे, सबळ पुरावा आहे, असेंच म्हणावें लागेल. कारण पद्यांतील भावनांशीं समरस झाल्याशिवाय, त्यांतील विचारांशीं तादात्म्य पावल्याशिवाय, त्याला अधिक चित्ताकर्षक चाल सुचणेंच शक्य नसतें.

मुलांना कविता सुरावर म्हणावयास लावण्यांत शिक्षकाच्या कसबाची कसोटी लागते. पाठ उत्तम झाला असेल, कवितेमधील खांचाखोचा मुलांना बरोबर कळल्या असतील, तिच्यामधील भाव त्यांच्या हृदयावर उमटले असतील, तर या गोष्टी त्यांच्या कविता म्हणण्यांत स्पष्ट दिसतील. त्या तशा दिसल्या तर रसग्रहण चटकदार होऊन एकदरींत पाठ परिणामकारक झाला असें समजावें या पद्धतीमध्यें मुलांवर बरेंचसें अवलंबून असून शिक्षकाचें कौशल्य दाखविण्यास येथें वाव नाहीं. तरी पण ही पद्धति स्वीकारण्यास हरकत नाहीं असें अनुभवानें पटतें.

पाठांत शिकविलेल्या कवितेशी त्याच विषयावरील दुसऱ्या कवितेची तुलना करणें ही पद्धति सर्वांत चांगली होय. उदा०

किती मौज दिसे ही पहा तरी ।
हें विमान फिरतें अधांतरी ॥

ही कविता शिकविली तर, ' गर गर फिरे विमान ' ही कविता रसग्रहणास घ्यावी. राजकवि यशवंत यांची ' आई ' शिकविली तर कविराज श्री विठ्ठलराव घाटे यांची ' आई ' किंवा इतर कोणाची ' आई ' तुलनेकरितां घ्यावी. ही पद्धति अमलांत आणण्याचें तंत्र वेगळें आहे. कवितेचें स्पष्टीकरण झाल्यानंतर शिक्षकानें ती भावपूर्ण गाऊन दाखवावी म्हणजे प्रतिपादनांत स्पष्ट केलेल्या कल्पना दृढ होतात. नंतर तुलनेला घ्यावयाची कविता आकर्षक चालीवर, गोड आवाजांत. शिक्षकानें म्हणून तिच्यांतील मध्यवर्ति कल्पना मुलांकडून काढून घ्यावी. मग या कल्पनेची शिकविलेल्या कवितेंतील कल्पनेशीं तुलना करून त्या सरस नीरस ठरवाव्या. या दुसऱ्या कवितेच्या स्पष्टीकरणाच्या भानगडींत पडूं नये. फक्त मध्यवर्ति कल्पना कळली म्हणजे पुरे.

रसग्रहणाची ही पद्धति अनुसरली तर द्विक्षित शिक्षकांचे पुष्कळ फायदे होतात. तुलनात्मक अभ्यास होत असल्यामुळें शिकविलेल्या

कवितेमधील कल्पनांची आपोआप उजळणी होऊन त्या मुलांचे मनांत दृढ होतात. थोडक्या वेळांत सहजासहजीं दोन कविता शिकविल्या जातात व त्यामुळें मुलांचे ज्ञानांत चांगलीच भर पडते. या पद्धतीमधील रस-ग्रहणाचें यश मुलांवर सर्वस्वीं अवलंबून नसतें. कौशल्य दाखविण्यास शिक्षकास जागा असते. त्यामुळें मागील टप्प्यांत पडलेला पाठ अशा तऱ्हेच्या रसग्रहणांत उठावदार करतां येतो.

रसग्रहणांत कवितेला नांव देण्याचा प्रघात सध्यां फार जोरांत आहे; आणि तो बराही आहे. निरनिराळया सुचविल्या गेलेल्या नांवावरून मुलांना कविता कितपत समजली हें आपणांस कळतें. पण अनुभव असें सांगतो कीं पुष्कळ वेळां योग्य नांव सुचविलें जात नाहीं. याचें कारण मुलें कवितेमधील मोहक शब्दांना, वाक्प्रचारांना, अलंकारांना. वर्णनांना भुलून तिच्यांतील मध्यवर्ति कल्पना विसरतात. असें झालें म्हणजे अशा चित्ताकर्षक शब्दांपैकीं एखादा निवडून तोच कवितेच्या नांवाकरितां पुढें करतात. अशी फसगत केवळ मुलांचीच होते असें नाहीं तर कित्येकवेळां शिक्षकाचीही होते. पूर्ण विचार न केल्यामुळेंही असें होण्याचा संभव असतो. एखादे वेळीं नांवांची अगदीं रेलचेल होते. याचेंही कारण वरील गोष्टीमुळें मुलांना पडलेली भूल. त्यामुळें कवितेला विवक्षित नांव देण्याचें कारण मुलांना सांगता येत नाहीं, आणि तें विचारण्याचें धैर्यही शिक्षकाला होत नाहीं. कारण त्याची तयारीच मुळीं जेमतेम असते. आणि असें झालें म्हणजे पाठाची पडलेली गाडी रुळावर आणणें शिक्षकाला जमत नाहीं. अशा वेळीं नांव स्वतःच सुचवून शिक्षक कसाबसा मोकळा होतो. ज्या शिक्षकांना पाठाची पडलेली गाडी रुळावर आणणें जुळत नसेल त्यांनीं रसग्रहणांत कवितेला नांव देण्याचे फंदांत न पडणें बरें.

या तीन प्रकारांशिवाय रसग्रहणाचे आणखी अनेक प्रकार आहेत. ते सर्व पोरकट, नाटकी असून टाकाऊ आहेत. कांहीं शिक्षक रसग्रहणांत

शिकविलेल्या कवितेवर गोषवाऱ्याचे प्रश्न विचारतात तर काहीं कवितेचा गोषवाराच वर्गांत लिहावयास सांगतात. काहीं शिक्षक फलक-लेखनांत गाळलेले नवीन शब्द व वाक्प्रचार भरावयास मुलांना सांगतात तर काहीं त्यांचा वाक्यांत उपयोग करून घेतात, आणि काहीं ध्वनिवाचक, सूचक व औचित्यपूर्ण शब्दांविषयीं पाल्हाळानें प्रश्न विचारीत सुटतात हे पांचीं प्रकार अगदीं नीरस आहेत. असें करणें म्हणजे पद्य पाठाला गद्य पाठाचें स्वरूप देणें होय. स्पष्ट सांगावयाचें झाल्यास असें सांगतां येईल कीं असें करणें म्हणजे काव्यांतील रस ग्रहण न करतां ओतून टाकण्यासारखा आहे ज्याला काव्य कशाशीं खातात हें माहीत नाहीं तो या प्रकाराचा अवलंब करतो

रसग्रहणाचा सहावा हास्यास्पद प्रकार म्हणजे भाषासौंदर्य लुटणें होय. या प्रकारांत अगदीं ठराविक सांच्याचा निर्बुद्ध प्रश्न काहीं भाळशांकडून विचारला जातो, तो असा– " या कवितेमधील कोणत्या ओळी तुम्हाला आवडतात ! " मला वाटते असा प्रश्न विचारणें बरें नाहीं. त्यांनीं स्वतःलाच हा प्रश्न विचारला तर त्याचें समर्पक उत्तर त्यांना देतां येईल कीं नाहीं याविषयीं शंका वाटते. एवढें कशाला, खुद्द कवीला असला चमत्कारिक प्रश्न टाकला तर तो देखील काहीं क्षण भांबावेल. मग मुलांची कथा काय ! जातिवंत कवीला संबंध कविताच आवडली पाहिजे. काव्य हें कवीचें अपत्य आहे. मूल बाळसेदार दिसायला, गोंडस दिसायला, त्याचे सर्व अवयव नीटनेटके व रेखीव असले पाहिजेत, सुन्दर असले पाहिजेत. खरोखर मुलांचा भाषेशीं पुरता परिचय सुद्धां झालेला नसतो. त्यांना शुद्ध बोलतां किंवा लिहितां येत नसतें. ही स्थिति सातवी अखेर तर खास आढळते. वरच्या वर्गांतील मुलांनीं अलंकार पाठ केलेले असतात, त्यांना त्यांतील सौंदर्य कळलेलें नसतें, त्यांना त्यांतील सौंदर्य स्थळांची ओळख नसते कारण भाषेच्या

जजाळांत सांपडल्यामुळें त्यांना सौंदर्यदृष्टीचाच पूर्णपणें लाभ झालेला नसतो. अशी परिस्थिति असतांना अशा प्रश्नांचीं विलक्षण उत्तरें मिळाल्या-शिवाय राहात नाहींत. चारपांच मुलांची असल्या प्रश्नांवरचीं उत्तरें गोळा केलीं तर सबंध कविता तयार होते. कारण प्रत्येक मुलाच्या आवडीच्या म्हणून सांगितलेल्या ओळी वेगवेगळया असतात. अशीं उत्तरें आल्या-नतर शिक्षकाची गाळण उडते त्यामुळें त्याला त्यांना विवक्षित ओळी कां आवडतात असा प्रश्न विचारण्यास धीर होत नाहीं काहीं वेळीं अशी मौज उडते कीं एखादा धीट व स्पष्ट बोलणारा मुलगा साफ सांगतो की, " मला खरोखर कोणतीच ओळ आवडत नाहीं. पाठाकरितां तुम्हाला उत्तर पाहिजे असल्यास वाचतों कोणत्या तरी दोन ओळी. " यापेक्षांही गमतीचें उत्तर मिळालेलें मी प्रत्यक्ष ऐकिलें आहे. शिक्षकानें तुम्हाला आवडणाऱ्या ओळी वाचा असें म्हटल्याबरोबर काहीं मुलें सबंध कविता वाचतात. यांतील काहीं मुलें मिस्किलपणानें सबंध कविता वाचतात तर काहीं अजाणपणें तसें करतात. दोघांच्या हेतुमध्यें जमीन अस्मानाचा फरक असला तरी त्यापासूनचा अर्थबोध सारखाच आहे. तो म्हणजे कवितेचें सौंदर्य तिचा भिमा करून चाखतां येत नाहीं तर तिच्या सबंध शरीरसौष्ठवावर ओझरता दृष्टिक्षेप करून अतःकरणाची तहान भागवावयाची असते. यावरून दिसून येईल कीं ही पद्धति अनुसरणें म्हणजे शिक्षकानें आपलें हसे करून घेण्यासारखें असून पाठांत शभर टक्के अपयश पदरांत घेणें होय.

रसग्रहणाचा आणखीही एक अत्यंत हास्यास्पद प्रकार रूढ झालेला निदर्शनास येतो. या प्रकारांत शिक्षक मुलांना डोळे झांकावयास सांगून शिकविलेल्या कवितेविषयीं त्यांच्या मनश्चक्षुकडून चर्मचक्षुपुढें कोणतीं चित्रें उभीं केलीं जातात तें सांगण्यास सांगतो. खरोखर अशीं चित्रें दिसण्यास मन एकाग्र व्हावें लागतें. मन एकाग्र करणें किती कठीण

कर्म आहे हें सर्वांना माहीत आहे. बालमन एकाग्र होणें त्यातून कठीण. वर्गाचें वातावरणात ' डोळे झांकून मन एकाग्र करा ' असा हुकूम सुटल्यानतर तें एकाग्र होणें अशक्य. हें सर्व मानसशास्त्रांतील पंडितांना माहीत असूनही ते मुलांकडून या कृतीपासून उत्तरांची अपेक्षा करतात. त्यांना उत्तरें मिळतातही. पण तीं डोळ्यांपुढें उभीं राहिलेल्या चित्रांचीं नसून कवितेच्या मतलबावर आधारलेल्या काल्पनिक चित्रांचीं असतात याचा पुरावा म्हणजे ही कृति चालू असतां होत असलेल्या मुलांच्या माकडचेष्टा. कांहीं मुलें गालांतील गालांत हसत असतात तर कांहीं एकमेकांना डोळे मिचकावीत असतात कांहीं मुलें डोळे किलकिले करून हळूंच इकडे तिकडे बघतात व शिक्षकाची त्यांचेकडे पाठ फिरताच डोळे उघडून त्याला निरखून पाहून त्याच्या या प्रसंगांतील अज्ञानाची कींव करतात. केवळ उत्तरें मिळाल्यामुळें शिक्षक मात्र पाठ चांगला झाला असें मानून स्वतःची फसवणूक करून घेतो व दुसऱ्यांची फसवणूक कर-ण्याचा प्रयत्न करतो. पवित्र व सुधारणापथावर असलेल्या शिक्षण-क्षेत्रांतील हें फसवाफसवीचें नाटक पाहून मन आधुनिक शिक्षण-पद्धती-विषयीं साशंक होतें. एवढ्या विवेचनावरून कळून आलें असेल कीं रसग्रहणाकरितां पहिल्या दोन पद्धति परिणामकारक व व्यवहार्य ठरतात व त्यांचाच अवलंब करणें अधिक श्रेयस्कर.

पाठाबरोबर गृहपाठ दिलाच पाहिजे अशी कांहीं लोकांची चुकीची समजूत झालेली असते. शिक्षणक्षेत्रांत वावरणाऱ्यांची गृहपाठाशिवाय पाठ पुरा होत नाहीं अशी समजूत असते. या गैरसमजुतीला बळी पडून पुष्कळवेळां अयोग्य गृहपाठ दिले जातात. पद्य-पाठाचे बाबतींत तर ही चूक नांवाजलेल्या शिक्षण-तज्ज्ञाकडूनही होण्याचा संभव असतो. कोणी कविता घरून पाठ करून येण्यास सांगतो तर कोणी नवीन शब्दांचा वाक्यांत उपयोग करून आणण्यास सांगतो कोणी गोषवाऱ्याचे प्रश्न

विचारतो तर कोणी ते घरून लिहून आणण्यास सांगण्याची खबरदारी घेतो. कोणी गाळलेले शब्द भरावयास सांगतो तर कोणी अलंकार शोधावयास सांगतो. तसेंच कोणी कवितेमधील प्रसंगाचीं चित्रें घरून काढून आणण्यास बजावतो. खरोखर रसग्रहणानंतर असे नीरस गृहपाठ दिल्यानें रसाची वाढ न होतां रसहानी होते. असे गृहपाठ देणें म्हणजे रसपान करून स्वर्गीय आनंदांत डुंबणाऱ्या मुलांना मिठाचा खडा देऊन पाताळांत लोटण्यासारखें आहे

पद्य-पाठाचे बाबतींत गृहपाठ देणें हा एक भयंकर प्रमाद गणला गेला पाहिजे. कारण पद्य-शिक्षणाचा हेतु आल्हाददान हा आहे. हा हेतु साधण्यास गृहपाठानें व्यत्यय येत असेल, आडकाठी येत असेल तर गृहपाठ न देणेंच योग्य ठरेल. रस-ग्रहणांत आल्हादाचा परमोच्च बिंदु येतो. त्यांत आल्हाद पराकोटीस पोहोंचलेला असतो. अशा उच्च कोटीच्या आनंदानं मुलें बेभान झालीं असतांना त्यांना तसेंच ठेऊन शिक्षकानें वर्गांतून काढता पाय घेतला तर तें अधिक परिणामकारक होतें असें आढळून येतें. आणि असें झालें तर तें पाठ शंभर टक्के यशाचेंच लक्षण मानावयास पाहिजे. पण पद्धतीच्या चौकोरीच्या बाहेर न पडतां गृहपाठ देण्याची एखाद्याची इच्छाच असेल तर निदान पद्य-पाठाला शोभण्यासारखा तरी तो असावा. असा योग्य गृहपाठ म्हणजे ज्या विषयावरील कविता शिकविली असेल त्या विषयावरील इतर कवींच्या कविता मुलांना शोधून आणण्यास सांगणें. असा गृहपाठ देतांना या प्रकाराचा उपयोग रसग्रहणांत केला गेला नाहीं हें पहाण्याची जरूरी आहे. कारण एकच प्रकार रसग्रहणांत व गृहपाठ देण्यांत अवलंबिला गेला तर शिक्षकाच्या बुद्धीचें भांडवल तोकडें पडल्याचाच तो पुरावा आहे असें मानणें वावगें होणार नाहीं. शिवाय पाठावरही त्याचा अनिष्ट परिणाम होण्याचा संभव आहे. म्हणून या प्रकाराचा वापर कोठें तरी एके ठिकाणींच करावा.. या प्रकारामुळें मुलांना निरनिराळ्या कवींचीं काव्यें माहीत होऊन त्यांचा त्यांच्या भाषासमृद्धीवर इष्ट परिणाम होतो.

# ५. बाहेरील पद्य व त्याची पाठपद्धति

नवीन अभ्यासक्रमांत बाहेरील पद्याला बरेंच उच्च स्थान दिलेलें दिसतें. जवळ जवळ सर्व इयत्तांमधील अभ्यासक्रमांत बाहेरील पद्याचा समावेश केलेला आढळतो. नवीन अभ्यासक्रमात मिळालेलें महत्त्वाचें स्थान बाहेरील पद्यानें लोकप्रिय होऊन भढळ केलेलें आहे. बाहेरील पद्य या प्रयोगानें गुरुशिष्यांचीं अंतःकरणें इतकीं काबीज केलीं आहेत कीं त्याचा परिणाम इतर विषयांकडे न कळत दुर्लक्ष करण्यांत होत आहे असें आढळून येईल. वर्ग-शिक्षकाचे गैरहजरींत किंवा विषय-शिक्षकाचे गैर-हजरींत दुसऱ्या एखाद्या शिक्षकास वर्ग शिकवण्याचा प्रसंग पडल्यास तो बहुधा पद्यच शिकवितो. तसेंच प्रायमरी ट्रेनिंग कॉलेजची पाठ परीक्षा असो कीं सेकंडरी ट्रेनिंग कॉलेजची पाठ-परीक्षा असो बहुतेक शिक्षकाचा ओढा बाहेरील पद्याकडेच असतो असेंही दृष्टीस पडतें या प्रयोगाच्या लोकप्रियतेचीं कारणेंही तशींच मनोरंजक आहेत.

कांहीं लोकांचा असा समज झाला आहे कीं केवळ नवीन अभ्या-क्रमांत बाहेरील पद्याला मानाचें स्थान दिलें गेल्यामुळें तो प्रयोग लोकप्रिय झाला. कांहीं जणांना असें वाटतें कीं प्रायमरी स्कूल सर्टिफिकेट परीक्षेस ' सामान्य भाषे ' चा पेपर ठेविल्यामुळें व त्या पेपरमध्यें बाहेरील पद्याचा प्रश्न हटकून पडत असल्यामुळें गुरुशिष्यांचें लक्ष त्याचेकडे वेधलें आहे. पण सारासार विचारांतीं असें कळून येईल कीं हे सगळे गैरसमज आहेत. कारण नवीन अभ्यासक्रमात महत्त्व दिलेले इतर विषय किंवा त्याचीं उपांगें ही लोकप्रिय झालेलीं दिसत नाहींत. त्यांत वाक्यरचनेवर कांहीं कमी भर दिलेला नाहीं. पण तो प्रयोग लोकप्रिय होण्याऐवजीं कंटाळवाणा झाला. नागरिकशास्त्रासारख्या विषयाकडे तर ढुंकून बघ-ण्याची देखील इच्छा शिक्षकांना होत नाहीं. आणि अशी सक्तीची इच्छा

झालीच तर ठराविक साच्याच्याबाहेर ते शिकवीत नाहींत. सामान्य भाषेच्या पेपरविषयीं म्हणाल तर त्यामध्यें बाहेरील पद्याबरोबरच अनुवाद, सारांश, संवाद, आत्मवृत्त, अलंकार, असे कितीतरी भाषेचे चित्तवेधक प्रयोग असतात. ते कांहीं लोकप्रिय झाले नाहींत. तेव्हां केवळ नवीन अभ्यासक्रमांत गोंवल्यामुळें व परीक्षेमध्यें प्रश्न पडत असल्यामुळें 'बाहेरील पद्य' लोकप्रिय झालें असें म्हणणें चुकीचें होईल. तसें असतें तर तें शिकणें व शिकविणें म्हणजे इतर विषयांप्रमाणें जुलमाचा रामराम झाला असता. तो तसा झाला नाहीं यावरून बाहेरील पद्याच्या लोकप्रियतेचीं कारणें वेगळीं आहेत हें स्पष्ट होतें.

आयुष्य हें एक महाकाव्य आहे. मातेच्या मांडीवर किंवा पाळण्यांत रजवून टाकणारीं शिशुगीतें, प्रियराधनेंत पृथ्वीला स्वर्गतुल्य करणारीं प्रियकर-प्रेयसीचीं प्रेमगीतें, स्वदेशाचें, पितृभूमीचें पांग फेडण्या-करितां आपलें तेजस्वी रक्त सांडणाऱ्या रणधुरंधरांच्या शौर्यानें ओतप्रोत भरलेलीं रण-गीतें, मानवाच्या हृदयांतील खळबळ दिग्दर्शित करून हृदयें हलविणारीं भावगीतें, हृदयें विदारणारीं शोकगीतें, दयाघन परमेश्वराला आळविणारीं भक्तिगीतें, अशा गीतांचें हें आयुष्याचें महाकाव्य बनलें आहे. मुलाच्या जन्माबरोबरच या महाकाव्याची सुरवात होत नसून त्यापूर्वींच ती होते. मूल मातेच्या कुशींत सामावल्याबरोबर त्याच्यावर डोहाळीं गीतांसारख्या काव्याचा संस्कार होऊं लागतो. साहजिकच मनुष्यप्राणी वेळीं अवेळीं कळत न कळत हें काव्य गुणगुणत असतो. मनुष्याची काव्याविषयीं ही नैसर्गिक आवड बाहेरील पद्य लोकप्रिय कर-ण्यास कारणीभूत झाली असल्यास नवल नाहीं.

मनुष्याची ही नैसर्गिक आवड वाढीस लावण्यांतील बरेंचसें श्रेय आधुनिक कवीकडे जातें. 'आजचें काव्य' आणि 'कालचें काव्य' यांमध्यें जमीनअस्मानाचा फरक आहे. आजचें काव्य विशेष वास्तववादी

आहे. तें विचारवैचित्र्यांनीं व नानाविध नाविण्यपूर्ण कल्पनांनीं भरलेलें आहे. त्याची भाषा एखाद्या सरिताप्रवाहाप्रमाणें सरळ व सहज समजण्याजोगी आहे. कालचें काव्य निरस, अवघड शब्दांनीं भरलेलें असावयाचें. त्याचा अर्थ, अन्वय अर्थ लावतांना एखाद्या घनदाट अरण्यांतून आपण भर दिवसा चांचपडत जात आहोंत असा विद्यार्थ्यांना भास होऊन त्यांना दरारून घाम सुटत असे, त्यांचा जीव गुदमरत असे. त्यामुळें त्यावेळीं मुलांना काव्यांतील रसग्रहण करण्यास अवघड जाई. आज अगदीं उलट परिस्थिति आहे. आजचें काव्य इतकें रसपूर्ण, भावनाप्रधान व सोपें आहे कीं कोणीही तें मिटक्या मारीत चाखूं शकतो. आधुनिक काव्य-रचनेमुळें काव्याची गोडी द्विगुणित झाली आहे खास.

त्यांतच कर्णमधुर व आकर्षक चालींची भर पडली. आर्या, ओवी, अभंग, शार्दूलविक्रीडित या किंवा अशा सारख्या वृत्तांशिवाय जुनें काव्य सांपडत नाहीं. आज अशी परिस्थिति नाहीं. आजचें नवें काव्य हृदयाचा ठाव घेणाऱ्या पण सहज लीलेनें म्हणता याव्या अशा चालींतून जन्मास आलें. या नवीन आकर्षक चालीचा प्रसार सिनेमा, ग्रामोफोन, रेडिओ, काव्यगायनसमारंभ, यांद्वारें होत असल्यामुळें व बहुजन समाजाला या गोष्टी सहज सुलभ असल्यामुळें त्यांनीं मनुष्याची मूळची काव्याविषयींची आवड द्विगुणित केली. त्याचें प्रत्यंतर म्हणजेच शाळांतून बाहेरील पद्याला मिळालेली सवंग लोकप्रियता.

बाहेरील पद्य लोकप्रिय करण्यांत आमच्या शिक्षकांचाही बराच वांटा आहे. आजचा शिक्षकवर्ग सुविद्य, बहुश्रुत, व्यवहारी, हौसी व खेळाडू वृत्तीचा आहे. त्याला मुलांचीं मनें कळतात. त्यांच्या आवडीनिवडीप्रमाणें तो त्यांना शिकवितो. केवळ एखाद्या गोष्टीविषयींचें ज्ञान म्हणून तो त्यांच्यावर तें लादीत नाहीं. शिक्षित शिक्षकांच्या आवडीनिवडी बहुतांशः सारख्या असल्यानें बाहेरील पद्य पाठाला रंग चढून त्यापासून

उत्पन्न होणाऱ्या आनंदसागरांत ते डुबत राहातात. विद्यार्थी व शिक्षक यांना जोडणारा बाहेरील पद्याचा दुवा कां बरें लोकप्रिय होणार नाहीं ?

आतां कोणी असें म्हणेल कीं सर्वसाधारण काव्य मनुष्याला आवडत असतांना बाहेरील पद्यांनेंच त्याच्या मनाची पकड कां घ्यावी ? क्रमिक पुस्तकांतील पद्यानें कां घेऊं नये ? बाहेरील पद्यें व क्रमिक पुस्तकांतील पद्यें त्या पुस्तकांत समावेशण्यापूर्वी बाहेरील पद्यें म्हणूनच जगाला माहिती होतीं कीं नाहीं ? बाहेरील पद्यें व क्रमिक पुस्तकांतील पद्यें यांत खरोखर कांहीं फरक नाहीं. बाहेरील पद्यें जमवून क्रमिक पुस्तक तयार होतें बाहेरील पद्यें केवळ क्रमिक पुस्तकांत गुंफल्यामुळें नावडीचीं कां व कशीं होतात हें गूढ उकलणें फार कठीण नाहीं. तुम्हाला माहीत असेल कीं मनुष्याचें मन स्वतंत्र आहे, तें स्वातंत्र्याचे भोक्ते आहे, तें कोणाचाही हुकूम पाळावयास खुषीनें तयार नसतें. असा हुकूम झाला तर तें ह्या हुकुमाविरुद्ध झगडण्याची तयारी करतें. क्रमिक पुस्तक हा एक हुकूम आहे. अमुक गद्य धडे वाचा, तमुक पद्य धडे शिका, असा तो विद्यार्थ्यांना हुकूम आहे. जीं पद्यें ते स्वेच्छेनें शिकले असते तीं शिकण्याची जबरदस्ती त्यांत आहे अर्थातच हा हुकूम धाब्यावर बसविण्याचा बालमन कट करतें. या झगड्याचा एवढा परिणाम बालमनावर होतो कीं कांहीं मुलें क्रमिक पुस्तकांतील कांहीं धडे वर्ष सपेपर्यंत वाचीतसुद्धां नाहींत. तुम्हांआम्हांस हा अनुभव विद्यार्थीदशेंत आला आहे. दुसरें उदाहरण देण्याची जरूरी दिसत नाहीं.

क्रमिक पुस्तकांतील पद्यांकडे दुर्लक्ष होण्याचें दुसरें एक कारण आहे. हीं पद्यें म्हणजे 'टोपलींतील भाकरी' वेळीं अवेळीं केव्हाही मोडून खातां येईल ही समजूत बऱ्याच अंशीं त्याकडे दुर्लक्ष होण्यास कारणीभूत होते. दुसरें असें कीं क्रमिक पुस्तकांत गोवलेलीं पद्यें सर्वच सरस असतात किंवा सर्वच ठिकाणचें वातावरणाला पोषक असतात असें

नाहीं. पुष्कळवेळां शहरांत लोकप्रिय होणारीं पद्यें खेड्यांत लोकप्रिय होत नाहींत, व खेड्यांत लोकप्रिय होणारीं पद्यें शहराच्या वातावरणांत विरून जातात. आणि समजा एखाद्या पुस्तककर्त्यानें सर्व सरस व सर्व प्रकारच्या लोकांच्या अभिरुचीला उतरणारीं पद्यें क्रमिक पुस्तकांत गोंवलीं तरी देखील तीं पद्यें लोकप्रिय होणार नाहींत. कारण मनुष्याची वृत्तीच मुळीं जें आहे त्याकडे पाठ फिरवून जें नाहीं त्याच्या पाठीमागें लागण्याची असते. सुंदर सुगृहिणीनें स्वहस्तानें केलेलें पचपक्वान्नाचें सुग्रास भोजन केल्यानंतर हॉटेलमधील अस्वच्छ पोऱ्यानें आणून दिलेल्या कांद्याच्या भजावर ताव मारणारे गृहस्थ आढळतात ना ? त्यांची वृत्ति काय दाखवते ? तोच नियम क्रमिक पुस्तकांतील पद्यांचे बाबतींत.

बाहेरील पद्याचा पाठ घेतांना पहिली मोठी अडचण म्हणजे पद्याची निवड करणें ही होय. क्रमिक पुस्तकांतील पद्याचा पाठ घेतांना ही अडचण नसते. कारण त्यांतील पद्यें केव्हांतरी शिकवावींच लागतात. पाठाकरितां घेतलेलें पद्य सरस आहे किंवा नीरस आहे हा वादाचा मुद्दा तेथें उपस्थित होऊं शकत नाहीं. पण बाहेरील पद्याची निवड ही केवळ पाठ घेणाऱ्याच्या कुवतीवर अवलंबून असल्यामुळें तिची सर्व जबाबदारी त्याच्यावर पडते. म्हणून बाहेरील पद्याची निवड काळजीपूर्वक करावयास पाहिजे.

बाहेरील पद्याची निवड करतांना शिक्षक आपल्या आवडीनिवडी-नुसार ती करील यांत शंका नाहीं. आपल्या आवडीनुसार निवडलेलें पद्य मुलांनाही आवडेल याची खबरदारी शिक्षकानें घेतली पाहिजे. बहुधा शिक्षकाची आवड मुलांच्या आवडीप्रमाणें असते. पण तशी ती नसेल तर फसगत होऊन पाठांत अपयश येण्याचा संभव असतो. म्हणून आपल्या आवडीपेक्षां मुलांच्या आवडीस शिक्षकानें प्राधान्य दिलें पाहिजे. शिक्षकानें केवळ स्वतःचीच आवड लक्षांत घेऊन पद्य निवडल्यास

पाठाचा विचका झाल्याशिवाय राहात नाहीं असा अनुभव आहे. या उलट केवळ मुलांची आवड लक्षांत घेतली आणि शिक्षक त्यांत समरस झाला नाहीं तरीही पाठ बिघडतो.

तेव्हां केवळ मुलांच्या किंवा शिक्षकाच्या आवडीनिवडीवर वाजवी-पेक्षां जास्त भर देऊन चालणार नाहीं. पद्याची निवड करतांना कांहीं तरी पायडे पाडायला पाहिजेत, कांहीं तरी नियम पाळायला पाहिजेत. हे पायडे किंवा नियम विवक्षित तत्त्वांवर आधारलेले असले पाहिजेत. बाहेरील पद्याचें निवडीचें बाबतींत एखादें स्थूल तत्त्वच शोधावयाचें झाल्यास काव्य शिक्षणाच्या हेतुकडे बोट दाखवितां येईल. काव्य-शिक्षणाचा मुख्य हेतु आल्हाददान आहे हें आपण पाहिलेंच आहे. तेव्हां ज्या पद्याचें पाठांत शिक्षकशिष्यांना भरपूर आनंद होईल असें पद्य निवडावयास पाहिजे हें स्पष्ट आहे. पण असें असतांही पुष्कळ वेळां नीरस पद्याची निवड झालेली आढळते. जुनें काव्य सर्वसाधारणतः क्लिष्ट असतें, नीरस असतें तें काव्य बुद्धिप्रधान असल्यामुळें अंतःकरणापेक्षां मेंदुलाच त्याच्या शिक्षणानें खाद्य मिळतें. त्यांत शब्दांचीच केवळ कसरत असते, व भावनांचा अभाव असतो. त्यामुळें अंतःकरण कोरडेंच रहातें. अन्तःकरणास भावनांचा ओलावा न मिळाल्यामुळें पद्यशिक्षणा-पासून आल्हाद मिळण्याऐवजीं रखरखताच जास्त जाणवते.

आल्हाददानाचा हेतु डोळ्यापुढें ठेवूनही अशी चुकीची निवड होण्याचें मुख्य कारण म्हणजे शिक्षकाची आवड. जुन्या वळणाचा शिक्षक अशाच तऱ्हेचें पद्य हटकून निवडतो. जुन्या वळणाच्या शिक्षकाला आणखी एक सवय असलेली आढळते. उठल्या सुटल्या कोणालाही उपदेश करणें त्याला फार आवडतें. या आपल्या संवयीस बळी देण्या-करितां विद्यार्थी आयतेच सांपडत असल्यामुळ तो पद्य-पाठांत आपला मोका साधण्याकरितां नीतितत्त्वांची गुंफण केलेली कविता हुडकतो.

अशा वेळीं 'बरें सत्य बोला यथा तथ्य चाला' किंवा 'बोले तैसा चाले । त्याचीं वंदावीं पाउलें ।' किंवा पोटीं चिंता धरू नये । कष्टें खेद मानूं नये । असे श्लोक हटकून सापडायचेच पद्यांतच काय पण शिक्षण-पद्धतींमधून बोधहेतुची हकालपट्टी झालेली आहे. आणि ती योग्यही आहे. पण याचा असा अर्थ नाहीं कीं शिक्षण-पद्धतीस नीतितत्त्वांचें वावडें आहे. नीति-तत्त्वांची ओळख विद्यार्थ्यांना झालीच पाहिजे पण ती एखाद्या महंताची भूमिका स्वीकारून शिक्षकानें करून देऊं नये. तसें झाल्यास मुलांवर त्याचा विपरीत परिणाम होतो. म्हणून अप्रत्यक्षपणें ती झाल्यास अधिक सोयीस्कर. तेव्हां शक्यतों बोधामृत पाजण्याकरितां पद्याची निवड न करणें हेंच सर्व दृष्टींनीं श्रेयस्कर ठरतें.

काव्य जीवनाचा आरसा आहे जीवनाचें प्रतिबिंब काव्यांत पडलेलें असतें. जीवन अफाट आहे, अमर्याद आहे, अथांग आहे. अशा विराट जीवनाचें काव्यांत पडलेलें प्रतिबिंब मुलांना स्पष्ट दाखवावयाचें असल्यास विविध तऱ्हेचीं पद्यें निवडलीं पाहिजेत. ठराविक सांच्याच्या पद्यांनीं जीवनाचें समग्र दर्शन करून देतां येणार नाहीं. म्हणून जगांतील विषमतेचें भीषण स्वरूप, निर्दयतेची प्रकृति, सूडवृत्ति, धार्मिक व सामाजिक रूढींचें प्राबल्य, धर्माधर्मांतील तंटे आणि त्याखालीं पडत असलेला मानवतेचा खून, मनुष्याचा स्वार्थसाधुपणा, त्याचा फसवा स्वभाव, त्याबरोबरच देवमाणसांचा स्वार्थत्याग, त्यांची कीर्ति, त्यांचें शौर्य व वैभव, निसर्गसौंदर्य, आणि त्यांत दिसून येणारें परमेश्वराचें कसब या व अशा असंख्य प्रसंगांवरील पद्यांची निवड व्हावयास पाहिजे.

पद्य-विषयाच्या विविधतेबरोबरच त्यांत मनोरंजकता असावयास पाहिजे. अनेक विषयांवरील गोळा केलेलीं पद्यें मनोरंजक नसतील तर त्यांचा फारसा उपयोग होणार नाहीं. काव्यांत मनोरंजकता आणावयाची असेल तर त्यांत भावनांचा आविष्कार झाला असला पाहिजे. तेव्हां

हृदयाचा हिंदोळा करणारीं पद्यें निवडलीं पाहिजेत. अशा भावनामय पद्यांना आकर्षक चालींची जोड दिली कीं निवड योग्य झाली असें म्हणावयास कांहींच हरकत नाहीं. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे निवडलें जाणारें पद्य भाषेच्या दृष्टीनें सोपें असावें, अर्थाच्या दृष्टीनें रसाळ असावें, तें नाविन्यपूर्ण कल्पनांनीं युक्त असावें, भावना विकसित करणारें असावें, आणि नादमधुर असावें, गेय असावें.

जगांत प्रेमासारखी दुसरी चीज नाहीं, वस्तु नाहीं. प्रेम अमोल आहे. प्रेमासाठींच जग जगतें आणि मरतें. प्रेम जीवनाचा मोठा आधार आहे, तें जीवनाची सावली आहे. मातृप्रेम, पितृप्रेम, भ्रातृप्रेम, भगिनीप्रेम, पति-पत्नीप्रेम, मित्रप्रेम यांवरच जीवनाची उभारणी केलेली आहे. हें प्रेम अबाधित राखणें, त्याची वृद्धि करणें आणि जीवन जगण्यालायक करणें हें एक मानवाचें कर्तव्य आहे. पण मानव हें कर्तव्य विसरत चालला आहे असें वाटतें. या प्रेमनिधीची वृद्धि होण्याऐवजीं त्याला ओहोटी लागल्याचा भास होतो आजकालच्या घटनांकडे पाहिलें म्हणजे निराशाच पदरीं पडते. वर्तमानपत्रांतील बातम्या चाळल्या तर कोठें ना कोठें आईनें मुलांना सोडलें, मुलांनीं आईवडिलांचा खून केला, भावाभावांच्या भांडणांत मारामारी होऊन त्यांना जबर जखमा झाल्या, पत्नी पतीच्या घरीं नांदावयास जात नाहीं, पतीनें काडीमोड घेतली, पत्नीचा खून केला, मित्रानें मित्रास फसविलें अशा तऱ्हेच्या चार दोन तरी बातम्या प्रत्येक वर्तमानपत्रांत वाचावयास मिळतात. याचा अनिष्ट परिणाम मुलांचे मनावर होऊन प्रेमनिधीस आणखी जोराची ओहोटी लागते. अशी परिस्थिति चालू राहिली तर लवकरच समाजस्वास्थ्य बिघडण्याचाच फार मोठा धोका आहे. तेव्हां प्रेम् कमी न होऊ देतां, नुसतें जतन न करतां त्यांत वाढ करणें आवश्यक आहे. हें काम शिक्षणानें करावयाचें आहे. हें कर्तव्य परिणामकारकपणें पार पाडण्यास पद्य-शिक्षणाचा फार मोठा उपयोग होण्यासारखा आहे.

मातृप्रेमाची महति सर्वकाळीं व सर्वस्थळीं सर्वमान्य आहे. त्या प्रेमाची नीट ओळख आणि जोपासना होण्यासाठीं मातृप्रेमविषयक आदर्श कविता निवडणें आवश्यक आहे. अशी ओळख, जोपासना, बालमनांत निश्चितपणें सुसंस्कार घडविते. याकरितां ' पेरूची फोड ' यांतील

पेरूची फोड लागली गोड
आईची फोड तर फारच गोड !

अशा ओळींची जरूरी आहे. याचकरितां 'खार' कवितेमधील—

बाळाचें नी घेतां नांव
जागी झाली चिऊताई
उठोनिया दूर जाई
भूर भूर.

या ओळी मुलांच्या मनावर बिंबवल्या पाहिजेत. याचकरितां ' बाळ करीं झोंपला ', या कवितेंत ' मज नको अर्पिलीं कुणी, नव सौख्यें पदिं आणुनी, मज एक हवें निशिदिनीं असावा बाळ करीं झोंपला ' या ओळींचें मर्म मुलांचे मनावर ठसवावयास पाहिजे. तसेंच श्रावणाच्या मातृपितृभक्तीची ओळख ' श्रावण बाळ ' या सारखी कविता शिकवून करून द्यावयास पाहिजे.

मातृपितृप्रेमाविषयींच्या असंख्य कविता निवडतां येतील. भ्रातृ-भगिनी प्रेमाच्या कविता निवडण्यासही फारसें कठीण पडणार नाहीं. अशा कविता पुष्कळ आहेत आणि त्यांत दिवसेंदिवस भर पडत आहे. माझें घर या कवितेमधील—

कमा, सुमा, अरु, चदू
"भाऊ आला" म्हणतात
मिठी मग सोडवावी
हातावर खाऊ देत.

या ओळींचा परिणाम न कळत मुलांचे मनावर फार चांगला होतो. अशा कविता नवकाव्यांतच आढळून येतात असें नाहीं तर जुन्या काव्यांतही त्या भरपूर आहेत. लोकगीतांमधील खालील ओळीवरून हें स्पष्ट होईल.

भावा ग बहिणीच्या । प्रेमाला नाहीं सरी
गंगेच्या पाण्यापरी । पवित्रता ॥
संसारी कितीक । असति नातीं गोतीं ।
मोलाचीं माणिकमोतीं । बहीण भाऊ ॥

तेव्हां जेथें जेथें भ्रातृभगिनीच्या प्रेमाचा अमोल साठा असेल तो धुडून उजेडांत आणून मुलांच्यापुढें मांडावयास पाहिजे.

मातृपितृप्रेम, बंधु-भगिनीप्रेम, मित्रप्रेम, मनुष्याचा खासगी संसार सुखी करतें तर समाजप्रेम, राष्ट्रप्रेम त्याचा सार्वजनिक संसार सुखी करते. राष्ट्राचा संसार सुखी झाल्याशिवाय मनुष्याचा कौटुंबिक संसार सुखी कदापि होणार नाहीं म्हणून राष्ट्रप्रेमाची जोपासना मुलांच्या मनांत पद्य-शिक्षणाकरवीं करून दिली पाहिजे. राष्ट्रप्रेम विषयक काव्य हें जरा कमी भासतें; तें वाढविलें पाहिजे. पण त्याची वाढ होईतों वाट न पाहातां राष्ट्रप्रेम विषयक जें काव्य आज हातांशीं आहे तें शिकवावयास घेतलें पाहिजे. ‘ हिंद देश आमुचा ’ या कवितेमधील

उच्च फडकवूं निशाण
वाहूं देशापायीं प्राण
सर्व मिळुनी हीच आण
या रे आपण घेऊं या
“ जयहिंद ” सारे गर्जू या ।

किंवा

विजयी विश्व तिरंगा प्यारा ।
झंडा ऊंचा रहे हमारा ।

किंवा 'प्राणज्योति' या कवितेमधील

भारताच्या मुक्तिसाठीं । भारताच्या शुद्धिसाठीं
प्राणही लावी पणाला । भारताची हीच शक्ति.

यासारख्या स्फूर्तिदायक कल्पना अनेक कवितांमधून विखुरलेल्या आहेत. त्यांतून पाठाकरितां पद्याची निवड करावयास पाहिजे.

विश्वप्रेम हें महत्तम प्रेमध्येय आहे. राष्ट्राचा संसार सुखी व्हावयाचा असेल, मानव खरोखर सुखी व्हावयाचा असेल तर तो विश्वप्रेमाला पारखा राहून कधींही सुखी होणार नाहीं. आपण सर्व एकाच परमेश्वराचीं लेंकरें आहोंत, आपण सर्व भाऊभाऊ आहोंत ही जाणीव जोपर्यंत माणसाला होत नाहीं, आणि जाणीव झाल्यास जोपर्यंत ती कृतींत उतरवतां येत नाहीं तोपर्यंत मानव सुखी होणार नाहीं. ही जाणीव मुलांचेमध्यें उत्पन्न करून ती कृतींत आणण्याकरितां त्यांना विश्वप्रेम करावयास शिकवलें पाहिजे. हें काम परिणामकारकपणें पद्यशिक्षणानें साध्य होण्यासारखें आहे. म्हणून विश्वप्रेमविषयक कविता मुलांना मधून मधून शिकविल्या पाहिजेत. अशा कवितांची संख्या सध्यां फार थोडी आहे ती वाढविली पाहिजे. अंतःकरण ओढून घेणारें नवीन काव्य निर्माण होईपर्यंत न थांबतां जुनें काव्य जरा नीरस असलें तरी त्यांतून एखादेवेळीं अशा कल्पना मुलांपुढें मांडल्या पाहिजेत. तुकोबाचे

'जे कां रंजले गांजले । त्यांसी म्हणे जो आपुलें ।

किंवा समर्थांचें

दुसऱ्याच्या दुःखें दुःखी व्हावें ।

अशासारखें काव्य जरूर शिकवावें.

लहान मुलांना मोठ्या माणसांपेक्षां निसर्गाचें वेड अधिक असतें. त्यांची ही भूक भागविण्याकरितां निसर्गविषयक पद्यांची निवड पाठाकरितां करणें वावगें होणार नाहीं निसर्ग सौंदर्यानें फुललेलें काव्य आज मोठ्या

प्रमाणांत उपलब्ध आहे. त्यांतून योग्य निवड करणें सोपें आहे. ' पाऊस, ' ' बाग, ' ' चांदोबा, ' ' सायकाळची शोभा, ' ' वन–भोजनाची तयारी, ' ' फुलपांखरुं, ' ' तृणबाळें, ' सृष्टीचें सौंदर्य, ' ' बालनिर्झर ' अशा अनेक कविता मुलांना शिकविण्यासारख्या आहेत.

वरील विवेचन सर्वसाधारणपणें कवितेची निवड करण्यास उपयोगी आहे या विवेचनाचा उपयोग क्रमिक पुस्तकांत समावेश करण्याकरितां कवितांची निवड करण्याकडेही होईल आणि बाहेरील पद्याच्या निवडी–करितांही होईल. याशिवाय बाहेरील पद्याची निवड करण्याकरितां इतर कांहीं गोष्टींचाही विचार करावा लागतो. असा विचार केला नाहीं तर बाहेरील पद्य व क्रमिक पुस्तकांतील पद्य यांमधील फरक बराच कमी होईल. म्हणून अशा विशेष गोष्टींचा विचार करणें अत्यावश्यक आहे.

बाहेरील पद्याची निवड करतांना ज्या मुलांना पद्य शिकवावयाचें आहे त्यांचें वय व सभोंवतालचें वातावरण लक्षांत घेऊन त्या वयाला व वातावरणाला साजेसें पद्य निवडावयास पाहिजे. शहरांतील मुलांना शहरी वातावरणाची व खेड्यांतील मुलांना खेडवळ वातावरणाची कविता शिक–वावयास पाहिजे. मुंबईतील "चौपाटीवरील" बहारीची वर्णनात्मक कविता किंवा 'मगनचुन्नी राजाभाई टॉवर' वरील विचारात्मक कविता खेड्यांतील मुलांच्या हृदयाला भिडणार नाहीं, ती मुंबईतील मुलांच्या हृदयांनाच भिडणार. उलट ' हुरड्याची जेंमत ' किंवा ' मोटेवरचें गाणें ' खेड्यां–तील मुलांचीं अंतःकरणेंच थरारविणार. मुंबईच्या मुलांचीं अंतःकरणें त्यामुळें थरारण्याऐवजीं बंद पडण्याचा संभव जास्त.

बाहेरील पद्याची निवड करतांना वातावरणाबरोबर स्थल, काल, भाषा यांचा विचार करावयास पाहिजे. घाटावरील मुलांना आवडणाऱ्या ' भऊग्या ' कोंकणांतील मुलांना आवडणार नाहींत. त्यांना होडी वल्हृ–वितांना म्हणावयाचीं गाणीं प्यार वाटणार. उलट ' सागरा ' वरील

कवितेमुळें त्याच्या प्रचंड पसाऱ्याची कल्पना घाटावरील मुलांना येणार नाहीं.

ठिकठिकाणच्या भाषावैचित्र्यामुळें पुष्कळ वेळां कवितेचा खरा अर्थ समजण्यास कठीण जातें, मग तिचें रसग्रहण बाजूलाच राहो. मराठी भाषेंतील शब्द व वाक्प्रचार माहीत नसणाऱ्यांची फजिती कशी होते याचा प्रत्यक्ष आलेला अनुभव सांगणें अनुचित होणार नाहीं असें वाटतें. श्री घाटे-भट्यांच्या साहित्य-परिचयांतील पहिल्या पुस्तकांत ' सर्कसवाला ' ही कविता आहे. या कवितेमध्यें ' आई म्हणे डोक्यावर घर कां घेई ' अशी एक ओळ आहे. येथें डोक्यावर घर घेणें याचा अर्थ घरांत बसणें, बाहेरून घरांत शिरणें, खेळांतील मातीचें घर डोक्यावर घेणें, असे निरनिराळे अर्थ निरनिराळया शिक्षकांनीं सांगितले पण एकानेंही गोंगाट करणें असा योग्य अर्थ सांगितला नाहीं याच कवितेमध्यें दुसरी एक ओळ अशी आहे— ' पदकें मिळवियलीं गाठीची, माझीं कामें नवलाईचीं ' येथें गाठीची याचा अर्थ दोरीच्या गांठीची, स्काऊटच्या रुमालाच्या गांठीचीं, बिल्ले बांधलेल्या फडक्याच्या गांठीचीं, लग्नगांठीचीं असे अर्थ शिक्षकांनीं शिकविले. पण साखरेची गांठी एकालाही सुचली नाहीं, कारण ती त्यांनीं पाहिलीच नव्हती. आणि आश्चर्य हें कीं हे शिक्षक चांगले थर्ड ईयर ट्रेंड असून नांवाजलेल्या रत्नागिरी जिल्ह्याचे होते. तेव्हां ज्या ठिकाणीं जी भाषा प्रचारांत असेल त्याच भाषेंतील कविता निवडणें चांगलें. नाहींतर फसगत होऊन पाठ बिघडावयाचा.

बाहेरील पद्याची निवड करतांना एक दंडक पाळावा लागतो. तो म्हणजे तें पद्य एका इयत्तेनें सोपें निवडणें. उदा० इ. ४ वर बाहेरील पद्याचा पाठ घ्यावयाचा असेल तर इ ३ रीच्या मुलांच्या बुद्धीच्या आवाक्यांत असणारें पद्य निवडावयाचें. याचें कारण असें कीं बाहेरील पद्याच्या पाठांत स्पष्टीकरण फारसें करावयाचें नसतें. तेथें स्पष्टीकरणापेक्षां

स्थलप्रत
अनुक्रम [११] क्रमांक 20965 दि. 2-5-… 236 नोंद: दि. 7-5-54

रसग्रहणाला जास्त महत्त्व असतें. उलट क्रमिक पुस्तकांतील कविता शिकवितांना स्पष्टीकरण संपूर्ण करावें लागतें. बाहेरील पद्य व क्रमिक पुस्तकांतील पद्य यांच्या पाठपद्धतीमध्यें हाच मुख्य फरक होय. हा फरक वगळला तर दोन्ही पाठपद्धति जवळजवळ सारख्या आहेत. त्या पाठपद्धति काय आहेत तें आतां आपण पाहू.

बाहेरील पद्याचें पाठांत साधारणतः सात टप्पे असतात— (१) प्रस्तावना (२) शिक्षकाचें नमुनेदार वाचन (३) सर्वसाधारण मुलांना अडणाऱ्या अवघड शब्दांचें स्पष्टीकरण (४) मूकवाचन (५) प्रतिपादन अथवा स्पष्टीकरण (६) रसग्रहण (७) गृहपाठ. यांपैकीं प्रत्येक टप्प्याचा हेतु काय, तो कसा साध्य करून घ्यावा व किती वेळांत साध्य करून घ्यावा या प्रश्नांचा आपण विचार करूं.

पाठाचें यशापयश बऱ्याच अंशीं प्रस्तावनेवर अवलंबून असतें. विषयप्रवेश करण्याकरितां तिची अत्यंत जरूरी आहे. प्रस्तावना पाठाच्या विषयाला साजेशी असली पाहिजे. कवितेमधील वातावरणाला पोषक असें वातावरण निर्माण करून त्यांत मुलांना डुंबत ठेवणें हा बाहेरील पद्यांतील प्रस्तावनेचा मुख्य हेतु असतो. अशा वातावरणाची यशस्वी रीतीनें निर्मिति करणें म्हणजे आदर्श पाठाचा पाया घालणें होय. प्रस्तावना व्यवस्थित झाल्यास विषय प्रतिपादनास सोपा जाऊन विद्यार्थ्यांना तो चटकन समजतो. बाहेरील पद्याचा पाठ व क्रमिक पुस्तकांतील पद्याचा पाठ यांच्या प्रस्तावनेमध्यें कांहीं फरक नाहीं. प्रस्तावनेला साधारण तीन मिनिटांपेक्षां जास्त वेळ लावतां कामा नये.

प्रस्तावनेनंतर शिक्षकानें गोड चालीवर, मंजुळ स्वरांत, कविता म्हणावयाची असते. कविता म्हणण्यांत शिक्षकानें दोन गोष्टी साधल्या पाहिजेत. त्या म्हणजे कवितेची चाल मुलांच्या मनांत घुमविणें आणि कवितेंतील उत्कट भाव त्यांच्या हृदयांवर उमटविणें, त्यांतील मध्यवर्ति

कल्पनेची त्यांना कल्पना आणून देणें. या दोन गोष्टी दोन निरनिराळ्या वेळीं मुलांच्या निदर्शनास आणून देण्याकरितां कांहीं वेळां कविता लागोपाठ दोन वेळां म्हटली जाते. विशेषतः क्रमिक पुस्तकांतील पद्य-पाठांत दोन वेळां कविता म्हणण्याचा प्रघात आहे, आणि तो बरोबरही आहे. बाहेरील पद्य-पाठाचें बाबतींत मात्र कविता दोन वेळां म्हणण्याची आवश्यकता नाहीं. कारण बाहेरील पद्य एका इयत्तेनें सोपें असल्यामुळें पद्याच्या चालीबरोबर त्याचा भावार्थही मुलांच्या ताबडतोब लक्षांत येतो. शिक्षक कविता म्हणत असतांना मुलांचीं पुस्तकें मिटलेलीं असावींत. परिणामकारकरीतीनें कविता म्हटली गेल्यास मुलें स्वतःस विसरून जातात. जेव्हां दोन वेळां कविता म्हणावयाची पाळी येते, तेव्हां पहिल्या वेळीं पुस्तकें मिटलेलीं ठेवावींत व दुसऱ्या वेळीं तीं उघडीं ठेवावींत. असें करण्याचें कारण म्हणजे पहिल्या वेळीं जी कविता म्हणावयाची असते ती कवितेच्या रसस्वादानें व मधुर चालीनें मुलांना गुंग करण्याकरितां व दुसऱ्या वेळीं म्हणावयाची ती कवितेची कल्पना व अर्थ त्यांच्या ध्यानीं आणून देण्याकरितां. पूर्वी सांगितल्याप्रमाणें दोन वेळां कविता म्हणण्याचा प्रश्न फक्त क्रमिक पुस्तकांतील पद्य-पाठांत उभा राहातो, बाहेरील पद्य-पाठांत नाहीं. कविता म्हणण्यास दोन तीन मिनिटें वेळ पुरेसा होतो.

कविता म्हणून झाल्यानंतर शिक्षकानें तिच्यामधील अवघड शब्दांचा अर्थ मुलांना फळयावर स्पष्ट करावा. हे शब्द साधारण बहुतेक मुलांना अडणारे असे असले पाहिजेत. बाहेरील पद्य एका इयत्तेनें सोपें घ्यावयाचें असल्यामुळें त्यांत असे शब्द फार थोडे असतात. हें काम एकदोन मिनिटांत उरकतां येतें.

नंतर प्रधान-प्रश्न फळयावर लिहून त्यांचीं उत्तरें काढण्याच्या दृष्टीनें मुलांना मूकवाचन द्यावयाचें असतें. प्रधानप्रश्न दोनपेक्षां अधिक असूं नयेत. एकच असल्यास उत्तम. ते कवितेच्या मध्यवर्ति कल्पनेला

धरून असावयास पाहिजेत. मूकवाचन करतांना मुलांना दोन गोष्टी कराव्या लागतात. एक प्रधान-प्रश्नाचें उत्तर शोधून काढणें आणि दुसरी कवितेमधील त्यांना कठीण वाटणाऱ्या शब्दांचें व भागांचें स्पष्टीकरण करून घेणें. हें स्पष्टीकरण वैयक्तिक असतें. त्यामुळें यावेळीं शिक्षकाला वर्गांत फिरून मुलांच्या वैयक्तिक अडचणींचें निरसन करून त्यांचें समाधान करावें लागतें. हा भाग सात मिनिटांत आटोपावा.

मूकवाचन झाल्यानंतर फळ्यावर दिलेल्या प्रधान-प्रश्नाचें उत्तर काढून घ्यावयाचें असतें. हें उत्तर मिळविल्याबरोबर स्पष्टीकरणाकडे वळावें.

स्पष्टीकरणाचें वेळीं पद्याचें एक एक कडवें वाचून त्यांतील कठीण शब्द, वाक्प्रचार, म्हणी, कल्पना वगैरे स्पष्ट केल्या पाहिजेत. यावेळीं कडवें वाचावयाचें असतें, गावयाचें नसतें. कडवें गायल्यास स्पष्टीकरणाकडे मुलांचें दुर्लक्ष होतें. बाहेरील पद्य एका इयत्तेनें सोपें असल्यामुळें विशेष स्पष्टीकरण करावें लागत नाहीं. इतर पद्याचें बाबतींत स्पष्टीकरणावर फार भर द्यावा लागतो. हाच दोन्ही पद्धतींमधील मुख्य फरक. स्पष्टीकरणाला पंधरा मिनिटें पुरीं पडतात.

नंतर बाहेरील पद्य-पाठांतील अत्यंत महत्त्वाचा टप्पा जो रसग्रहण तो येतो. प्रस्तावना पाठाचा पाया घालते तर रसग्रहण त्यावर कळस चढवते. रसग्रहण पडलें तर सबंध पाठ पडतो. बाहेरील पद्याचें बाबतींत तर पाठांत रसग्रहणाला फारच महत्त्व असतें. असें महत्त्व असलें तरी बाहेरील पद्य-पाठांतील रसग्रहणाचा प्रकार कांहीं वेगळा नाहीं. क्रमिक पुस्तकांतील पद्य-पाठांत जसें रसग्रहण करतात तसेंच येथेंही करतात. त्यांत जे रसग्रहणाचे योग्य प्रकार मानले जातात ते यांतही मानले जातात. बाहेरील पद्याचा विशेष भर सामान्य भाषाज्ञान वाढविण्याचा असल्यामुळें ज्या विषयावरील कविता शिकविली असेल त्या विषयांतील दुसऱ्या कवीची कविता रसग्रहणास घेणें अधिक फलदायी होतें.

(६३५)

रसग्रहणानंतर पाठांतील शेवटचा टप्पा जो गृहपाठ तो येतो. पद्य-पाठांत गृहपाठाची आवश्यकता नाहीं हें पूर्वीच सांगितलेलें आहे. असें असूनही जर तो क्रमिक पुस्तकांतील पद्य-पाठांत दिला तर विशेष बिघडत नाहीं. पण बाहेरील पद्याचें बाबतींत गृहपाठ देणें हा गुन्हा मानला पाहिजे. बाहेरील पद्य एका दृष्टीनें सोपें असल्यामुळें तें वर्गांतच मुलांना पुरेपुर कळतें व घरीं त्याची आवृत्ति करण्याची आवश्यकताच उरत नाहीं. दुसरें असें कीं रसग्रहणांत मुलें आनंदसागरांत डुंबत असतां त्यांचें लक्ष गृहपाठाकडे खेंचून आणून त्यांचा रसभंग करण्यापेक्षां त्यांना तसेंच डुंबत ठेवून शिक्षकानें आपला पाय हळूंच वर्गांतून काढून घेणें अधिक परिणामकारक आहे, साजेसें आहे, योग्य आहे.

# ६. लोकगीत व त्याची पाठपद्धति

प्राथमिक शाळेच्या अभ्यासक्रमांत लोकगीतांचा समावेश होऊन आज सुमारें पंधरा वर्षे झालीं. एवढा अवधि उलटून गेला तरी प्राथमिक शिक्षकांना लोकगीतांविषयीं पूर्ण कल्पना आहे असें म्हणवत नाहीं. लोकगीत म्हणजे आबालवृद्धांकडून वेळींअवेळीं म्हटलें जाणारें गीत असेंच बहुतेक शिक्षक मानतात. या विधानाला सबळ पुरावाच द्यावयाचा झाल्यास तो सहजासहजीं देतां येईल. मी शेंकडों प्राथमिक शाळा तपासल्या, हजारोंना भेटी दिल्या. पण यांपैकीं बहुतेक शाळांत लोक-गीतांविषयीं अज्ञानच दिसून आलें. शाळेच्या वार्षिक तपासणीचेवेळीं किंवा भेटीचेवेळीं मुलांना लोकगीत म्हणावयास सांगितलें कीं मुलें कावरी-बावरी होत आणि शांत राहात. या शांततेचा भग शिक्षक एखाद्या मुलास उठवून त्याला कोणतें तरी गाणें म्हणावयास लावून करी. अशा वेळीं चालू चित्रपटांतील आकर्षक व सोप्या चालींचीं, सर्वांच्या जीभेवर नाचणारीं गाणीं म्हणून मुलें खालीं बसत. अशा गाण्यांत दहाबारा वर्षांपूर्वीं सर्वांत अधिक लोकप्रिय झालेलीं गाणीं म्हणजे—

मन शुद्ध तुझं गोष्ट हाये । पिरथीवी मोलाची ।
तूं चाल पुढं तुला र गड्या, भीति कशाची ।
परवाबी कुणाची ।

' आधीं बीज एकलें ' हा तुकाराम चित्रपटांतील अभंग किंवा 'यमुनाजळीं खेळूं खेळ कन्हया कां लाजता' हें ब्रह्मचारी चित्रपटांतील सर्वांना मोहिनी घालणारें गाणें हीं होत. हीं गाणीं इ. १ व २ चीं मुलें म्हणत. त्याचा अर्थ त्यांना कळणें कठीण होतें हें वेगळें सांगावयास नको. यानंतरच्या काळांतील मराठी चित्रपटांतील लोकप्रिय गाण्यांची जागा हिंदी चित्र-पटांतील हृदयाला हेलकावे देणाऱ्या गाण्यांनीं घेतल्यामुळें मराठींतील लोकगीत म्हणून तीं म्हणणें अशक्य झालें. त्यामुळें लोकगीत म्हणून

चित्रपटांतील गाणीं म्हणण्याचा प्रघात हळूहळू कमी होत चालला आहे असें आढळून येतें.

सुमारें दहा वर्षांपूर्वीची गोष्ट. पुण्यांतील एका नांवाजलेल्या पसंत शाळेला मी भेट दिली. या शाळेचे सुपरिंटेंडेंट एक तरुण होतकरू विद्वान् असून त्यांचें शिक्षण एम् ए, एल्एल् बी पर्यंत झालेलें होतें. आपली शाळा आदर्श व्हावी अशी त्यांची सारखी खटपट असे. त्यांनीं शाळेंत बहुतेक ट्रेंड शिक्षक नेमलेले होते. अशा ध्येयवादी व्यक्तिबरोबर मी शाळा पाहात असतांना मी सहज इ. १ च्या वर्गातील मुलांना लोकगीत म्हणावयास सांगितलें. मुलांना लोकगीत म्हणतां येईना. त्यांना तें शिकविलेंच नव्हतें. शिक्षकाच्या चेहऱ्यावरून त्याला लोकगीताची कल्पना होती असें वाटलें नाहीं. त्यांनीं स्पष्टच सांगितलें कीं मला लोकगीताची कल्पना नाहीं व म्हणून तें शिकविलें नाहीं. पण आश्चर्याची गोष्ट अशी कीं सुपरिंटेंडेंटसाहेबांनीं असें चोख बजावलें कीं अभ्यासक्रमांत लोकगीतांचा समावेश नसल्यामुळें शिक्षकानें तें शिकविलें नाहीं. त्यावर मी शांतपणें म्हटलें, "तुमचें म्हणणेंही खरें असण्याचा संभव आहे. पण लोकगीतांचा समावेश अभ्यासक्रमांत केल्याचें मला स्मरतें. आपण जरा तसदी घेऊन अभ्यासक्रम वाचाल तर माझीही चूक सुधारेल." झालें. सुपरिंटेंडेंटसाहेबांनीं लगेच अभ्यासक्रमाची प्रत शोधून काढून वाचली. त्याबरोबर त्यांची परिस्थिति विलक्षण झाली. पण ते जात्याच सत्प्रवृत्तीचे असल्यामुळें त्यांनीं स्वतःचा तोल सांभाळून म्हटलें, "आमची फसगत होत होती. आपण मरीब मार्गदर्शन केलें. आभारी आहे. आतां आम्हीं अगोदर संपूर्ण अभ्यासक्रमाचा अभ्यास करू व नंतर तो तंतोतंत अमलांत आणण्याची कोशीस करू." आणि पुढें त्यांनीं तसें केलेंही. मला अत्यानंद झाला.

या उदाहरणावरून पुष्कळांना पुष्कळ शिकण्यासारखें आहे. शिक्षकानें अभ्यासक्रम वाचला नव्हता, त्याला त्याची कल्पना नव्हती हें

जितकें खरें तितकेंच अभ्यासक्रमाची कल्पना त्याला कोणी आणून दिली नव्हती, त्याबाबतींत त्याला मार्गदर्शन कोणी केलें नव्हतें हेंही खरें आहे. असें मार्गदर्शन न होण्याचें कारण मला वाटतें मार्गदर्शकानांच त्याबाबतींत विशेष ज्ञान नसतें आणि आपल्याला नसलेलें ज्ञान मिळविण्याचा ते कधीं विशेष प्रयत्नही करीत नसावेत प्राथमिक शाळांच्या इन्स्पेक्टिंग ऑफिसरांच्या मुलाखती घेतल्यास या परिस्थितीची सत्यता पटण्याचा संभव आहे.

लोकगीतांचे बाबतींत केवळ प्राथमिक शिक्षकांना दोष देऊन भागणार नाहीं. दुय्यम शाळांतील बऱ्याच शिक्षकांना लोकगीताविषयीं कल्पना असल्याचें दिसत नाहीं. ज्यांना थोडीफार कल्पना आहे असें वाटतें ती खरीखुरी ठरतेंच असेंही नाहीं. दुय्यम शिक्षकांपैकीं बऱ्याच शिक्षकांची अशी समजूत असते कीं ग्रामीण जीवनावरील गाणीं म्हणजे लोकगीतें, खेड्यांतील वातावरण ज्यांत चित्रित केलें आहे त्या सर्व कविता म्हणजे लोकगीतें, जानपदगीतें म्हणजे लोकगीतें. लोकगीताविषयींच्या त्यांच्या या कल्पनांचा अनुभव अनेकवार आला आहे. परवाच पुन्हा त्याची उजळणी झाली. गेल्या वर्षापासून बी. टी. चा नवीन अभ्यासक्रम शिकविला जात आहे. या नवीन अभ्यासक्रमात पदवीधरांनीं प्रत्येकीं कमीत कमी दहा पाठ प्राथमिक शाळेंत द्यावयाचे आहेत. सुधारलेला नवीन अभ्यासक्रम व्यवस्थित रीतीनें अमलात आणण्याचे दृष्टीनें व पदवीधरांना मार्गदर्शन करण्याच्या हेतुनें मी स्वतः इ. १ वर लोकगीताचा पाठ घेतला. पाठामध्यें मुलें चांगलींच रंगलीं, तन्मय झालीं व स्वतःला विसरलीं असें टीकाकारांनीं नंतर सांगितलें. मीही स्वतःला विसरलों होतो, असें म्हणावयास हरकत नाहीं. शंभर सव्वाशें बघे लोक असूनही त्यांपैकीं एकही मला दिसत नव्हता. तीसपस्तीस मुलें तेवढीं दिसत होतीं. त्यांना शिकवितांना होणारी कृति सहेतुक होती कीं अहेतुक होती

हें सांगणें कठीण आहे. सुचत होतें तसें करीत होतो, मुलांना करावयास लावीत होतो, एवढेंच. अशा तऱ्हेचा पाठ झाल्यामुळें पाठाची सर्वांनीं एकमुखानें मध्यें आडपडदा न ठेवतां वाखाणणी केली. पण त्याबरोबरच लोकगीताविषयींचें त्यांचें अज्ञान बाहेर पडलें. पण विशेष आश्चर्य असें कीं एका प्राध्यापकानेंही न कळत आपलें अज्ञान प्रकट केलें. ते म्हणाले कीं पाठ अतिशय यशस्वी झाला, अगदीं प्रिन्सिपॉलसाहेबांच्या खुर्चीला शोभण्यासारखा झाला. पण जें शिकविलें गेलें तें मात्र आम्हाला कळलें नाहीं. तें पद होतें कीं गाणें होतें की कविता होती हें कांहींच कळलें नाहीं. मला वाटतें मुलांची, विद्यार्थी-शिक्षकांची, प्राध्यापकांची, सर्वांचीच करमणूक करण्याकरितां साहेबांनीं कांहींतरी शिकविलें. कांहीं जरी असलें तरी तें अतिशय मनोरंजकपणें शिकविलें गेलें, अतिशय परिणामकारकपणें शिकविलें गेलें यांत तिळमात्र संशय नाहीं. शून्यांतून जग निर्माण झाल्याचें अनुभवास आलें नाहीं. पण शून्यांतून आनंद-सागर कसा उफाळतो याचा अनुभव आज खास मिळाला. या उद्गारांनीं मी हुरळून जावयास पाहिजे होतें, बेहोष व्हावयास हवें होतें. पण तसें न होतां मला जरा वाईटच वाटलें. एका जबाबदार व्यक्तीचें लोकगीताविषयींचें हें ज्ञान पाहून विषाद वाटला. लोकगीताविषयींचें आमच्यांतील अज्ञान इतकें अफाट आहे, इतकें अमर्याद आहे, इतकें अथांग आहे. म्हणूनच त्याचें स्वरूपाचें सविस्तर वर्णन करणें अत्यावश्यक आहे.

लोकगीत म्हणजे कोणत्याही कवि किंवा कवयित्री म्हणून म्हटल्या जाणाऱ्या व्यक्तीनें कागद पेन्सील घेऊन न केलेलें स्वयंस्फूर्त व एका पिढीपासून दुसऱ्या पिढीकडे तोंडीं आलेलें गीत. लोकगीतांत अनेक प्रकारचीं गाणीं मोडतात. या सर्व प्रकारच्या गाण्यांची मोजदाद केली तर जात्यावरच्या गाण्यांचा नंबर संख्येच्या दृष्टीनें पहिला लागेल. गीतांच्या विषयांसंबंधींसुद्धां त्यांचें स्थान कोणी हिरावून घेऊ शकणार नाहीं.

आईबाप, भाऊ-भावजय, बहीण-मेहुणा, मामा-भाची, चुलता-पुतण्या, मावशी-काकी, सासू-सासरे, दीर-जावा, नणंद-नणंदावा, नवरा, सवत, मुलगा-मुलगी, यांपैकीं कोणीही जात्याच्या तावडींतून सुटलेलें नाहीं. खालील तुरळक उदाहरणें त्याचा सबळ पुरावा आहे.

बापजी बयाबाई दोन अमृताचीं कुंडं
त्यात जलमला माझा पिंड ।
तांबड्या लुगड्याच्या निऱ्या घालते हौशीनें
केलं माह्यार मावशीन ।
चांदन्यासंगट चांदाला येते शोभा
भाऊ बहिणी मंदी उभा ।
बधुजी परायास, भाच्या राघुची आगत
मुदला परायास मला याजाची लजत ।
पाया पडूं आली, म्या धरिली वरच्यावर
भावजईच्या कडेला भाचा ढुणीदार ।
आई परायास सासुबाईचा उपकार
सासुमालकीन दिला पीरतीचा चद्रहार ।
चारी माझी बाळं, पांचवा हाई कंथ
राज्याला न्हाई अंत ।
सरल दळण, माझ्या सुखांची सरेना
नऊ लक्ष ओंवी माझ्या गोताला पुरेना ।

फेरावरचीं गाणीं किंवा हादग्याचीं गाणीं ही लोकगीतामध्येंच मोडतात जात्यावरच्या गाण्यांच्या खालोखाल अशा गाण्यांची संख्या आहे. उदाहरण म्हणून एक गाणें खालीं दिलेलें आहे.

वइवरचं कारल, साजिर ग सई गोजिरग ।
सखुबाई सुग्रणिन्, गोडलन् ग सई तोडलन् ग ।

त्याचीच भाजी, रांधलिन ग सई रांधलिन् ग।
आपुल्याच पतिला, वाढलिन् ग सई वाढलिन् ग।
तिचाच पती, रुसला ग सई रुसला ग।
शेजीच्या घरीं, जाऊन बसला ग सई बसला ग।
शिंप्या घरचा शेला।
माळ्या घरचा तुरा।
तिन् आपला पति समजाविला सई समजाविला।

स्त्रिया साधारणपणें फेर धरतात. पण मुली इतर खेळ अधिक प्रमाणांत खेळतात फुगडी, झिम्मा हे त्यांचे विशेष आवडीचे खेळ. त्यावरील अनेक लोकगीतांपैकीं एक खालीं दिलें आहे.

आंबा पिकतो का रस गळतो।
कोकणचा राजा झिमा खेळतो।
झिम पोरी झिम।
कपाळाचा भिंग।
भिंग गेल फुटून।
पोरी आल्या उठून।
नदीच्या कडेला।
दामुजी सोनार।
पाय नाहीं पडिलें।
पायाच जोडव।
सवती बोल ग।
सवत बोलेना।
मांडव हलेना। वगैरे.

मोठ्या मुलींची वरीलप्रमाणें गाणीं असतात. पण लहान मुलांमुलींचीं गाणीं वेगळींच असतात. सर्व मुलें कांहींएक लिंगभेद न मानतां तीं एकत्र म्हणतात. उदा०

येरे येरे पावसा
तुला देतो पैसा
पैसा झाला खोटा
पाऊस आला मोठा.

स्त्रियांच्या गाण्यांत देवादिकांचीं गाणीं फार मोठ्या प्रमाणांत आहेत रामायण–महाभारतासारखे ग्रंथच नसते त्यांनीं ओवीबद्ध केलें असें नसून तेहतीस कोटी देवांना त्यांनीं वेठीस धरल्याचें स्पष्ट दिसून येतें. या विधानाची सत्यता खालील कांहीं ओव्या पटवून देतील.

एवढ्या वनांमधीं काय दिसत लाल लाल
सीता बाळंतीण, लुगड्याच दिलं पाल ।
पंढरपुरामंदी । काय विण्याला वीणा दाटे
ज्ञानोबा तुकाराम । अहा साधुला साधु भेटे ।
विठ्ठलाच्या शेल्यावर । अभंग झाले दाट
रुक्मीणीच्या चोळीवर । लिहिलें हरिपाठ ।
माझ्या घरीं पाहुन, आलं पंढरीचं हरी
चंद्राच्यावाचून उजेड पडला माझ्या दारीं ।

स्त्रिया जशा जात्यावर गाणीं म्हणतात तसेंच पुरुषही कधीं कधीं म्हणतात. खेड्यांत लग्न कार्यांत मोठमोठ्या जात्यावर [illegible] पुरण दळतात त्यावेळीं ते गाणीं म्हणतात. गावजेवणाची प्रथा कमी होत चालल्यामुळें व पुरणाव्यतिरिक्त कमी श्रमाचीं पक्वानें तयार करण्याकडे ओढा असल्यामुळें ही प्रथा कमी होत चालेली दिसते [illegible] गाण्यांत पोवाडे, लावण्या, कटाव यांचाही समावेश असतो पण कधीं कधीं स्वतः रचलेलींही गाणीं ते म्हणतात. पुष्कळ वेळां स्त्रियांना वेडा[illegible]याकरितां त्यांचींच गाणीं पुरुष म्हणतात. उदा०

अरे माझ्या सासऱ्या, तुझ्यावर कचऱ्या
पाऱ्याच्या वाऱ्याच्या ।

अग माझी सासू , तुला भारी सोसू
शिव्याचा शिव्याचा ।
अरे माझ्या दीरा, उपस झरा
पाण्याचा पाण्याचा ।
अग माझी नणद, तुला भारी छंद
पोराचा पोराचा ।
अरे माझ्या नवऱ्या, तुझ्यावर चवऱ्या
सोन्याच्या सोन्याच्या ।

स्त्रिया नागपंचमींत फेरावर गाणीं म्हणतात. गौरीगणपतीच्या सणालाही म्हणतात. तसेंच पुरुषही पोळ्यासारख्या सणाला किंवा आश्विन वद्य १२ हीस जिला गायगोऱ्ह्याची बारस म्हणतात त्या दिवशीं गाणीं म्हणतात. खालील गाणें गायगोऱ्ह्याच्या बारसीच्या दिवशींच गाईला ओवाळतांना म्हणावयाचें आहे.

माझी भौळण गाय बरी
दूध भरून देती चरी
चरचरत भिवर थरी
तिला राखितो गोविंदा हरी ॥धृ०॥
माझ्या भौळण गाईचीं शिंग
जशीं महादेवाचीं लिंगं । माझी भौळण गाय ॥१॥
माझ्या भौळण गाईचे कान
जसें नागिलीचें पान । माझी भौळण गाय ॥२॥
माझ्या भौळण गाईचे डोळे
जसें लोण्याचे गोळे । माझी भौळण गाय ॥३॥
माझ्या भौळण गाईच्या मांड्या
जशा पालखीच्या दांड्या । माझी भौळण गाय ॥४॥

माझ्या मौळण गाईची शेप
जशी नागिणीची शेप । माझी मौळण गाय ॥५॥

खेड्यातील लोकांचा मुख्य धंदा म्हणजे शेती. शेती करतांना मोट हांकावयाच्या वेळीं जीं गाणीं म्हणतात त्यांना मोटेवरचीं गाणीं म्हणतात. हीं गाणीं लोकगीतांच्या प्रकारांपैकींच आहेत. खालील गाण्यावरून मोटेवरील गाण्याची कल्पना येईल.

लई मी नटतुया माचाडाच्या बाहुलीला ।
मोट चिंचच्या सावलीला ॥
वाटावरला मळा घ्या ग बायानों शेंगा भेंडी ।
मळा पिकला पहिल्या तोंडीं ॥
राजहंस पांखरू गढूळ पाणी पितं ।
मळकऱ्याला दुवा देतं ॥
पाणवठ्याच्या बायांनो ग पाणी भरून सरका ।
बैल होश्या हाय मारका ॥

शाळू काढतांना स्त्री पुरुष गाणीं म्हणतात. त्यांना भलऱ्या म्हणतात. भलरी सांघिक गीत आहे. त्यांत भावनांचा अभाव दिसून येतो व गद्यात्मक पद्यासारखें तें भासतें. त्याची चालही ठरलेलीच असते. खालील दिलेली भलरी बरीच लोकप्रिय आहे.

भलरी दादा भलरी ।
चांदगांव नांदगांव नरे आंबेगांव ॥१॥
तुझ्या येळाची चमचम । झणकरी बांगडी ।
फुलेरी चापा भलरी ॥२॥
ताडीवर माडी झुंघळ काढी ।
घाल काय घुंबर भलरी ॥३॥

भानाया माळसा बाण्याची ।
सर्वि जेजुरि सोन्याची ॥४॥

नकू बाई लाखाची पायरी ।
आंत देव नांदतो मल्हारी ॥५॥

काळीं करवद वेचाया ।
जाऊं बाई बळरी बळरी ॥६॥

देशावर जोंधळा काढतांना स्त्री पुरुष भळरी म्हणतात तर कोंकणांत होडी वल्हवितांना कोळी, दालदी व गाबीत गाणीं म्हणतात. हीं गाणीं लोकगीतांमध्येंच मोडतात या गाण्यांपैकीं कांहीं गाणीं स्त्री-पुरुष एकत्र म्हणतात, कांहीं एकएकटे म्हणतात तर कांहीं आळीपाळीनें म्हणतात. पुरण दळतांना म्हणण्यांत येणाऱ्या गाण्यांत जशी अश्लीलता असते तशी होडी वल्हवितांना म्हणण्यांत येणाऱ्या कांहीं गाण्यांतूनही आढळते. खाडींतील किंवा समुद्रातील शांत वातावरणांत हीं गाणीं मनावर फार परिणाम करू शकतात. खालील गाणें यांपैकींच एक आहे.

आहे आहे रे नखवा दऱ्यांत मचवा आदलतो है
नखव्याच्या मचव्याला हिरवा रंग
नखव्याची गोमू आतां झालेय दंग, आतां झालेय दंग
मचव्याच्या शिगला हिरवा रंग
नखव्याची गोमू आतां झालेय दंग, आतां झालेय दंग
नखव्याच्या जाळयाला गावलीच घोल
नखव्याची गोमू म्हणे पाणी किती खोल
नखव्याच्या जाळयाला गावलीय मूसी
नखव्याची गोमू आतां झालीय खुषी
आहे रे आहे रे नखवा, दऱ्यांत मचवा आदलतो है

आजकाल जो तो उठतो तो लोकगीतांविषयीं बोलूं लागतो, लिहूं लागतो, त्याचें महत्त्व प्रतिपादन करूं लागतो, त्याची बेहद वाखाणणी करू लागतो. असें का व्हावें ! हें होत आहे त्यांत कांहीं स्वारस्य आहे कीं ती एक तात्पुरती लाट आहे हें पडताळून पाहिलें पाहिजे. लोकगीताच्या या साथीचा उलगडा करून घ्यावयास पाहिजे. केवळ जुनें तें सोनें म्हणून त्याची वाहवा होते, त्याचा उदोउदो होतो कीं त्यांत विशेष कांहीं आहे याचा तल्लास लावला पाहिजे हें करीत असतांना आजचें काव्य व लोकगीतें यांचा तुलनात्मक दृष्टीनें अभ्यास करून सर्व-साधारण काव्यापेक्षां लोकगीतांमध्यें विशेष काय आहे त्याचा शोध करणें गैरवाजवी होणार नाहीं.

लोकगीतांचीं वैशिष्ठ्यें अनेक आहेत. एक तर तें अलिखित आहे. कोणीही तें कागद पेन्सील घेऊन रचलेलें नाहीं. कर्णोपकर्णीं तें एका पिढीपासून दुसरीकडे आलेलें आहे. असें पिढ्यान्‌पिढ्या होत आलें आहे. म्हणून त्यास श्रुतिकाव्य म्हणण्याचा कित्येकांना मोह होतो. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जातांना लोकगीतांमध्यें भर पडणें अगदीं साहजिकच आहे. तसेंच लोकगीतांचें अस्तित्व केवळ स्मरणशक्तीवर अवलंबून असल्यामुळें त्यांत घटही मोठ्या प्रमाणांत होत आलेली आहे. लोकगीतांची ही मोड आणि जोड अव्याहत चालत आलेली आहे. ज्यावेळीं प्रत्येक पिढी लोकगीतांच्या संख्येत भर घालीत असे त्यावेळीं त्याच्या घटीची फारशी कोणाला खत वाटली नाहीं. पण सध्या ही घट फार जाणवूं लागली आहे. कारण आधुनिक सुशिक्षित व सुसंस्कृत म्हणविल्या जाणाऱ्या पिढीकडून त्यांत भर कांहींच पडत नाहीं. या पिढीचें त्याच्याकडे दुर्लक्ष असल्यामुळें घट मात्र मोठ्या प्रमाणांत होत आहे.' ही घट थांबवावी, आपल्या उच्च संस्कृतीची खूण जतन करावी, आपलें जिवंत काव्य कायम राखावें,' म्हणून आतां कोठेंसें लोकगीतांचा

लेखी संग्रह करण्याचे तुरळक प्रयत्न होत आहेत. सानेगुरुजी, प. महादेवशास्त्री जोशी, सौ. मालतीबाई दांडेकर व कमलाबाई देशपांडे, डॉ. सरोजिनी बाबर यांच्यासारख्या व्यक्तींनीं दीर्घ प्रयत्नानें कांहीं लोकगीतांचे संग्रह प्रसिद्ध केले आहेत. पण प्रसिद्ध संग्रहांतील लोकगीतांपेक्षां अप्रसिद्ध लोकगीतांची संख्या एवढी मोठी आहे कीं संग्रह-कार्याला आतां कोठेशीं सुरवात झाली असें म्हणावें लागतें. तें कांहीं असलें तरी लोकगीतांचें अलिखित स्वरूप आतां मावळूं लागलें हें निर्विवाद आहे.

लोकगीतांचें दुसरें वैशिष्ट्य म्हणजे त्यांची सोपी भाषा होय. लोकगीतांची भाषा बोलभाषा आहे. म्हणून ती सोपी आहे, त्यांत अवघड शब्द नाहींत, भाषेची कृत्रिमता नाहीं. बोलभाषा सर्वांच्या परिचयाची असल्यामुळें लोकगीतें सर्वांना सहजासहजीं झटकन समजतात. म्हणून लोकगीतांची पकड बहुजन समाजावर फार मोठी आहे. लोकगीतांमधील उपमा–रूपकादि अलंकार अगदीं लीलेनें वापरलेले दिसतात. उदा०

फुलांमदी फूल । फूल हुंगावें जाईचें ।
सुख भोगावें आईचें । बालपणीं ॥

किंवा

फुलांमदीं फूल । फूल हुंगावें चाफ्याचें ।
सुख भोगावें बापाचें । बालपणीं ॥

या सोप्या, अकृत्रिम, बोलभाषेंतील ओळींत जेवढें भाषासौंदर्य एकवटलें आहे, जेवढा अर्थ भरलेला आहे, तेवढें सौंदर्य पंडिती भाषेंतील काव्यांत क्वचितच आढळतें. म्हणूनच लोकगीतें हें जिवंत काव्य आहे, चैतन्यमय वाङ्मय आहे असें म्हटलें जातें. आणि तें खरेंही आहे. भावना व अर्थ दोन्हीही एकाच वेळीं अंतःकरणाला जाऊन भिडलें तर जीवनांत चैतन्य यावयास कितीसा उशीर लागणार !

लोकगीतांचें तिसरें वैशिष्ट्य म्हणजे त्यांतील अतर्क्य वास्तवता. लोकगीत म्हणत असतांना किंवा ऐकत असतांना त्यांत रंगविलेलीं चित्रें

चटकन डोळ्यांपुढून सरकून जातात. हीं चित्रें इतकीं हुबेहुब असतात कीं आपण तीं प्रत्यक्षांत अनुभवतो आहोंत असेंच वाटतें. हुबेहुब चित्रांचीं उदाहरणें अगणित देतां येतील. पण स्थलसंकोचामुळें तसें करतां येत नाहीं. पैलवान मुलाचें आईनें केलेलें हें वर्णन पहा—

अंगांत अंगरख जुधळी त्याचा वाण
माझा बाळराज आकडी दुधाचा पैलवान।

तसेंच हें नवऱ्याचें वर्णन पहा—

अंगांत अंगरखा वर केसांचा गरका
माझ्या भरताराचा साज शिपायासारखा।

किंवा

दिवाणाला जातां माग पुढं माणूस
मधीं घरधनी, मोतियाचं कणीस।

खालील ओळीमध्यें तर या वास्तवतेची परमावधि झाली असल्याचा भास होतो—

कंथ पुशित्यांत, रानीं माहेरवास कसा?
केळीच्या पानावर अंबेमोहराचा भात जसा।

असें अमोल काव्य वाचल्यानंतर प्रश्न असा पडतो कीं एवढीं हुबेहुब चित्रें अशिक्षित स्त्रीयांना कशीं चित्रित करतां आलीं. या प्रश्नाचें उत्तर वाटतें तितकें अवघड नाहीं. लोकगीत हें सहजस्फूर्त काव्याचा उत्तम नमुना आहे. जात्यावर बसलें म्हणजे ओवी आठवते असें म्हणतात. याचा अर्थच असा कीं जात्यावर बसल्यानंतर ज्या भावनांशीं दळणारीण समरस होते त्या भावना स्पष्ट करणारे बोल सहजासहजीं तिच्या तोंडून बाहेर पडतात. या भावनांत मातृप्रेम आहे, भ्रातृप्रेम आहे, जातकुळीचा अभिमान आहे, प्रणयाची आतुरता आहे, देवावरील श्रद्धा आहे. त्यांत वात्सल्यरस आहे, प्रणयरस आहे, हास्यरस आहे,

करूण रस आहे, सर्व कांहीं आहे. सहजस्फूर्त काव्याचे सर्व गुण त्यांत आहेत. भावनांच्या खेळाविरहित लोकगीत सापडणें कठीण. खालील भोंडल्याच्या गाण्यांत नुसता हास्यरसच आहे असें नसून त्यांत अद्भुतरसही आहे

शिपरं कुतरं सोडा ग बाई ।
दारीं कोण पाहुणा आला ग बाई ।
चारी दरवाजे लावा ग बाई ॥ ध्रु० ॥
सासु पाहुणी आली ग बाई ।
सासूनं काय आणलन् ग बाई ।
सासूनं पाटल्या आणल्या ग बाई ॥
(चा. ब.) पाटल्या मी लेत नाहीं ।
सग मी येत नाहीं
(चा. ब.) शिपरं कुतरं सोडा ग बाई ॥ ध्रु० ॥

( अशा तऱ्हेन सासरच्या सर्व मुन्हळ्यांना हात हालवीत परत पाठविल्यानंतर नवरा न्यावयास येतो )

पती पाहुणा आला ग बाई ।
पतीन काय आणलन् ग बाई ।
पतीनं आणला चाबुक ग बाई ।
चाबुक मी खातें ।
सग मी येतें ।
शिपर कुतर बांधा ग बाई ।
चारी दरवाजे उघडा ग बाई ॥

स्त्रियांच्या ओंव्यांत वात्सल्यरस तर पदोपदीं आढळतो—

बोबड्या बोलाचं येतं मला हंसं
बाळा फिरून बोल तसं ।

किंवा

बाळा दृष्ट झाली, झाल दृष्टीचं कोळसं
मोडलं बाळाचं बाळसं ।

अशा वात्सल्यरसानें ओथंबलेल्या कितीतरी ओव्या दाखवितां येतील. लोकगीतांमध्यें वात्सल्यरसापेक्षां प्रणयरस कमी प्रमाणांत आढळत असला, क्वचित आढळत असला तरी त्याची उत्कटता मात्र वात्सल्यरसापेक्षां कितीतरी अधिक प्रमाणांत आहे. ही उत्कटता प्रेमवीरांना तर प्रेमांध करतेच पण विरक्तांनाहीं मोहांत पाडण्यासारखी असते. खालच्या ओव्या वाचून तुमच्यावर काय परिणाम होतो तो तुम्हीच पहा—

छप्पर पलंगावर वेलच्या लवंगाचा सडा
धरधनि यांना म्यां झोपेंत दिला इडा ।
गोटपाटल्याचा हात कंथाच्या उशाखालीं
हलवून जागी केली ।

केव्हां केव्हां भावनेची भरती इतकी अफाट असते, इतकी अमर्याद असते, या भरतीच्या लाटा इतक्या असंख्य असतात, इतक्या गगनचुंबी असतात कीं माणूस स्वतःला विसरतो. अशा तऱ्हेची भावनेची भरती देवादिकांविषयींच्या श्रद्धामय ओव्यांमध्यें फार स्पष्टपणें दिसतें.

सांगुन पाठवते, रुक्माबाई मावशीला
मला मूळ धाड बाई आखाडी बारशीला ।
सांगुन पाठवते, रुक्माबाई मावशीला
कुंकवाचा पुडा धाड, हिरेजडीत फणी मला ।
विठ्ठल माझा पिता, रखुमाई माझी माता
हरला शीणभाग दोघांना ओव्या गातां ।
दिस मावळला राऊळाच्या माग
मला राहावं म्हनत्यात हरुक्माई दोघं ।

प्रत्यक्ष परमेश्वर आईबापांचे ठिकाणीं दिसून तो आपल्या मुठीस राहाण्याचा आग्रह करीत असल्यानंतर परमेश्वर व माणूस यांत फरकच काय राहिला ! भावनेच्या भरतीचें महात्म्य एवढें आहे. ती माणसाला परमेश्वरस्वरूप करतें व परमेश्वराला माणूस करते.

लोकगीतांमध्यें नानाविध रसाबरोबरच कल्पनेची भरारी मोठ्या प्रमाणांत आढळते. ही भरारी कांहीं वेळां गरुडाचें उड्डाणासही मागें टाकतें. खालील ओव्या या भरारीचा सुंदर दाखला म्हणून पुढें करण्यासारख्या आहेत.

भरली कृष्णाबाई, कोयना आली नीट ।
कन्हाडाला झाला संगम प्रीती दाट ॥
किंवा
रुणझुण् पांखरा । जा माझ्या माहेरा ।
कमानी दरवाजा । त्यावर बस जा ।
सांग माझ्या आईला । न्या मला माहेरा ।

मेघदूतांमधील कल्पनेइतकीच ही रम्य कल्पना आहे. मेघाला दूत करणें काय किंवा पांखराला दूत बनविणें काय सारखेंच. असें असूनही मेघदूतकर्त्याचीच तेवढी आपण वाहवा करतो. आणि ही ओवी जुळवणाऱ्याकडे ढुकूनही बघत नाहीं. इतकें आम्ही विचारहीन आहोंत, बुद्धिहीन आहोंत, अरसिक आहोंत.

लोकगीत कल्पनाशक्तीवर जसे आरूढ झालेलें आहे तसे तें भाषा-सौंदर्यानेंही नटलेलें आहे. त्यांतील उपमा-रूपकादि अलंकार नैसर्गिक आहेत, मनाला भुरळ पाडणारे आहेत. त्यांची सर इतर काव्यांत क्वचित्च येइल. आईबापांना किती उच्च स्थानावर बसविलें आहे आणि त्यांत अर्थ किती भरला आहे ते खालील ओव्यावरून दिसून येईल.

बाप समिंदर बधा माझी गोदायण
काशीला जाते वाट, दोनीच्या मधयान

सासू, सासरा, नवरा याबद्दल अशीच खालची ओवी पाहा—

सासू नि सासरा दोन तुळशीचीं आळं
त्यांच्या साऊलीला भरतार राजस बाळ।

किंवा

मायबापाचं राज मळ्यांतली मका
माझ्या चुडीयाचं राज, कृष्ण देवाची द्वारका।

किंवा

पोटीं न्हाई पुत्रफळ सुख न्हाई कामिनीला
पिकाच्यावाचून काय कराय जमिनीला।

आतापर्यंत लोकगीत म्हणजे काय याची शहानिशा करण्याचा प्रयत्न केला. त्याची ओळख करून घेण्याचा प्रयत्न केला. त्याच्या स्वरूपाविषयीं विचार केला. त्याच्या वैशिष्ठ्याचा अभ्यास केला. एवढें करूनही लोकगीताविषयीं संपूर्ण कल्पना आली असें म्हणणे धोक्याचें होईल. लोकगीताविषयीं पूर्ण कल्पना आणून घ्यावयाची असेल तर अधिक खोलांत जाणें आवश्यक आहे. लोकगीतांचें प्रकार कोणते आहेत, त्यांची वर्गवारी कशी करतां येईल; लोकगीतांना लोकगीतेंच नांव शोभून योग्य दिसतें कीं दुसरें कोणतें समर्पक नांव देतां येईल, लोकगीतांचा जन्म केव्हां झाला, वगैरे प्रश्न सखोलपणें अभ्यासल्याशिवाय लोकगीताविषयीं खरी कल्पना येणें अशक्य आहे असें वाटतें. तेव्हां या प्रश्नाचा उहापोह करणें क्रमप्राप्त आहे असें म्हटल्यास वावगें होणार नाहीं.

लोकगीतांचे अनेक प्रकार अनेकांनीं केले आहेत. त्यांची वर्गवारीही आपापल्या कुवतीप्रमाणें कांहींनीं केल्याची आढळते. त्यांतील सर्वच वर्गवारी योग्य आहे असें म्हणवत नाहीं. वर्गवारीचे सर्वच प्रकार योग्य नसल्यामुळें ती करण्याचें निरनिराळे दृष्टिकोन समजावून घेऊन ती सरस-नीरस ठरविणें हें मोठें जिकीरीचें काम करणें कर्तव्य होऊन बसलें

आहे. लोकगीतांच्या पहिल्या वर्गात दोन प्रकारचीं लोकगीतें येतात. काम करतांना म्हणावयाचीं गाणीं व खेळतांना म्हणावयाचीं गाणीं. खेळांतील गाण्यांत मुलांमुलींचीं झिम्मादि गाणीं मोडतात. तसेंच स्त्रीयांचीं फेरावरचीं गाणीं, सणावारांचीं गाणीं, बैठकीचीं गाणीं यांचाही त्यांतच समावेश होतो. काम करतांना म्हणावयाच्या गाण्यांत मोटेवरचीं गाणीं, पुरण दळतांना म्हणावयाचीं गाणीं, स्त्रीयांचीं जात्यावरील गाणीं, शाळू काढतांना म्हणावयाचीं गाणीं, होडी वल्हवितांना म्हणावयाचीं गाणीं या व अशासारख्या गाण्यांचा समावेश होतो. ही वर्गवारी अर्थपूर्ण वाटते. कारण आयुष्य सुख-दु खाचा हिंदोळा आहे. तें सुखदु:खांनीं भरलेलें आहे, काम-करमणुकीनें ओथंबलेलें आहे. काम करीत असतांना त्याचे श्रम कमी भासावेत म्हणून गाणीं म्हटलीं जातात. श्रमपरिहारार्थ म्हटलेल्या गाण्यांचा उद्देशही सफल होतो. अशा गाण्यामुळेंच मण-अर्धामण वजनाची जात्याची दळी स्त्रिया सहजासहजीं ओढू शकतात. त्यांच्यामुळेंच पुरुष तासनतास उन्हातान्हांत मोट धरू शकतात. या गाण्यांचा मोठा मोबदला म्हणजे श्रमपरिहार. पण केवळ श्रमपरिहार होऊन भागत नाहीं. शरीरास ताजेंतवानें ठेवण्यास, त्यामध्यें उत्साह भरण्यास त्यांतील शक्तींत वाढ करण्यास निर्मळ आनंदाची आवश्यकता असते. हा आनंद खेळांतील गाण्यांपासून मिळतो. श्रम-परिहाराचीं गाणीं व खेळांतील गाणीं यांचा वाटा मानवी जीवन जगण्यालायक करण्यांत फार मोठा आहे. म्हणून लोकगीतांची ही वर्गवारी सार्थ वाटते

श्रम करीत असतांना माणसास आपोआप व्यायाम होतो. म्हणून श्रमपरिहारार्थ म्हटल्या जाणाऱ्या गाण्यांना व्यायामाचीं गाणीं असें कांहीं लोकांकडून म्हटलें जातें. आणि त्याचा परिणाम व्यायामाची गाणीं व खेळांचीं गाणीं यांचीं स्वतंत्र वर्गवारी करण्यांत होतो. पण ही वर्गवारी पटण्यासारखी नाहीं. कारण श्रम व व्यायाम भिन्न आहेत.

व्यायाम करीत असतांना शरीरास श्रम होतात म्हणून श्रम हाच व्यायाम असें म्हणतां येणार नाहीं. व्यायाम हें एक शास्त्र आहे. त्याला नियम आहेत. तसें श्रमाचे बाबतींत नाहीं. शिवाय गाणीं म्हणतांना जी कृति होते तिचा हेतु व्यायामाचा नसून कामाचा असतो, श्रमाचा असतो. म्हणून शब्दांची ओढाताण करून लोकगीतांची वर्गवारी वाढविण्यांत कांहीं अर्थ नाहीं असें म्हटल्यास अनुचित होणार नाहीं.

लोकगीतांची दुसरीही एक वर्गवारी करतां येण्यासारखी आहे. त्यांत दररोजच्या व्यवहाराचीं गाणीं व देवादिकांचीं गाणीं यांचा समावेश करतां येण्यासारखा आहे. व्यवहाराच्या गाण्यांत विशेषतः प्रापंचिक गाणीं मोडतात. संसारांतील नातींगोतीं, त्यांची कीर्ति-अपकीर्ति, त्यांच्यापासून होणारे फायदे तोटे, त्यांच्यांतील प्रेम, द्वेश व मत्सरादि भावनांनीं रसरसलेलीं गाणीं प्रापंचिक गाणीं म्हणून मानावयास हरकत दिसत नाहीं. या गाण्यांत मनुष्याचा स्वार्थच मुख्यत्वें आढळून येतो. पण स्वार्थ साधीत असतांना मनुष्य परमार्थ नेहमींच विसरतो असें मात्र म्हणतां येणार नाहीं. सुख-दुःखाच्या परमोच्च बिंदूवर असतांना देवाची सारखीच आठवण येते. म्हातारपणीं असें वरचेवर होतें. म्हातारपणांत परमार्थाकडे वळलेल्या दृष्टीची जाणीव मनुष्याच्या देवादिकाविषयींच्या गाण्यांतील आशयावरून सहज होते. पारमार्थिक तत्त्वज्ञानाचा संस्कार हिंदी मनावर इतका मोठ्या प्रमाणांत झालेला आहे कीं प्रापंचिक व पारमार्थिक गाणीं ते नेहमींच गुणगुणत असतात.

लोकगीतांच्या तिसऱ्या वर्गवारींत पुरुषांचीं गाणीं, स्त्रियांचीं गाणीं असे प्रकार पडतात. मुलांचीं गाणीं विशेषतः खेळांतील गाणींच आहेत. पुरुषांचीं गाणींही थोडींच आहेत. लावणी व मोटेवरच्या गाण्यासारखीं थोडीं गाणीं अपवाद म्हणून वगळल्यास बाकी सर्व गाणीं स्त्रियांचींच आहेत. असें असलें तरी प्रत्येकाच्या गाण्याची खुमारी वेगळीच असल्या-

मुळें त्यांच्यांतील वातावरण भिन्न असल्यामुळें, त्यांच्यांतील रस भिन्न असल्यामुळें, त्यांची रुची वैचित्र्यांनीं भरलेली असल्यामुळें लोकगीतांच्या या वर्गवारीचा स्वीकार करण्यास प्रत्यवाय दिसत नाहीं

काहीं लोकगीतें सर्वानें म्हणावयाचीं असतात तर काहीं एका व्यक्तीनें म्हणावयाचीं असतात. तेव्हां वैयक्तिक लोकगीतें व सांघिक लोकगीतें अशी वर्गवारी करण्याकडे काहींचा कल दिसून येतो. अशा तऱ्हेची वर्गवारी स्त्री व पुरुष या दोघांच्याही गाण्यांच्या बाबतींत करतां येण्यासारखी आहे. मोटेवरचें गाणें हें पुरुषाचें वैयक्तिक गाणें आहे, पण पुरण दळतांना म्हणावयाचें गाणें सांघिक आहे. तसेंच जात्यावरचीं गाणीं हीं साधारणतः वैयक्तिक गीतें आहेत. कारण क्वचितच दुसऱ्या व्यक्तीचा त्यांत भाग असतो. पण भोंडल्याचीं गाणीं, हादग्याचीं गाणीं, गौरीचीं गाणीं, फेरावरचीं गाणीं हीं स्त्रियांचीं सांघिक गाणीं आहेत. मुलांमुलींचीं खेळांतील गाणीं बहुधा सांघिक आहेत.

सांघिक गाण्यांतही आणखी एक नवीन प्रकार आढळतो. काहीं सांघिक गाणीं मिश्र आहेत. म्हणजे स्त्री आणि पुरुष दोघेही हीं गाणीं एकाच वेळीं म्हणतात. शाळू काढतांना म्हणावयाच्या गहूऱ्या, होडी वल्हवितांना म्हणावयाचीं गाणीं, वगैरे या सदरांत मोडतात.

लोकगीतांच्या रचनेवरून त्याची वर्गवारी कधीं कधीं करण्यांत येते. काहीं लोकगीतांमध्यें जिवंत काव्य आढळतें तर काहींमध्यें काव्याचा लवलेशही नसतो. काहींमध्यें भावनांची खळखळ असते तर काहींमध्यें त्यांचा मागमूसही नसतो ज्या गीतांमध्यें भावनांची कसरत आहे त्यांतील शब्द हृदयांतून अचूक उमटतात आणि त्यास उच्च काव्याचें स्थान मिळतें. भावनांचा अभाव असलेल्या गीतांमध्यें शब्दरचना ओढूनताणून केलेली अनुभवास येते. काहीं वेळां ती निरर्थकही असते. म्हणून गद्यात्मक लोकगीतें व पद्यात्मक लोकगीतें अशी वर्गवारी काहींजण

करीत असल्याचें दिसतें. ही वर्गवारी मानली तर मुलांमुलींच्या खेळांतील गाण्यांपैकीं बरीचशीं गाणीं व पुरुषांचीं बहुतेक गाणीं 'गद्य काव्य' म्हणून मानावीं लागतील व स्त्रियांचीं लोकगीतें 'पद्य-काव्य' म्हणून मानावीं लागतील.

सध्या गद्य-काव्यानें आजच्या पिढीचें लक्ष वेधून घेतलें असल्याचें अनुभवास येतें. पण आजचें 'गद्य-काव्य' व 'गद्यात्मक लोकगीतें' यांमध्यें महद्‌तर आहे. गद्य-काव्याचें स्वतंत्र तंत्र आहे. त्यांत भावना आहेत, रस आहेत; सर्व आहे. गद्य लोकगीतांमध्यें यांपैकीं बहुतेक कांहींच नसल्यामुळें त्यांचीं एकमेकांशीं तुलना न केलेली बरी.

ग्रामीण जीवनावरील लोकगीतें व शहरी जीवनावरील लोकगीतें असे प्रकार पाडून लोकगीतांची आणखी एक नवीन वर्गवारी करण्याचा प्रघात रूढ होत चालला आहे असें आतां स्पष्ट दिसूं लागलें आहे. साने गुरुजींनीं शहरीं स्त्रियांच्या लोकगीतांचा संग्रह केला तर सौ. मालतीबाई दांडेकरांनीं खेड्यांतील लोकगीतें गोळा केलीं. अशी वर्गवारी मानणें कितपत योग्य आहे हा प्रश्न अलाहिदा आहे. पण एवढें मात्र खरें कीं अशी वर्गवारी मानली तर दोन गोष्टी प्रामुख्यानें डोळ्यांमध्यें भरतात. त्यांतील पहिली गोष्ट म्हणजे खेड्यांतील लोकगीतांमधील भावनांची उत्कटता व शहरीं लोकगीतांमधील त्यांचा तुलनात्मक अभाव. दुसरी गोष्ट अशी कीं खेड्यांतील लोकगीतांमधील हृदयाला जाऊन भिडणारी सहज व सुंदर शब्दरचना व शहरीं लोकगीतांमधील मेंदूला खाद्य पुरविणारी भारदस्त व बोजड शब्दरचना; शब्दरचनेंतील भिन्नता भावनेच्या कमी अधिक उत्कटतेमुळेंच उपस्थित झाली असें म्हटल्यास अयोग्य होणार नाहीं. याद्दष्टीनें खेड्यांतील लोकगीतें हीं शहरीं लोकगीतांपेक्षां अधिक सरस असणें, अधिक काव्यमय असणें वाजवी आहे. आणि त्याचा पडताळाही मधून मधून येतो. एकाच कल्पनेवर दोन वाता-

घरणांतल्या खालील दोन वेगवेगळया ओव्या या प्रतिपादलेल्या मुद्याचा पुरावा आहे असें गृहीत धरण्यास जड पडू नये.

(१) शहरीं लोकगीतः— सखीया लेणें लेती, आपुले हारदोरे
आपण दाखवूं, आपलें बाळ गोरें।

ग्रामीण लोकगीतः— ल्येकाच्या आईला, तिला कशाचा दुकाळ
हौसे किती सांगूं, पानी हौदाला बखळ।

किंवा

(२) शहरीं लोकगीतः— धन ग संपदा नाहीं मला ती लागत
तुझ्या जीवाचें अगत्य तान्हेबाळ।

ग्रामीण लोकगीतः— डागडागिन्याची न्हाई मी आशा केली
पोटीच्या कमळावर मिस्त दिली।

किंवा

(३) शहरीं लोकगीतः— आंतून जळते, मनांत रडते
परी वरून हसते, उषाताई।

ग्रामीण लोकगीतः— राहते हसुन खेळुन जन म्हणती सुखाची
पित्याच्या नांवापायीं घ्याई जळते लाखाची।

ग्रामीण जीवनाचीं लोकगीतें व शहरीं जीवनाचीं लोकगीतें यांना निरक्षर मागासलेल्या लोकांचीं गीतें व सुशिक्षित पांढरपेशा लोकांचीं गीतें असेंही कांहीं लोक म्हणतांना आढळतात. पण मला स्वतःस या दोन्हींपैकीं एकही वर्गवारी मान्य नाहीं. कारण स्पष्ट आहे. लोक-गीतांचा जन्म झाला त्यावेळीं खेडें व शहर असा भेद नव्हता, सुशिक्षित व अशिक्षित असा फरक नव्हता. त्यावेळीं जवळजवळ सगळींच खेडीं होतीं, जवळजवळ सगळेच निरक्षर होते. शहर व खेडें, सुशिक्षित व अशिक्षित हे भेद अलीकडचे आहेत. अलीकडचे भेद मन मानेल तसे जुन्या गोष्टींना चिटकावणें योग्य होणार नाहीं. दुसरें असें कीं हे भेद

# लोकगीतें

- श्रमपरिहारार्थ
  - पुरुषांची
    - सांघिक
      - १ पुरण दळतांना म्हणावयाची
      - २ शाळू काढतांना म्हणावयाची
      - ३ होडीवरची
    - वैयक्तिक
      - मोटेवरची
  - स्त्रियांची
    - सांघिक
      - १ शाळू काढतांना म्हणावयाची
      - २ होडीवरची
      - ३ गवंडी काम करतांना म्हणावयाची
    - वैयक्तिक
      - जात्यावरील
- खेळांतील
  - पुरुषांची
    - सांघिक
      - १ पोवाडे
      - २ लावण्या
      - ३ सणांची
  - स्त्रियांची
    - सांघिक
      - १ फेरावरची
      - २ बैठकीतील
  - मुलांमुलींची
    - सांघिक
      - मिश्र
        - लहान मुलांची
      - मुलांची
        - सणावाराची
      - मुलींची
        - झिम्मा फुगडी वगैरेची

जेव्हां उत्कटतेनें पडूं लागलें त्यावेळीं लोकगीत निर्मितीमध्यें मोठा अडथळा आला. शहरी जीवनाची ठेवण मूलत:च वेगळी असल्यामुळें तेथें लोकगीतांची निर्मिति होणेंच बंद झालें असें प्रत्ययास येतें. तेव्हां असे भेद पुढें करून आपला कोतेपणा न दाखविणें बरें. लोकगीतांच्या प्रकारांवरून त्यांच्या निरनिराळया वर्गवाऱ्या केल्या असल्या तरी हे सर्व प्रकार एका वर्गवारींत गोवणें वरील तक्त्यांत दाखविल्याप्रमाणें शक्य आहे.

लोकगीतांचे प्रकार अनेकांनीं अनेक पाडले. त्यांची वर्गवारी निरनिराळया लोकांनीं निरनिराळी केली. तसेंच त्यांना भिन्नभिन्न नांवेंही वेगवेगळया विद्वानांनीं बहाल केली. या सर्व नांवांचा परामर्श घेणें येथें स्थलमर्यादेमुळें शक्य नाहीं आणि त्याची आवश्यकताही नाहीं. पण योग्य नांव देण्याच्या दृष्टीनें त्यांच्यापैकीं कांहीं नांवांची शहानिशा करणें अत्यावश्यक आहे असें वाटतें. लोकगीतें हीं एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे श्रवणशक्ति व स्मरणशक्ति यांच्या जोरावर आलीं. जसें स्फुरलें अगर सुचलें तसें जोडून तें गायलें गेलें. दुसऱ्यानें तें श्रवण केलें आणि तोंडीं खेळवत वाचागत केलें. श्रुतिसाहाय्यानें सरक्षिलें गेलें म्हणून त्यास 'श्रुति' गीतें कांहीं जणांकडून म्हटलें जातें. पण हें नांव इतकें सार्थ नाहीं असें वाटतें. श्रुतीच्या मागें एक कल्पना आहे. एकदां रचलें गेलें तेंच श्रुतीनें जतन करीत आजतागायत आणलें अशी ती कल्पना आहे. लोकगीतांचे बाबतींत ही कल्पना खरी ठरत नाहीं. लोकगीतें जतन करण्यांत श्रुतीचा मोठा वांटा असला तरी तीं कांहीं एकदांच रचलेलीं नाहींत. त्यांत वरचेवर भर पडलेली आहे. त्यांतील कांहीं विसरलीं गेलीं आहेत. लोकगीतांमधील मोड जोड अव्याहत चालत आलेली आहे. 'श्रुति' मध्यें असें सांपडत नाहीं म्हणून लोकगीतांना 'श्रुति काव्य' म्हणणें तितकेंसें उचित नाहीं असेंच म्हणावेसें वाटतें.

लोकगीतें कांहीं वेळां ' अक्षर वाङ्मय ' म्हणून ओळखलीं जातात. त्यांना ' अक्षर वाङ्मय ' म्हणण्याचें कारण असें दिलें जातें कीं या वाङ्मयांत जुन्या संस्कृत वाङ्मयाच्या पाठीशीं असलेलें ईश्वरप्रणीततेचें आवरण नाहीं, त्यांच्यांत गूढ पावित्र्याचें संरक्षण नाहीं, आणि लेखन-मुद्रणादि शक्तींचा वापर नाहीं. लोकगीतें आवडीनिवडीच्या नैसर्गिक चाळणींतून गळत गळत खालीं उतरलेलीं आहेत. म्हणून ती एक प्रकारें ' अक्षर वाङ्मय ' आहेत. लोकगीतें अलिखित असल्यामुळें त्यांत मुद्रणशक्तीचा प्रभाव पडलेला नाहीं हें स्पष्टच आहे. पण त्यांत ईश्वर-प्रणीतता नाहीं, पावित्र्य नाहीं हें म्हणणें पटण्यासारखें नाहीं. शिवाय काव्याची कसोटी केवळ ईश्वरप्रणीततेचें अवडंबर माजण्यावर किंवा पावित्र्याच्या चरपटपंजरीवर अवलंबून आहे असेंही म्हणतां येत नाहीं. काव्याची खरी कसोटी म्हणजे भावनांची उत्कटता. अंतःकरणाच्या उर्मी उफाळू लागल्या म्हणजे शब्दांचा बांधसुद्धां तोकडा पडतो. अंतःकरणाच्या उमाळ्यास शब्दांनीं करून दिलेली वाट, अंतःकरणाच्या उर्मींस शब्दांनीं घातलेला बांध म्हणजे काव्य. काव्याच्या या व्याख्येस लोकगीतें तंतोतंत उतरतात. म्हणून त्यांना ' अक्षर वाङ्मय ' म्हणून संबोधणें उचित होणार नाहीं.

लोकगीतांना स्त्री-वाङ्मयांत खेचण्याचें सहेतुक प्रयत्न पद्धतशीरपणें चालू असल्याचें प्रत्ययास येतें. असे प्रयत्न स्त्री व पुरुष या दोघां-कडूनही होत असल्याचें निदर्शनास येतें. साने गुरुजींनी लोकगीतांचा संग्रह प्रसिद्ध केला त्याला स्त्री-गीतें असें त्यांनीं नांव दिलें. असें नांव देण्यांत त्यांचा काय हेतु होता हें त्यांनीं कोठेंच स्पष्ट केलेलें नाहीं. स्त्री--गीतांचा संग्रह ' स्त्री-गीतें ' म्हणून प्रसिद्ध झाल्यास त्यांत अयोग्य असें कांहीं नाहीं. त्यामुळें पुरुषांनीं रचलेल्या गीतांच्या अस्तित्वास बाध येत नाहीं. कमलाबाई देशपांडे यांनींही लोकगीतांचा एक छोटासा संग्रह

प्रसिद्ध केला आहे आणि त्यात लोकगीतांच्या निरनिराळया अंगाउपांगांचा ऊहापोह केला आहे. या पुस्तकास त्यांनीं अपौरुषेय वाङ्मय अर्थात् स्त्री-गीतें असें नाव दिलें आहे. असें नाव देण्यास कोणाचाच विरोध नाहीं. साने गुरुजींनींही तसेंच नाव दिलेलें आहे. पण दोघांच्या नाव देण्यामध्यें फरक आहे. केवळ स्त्री-गीतांचा संग्रह म्हणून गुरुजींनीं स्त्री-गीतें नाव दिलें. पण कमलाबाई देशपांडे यांनीं स्त्रिया, पुरुष, मुलें यांच्या गाण्यांचा उल्लेख करूनही, त्यांचें अस्तित्व हिशेबांत घेण्यासारखें नाहीं असें निवेदलें आहे. एवढेंच नव्हे तर 'अपौरुषेय वाङ्मय' हेंच खरें वाङ्मय असें सिद्ध करण्याचा निरर्थक प्रयत्न केला आहे. आपल्या म्हणण्याच्या पुष्ट्यर्थ त्यांनीं पुरावा देण्याचा असा कांहीं आव आणला आहे कीं तें सगळें पाहून गमत वाटल्याशिवाय राहात नाहीं. लोकगीतांना 'अपौरुषेय वाङ्मय' लेखत असतांना त्यांनीं त्याची सोईस्कर व्याख्या केलेली आहे. ती व्याख्या अशी— स्त्रियांच्या जीवनावर आधारलेलें, स्त्रियांच्याकडून खेळ, सण, उत्सव इत्यादि प्रसंगीं उपयोगांत आणलें जाणारें, स्त्रियांच्या दृष्टीकोनांतून व प्रामुख्यानें स्त्रियांनीं रचलेलें वाङ्मय म्हणजे 'अपौरुषेय वाङ्मय'. ही व्याख्या सर्व दृष्टींनीं सदोष वाटते. कारण स्त्रियांच्या जीवनावर आधारलेलीं जशीं लोकगीतें आहेत, तशीं पुरुषांच्या जीवनावर आधारलेलींही स्वतंत्र लोकगीतें आहेतच. मोटेवरचीं गाणीं ही पुरुषांचींच गाणीं आहेत. मोठमोठ्या लग्नसमारंभांत पुरुष पुरण दळतांना गाणीं म्हणतात त्यांचाही पुरुष जीवनाशीं निकटचा संबंध येतो. स्त्रिया खेळ, सण, उत्सव वगैरे प्रसंगीं गाणीं म्हणतात तसें पुरुषही म्हणतात. धनत्रयोदशीचे अधल्या दिवशीं म्हणजे गायगोऱ्ह्याचे बारशीस गायीस ओवाळतांना जीं गाणीं म्हणतात तीं पुरुषांनींच रचलेलीं असतात. पोळयाच्या सणाचीं गाणींही पुरुषांनीं केलेलीं असतात. याशिवाय शाळू काढतांना म्हटल्या जाणाऱ्या भलऱ्या किंवा होडी हाकारतांना म्हटलीं जाणारीं गाणीं हीं स्त्री व पुरुष दोघांकडून सांधिक

पद्धतीनें म्हटलीं जातात. तेव्हां या गाण्यांची रचना फक्त स्त्रियाच करतात आणि पुरुष त्यांच्यामागें म्हणतात असें म्हणणें एककल्लीपणाचें व सत्यास सोडून होईल. बहीणभाऊ झोपाळयावर बसून ओव्या म्हणत असतां बहीणच त्यांची रचना करते व भाऊ नुसता घुम्यासारखा बसलेला असतो असें म्हणणें हास्यास्पद होय. या सर्व गोष्टीवरून स्पष्ट होतें कीं कमलाबाई देशपांडे यांचा दावा पटण्यासारखा नसल्यामुळें तो टिकतही नाहीं.

आपला दावा टिकणार नाहीं असा संशय आला म्हणूनच कीं काय त्यांनीं 'अपौरुषेय वाङ्मय' हा शब्द दुसऱ्या एका अर्थानें सार्थ आहे असें दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांचें म्हणणें असें कीं या वाङ्मयापैकीं प्रत्येक वाक्यसमूह, कडवें अगर ओवी कोणी गुंफली आहे हें कळणें शक्य नाहीं व म्हणून ज्या कृतीची निर्माती व्यक्ति म्हणजे पुरुष निश्चित नाहीं तें अपौरुषेय वाङ्मय होय. पण हाही प्रयत्न नुसता फोलच नव्हे तर पोरकटही वाटतो. त्यांच्याच शब्दांत एखाद्यानें उत्तर द्यावयाचें ठरविल्यास त्याला असें म्हणतां येईल कीं ज्या कृतीची निर्माती व्यक्ति निश्चित नाहीं तें पौरुषेय वाङ्मय धरावयास हरकत नाहीं.

लोकगीतें अपौरुषेय वाङ्मय आहे असें सिद्ध करण्याकरितां आणखी एक दाखला दिलेला आढळतो. 'स्त्रीजीवनविषयक वाङ्मयांत साहजिकच वीररसावर भर दिलेला नसणार. यावरूनही यास पुरुषार्थविरहीत व म्हणून अपौरुषेय असेंही विनोदानें म्हणावें तर!' लोकगीतांना विनोदानें अपौरुषेय वाङ्मय म्हणणें हा देखील एक मोठा विनोदच आहे. स्वजन व शत्रु यांना तोंड देऊन स्वतंत्र राज्य स्थापणारी ताराबाई, तळहातावर शीर घेऊन लढणारी चांदबिबी, इंग्रजासारख्या बलाढ्य शत्रुशीं सामना देऊन धारातीर्थीं पडणारी लक्ष्मीबाई अशीं वीर स्त्री रत्नें जगांत जन्मास आलीं असतां वीररसाशीं स्त्रियांची फारकत आहे हें म्हणणें चमत्कारिक वाटतें. वीरपुत्र प्रसवणारी माता वीर नसते, तिच्यांत वीर-

रसाचा मागमूस नसतो असें म्हणणें म्हणजे नुसतें संतति-शास्त्राविषयीं अज्ञान प्रकट करणेंच नव्हे तर जगरहाटीकडे कानाडोळा करण्यासारखें आहे. स्त्रियांना शिपाईबाणा आवडतो हें कितीतरी ओव्यांवरून दाखविता येण्यासारखें आहे. नवरा कसा आहे तें खालील ओळींत मोठ्या अभिमानानें सांगितलें आहे—

अंगात अंगरखा, वर कबजा हिरवागार
उभ पेठेला जमादार ।

नवऱ्याच्या शिकारीच्या छंदावरही स्त्री खुश असते—

वाघ मारीला वाघजळी ससा मारीला घोळुनी
घरधनी आलं शिकार खेळुनी ।

नवऱ्यानेंच नव्हे तर आपल्या मुलानेंही पराक्रम गाजवावा, जगांत नांव काढावें असें आईला वाटतें. आपली इच्छा पुरी करण्याकरितां ती मुलाला वीरत्वाचें वळण लावतें—

दुधाचा तांब्या, तुझ्या तालमीच्या खुणा
गोटी उचल पैलवाना ।

मुलाची भरदार छाती पाहून आईचा ऊर भरून येतो—

अंगुळीला पानी हंडा ठेवीते परसूदारीं
पैलवानाची रुंदी भारी ।

यावरून स्त्रियांच्या गाण्यांत वीररस नसतो हें म्हणणें लटकें आहे हें स्पष्ट होतें.

लोकगीतांना 'श्रुति काव्य' म्हणणें योग्य नाहीं, 'अक्षर वाङ्मय' म्हणणें पटत नाहीं, 'स्त्री वाङ्मय' म्हणणें उचित नाहीं, 'अपौरुषेय वाङमय' म्हणणें प्रशस्त नाहीं हें खरें. मग त्यांना म्हणायचें तरी काय? हा प्रश्न ओघानेंच येतो. या प्रश्नाचें उत्तर फार सोपें आहे. लोकगीतांना लोकगीतेंच म्हणणें अधिक योग्य आहे. 'लोक' या शब्दांत स्त्री व

पुरुष दोघांचाही अंतर्भाव होतो. स्त्री व पुरुष यांना जसें सुचलें तसें त्यांनीं रचलें आणि मग त्यांना जसें रुचलें तसें मनावर ठसलें असल्यामुळें या गीतांना लोकगीतें म्हणणें अधिक समर्पक आहे. स्त्रीपुरुषांपैकीं एखाद्यास जास्त काव्य स्फुरलें म्हणून दुसऱ्याचें अस्तित्वच न मानणें वेडेपणाचें आहे. मानवी जीवनांत स्त्री व पुरुष एकमेकांना पूरक आहेत. एकास सोडून दुसऱ्याचें जीवन समृद्ध होत नाहीं, पूर्ण होत नाहीं

लोकगीतांचें नांव जसें आपण निश्चित करून घेतलें तसा त्यांचा काल निश्चित करून घेणें आवश्यक आहे. लोकगीतांचा जन्मकाल ठरविणें अत्यावश्यक असलें तरी तें तितकेंच कठीण काम आहे. कारण लोकगीतें कांहीं विवक्षित व्यक्तींनीं रचलेलीं नाहींत कीं त्यांच्या जन्म-मृत्यूच्या नोंदीवरून लोकगीतांचा काल ठरवितां येईल. दुसरें असें कीं अमुक लोकगीत अगोदर रचलें व तमुक नंतर रचलें असेंही पुराव्याअभावीं हमखास छातीठोकपणें सांगतां येत नाहीं. केवळ लोकगीतांच्या संग्रहांत कांहीं लोकगीतें अगोदर छापिलीं व कांहीं मागाहून छापिलीं म्हणून त्यांच्या जन्मकालाचा शोध लागत नाहीं.

ठराविक लोकगीतांचा जन्मकाल शोधून काढणें अवघड काम असलें तरी सर्वसाधारण लोकगीतांचा जन्मकाल वर्तवतां येण्यासारखा आहे. लोकगीत म्हणजे अंत:करणाच्या उर्मी. ज्यावेळीं या उर्मी उफाळून तोंडावाटे बाहेर पडल्या तो लोकगीतांचा काल होय. आदि-मानवाच्या अंत:करणांतील उर्मींना प्रथम शब्दांची वाट न मिळतां सुरांचीही मिळालेली असेल. हे सुर म्हणजे आदिमानवाचीं लोकगीतें होत असें म्हणावयास कांहींच हरकत नाहीं.

आदिमानवाचें चित्रविचित्र आवाज लोकगीतें मानूनही आज जीं आपल्यापुढें लोकगीतें आहेत त्यांचा काल निश्चित करण्यास त्यामुळें मदत होत नाहीं. आपल्यापुढील लोकगीतांचा जन्मकाल म्हणजे मराठी

भाषेचा जन्मकाळ असें म्हटलें तर अस्थानी होणार नाहीं. आदिमानवाचे सुरांनीं जेव्हां मराठी शब्द उचलले तेव्हां मराठींतील लोकगीतें अस्तित्वांत आलीं. हा काल साधारणतः ज्ञानेश्वरापर्यंत न्यावयास हरकत नाहीं. याचा अर्थ असा नाहीं कीं आज जी आपणापुढें लोकगीतें आहेत तीं ज्ञानेश्वरापासून चालत आलेलीं आहेत. या लोकगीतांची भाषा पाहिली, त्यांची शब्दरचना अभ्यासली तर असे दिसून येईल कीं ती गेल्या शंभर-दीडशें वर्षांतील आहेत. हा शंभर-दीडशें वर्षांना काल बुद्धीला पटण्यासारखा आहे. आई मुलीस लोकगीत शिकविते, आजी नातीस शिकविते, पणजीही पणतीस शिकविणें अशक्य नाहीं. म्हणजे आजच्या संग्रहांतील लोकगीतें तीनचार पिढ्यांचीं जुनीं आहेत. शंभर वर्षांत तीन पिढ्या धरल्या तर हा काल शंभर-दीडशें वर्षांचा होतो. याचा अर्थ असा नाहीं कीं शंभर-दीडशें वर्षांपूर्वीं मराठींत लोकगीतें नव्हतीं. लोकगीतें होतीं. पण तीं कालाच्या उदरांत गडप झालीं एवढेंच.

लोकगीतें इतकीं जुनीं असतांना त्यांचा शालेय अभ्यासक्रमांत समावेश कां केला गेला हा प्रश्न कित्येकांना भेडसावण्यासारखा आहे, हें कोडें कित्येकांना पडण्यासारखें आहे. केवळ जुनें तें सोनें म्हणून तर त्यांचा समावेश अभ्यासक्रमांत केला गेला नाहीं ना ? अशी शंका त्यांच्या मनास चाटून जाण्याचा संभव आहे. पण अशी शंका घेणें योग्य होणार नाहीं. जुनें तें सोनें म्हणून नव्हें तर जुनें तें वाईट अशी भावना पाश्चिमात्य शिक्षण घेतलेल्या आधुनिक पिढींत मोठ्या प्रमाणांत निदर्शनास येते. अशी गैरसमजूत होऊं नये म्हणून लोकगीतांना अभ्यासक्रमांत स्थान मिळालें असण्याचा संभव आहे. आधुनिक पिढी जुन्या वाङ्मयाच्या अमोल ठेव्यास पारखी होऊं नये म्हणून लोकगीतांची ओळख तिला करून देण्याकरितां तीं शिकविण्याची तरतूद अभ्यासक्रमांत केलेली दिसते. अशी ओळख करून दिली तर ज्यांनीं लोकगीतें रचिलीं त्या पूर्वजांबद्दल

प्रचलित असलेले गैरसमज दूर होऊन त्यांच्याबद्दल आदरभाव निर्माण व्हावा, त्यांच्या कल्पकतेबद्दल अभिमान वाटावा, त्यांच्या अचाट कल्पनाशक्तीबद्दल कुतुहल वाटावें, त्यांच्या अफाट स्मरणशक्तीबद्दल कौतुक वाटावें, त्यांच्या काव्यविषयक गुणांनीं अंतःकरण भरून येवून छाती अभिमानानें पुढें यावी म्हणून लोकगीतांना शालेय अभ्यासक्रमांत स्थान दिलें असल्यास त्यांत विशेष नवल नाहीं.

लोकगीतांच्या अभ्यासानें जुन्यांची ओळख होते, पूर्वजांबद्दल आदरभाव उत्पन्न होतो ही गोष्ट निर्विवाद आहे. पण त्याबरोबरच जिवत काव्याची ओळख होते, हेंही तितकेंच खरें. या जिवंत काव्याचा अतर्भाव अभ्यासक्रमांत झाला नसता तर त्याच्या अमोल ठेव्यास आपण मुकलों असतो, एका महान् कलाकृतीस आपण अतरलों असतो. हें काव्य बोलभाषेंत लिहीलें गेल्यामुळें कांहीं जणांना या काव्यांत विशेष काय आहे असें वाटण्याचा संभव आहे. पण बोलभाषेंत तें लिहीलें गेल्यामुळें या काव्याची महति वाढली आहे. उत्कट भावना अतःकरणांत एकवटून काव्य स्फुरलें आणि तोंडावाटें तें सहजासहजीं बाहेर पडलें. हें लक्षणच मुळीं उत्कृष्ट काव्याची साक्ष देण्यास पुरें आहे. त्यांत बहुजनसमाजाचें अतःकरण पुरेपुर दिसतें. म्हणूनच तें त्याचें दैवत झालें आहे.

लोकगीतांच्या अभ्यासानें समाजदर्शन सहजासहजीं होतें लोकगीतें रचिलीं गेलीं त्यावेळीं समाजाची स्थिति कशी होती, त्याची आर्थिक परिस्थिति कशी होती, त्याची नैतिक कसोटी काय होती, त्याची भौतिक प्रगति किती होती, त्याच्या आशा, आकांक्षा काय होत्या ह्या सर्व गोष्टींचा परिचय लोकगीतांच्या अभ्यासानें विनासायास होतो. या परि-स्थितीशीं सद्य परिस्थितीची तुलना कळत न कळत होते आणि सध्यांच्या परिस्थितींत वैगुण्य आढळल्यास ते कोणत्या कारणामुळें आलें याचा तपास लावण्यास व त्यावर उपाय योजण्यास सवड मिळते. आज

आपण शेजारधर्मास विसरत चाललों आहोंत. पण पूर्वी शेजारी शेजाऱ्यावर उत्कट प्रेम करीत असल्याचें आढळून येतें.

शेजीचा शेजारू माझं अर्धे माहेरू
तिठ इवावा लिन भरू ।

जीवाला माझ्या जड, शेजी जिवाला माझ्या झाली
माझ्या वयाच्या आधीं आली ।

हें प्रेम इतकें अगाध होतें कीं सासुरवासणीस शेजार हें आपलें माहेर भासावयाचें आणि शेजारीण आईसारखी वाटावयाची.

बहीणभावामध्येंही निर्मळ प्रेमाचा झरा अखंड वाहात असे. चोळीबांगडी व्यतिरिक्त बहिणीची भावापासून दुसरी अपेक्षा नसे.

बंधुजी बोलती, बहिणा चौथाई घ्याया चला ।
चौथाई तुझी तुला, एक चोळीची आशा मला ।

बहीण भावाच्या प्रेमानें ओथंबलेल्या हजारों ओव्या या वाङ्मयांत आहेत. त्यांचा एकत्र संग्रह केला तर मोठा ग्रंथ होईल.

बहीणभावाच्या प्रेमाप्रमाणेंच आईचें मुलावरील अगाध प्रेम या काव्यांत दिसून येतें. मुलाशिवाय जगांत दुसरा अमोल ठेवा नाहीं असें आईस वाटे. मुलासाठीं जगायचें, मुलासाठीं मरायचें ही भावना त्यावेळीं फार मोठी होती. मुलाचं सुख पाहाणें हीच सर्वांची मुक्ति, हाच सर्वांचा मोक्ष वाटून त्याच्यावरून आपले पंचप्राण ओवाळून टाकण्याची त्यांची तयारी असे.

लेल्या लुगड्याची नार दिसती कळवतीण
जल्मा येऊनी न्हाई झाली बाळांतीण ।

लाख्या सावकार काय करावं लाखाला
पोटीं न्हाई पुत्रफळ, धन व्हईल लोकाला ।

देरे देवा मला, नकोत सोनहोन
मांडीवर देई इसाळ्याला तान्ह ।
देवाचा देवपाट फुलानं शोभिवंत
नार पुत्रान भाग्यवंत ।

अशा कितीतरी ओव्या दाखल्यादाखल देतां येतील. आई-मुलांचें पवित्र प्रेम जसें या वाङ्मयांत पदोपदीं आढळतें तसें नवराबायकोचेंही आढळतें. त्यांचा संसार सुखी होता. दोघेही एकमेकांना सुखी ठेवण्याचा प्रयत्न करीत. बायको तर नवऱ्यास देवाप्रमाणें मानून त्याच्याकरितां वाटेल तो स्वार्थत्याग करावयास तयार असे. तिचें नेहमीचें मागणें असे कीं,

सत्तेनारायना न्हाई मागत तुला काई
होशा भरताराला थोडी सपत, औक्ष लई ।
सकाळीं उठूनी जाते देवाच्या वाड्याला
औख मागते चुड्याला ।
अहेव मरनाची मला हाई आवड
म्होर पतीपुतं मागं कुकवाची कावड ।

असें मानाचें इच्छित मरण आलें नाहीं तर स्त्रियांची स्थिति फार केविलवाणी व्हावयाची. त्यांना उभें आयुष्य नीतिमत्तेनें कंठावें लागे. उभें आयुष्य त्यांना जीवाला जाळून काढावें लागे. आतडी पिळवटून काढणारे विधवेचे हे बोल पाहा—

रांडपण आलं कुन्या अशिलाची तान्ही
ल्वानी जळे दिव्यावाणी ।
आपुल्या भरताराचं स्वर्गी झालं सोन
माग बाईल, तुळशीचं वाळवण ।

आई-मुलगा, बहीण-भाऊ, नवरा-बायको वगैरेमधील परस्परसंबंध समाजाचें दर्शन घडविण्यास पुरेसे आहेत. पण कांहीं लेखकांना या

संबंधामुळें समाजदर्शन होत नाहीं असें वाटत असावें. म्हणून त्यांनीं समाजदर्शनाखालीं जाती-जमातीचे निर्बंध, शकुन-सकेत शेजारधर्म वगैरे-वरील ओव्या गोंवलेल्या आहेत. उदा०

जातीसाठीं माती, खावं गोतासाठीं खडं
पिता दौलती लौकिकाला चढ
देवाच्या देऊळांत किती उशीर उभी राहू
गुरवाच्या मुला आधीं कौल माझा लावू।
भरली तीनसांज दिवा लावावा सूनबाळ
लक्षुमीची झाली वेळ।

अशा ओव्यांनीं समाजाचें स्पष्ट दर्शन होण्यास मदत होते यांत बिलकूल संशय नाहीं पण एवढ्याच करितां कौटुंबिक ओव्यांपासून त्यांची फारकत करणें योग्य होणार नाहीं. कारण कौटुंबिक ओव्यांतूनही समाजदर्शन पदोपदीं होतच असतें. वास्तविक कुटुंबाशिवाय समाजाला स्वतंत्र असें अस्तित्व नाहीं. अनेक कुटुंबें मिळूनच समाज निर्माण होतो. तेव्हां कुटुंबांच्या चालीरीती, आशा, आकांक्षा याच समाजाच्या चालीरीती, आशा, आकांक्षा असतात. मानवाचें जीवन हेंच समाजाचें जीवन होत असल्यामुळें समाजदर्शन असा वेगळा खंड पाडणें बुद्धीला पटण्यासारखें नाहीं असें वाटतें.

लोकगीतांच्या अभ्यासानें मानवी जीवनाची ओळख होते, मानवी संस्कृतीची ओळख होते. ही संस्कृति महान् आहे, भव्य आहे, उदात्त आहे, पवित्र आहे असें प्रत्ययास येतें. या संस्कृतीचें संरक्षण करण्याकरितां, तिची जपणूक करण्याकरितां, तिचा अमोल ठेवा आपल्या वारसदारांना सुपूर्त करण्याकरितां लोकगीतांचा समावेश शालेय अभ्यासक्रमांत केला असल्यास योग्यच झाले असें म्हणावें लागेल.

शिक्षणतज्ज्ञांच्या मतानुसार लोकगीतांचा समावेश शालेय अभ्यासक्रमांत झाल्यामुळें शिक्षकांची जबाबदारी वाढली आहे. ही जबाबदारी

दुहेरी मार्गानें वाढली आहे. एक तर लोकगीत हें नवीन अधिक गीत म्हणून शिकवावें लागतें. इतर पद्यें शिकवावीं लागत त्यांत लोकगीतांची भर पडली. दुसरें असें कीं लोकगीत हा वाङ्मयांतील जरासा वेगळा प्रकार असल्यामुळें आणि त्याचा शालेय अभ्यासक्रमांत नव्यानेंच समावेश झाल्यामुळें त्याच्या पाठ-पद्धतीची कल्पना शिक्षकास नाहीं. लोकगीताच्या पाठ-पद्धतीची संपूर्ण कल्पना शिक्षकांनाच नव्हे तर त्यांना शिक्षक बनविणाऱ्या प्राध्यापकांनाही नाहीं, असे अनेक ठिकाणीं प्रत्ययास येतें. प्रायमरी ट्रेनिंग कॉलेजमधील प्राध्यापक आणि त्यांच्या हाताखालीं शिक्षण घेत असलेल्या शिक्षकांची ही परिस्थिति तर ज्यांना प्राथमिक शिक्षणाचा गंधही नाहीं, लोकगीतांची कल्पना नाहीं अशा सेकंडरी ट्रेनिंग कॉलेजमधील प्राध्यापक व त्यांचे पदवीधर विद्यार्थीगण यांची काय शोचनीय स्थिति असेल याची कल्पनाच केलेली बरी.

कोणत्याही नवीन गोष्टीविषयीं कल्पना नसल्यामुळें तिचा बाऊ वाटणें साहजिक आहे. तसा लोकगीतांविषयींही वाटणें नैसर्गिक आहे. पण तसें भिण्याचें कांहीं कारण नाहीं. लोकगीताची पाठ-पद्धति अगदीं सोपी आहे. इतर पद्य-पाठाप्रमाणें लोकगीताच्या पाठाची प्रस्तावना विषयाला पोषक असे प्रश्न विचारून योग्य असें वातावरण निर्माण करण्याकरितां करावयाची असते प्रस्तावना झाल्यानतर लगेच हेतुकथन करावयाचें असतें. हेतुकथन झाल्यानंतर शिक्षकानें गोड गळयावर लोकगीत म्हणावयास आरंभ करावयास पाहिजे. गोड गळयावर लोकगीत म्हणण्यापूर्वी एक गोष्ट शिक्षकानें ध्यानांत ठेविली पाहिजे. ती ही कीं लोकगीताला जी चाल लावावयाची ती आधुनिक, आकर्षक चालीपैकीं न लावतां नेहमींच्या रिवाजाची लावावयाची. प्रत्येक लोकगीताला स्वत:ची चाल असते. ती सर्वसंमत झालेली असते. कोणीही तें लोकगीत म्हटलें, कोठेंही तें म्हटलें, केव्हांही तें म्हटलें तरी त्याच्या विवक्षित चालींवरच तें म्हटलें जातें. लोकगीतास अशी विवक्षित चाल असल्यानतर तें म्हणत असतांना त्यांतील

रसवृद्धि होण्यास मदत होते दुसरी स्वतंत्र चाल लावल्यास रसहानी होण्याचा मोठा धोका असतो. इ. १ व २ सारख्या अगदीं खालचें वर्गांत शिकविण्यांत येणाऱ्या लोकगीतांत कृतीला महत्त्व असतें. तेव्हां शिक्षक लोकगीत गात असतां त्यानें योग्य अशी कृतीही करावयास पाहिजे. शिक्षक कृती करून लोकगीत म्हणत असतां मुलांच्या पुढें लोकगीताचा छापील मजकूर ठेवण्याची जरूरी नाहीं. कारण मुलांना अद्याप नीटसें वाचतांही येत नसतें. ज्यांना वाचतां येतें अशा मुलांच्या पुढें देखील लोकगीत ठेवूं नये. तसें तें ठेवल्यास कृतीकडे त्यांचें दुर्लक्ष होतें

एकदां लोकगीत म्हणून झाल्यावर शिक्षकानें पुन्हां एकदां त्याच चालीवर तीच कृति करून तें म्हणावें. पहिल्या वेळीं लोकगीत म्हणण्यांत त्याची मुलांना ओळख करून देण्याचा उद्देश असतो दुसऱ्या वेळीं लोकगीत म्हणावयाचें तें त्याची चाल व कृति मुलांच्या मनावर बिंब-विण्याकरितां, त्यांच्या अंतःकरणावर ठसविण्याकरितां, अशा तऱ्हेनें दोन वेळां लोकगीत म्हणून झाल्यानंतर तें तिसऱ्यांदा मुलांनीं शिक्षकाचे मदतीनें म्हणावयाचें असतें. शिक्षकानें तें पुढें म्हणावयाचें व मुलांनीं त्याच्यामागें म्हणावयाचें आणि शिक्षक करील तशी कृति करावयाची. यानंतर मुलांना स्वतंत्रपणें कृति बिनचूक करतां येते कीं नाहीं हें पाहाण्याकरितां शिक्षकाचें मदतीशिवाय त्यांनीं तें पुन्हां म्हणावयाचें असतें. यावेळीं मुलांच्या होणाऱ्या चुका शिक्षकानें सुधारावयाच्या असतात. त्यानंतर पुन्हां एकदां विद्यार्थ्यांनीं स्वतंत्रपणें कृति करून लोकगीत म्हणावयाचें असतें. लोकगीताचें शेवटचें गायन त्याच्या रसग्रहणाकरितां असतें. अशा तऱ्हेनें शिक्षक व मुलांचें मिळून लोकगीतांचें गायन पांच वेळां होतें. कृतियुक्त लोक-गीतांच्या पाठांत मुलांना प्रश्न विचारण्याची जरूरी नाहीं. कारण लोक-गीत सोपें असतें व त्याची कृति मुलांकडून करून घेतली जाते. प्रत्यक्ष कृति मुलांकडून करून घेतल्यानंतर त्यावर प्रश्न विचारणें अप्रयोजक आहे. ज्या लोकगीतांमध्ये कृति नाहीं व जीं वरच्या वर्गांना शिकवावयाचीं

असतात त्यावर चारदोन प्रश्न विचारण्यास हरकत नाहीं. लोकगीत सोप्या बोलभाषेंत असल्यामुळें फार प्रश्न विचारण्याची जरूरीच पडत नाहीं.

वर्गांत एकूण पांच वेळां लोकगीत कृतिसहित म्हटलें जात असल्यामुळें कृति चांगली घटते व मुलांचें तें गीत जवळ जवळ पाठ होतें. तेव्हां आई, भाऊ, बहीण यांना घरीं लोकगीत म्हणून दाखवा असा गृहपाठ देणें अयोग्य ठरणार नाहीं. दुसऱ्या तऱ्हेचा गृहपाठ देणें योग्य होणार नाहीं. कारण तो औचित्यास सोडून होण्याचा संभव आहे.

लोकगीताच्या पाठपद्धतीचा खुलासा उदाहरण देऊन करतां येण्यासारखा आहे. समजा तुम्हाला—

आपडी थापडी
गुळाची पापडी
धम्मक लाडू
तेल पाडू
तेलणीचें एकच पान
दोन्ही हाती धरले कान ॥
च्याऊ म्याऊ
पितळेचं पाणी पिऊं
हांडा पाणी गडप ॥

हें लोकगीत शिकवावयाचें आहे. या लोकगीताच्या पाठाची प्रस्तावना मुलांच्या पूर्वज्ञानावरून करतां येईल. यापूर्वी मुलें ' येरे येरे पावसा, तुला देतो पैसा ' हें लोकगीत शिकलेलीं असतात. तेव्हां योग्य ते प्रश्न विचारून झाल्यावर शिक्षकानें हें गीत प्रथम कृति करून म्हणून दाखवावें. आणि नतर नवीन शिकवावयाचें ' आपडी थापडी ' हें गीत वर विवेचन केल्याप्रमाणें एकूण पांच वेळां म्हटलें म्हणजे झालें.

लोकगीतांच्या कृतिविषयीं दोन गोष्टी लक्षांत ठेवणें अत्यावश्यक आहे. लोकगीत म्हणत असतां सर्व मुलांची कृति एकदम होते कीं नाहीं,

एका गाण्याची होते कीं नाहीं हें शिक्षकानें पाहिलें पाहिजे. आणि तशी करण्याची धडपड त्यानें केली पाहिजे. दुसरी महत्त्वाची गोष्ट अशी कीं लोकगीताची कृति योग्य असली पाहिजे. कृति योग्य कीं अयोग्य आहे हें ठरवितांना लोकगीताच्या अर्थास ती जुळते कीं नाहीं हें बघावयाचें कारण नाहीं. लोकगीताबरोबर पिढ्यान् पिढ्या चालत आलेली कृतीच केली पाहिजे. मग ती त्याच्या अर्थास जुळो अगर न जुळो. पण ही महत्त्वाची गोष्ट बहुतेक शिक्षक विसरतात आणि आपणास हवी तशी नवीन कृति लोकगीतास चिकटवून रसहानी करतात. उदाहरणच घ्याव-याचें झाल्यास ' येरे येरे पावसा ' या गाण्याचें घेतां येईल. हें गाणें म्हणत असतां मुलें स्वत.भोंवतीं गाड्या गाड्या भिंगोऱ्या करीत असतांना जसें फिरतात तसें फिरत असतात. हें शिक्षकांसहित सर्वांना माहीत असूनही शिक्षक मुलांना वर्गांत तसें फिरण्यास सांगण्याऐवजीं पावसाला हातानें खूण करून बोलवावयास सांगतो. ही चूक केवळ शिक्षकाचीच होते असें नाहीं तर मोठमोठ्या विद्वान् शिक्षण तज्ज्ञांचीही होण्याचा संभव असतो. श्री. घाटे अन्यांच्या 'अरूणवाचन' मालेमधील पहिल्या पुस्तकांत ' आपडी थापडी ' चें चित्र दिलें आहे. त्यांत मुलें आपडी थापडी करीत असतांना स्वत:चे हात एकमेकांवर मारतात व स्वत:चेच कान पकडतात असें दाखविलें आहे. 'आपडी थापडी' खेळतांना एकापेक्षा अधिक मुलें असावीं लागतात व ती एकमेकांच्या हातांवर आपडी थापडी करून एकमेकांचे कान धरतात हें सर्वांना माहीत आहे. असें असूनही अशा चुकीच्या कृतीचें चित्र दिलें गेलें, याचा अर्थ सरळ आहे. शाळे-मध्यें घरच्यापेक्षां वेगळें शिकवावयाचें असतें अशी तरी शिक्षकाची कल्पना होत असली पाहिजे किंवा तो जीवनाकडे आंधळेपणानें पहात असला पाहिजे. शिक्षण जीवनावर आधारलेलें असल्यामुळें शिक्षकानें जीवन-शिक्षणाचे धागे डोळसपणें सांधले पाहिजेत हें सर्वांनीं ओळखलें पाहिजे.

# ७. अभिनय-गीत व त्याची पाठपद्धति

शालेय अभ्यासक्रमांत लोकगीतांबरोबर अभिनय-गीतांचाही समावेश केलेला आहे. अभिनय गीतें खालचे वर्गांत शिकवावयाचीं आहेत. अनुभवावरून असें स्पष्ट म्हणतां येईल कीं अभिनय-गीतांचा प्रयोग शाळेमध्यें यशस्वी झाला असून मुलांना तो प्रिय वाटतो. एवढेंच नव्हे तर लोकगीतांपेक्षा कांकणभर अधिक गोडी मुलांना अभिनय-गीतांची लागलेली दिसते.

या गोडीचीं कारणें अनेक आहेत. तीं सर्व कारणें अभिनय गीतांच्या शिक्षण हेतुस पुरक अशींच आहेत. मुलें कृतिप्रिय असतात. अभिनय गीतांमध्यें कृतीस प्राधान्य असल्यामुळें व ही कृति मुलांना करावी लागत असल्यामुळें तीं त्यावर बेहद्द खुश असतात. या गीतांमध्यें मुलांचे हातापायांचे चाळयास वाव मिळतो, त्यांच्या हातवाऱ्यास मुभा मिळते, त्यांच्या शरीराच्या अवयवाच्या हालचालीस संधि मिळते. त्यामुळें मुलांच्या कृति-प्रवृत्तीस हीं गीतें एक प्रकारचें खाद्यच पुरवितात. अशा नैसर्गिक परिस्थितीचा परिपोष या गीतांच्या शिक्षणानें होत असल्यामुळें मुलें या गीतांत दगून जातात, रमून जातात, रंगून जातात.

अभिनय गीतांची कृति त्यांतील मतलबावर आधारलेली असते. त्यांतील मजकुराला पोषक असते. त्याच्या अर्थाला साजेशी असते. अभिनय-गीतांमधील कृति सार्थ असल्यामुळें मुलांना त्याचा अर्थ सहजासहजीं कळतो, चटकन समजतो, विनासायास कळतो.

मुलें अनुकरणप्रिय असतात. आजुबाजूच्या जगाचा परिचय त्यांना मोठमोठ्या माणसाकडून करून घेतां येतो. भाषादेखील तीं अनुकरणानेंच शिकत असतात. नवे नवे शब्द त्यांना प्रत्यक्ष वस्तुदर्शनानेंच शिकतां येतात. आपण बाळाला गाय दाखवतो व 'ती बघ हम्मा' असें म्हणतो; त्याचप्रमाणें चिऊकाऊही दाखवितो. वस्तु पाहिल्यामुळें

शब्दांचा व वस्तुंचा अन्योन्य संबंध तीं मनात जोडतात व त्यांच्या मनावर या शब्दांचा ठसा उमटला जातो. अशाच प्रकारें निरनिराळ्या क्रिया करवून घेऊन वा वेगवेगळे आवाज काढून आपण मुलांची शब्दसंपत्ति वाढवित असतो 'म्यॉऊ' 'म्यॉऊ' करणारी ती माऊ, 'हम्मा' करून ओरडणारी ती गाय 'झुक झुक' करणारी ती आगगाडी, अन् 'पों पों' आवाज करणारी ती मोटार असें ज्ञान मुलांना होत असतें. बालवयात कृतीस महत्व असल्यामुळें मुलांना द्यावयाचें ज्ञान कृतियुक्त गाण्यांतून दिलें तर तें अधिक परिणामकारक ठरतें अशा गाण्यांमुळें त्यांना नवीन क्रिया, नवीन शब्द, यांचें ज्ञान होऊन 'त्यांच्या जगाचा' विस्तार वाढतो. 'काठीचा घोडा करूनि, घोडा माझा चालवितो' या काठीच्या गाण्यात मुलांना काठीची पूर्ण माहिती मिळते, तिचा उपयोग समजतो. काठीचा घोडा तीं करीत असल्यामुळें त्यांची कल्पनाशक्ति वाढते, काठीवर ऐटींत बसत असल्यामुळें घोड्यावर बसण्याची त्यांची हौस फिटते.

अभिनय-गीतें म्हणत असतांना मुलांना वस्तुज्ञान तर होतेंच पण त्याबरोबरच त्यांचें मनोरंजनही होतें. म्हणून अभिनय गीतें मनोरंजक निवडलीं पाहिजेत. अभिनय-गीतांमुळें मुलांचें भरपूर मनोरंजन होऊन त्यांचा मनोविकासही होतो.

कृतिप्रियतेला आणि क्रीडाप्रियतेला वाव देणें हा अभिनय-गीतें शिकविण्याचा हेतु असला तरी त्यांचा नीट अर्थ समजून घेतला पाहिजे. समजा 'हातीं काठी मी घेतो, बंदूक छान तिची करतो' ही कविता मुलें म्हणत आहेत. यावेळीं सर्व मुलांनीं शिस्तींत ताठ उभें रहायला हवें व बगलेंत बंदूक धरून नेम धरण्यासाठीं विशिष्ट पद्धतीनें एक गुडघा टेकून बसलें पाहिजे. त्यांच्या सर्व हावभावांत एक प्रकारची प्रमाणबद्धता यायला पाहिजे व हालचाली रेखीव व्हावयास पाहिजेत. असें झालें तरच अभिनय-गीत शिकविण्याचा हेतु साध्य झाल्यासारखें होईल.

नाहींतर ' बंदूक छान तिची करतो ' असें मुलांनीं तोंडानीं गायचें अन् एकमेकांवर लाठीचे वार करण्यास पुढें सरसावयाचें. असली बेशिस्त कृतिप्रियता टाळून मुलांना योग्य व रेखीव हालचाली शिकविल्या पाहिजेत.

साधें गीत म्हणतांनासुद्धां मुलांच्या नाभीपासून तो मुखापर्यंतच्या स्नायूंना एक तऱ्हेचा व्यायाम होत असतो, मग तेंच गीत साभिनय म्हटलें तर उत्कृष्ट प्रकारचा व्यायाम त्यांना सहज होतो हें वेगळें सांगण्याची आवश्यकता नाहीं. शरीराच्या निरनिराळ्या हालचालींमुळें त्यांना सहजगत्या व्यायाम होतो, त्यांचें शरीर सुडौल होतें, त्यांच्यांत चापल्य येतें. अभिनय-गीतामुळें मुलांच्या मनोविकासाबरोबरच यांचें शरीर-संवर्धनही आपोआप होतें. प्रत्यक्षांत असें घडत असलें तरी अभिनय-गीत शिक्षणाचा मुख्य हेतु शरीर-सवर्धन करणें असा नाहीं यांची खूणगांठ बांधली पाहिजे. इतर पद्याप्रमाणें अभिनय-गीत शिक्षणाचा मुख्य हेतु आल्हाद-दानच आहे, आणि म्हणून तो तसाच राहिला पाहिजे.

अभिनय-गीताच्या गोडीचीं कारणें आपण पाहिलीं, त्यांच्या शिक्षण हेतुचा आपण विचार केला. अभिनय गीताच्या शिक्षणाचें हेतु शाळेंत साध्य झाले पाहिजेत असेंच कोणी म्हणेल. पण प्रत्यक्षांत हे हेतु साध्य न होतां अभिनय गीतांच्या शिक्षणानें मुलांना बेशिस्त वळण लागत असल्याचें अनुभवास येतें. या गीतांचा पाठ चालू असतांना मुलें एवढ्या मोठ्यानें ओरडतात, मागेंपुढें म्हणतात, कसे तरी हातवारे करतात कीं वर्गाला एखाद्या मासळी बाजाराचें स्वरूप प्राप्त होतें. असें झालें म्हणजे शिक्षकाला वर्गांत राहाणें असह्य होतें. यांत आपला कांहीं दोष आहे असें उमगण्याऐवजीं तो इतरांनाच त्याबद्दल दोष देऊं लागतो.

अभिनय-गीतांच्या पाठाचा असा बोजवारा मुख्यतः शिक्षकाच्या पाठपद्धतीविषयींच्या अज्ञानामुळें उडतो. अभिनय-गीताची पाठपद्धति कांहीं वेगळी आहे, निदान तशी असावयास पाहिजे याचा विचार न

करतां तो घोपटमार्गाची, सर्व साधारण पद्याची पाठपद्धति अमलात आणतो. अभिनय-गीताच्या पाठांत अपयश येण्याचें यापेक्षाही मोठें कारण दुसरेंच आहे. तें म्हणजे अभिनय-गीतांची चुकीची निवड सारासार विचार न करितां शिक्षक कोठलें तरी गीत निवडतो व मुलांना कृति करण्यास भाग पडतो. या गीताची निवड करतांना हमखास होणारी चूक म्हणजे निसर्गावरील वर्णनात्मक कवितेची निवड. अशा कवितेमध्यें कृतीस विशेष वाव नसल्यामुळें मुलें कांहीं तरी हातवारे करून कृति केल्याचें समाधान मानतात व शिक्षकही अभिनय-गीत शिकविल्याचा सुस्कारा टाकतात.

यावरून अभिनय-गीताची योग्य निवड करणें हें अतिशय महत्त्वाचें काम शिक्षकानें प्रथम करावयास पाहिजे याबद्दल दुमत होण्याचें कारण नाहीं. ही निवड करतांना कांहीं नियम पाळावे लागतात, मुलांच्या आवडी निवडी लक्षांत घ्याव्या लागतात, त्यांचें मन व स्वभाव ओळखावें लागतें. मुलांच्या आवडी निवडी, मन, स्वभाव वगैरे चोखंदळपणें समजून घेतल्यानंतर त्यांना अनुसरून लोकगीताची निवड करावी. परिचित वस्तुंचा माणसाचें मनावर परिणाम होतो, मुलांचें मनावर तर त्यांचा चांगलाच परिणाम होतो. परिचित वस्तुकडे मुलें आकर्षिलीं जातात, त्यांच्याशीं खेळतात, कुजबुजू लागतात. तेव्हां अशा परिचित वस्तुवरील कविता अभिनय-गीताच्या पाठांकरितां निवडणें फायद्याचें होतें. काठी, चेंडु, पतग, मोटार, आगगाडी, विमान, विटीदाडू, यांवर कित्येक कविता आहेत. काठीचें खालील गाणें अभिनय-गीत म्हणून शिकविण्याकरितां योग्य आहे.

हातीं काठी आमुची छान
सगळे मिळून गातो गान
पायांमधी काठी धरतो
हाताचा चाबूक करूनी
घोडा माझा पळवितो ॥१॥

काठीचा केवळ घोडाच करतां येतो असें नाहीं, तर तिचा उपयोग निशाणाच्या काठीस बंदुक म्हणून व होडीसारखाही करतां येतो. कसें तें पाहा —

हातीं काठी ही घेतो
निशाण बघ मी करतो
लढाईसाठीं मी जातो
गर गर काठी फिरवितो ॥
हातीं काठी ही घेतो
शिपाई दादा मी बनतो
दोघांची जोडी करुनी
ऐटींत ऐसे चालतो ॥
हातीं काठी ही धरतो
होडी छान तिची करतो
पाणी कापून ऐटीनें
होडीनें गांवीं जातो ।

याचप्रमाणें—

आम्ही पतंग हा उडवूं
भर भर भर भर
वर वर वर वर
पतंग हा उडवूं ।

किंवा

आम्ही उडवूं चेंडूला
वर वर फेकून
सरकन झेलून
घेऊं चेंडूला

अशीं निरनिराळया वस्तुवरील किती तरी गीतें आपणास निवडतां येतील. मुलींच्या बाबतींत तर अशा गीतांचा सुकाळच आहे. विशेषतः बाहुलीवरील गीतें इतकीं अगणित व वैचित्र्यांनीं भरलेलीं आहेत कीं त्यास सुमार नाहीं. खालील कांहीं गीतें माझ्या म्हणण्यास दुजोराच देतील. हें बाहुलीचें वर्णन पाहा—

लहान माझी भावली
तिची मोठी सावली
घारे डोळे फिरविते
नकटें नाक उडविते
दांत कांहीं घाशीत नाहीं
तोंड कांहीं धूत नाहीं...... वगैरे

किंवा

या बाई या बघा बघा माझी बसली बया
ऐकूं न येते इकू इकूं अशी माझी छबी बोलते
डोळे फिरविते टुलु टुलु कशी माझी सोनी बघते
बघा बघा तें गुलु गुलु गालांतच कशी हसते
मला वाटतें हिला बाई सारें कांहीं सारें कळतें
वगैरे

बाहुलीचा रूसवा किती कठीण असतो तें पाहा—

शहाणी माझी बाहुली
सुंदर परकर नेसली
चोळी आणु कां तुला निळी
रूसली बघ ग सोनुली ॥१॥
खाऊ हवा कां तुला गडे
जिलेबी लाडू वा पेढे

धरिसी अबोला का छबडे
रुसली बघ ग सोनुली ॥२॥
लिंब लोण ग आणा कुणी
ओवाळून टाकू या क्षणीं
कुणी ग पायी मेल्यांनीं
दृष्ट हिला ग लाविली ॥३॥

असाच दुसऱ्या बाहुलीचा रुसवा काढतां काढतां नाकीं कसे नऊ येतात तें पाहा—

बोलत कां नाहीं । अजि बोलत का नाहीं ।
चोळी परकर नवीन केले
दागदागिने सर्वही दिधले
दिले सर्व कांहीं
तरी तू बोलत कां नाहीं ॥

मुलें जात्याच अनुकरणप्रिय असतात. त्यांना वस्तुवरील गाणीं कांहीं काल आनंद देतात. पण जसजसें त्यांचें वय वाढतें तसतसें त्या वस्तुची स्वतः नक्कल करण्यांत त्यांना मजा वाटते. निर्जीव वस्तुची नक्कल करीत असतांना कांहीं माणसांची नक्कल करण्याचाही त्यांना मोह होतो. अशा नक्कलेस ज्या गाण्यांत वाव आहे अशी गाणीं मुलांना फार आवडतात. खालील गाणें या प्रकारांत मोडतें—

चला सुटी झाली आतां खूप खूप खेळायचें
मी मोटारवाला, तुम्ही गांवा चला
मी पैसे घेऊन बसवायचें, मी पों पों करीत फिरवायचें ॥१॥
मी बनेन इंजिन, सिटी जोरांत फुंकीन
तुम्ही सर्वांनीं डबे बनायचे । तुम्ही ओळींत मागून चालायचे ॥२॥
मी बनेन चोर, तुम्ही शिपाई स्वार
मी लपून छपून निसटायचें । तुम्ही शोधून मला काढायचें ॥३॥

मी होईन भट, पोथी सांगेन झट
तुम्ही मलाच तूप वाढायचें । मी तट्ट फुगून चालायचें ॥४॥

किंवा

गवळी आमुचा रोज कसा
धार दुधाची काढीतसे
चुळ चुळ चुळ ।
धोबी आमुचा रोज कसा
धू धू धू धू धूत असे
धप धप धप ।
मोटारवाला रोज कसा
पंप भराभर मारीतसे
सू सू सूं ।

हेंहीं गाणें मुलांची नकलेची हौस पुरविण्यात समर्थ आहे.

नकल करतांना मुलें ज्यांची नकल करतात त्यांच्याशीं अगदीं समरस होतात, त्यांच्या भावनांशीं तन्मय होतात; त्यांच्या कृतीशीं तादात्म्य पावतात. जणूं कांहीं तीं स्वतःच तशीं आहेत हें दाखविण्याचा प्रयत्न करतात. यांत त्यांच्या आयुष्यांतील आशाआकांक्षांचें प्रतिबिंबही पडल्याचा क्वचित् भास होईल. अशा तऱ्हेनें पुढील संसाराची तयारी खेळांत दिसून येते. या तयारींत मुलांपेक्षां मुली आघाडीवर असल्याचें दिसून येतें. खालील गाणें या विधानाचा पुरावा घेण्यासारखें आहे—

या चला ग, या चला ग, खेळूं या खेळा
गाणें गाऊन तसें करू या सुटली हो शाळा ॥धृ०॥

१ ली मुलगी
रहाट ओढुनी काढीन पाणी
घागर घेता अशी ओढुणी
डोकीवरती घागर घेऊनी
ऐटीनें चाला ॥१॥

२ री मुलगी　　माळीन होईन भाजीवाली
सर्व दणाणून सोडीन आळी
कांदे, बटाटे, कोथिंबीर घ्या
हा भाजीपाला ।

३ री मुलगी　　शिक्षकीन मी होईन बाई
शाळेची मज सदाच घाई
ऐटींत जाईन तशीच येईन
शिकवीन तुम्हाला ।

अभिनय गीताची निवड करतांना त्यांतील शब्द माधुर्याकडे लक्ष देणें आवश्यक आहे. शब्दांच्या विविक्षित उच्चारानें मुलांना मोहिनी पडते. त्यांच्या विशिष्ट अर्थानें तीं खुलतात. त्यांच्या नादमाधुर्यानें तीं भुलून जातात. असें झालें म्हणजे गीत वरचेवर म्हणण्याचा त्यांना अनावर मोह होतो, त्यांतील कृति करण्याचा ते ध्यास घेतात आणि ती बरोबर वठविण्याचा कसोशीनें प्रयत्न करतात. त्यामुळें त्यांचें गीत सहजासहजीं पाठ होते आणि पाठ सर्व बाजूनीं यशस्वी होतो.

अशा तऱ्हेचीं अभिनय गीतें मराठींत कांहीं कमी नाहींत. लेखकांचें लक्ष बाल-वाङ्मयाकडे वेधल्यानें आतां अशीं गीतें मोठ्या प्रमाणात निर्माण होत आहेत. पण सध्यां आहेत त्या गीतांमध्यें खालील सारखीं गीतें निवडून तीं शिकविल्यास आपला कार्यभाग होण्यास हरकत नाहीं.

गाडी आली गाडी आली　　झुक झुक झुक
शीट कशी वाजे बघ　　कुक कुक कुक
इंजिनाचा धूर निघे　　भक् भक् भक्
चाकें पाहूं तपासून　　ठक ठक ठक
जायचें कां दूर कोठें　　भूर भूर भूर
कोठेंही नेऊं तेथें　　दूर दूर दूर

गाडीमध्यें बसा चला — पट पट पट
सामानही ठेवा सारे — चट चट चट
गाडीचीही घंटा वाजे — घण घण घण
नका बघू डोकावून — झुक झुक झुक
गाडी आतां निघालीच — झुक झुक झुक

गीत म्हटलें कीं गेयता आलीच. तेव्हां अभिनयगीत जे निवडावयाचें तें गातां येण्यासारखें असलें पाहिजे. गाणें शास्त्रीय तालसुरांत म्हणतां यायला पाहिजे असें मात्र नाहीं. तें गोड गळयावर म्हणतां आलें म्हणजे पुरें. बाळगोपाळापासून तो वृद्धापर्यंत सर्वांनाच गाण्याची मोहिनी पडते. तान्हुला बाळ अंगाई गीत ऐकत आईच्या कुशींत झोपी जातो तर देवाला आळविण्यासाठीं गायिलेल्या अभंगानें वृद्धांची ब्रह्मानंदीं टाळी लागते अशी आहे गायनाची थोरवी. ल ल ल ला सारखीं निरर्थक गीतें मुलें आळवतात तीं केवळ गेयतेमुळें, त्यांतील नादमाधुर्यामुळें. हीच त्यांची नादलुब्धता अभिनय गीतांनीं भागविली पाहिजे. हीच त्यांची गानप्रियता त्यांनीं भागविली पाहिजे. या गेयतेची तहान भागविण्याकरितां वाटेल तशा मुलांना न झेपणाऱ्या चाली मात्र अभिनय गीतांना लावू नयेत. लीलेनें म्हणतां येण्यासारख्या सोप्या पण आकर्षक चाली लावाव्यात. सिनेमासृष्टींतील गाण्यांनीं अशा चाली लावणें सोपें केलें आहे. त्यांतील चालींचा पुरेपूर उपयोग केला पाहिजे.

अशा तऱ्हेनें अभिनय-गीतांची योग्य निवड झाल्यानंतर त्याचा पाठ अधिकांत अधिक उठावदार करण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. अभिनय-गीताची पाठपद्धति व पद्य-पाठाची पद्धति यामध्यें फार फरक आहे. अभिनय-गीताची पाठपद्धति अगदीं वेगळी आहे ही पाठपद्धति सर्वसाधारण पद्य-पाठ-पद्धतीपेक्षां निराळी असली तरी तिचें लोकगीताच्या पाठपद्धतीशीं बरेंच साम्य आहे. अभिनय-गीताच्या प्रस्तावनेंत व इतर

पद्यपाठांच्या प्रस्तावनेंत काहीं फरक नाहीं. प्रस्तावना सर्वप्रकारच्या पद्यपाठांत सारखीच असते. ती सर्व ठिकाणीं पद्यांतील वातावरणास पोषक असें वातावरण वर्गांत निर्माण करून करावयाची असते. तशी अभिनय-गीताच्या पाठांतही करावयाची असते. हेतुकथनही सर्व पद्य-पाठांत सारखेंच करावयाचें असतें हेतुकथन झाल्यानंतर शिक्षकानें अभिनय-गीत योग्य तें हावभाव करून आकर्षक चालीवर लागोपाठ दोन वेळां म्हणावयाचें असतें. पहिल्या वेळीं गाणें म्हणण्याचा उद्देश गाण्याची चाल व त्यांतील कृति यांची ओळख मुलांना ओळख करून देण्याचा असतो. दुसऱ्या वेळीं गाणें म्हणतांना याच गोष्टी मुलांच्या मनावर बिंब-विण्याच्या, त्यांच्या अंतःकरणावर ठसविण्याच्या असतात असे दोन निरनिराळे हेतु दोन वेळां गाणं म्हणण्यांत असल्यामुळें दोन्हीही वेळीं गाणें म्हटलें जात असतांना पुस्तकें मिटलेलीं असलीं पाहिजेत.

शिक्षकानें दोन वेळां गीत म्हटल्यानंतर मुलांना तें शिक्षकाचे मदतीनें कृति करून पुन्हां म्हणावयाचें असतें. यावेळीं शिक्षकानें व मुलांनीं दोघांनींही कृति केली पाहिजे. शिक्षकानें अगोदर म्हणून नंतर तें मुलांनीं म्हटलें पाहिजे. यावेळीं शिकविली गेलेली कृति व चाल मुलांनीं कितपत उचलली हें पाहाण्याकरितां पुन्हां एकदां तें गीत मुलांना म्हणावयास लावावें. यावेळीं मुलांनीं तें स्वतंत्रपणें म्हणावें. शिक्षकानें म्हणण्यास मदत करूं नये. गीताच्या चालींत किंवा कृतींत मुलांची चूक झाल्यास ती सुधारण्याकरितां फक्त शिक्षकानें मुलांना मदत करावी.

अशा तऱ्हेनें गीत बिनचूक म्हणावयास शिकविल्यानंतर तें मुलांच्या चांगलेंच पचनीं पडलेलें असते. त्यांत मुलें रमलेलीं असतात. त्यांतील त्यांची कृति व्यवस्थित घटवलेली असतें. या सर्व गोष्टींचा सुपरिणाम पाठावर झाल्याशिवाय राहात नाहीं. अशा योग्य वेळीच पाठांतील रसग्रहणाचा टप्पा येतो. अभिनय-गीताचें रसग्रहण करणें फार सोपें

आहे. पुन्हां एकदां मुलांनीं गोड गळयावर योग्य कृति करून गीत म्हटलें कीं झालें रसग्रहण. लोकगीताचें रसग्रहणही असेंच करावयाचें असतें. अभिनय-गीताचे पाठांत गृहपाठाची फारशी आवश्यकता नाहीं. द्यावयाचाच झाल्यास हें गाणें घरीं आपल्या आई वडिलांना किंवा भावंडांना हावभाव करून म्हणून दाखवा असा द्यावा.

वरील विवेचनावरून स्पष्ट होईल कीं लोकगीत व अभिनय-गीत यांच्या पाठपद्धतीमध्यें विशेष फरक नाहीं. दोन्हींच्या पाठामध्यें एकदर पाच वेळां गीत म्हटलें जातें. प्रस्तावना, हेतुकथन वगैरे दोन्हीमध्यें सारख्याच पद्धतीनें करावयाचें असतें. फरक एवढाच कीं सगळया लोक-गीतांमध्यें कृति करण्यास वाव नसतो तो सर्व अभिनय-गीतांमध्यें असतो. असा फरक साहजिक आहे अभिनयाशिवाय अभिनय-गीतच होणार नाहीं.

अभिनय-गीताच्या पाठाचें तंत्र हें असें आहे. पाठाचें तंत्र कितीही शास्त्रशुद्ध असलें, तें मानसशास्त्राच्या नियमानें कितीही जखडून टाकलेलें असलें, तें शिक्षणशास्त्राच्या तत्वांनीं कितीही वेष्टिलेलें असलें, तें व्यव-हाराच्या कसोटीवर कितीही घासलेलें असलें तरी तें यशस्वी करून दाखविण्यास इतर कांहीं गोष्टींकडे लक्ष पुरविलें पाहिजे. त्यांतील पहिली महत्वाची गोष्ट म्हणजे सर्वांना योग्य आवाज. गाणें म्हणतांना कोणाचा छोटा आवाज होता कामा नये. तसेंच तो कर्कश किंवा कोता पडता कामा नये. सर्वांचा आवाज सारखा आला पाहिजे. सर्वांचा सारखा आवाज साधल्यानंतर सर्व मुलें एकमेकांबरोबर व्यवस्थित गाणें म्हणतात कीं नाहीं हें बघितलें पाहिजे. पुष्कळ वेळां कांही मुलें मागें तर कांहीं मुलें पुढें म्हणतात. असें मागें पुढें म्हटल्यानंतर कोणाचें कोणाला समजत नाही आणि वर्गांत गोंधळ माजतो. सारखा आवाज साधल्या-नंतरही ही परिस्थिति उद्भवते तेव्हां मुलांना सारख्या आवाजांत यांत्रिक रीतीनें एकमेकांबरोबर अचुकपणें म्हणण्याची सवय लाविली पाहिजे.

गीत सर्वांनीं एकदम सारखें म्हटलें पाहिजे. तशीच त्यातील कृति सर्वांनीं सारखी एकदम करावयास पाहिजे. सर्वांनीं सारखी कृति एकदम केली नाहीं तर वर्गातील शिस्त बिघडून जाते. वर्गाला विदुषकाच्या वसतिस्थानाचें स्वरूप येतें. असें स्वरूप येऊ न देण्याची खबरदारी शिक्षकानें घेतली पाहिजे. ही खबरदारी घेत असतांना करून घ्यावयाची कृति योग्य आहे कीं नाहीं हें कटाक्षानें पाहिलें पाहिजे. अभिनय-गीताच्या आशयाला साजेशीच कृति व्हावयास पाहिजे.

या सर्व गोष्टी साधण्यास पाठ साहित्याची फार मदत होते. चेंडू, पतग, बाहुली वगैरे वरील गाण्यांत त्या त्या वस्तू आणून मुलांना त्यांचा उपयोग करण्यास शिकवून जर कृति केली तर ती योग्य व परिणामकारक होते. असें करतांना एक गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे. ती ही कीं वर्गातील प्रत्येक मुलास वस्तु मिळाली पाहिजे; आणि सर्व मुलांच्या वस्तु सारख्या पाहिजेत. त्या सर्वांचा आकार, डौल, रंगरूप वगैरे सर्व सारखें पाहिजे. तें जर तसें नसेल तर मुलें एकमेकांच्या वस्तु पाहाण्यांत गुंग होतील, दंग होतील. पाठाकडे कोणाचेंच लक्ष राहाणार नाहीं. सर्वच घोटाळा होईल.

प्रत्यक्ष वस्तूच्या साहाय्यानें सारखी कृति एकदम करून घेणें बरेंच सोपें आहे. पण वस्तु कल्पून तिची कृति करवून घेणें फार अवघड आहे. बाहुली हातांत घेऊन तिचे केस विंचरणें, तिला न्हाऊ घालणें, तीट लावणें, खाऊ घालणें, झोपविणें सोपें आहे. पण स्वतःला आगगाडी कल्पून तिच्यासारखें चालणें, शिटी वाजविणें, निरनिराळे आवाज काढणें कठीण आहे. पण शिस्तीनें व संवयीनें याही गोष्टी आत्मसात करतां येण्याजोग्या आहेत.

अभिनय-गीतांच्या पाठांतील तिसरें वैशिष्ट्य म्हणजे या पाठांत प्रश्नोत्तरें फारशीं नसतात. गाण्यावर प्रश्न विचारावयाचे नसतात. असे

करण्याचें कारण स्पष्ट आहे. गाण्यातील आशयावर कृतीची उभारणी केलेली असल्यामुळें, त्यातील मतलब कृतीच्याद्वारे मुलांना सहजासहजीं समजल्यानतर प्रश्न विचारण्याचें प्रयोजनच उरत नाहीं. अट्टाहासानें प्रश्न विचारले तर सर्वांचा विरस होऊन पाठात अपयश आलेंच म्हणून समजा.

. नगर ग्रंथ संग्रहालय ठाणे स्थापना
अनुक्रम २०९८५ वि. २५४२
क्रमांक २३९ नों. दि. १९/५/५५

# ८. पद्य-पाठाचें साहित्य

अध्यापनशास्त्रांत पाठ-साहित्याला महत्त्वाचें स्थान आहे. साहित्यामुळें पाठाचा विषय अधिक स्पष्ट करतां येतो, अधिक मनोरंजक करतां येतो. साहित्यामुळें विषयाचें काठिण्य कमी करतां येतें. साहित्यामुळें बऱ्याचशा गोष्टी समजण्यास सोप्या जातात. अध्यापनशास्त्रांत पाठ-साहित्याचें स्थान असें अढळ असतांनाही त्याविषयीं एक आक्षेप घेतला जातो. 'पाठ-साहित्यामुळें विषयाची समजूत सुलभ होत असल्यामुळें विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीस ताण पडत नाहीं, त्यांच्या विचारशक्तीस खाद्य मिळत नाहीं, स्वत. प्रयत्न करून विषय समजून घेण्याची प्रवृत्ति विद्यार्थ्यांमध्यें कमी होते, स्वतःची बुद्धि चालविण्याची त्यांची पात्रता कमी होते', हाच तो आक्षेप होय. हा आक्षेप तितकासा पटण्यासारखा नाहीं. पाठ-साहित्याचा उपयोग न करतां अध्यापन केलें तर मुलांचें लक्ष लागत नाहीं, त्यांना विषय नीटसा कळत नाहीं. 'नळी फुंकिली सोनारें, इकडून तिकडे गेलें वारें' असें अध्यापनाचें होतें असेंही म्हटलें जातें. याच्या उलट पाठ-साहित्याचा उपयोग केला तर वरीलप्रमाणें आक्षेप घेतला जातो.

पाठ-साहित्याचे फायदे स्पष्ट दिसत असतांना, पाठसाहित्याला शिक्षणशास्त्राचा आधार असतांना, मानसशास्त्राचा पाठिंबा असतांना त्याचे विरुद्ध आक्षेप कां घेतला जावा याचा बारकाईनें विचार केला तर त्याचें कारण वेगळेंच असल्याचें दिसून येतें. या आक्षेपाचें मूळ पाठ-साहित्याच्या दुरुपयोगांत आहे. पाठ-साहित्य निरनिराळ्या प्रकारचें असतें. त्याचा उपयोग योग्य त्या पाठांतच व्यवस्थितपणें करावयाचा असतो. नेमकी हीच गोष्ट विसरली जाते. पाठांत साहित्याचा उपयोग करावयाचा असतो आणि शाळेंत असें भरपूर साहित्य आहे, एवढेंच ध्यानांत ठेविलें जातें. त्यामुळें अनेकवेळां अनावश्यक साहित्याचा उपयोग करून

सर्व शैक्षणिक तत्त्वांवर बोळा फिरविला जातो. त्याचा परिणाम व्हायचा तोच होतो. पाठ परिणामकारक होण्याऐवजीं तो पडतो. साहित्य वापरणाराचें हसें होतें आणि पाठसाहित्याबद्दल शंका घेण्यास जागा उरते. साहित्य वापरण्यांत शिक्षकांची दिशाभूल करण्यांत ट्रेनिंग संस्थांचाही मोठा वांटा असतो असें स्वानुभवानें मी म्हणूं शकतो. साहित्याची आवश्यकता पाठांमध्यें आहे कीं नाहीं याचा विचार न करतां पाठ म्हटला कीं साहित्य असावयास पाहिजेच या भावनेनें प्राध्यापकवर्ग साहित्याची जमवाजमव करण्यास विद्यार्थी-शिक्षकांना सांगत असतो प्राध्यापकांच्या या छंदानें बिचारे शिक्षक इतके मेटाकुटीस येतात कीं ते कसलाही विचार न करतां वाटेल तें साहित्य पाठांत वापरतात. याचा परिणाम असा होतो कीं ट्रेनिंग कॉलेजला ' राम राम ' ठोकल्यानंतर शाळेंत चुकूनदेखील साहित्य वापरावयाचें नाहीं असें जवळ जवळ तें ठरवून टाकतात. अर्थात् या त्यांच्या निश्चयाला शाळेच्या वार्षिक तपासणीसारखे सणवार किंवा शैक्षणिक सभा—समेलनासारखे सोहाळे अपवाद असतात हें वेगळें सांगण्याची जरुरी नाहीं.

पद्य-पाठांत साहित्याचा दुरुपयोग हटकून झाल्याचें वारंवार निदर्शनास येतें. साहित्याच्या दुरुपयोगाची परमावधि पद्य-पाठाइतकी इतर विषयांच्या पाठांत होत नसेल. वास्तविक पद्य-पाठांत साहित्याची आवश्यकताच नाहीं असें म्हटलें तर तें शोभण्यासारखें आहे. इतर विषय व पद्य यांमध्यें जमीन अस्मानाचा फरक आहे, त्यांच्यांत पॅसिफिक महासागराची खोली व हिमालयाची उंचीइतकें अफाट अंतर आहे. इतर विषयांचें ज्ञान कानापेक्षां डोळ्यावाटें मेंदूस पोहोंचविलें जातें. पद्य कर्णमार्गें हृदयास जाऊन भिडतें. इतर विषयांचा ठसा डोळ्यांत शिरणाऱ्या प्रकाशकिरणांच्या साहाय्यानें मेंदूवर उमटविला जातो. पद्याचा ठसा नाजुक वायुलहरींच्या मदतीनें हळुवारपणें हृदयावर उमटविला जातो.

या वायुलहरींनीं उमटविलेला ठसा इतका स्पष्ट असतो, सुरेख असतो, सुंदर असतो कीं तो पुन्हां पुसट होण्याची भीतिच नसते. म्हणून पद्य-पाठांत साहित्याचें प्रयोजन नाहीं.

पाठ-साहित्यामध्यें फळा सर्वश्रेष्ठ आहे. फळा हा पाठ-साहित्याचा प्राण आहे, शालेय जीवनांतील प्राणवायु आहे, शालेय जगांतील अणु आहे, शालेय उद्यानांतील फुलोरा आहे. हा प्राणवायु वाहू लागला म्हणजे वर्गांतील लहानग्या जीवांना जीवन मिळतें. या अणूचा संघर्ष झाला म्हणजे विद्यार्थ्यांचा ज्ञानाग्नी भडकतो. हा फुलोरा फुलला म्हणजे मुलांच्या तोंडावर एक नाविन्यपूर्ण टवटवी येते. फळा हा शिक्षकाचा सोबती आहे. शिक्षक फळ्याशीं इतका समरस होतो कीं फळा हा आपलाच एक अवयव असें समजून तो त्याचें स्वतंत्र अस्तित्व विसरतो. शाळेंतून फळ्याची हकालपट्टी केल्यास शिक्षक पाय असून पंगू होतील, हात असून थोटे होतील.

फळ्याचा महिमा सर्वमान्य आहे. पाठ-साहित्यांतील फळ्याचें स्थान मानाचें आहे, तें अढळ आहे. फळ्याचें हें महत्त्व सर्व विषय मानीत असलें तरी पद्य त्याला अपवाद आहे. इतर विषयांच्या पाठांत फळ्याशिवाय शिक्षकाचें पान हालत नसलें तरी पद्य-पाठांत त्याची गैरहजरी उत्कटतेनें भासत नाहीं. याचें कारणच असें कीं पद्यामध्यें इतके गुण भरलेले आहेत कीं त्यापुढें फळ्याच्या गुणाची आठवणच होत नाहीं. सूर हा पद्याचा प्राण आहे. कल्पना त्यांतील प्राणवायु आहे विचार त्यांतील अणु आहे त्यांतील अलंकार नंदनवनांतील फुलें आहेत. पद्याचा प्राणसूर घुमू लागला कीं मुलें देहभान विसरतात, त्यांची ब्रह्मानंदीं टाळी लागते. त्यांतील कल्पनांचा प्राणवायु वाहू लागला कीं वर्गांतील चिमण्या जीवांना सजीवन प्राप्त होतें. त्यांतील विचारांच्या अणूचा संघर्ष झाला कीं विद्यार्थ्यांच्या ज्ञानाग्नीचे लोळ आसमंतांत चोहोंकडे पसरतात. त्यांतील

भाषारूपी नंदनवनांतील अलंकारांच्या सुमनांचा सुवास वातावरणांत दरवळला कीं मुलें बेहद्द मोहून जातात. असें अचाट सामर्थ्य पद्यामध्यें आहे. फळ्याचें सामर्थ्य पद्यापुढें फिकें पडतें, तोकडें पडतें.

वरील विवेचनावरून असा समज होण्याचा संभव आहे कीं पद्य-पाठांत फळ्याला स्थानच नाहीं. पण हा समज गैर आहे पद्य-पाठांत फळ्याला स्थान आहे. पण तें अगदीं मामुली स्वरूपाचें आहे. एखादा शब्द लिहीणें किंवा एखादें वाक्य लिहीणें एवढ्यापुरतेंच तें मर्यादित आहे. पद्य-पाठांत फळ्याचा उपयोग साधारणतः तीन वेळां केला जातो. पहिला उपयोग म्हणजे पद्याचें शीर्षक लिहीण्याकरितां. पाठाचें हेतुकथन झाल्याबरोबर हें शीर्षक लिहावयाचें असतें. फळ्याचा दुसरा उपयोग पद्यांतील कठीण शब्द लिहीण्याकडे होतो. पद्यामध्यें कठिण शब्द फार असल्यास पद्याचें शीर्षक लिहील्यानंतर लगेच कठीण शब्दांचें स्पष्टीकरण करून ते फळ्यावर लिहावयाचे असतात. पद्यांत कठीण शब्दांचा भरणा कमी असल्यास पद्यावर गोष्टवाऱ्याचें प्रश्न विचारले जात असतांना असे शब्द समजावून देऊन ते फळ्यावर लिहावयाचे असतात. यानंतर तिसरा उपयोग हेतुप्रश्न लिहीण्याकरितां करावयाचा असतो. मूकवाचन मुलांना देतांना हे हेतुप्रश्न फळ्यावर लिहावयाचें असतात. याशिवाय आणखी इतर वेळीं फळ्याचा उपयोग करण्याची पाळीच येत नाहीं.

पद्य-पाठांत फळ्याचा उपयोग इतका मर्यादित असतांना मेणकापडाचा फळा वापरण्याची सवय सारासार विचार न करतां विद्यार्थ्यांना ट्रेनिंग संस्थामधून लाविली जाते. या मेणकापडाच्या फळ्याचा उपयोगही कठीण शब्द लिहीण्याकरितां व हेतुप्रश्न लिहीण्याकरितां केला जातो. पण हें लिखाण प्रत्यक्ष वर्गांत न करितां त्यावर घरून लिहून आणलें जातें. शीर्षक हेतुकथन झाल्यावर वर्गांतच लिहावयाचें असतें. म्हणून तें मेणकापडाच्या फळ्यावर लिहून आणतां येत नाहीं. वास्तविक इतर

लिखाणही घरून लिहून आणण्याची जरूरी नाहीं. पद्यांत अवघड शब्द फार तर पांच सात निघतात. ते वर्गांत तावडतोब फळयावर लिहीतां येतात. तसेंच हेतुप्रश्नही पांच सात शब्दांचा फार तर दहा पधरा शब्दांचा साधारणतः एकच असतो कारण हेतुप्रश्न पद्याचे मध्यवर्ति कल्पनेवर आधारलेला असतो आणि मध्यवर्ति कल्पना पद्यांत एकच असते. असा हेतुप्रश्नही वर्गांत फळयावर तावडतोब लिहीतां येतो. यावरून मेणकापडाच्या फळयाचा उपयोग किती अयोग्य व अनावश्यक आहे याची सहज कल्पना येते. पण या उपयोगाची तरफदारी केव्हां केव्हां केली जाते. ती अशी कीं कांहीं शिक्षकांचें अक्षर वाईट असतें. वाईट अक्षर वर्गांत फळयावर काढलें तर मुलांपुढें वाईट आदर्श ठेविल्यासारखें होतें. वाईट हस्ताक्षर असलेल्या शिक्षकांना घरीं सावकाशपणे मेणकापडाच्या फळयावर लिहीतां येत किंवा दुसऱ्यांकडून वळणदार अक्षरांत लिहून घेतां येतें. पण ही तरफदारी फोल आहे, धोक्याची आहे, गुन्हेगारी स्वरूपाची आहे असें स्पष्ट म्हणावेसें वाटतें. कारण असें करण्यांतील कोणताच उद्देश साध्य न होतां शिक्षकाची गुन्हेगारी प्रवृत्ति विद्यार्थ्यांच्या दृष्टीस पडते. पद्याचें शीर्षक वर्गांत लिहावें लागत असल्यामुळें वाईट अक्षराचा नमुना मुलांपुढें येतोच. त्याच्या जोडीला मेणकापडाच्या फळयावरील उत्तम हस्ताक्षराचा नमुनाही असतो. तुलनात्मक दृष्टीनें दोन्ही नमुने पाहिल्यानंतर शिक्षकाचा खोटेपणा मुलांचें लक्षांत येण्यास उशीर लागत नाहीं. याचा व्हायचा तोच परिणाम होतो. मुलांचा शिक्षकाबद्दलचा आदर कमी होऊन त्याच्याविषयीं एक प्रकारचा तिटकारा त्यांच्या मनामध्यें उत्पन्न होतो हें सर्व टाळावयाचें झाल्यास त्यावर एकच रामबाण उपाय आहे. तो म्हणजे शिक्षकानें आपलें अक्षर सुधारणें. तें जमत नसल्यास जसें आपलें अक्षर असेल तसें वर्गांत फळयावर लिहीणें. असें करण्यांत थोडा कमीपणा असला तरी खोटेपणा नाहीं ही कांहीं लहानसहान गोष्ट नाहीं.

मेणकापडाच्या फळयाचा उपयोग आणखी एकदां रसग्रहणाचें वेळीं करण्याचा प्रघात पडला आहे. या वेळीं या फळयावर अपुरीं वाक्यें लिहून आणलेलीं असतात किंवा मध्यें मोकळया जागा सोडून वाक्यें लिहीलेलीं असतात. हीं वाक्यें वर्गांत मुलांकडून पुरीं करून घेतलीं जातात आणि मोकळया जागीं शब्द भरून घेतले जातात. पण अशा तऱ्हेनें रसग्रहण करणें म्हणजे रस ग्रहण करण्याऐवजीं तो ओतून देण्यासारखें आहे हें रसग्रहणावरील पाठांत स्पष्ट झालेलेंच आहे. तेव्हां अशा तऱ्हेच्या रसग्रहणालाच बुट्टी मिळाल्यानंतर लिखाणाचा प्रश्नच उरत नाहीं. एवंच मेणकापडाच्या फळयास पद्य-पाठांत कोठेंच बिलकूल स्थान नाहीं.

पद्य-पाठांत चित्रांचा उपयोग सर्रास करण्यांत येत असल्याचें निदर्शनास येतें. असा उपयोग करणें घातुक आहे याकडे कोणी लक्षच देत नाहीं. त्यामुळें पाठ रंगण्याऐवजीं पडतो हें कोणाचे लक्षांतच येत नाहीं. चित्रांमुळें पाठाचें अपयश पदरीं पडतें याचा विचार कोणी करीत नाहीं. चित्र महत्त्वाचें पाठसाहित्य आहे आणि अध्यापनशास्त्रानें त्याचा उपयोग करण्यास परवाना दिला आहे एवढेंच लक्षांत घेतलें जातें. या परवान्यानें शिक्षक बेफाम होतात, अविचारी होतात. या सवलतीच्या फशी ते इतके पडतात कीं वाटेल तेथें आणि वाटेल तेव्हां चित्रांचा उपयोग पद्य-पाठांत करतात. असे शिक्षक पद्य-पाठाची प्रस्तावना करतांना चित्रांचा उपयोग करतात, प्रतिपादनांत त्यांचा उपयोग करितात आणि रसग्रहणांतही करतात. वास्तविक पद्य-पाठांत चित्रांचा उपयोग कोठेंच केला जाऊं नये असें स्वानुभवानें म्हणावेंसें वाटतें. पद्य-पाठांत मुलांच्या चर्मचक्षुंना चित्रें दाखविण्याऐवजीं तीं त्यांच्या मनश्चक्षुपुढें उभीं करावयाचीं असतात. चर्मचक्षुंना दाखविलेल्या चित्रांमुळें पद्यांतील स्वारस्यच नाहींसें होतें. प्रस्तावनेमध्यें शिकविल्या जाणाऱ्या विषयास शोभेसें वातावरण निर्माण करावयाचें असतें. अशा वातावरणाची निर्मिती करण्यास चित्रांची

मदत होते हें खरें आहे. पण तें इतर विषयांच्या बाबतींत खरें आहे. पद्य-पाठाचें बाबतींत नाहीं. पद्य-पाठांत प्रस्तावनेंत चित्र दाखविल्यामुळें वातावरण बिघडतें, दूषित होतें असेंच प्रत्ययास येतें. जीं चित्रें मुलांनीं स्वतांच्या मनश्चक्षुनीं आपल्या हृदयपटावर नाचलेलीं पाहिलीं असतीं तीं त्यांना उघड्या डोळ्यांनीं प्रस्तावनेंत पाहावीं लागत असल्यामुळें त्यांच्या तन्मयतेस बाध येतो, त्यांचें लक्ष केंद्रित होण्यांत व्यत्यय येतो. अशा तऱ्हेनें पाठाची गाडी रूळावरून घसरण्यास प्रस्तावनेंतच आरंभ केला जातो. या गाडीस सावरण्याचे प्रयत्न न करतां उलट ती जलदीनें घसरेल असेंच वर्तन शिक्षकांकडून घडतें. प्रस्तावनेंत दाखविलेल्या चित्रावर समाधान न मानतां पुन्हा तीं प्रतिपादनांत दाखविलीं जातात. परिणाम-कारक पद्य-गायन झाल्यानंतर प्रतिपादनांत प्रश्नोत्तरें करून शब्दरूपी कुंचल्यानें पद्यांत रेखाटलेलीं चित्रें मुलांच्या अंतःकरणावर चित्रित करावयाचीं असतात नाजुक शब्दांच्या ठशानें त्यांतील भाव अंतःकरणावर प्रतिबिंबीत करावयाचे असतात. अशा वेळीं हातांनीं रेखाटलेलीं चित्रें दाखविल्यास अंतःकरणावर चित्रें रेखाटण्यांत व्यत्यय येतो. एवढेंच नाहीं तर त्यावर रेखाटत आलेलीं चित्रें पुसट होतात, रंगहीन होतात, निर्माल्यवत् होतात. या प्रकारची जाणीव कांहींना उत्कटतेनें होते म्हणूनच कीं काय त्यांनीं यावर असा उपाय शोधून काढण्याचा प्रयत्न केला आहे कीं पद्य अवघड असेल तरच चित्रें मुलांना दाखवावींत. एरवीं नाहीं. पण या त्यांच्या शोधांत कांहीं राम नाहीं. शिकवावयाचें पद्य सोपें असो वा अवघड असो चित्रें दाखविण्याचा परिणाम जो व्हावयाचा तोच होतो.

पण सर्वांत वाईट परिणाम रसग्रहणाचे वेळीं चित्रें दाखविल्यानें होतो, त्यामुळें पाठाची गाडी सपशेल रूळावरून घसरते; पाठाची सर्वच मथुरा पाण्यांत बुडते. प्रतिपादनांत चर्मचक्षुंपुढें सरकणारीं चित्रें रसग्रहणांत स्थिर करावयाचीं असतात, त्यांत निरनिराळ्या रंगांच्या छटा

हळुवारपणें भरावयाच्या असतात, तीं अंत:करणाच्या कॅन्व्हसवर मरेपर्यंत राहातील इतकीं आकर्षक करावयाचीं असतात. अशा आकर्षक चित्रांच्या आनंदसागरांत मुलें डुंबत असतांना शिक्षकानें वर्गांतून काढता पाय घ्यावयाचा असतो. असें अविस्मरणीय रसग्रहण करण्याऐवजीं शिक्षक जर साध्यासुध्या डोळ्यांना दिसणारीं हातानें काढलेलीं चित्रें दाखवूं लागला तर सबंध पाठाच्या यशावर पाणी पडतें, त्यावर बोळा फिरविला जातो.

पद्य–पाठांत चित्रांचा दुरुपयोग केल्यामुळें हातातोंडाशीं आलेला यशाचा घास तोंडांत कसा पडत नाहीं याचें एक उदाहरण आठवलें तेंच सांगतो. पूर्व खानदेश जिल्ह्यांत चोपड्यापासून सातआठ मैलावर पश्चिम खानदेशाच्या सीमेजवळ हातेड म्हणून एक गांव आहे. या गांवीं झालेल्या शिक्षक-सम्मेलनाचे अध्यक्ष म्हणून काम करण्याची संधि मला मिळाली. गांवांतील लोक उत्साही असल्यामुळें दहा दहा पधरा पधरा मैल अंतरावरून सामान गोळा करून भव्य मंडप उभारला होता. गांव दोन जिल्ह्यांच्या सरहद्दीवर असल्यामुळें दोन्ही जिल्ह्यांतील शिक्षक मोठ्या संख्येनें संमेलनास हजर होते. गांवकऱ्यांच्या हुरुपामुळें आजुबाजूचे ग्रामस्थही खूप आले होते. सुमारें तीनचार हजार शिक्षक–ग्रामस्थांच्या मेळाव्यांत संमेलनास सुरवात झाली. संमेलनांत बाहेरील पद्याचा पाठ ठेविलेला होता. त्याकरितां 'भिकारीण' ही कविता शिकवावयास घेतली होती. शिक्षक खरा शिक्षक होता, हाडामांसाचा शिक्षक होता, जातिवंत शिक्षक होता. वर्गांतील चार भिंतींमध्यें पद्याचा पाठ रंगविणें अवघड जातें. त्यांतून बाहेरचे कोणी पाठास हजर असल्यास तें अधिकच अवघड जातें. आणि हजारांनीं बाहेरची सुशिक्षित आणि अशिक्षित मंडळी हजर असतांना शिक्षकाची कशी गाळण उडत असेल, त्रेधा होत असेल याची कल्पनाच केलेली बरी. पण येथें जातिवंत शिक्षक कविता शिकवीत

असल्यानें पाठ इतका रंगला, त्यांत गुरुशिष्य इतके तन्मय झाले, त्याच्याशीं इतके तादात्म्य पावले कीं ते देहभान विसरले. करुणरसाची निर्मिति इतक्या कुशलतेनें, हलुवारपणें केली गेली होती कीं शिक्षकाचा आवाज कापरा येत होता, मुलांचे डोळे पाण्यानें डबडबले होते, त्यांची दृष्टि जमिनीवर खिळलेली होती. प्रश्नोत्तरें नुसतीं यंत्राप्रमाणें चाललीं होतीं. अंतरीचें बोल अंतःकरणें झेलीत होतीं, अंतकरणाची एकतानता ते साधीत होते. त्यांचीं अंतःकरणें भिकारणीच्या अंतःकरणांत विलीन होत होतीं. अशा परमोच्च बिंदूस पाठ पोहोंचला असतांना शिक्षकाला अवदसा आठवली. त्याला ट्रेनिंग कॉलेजमधील उद्दिष्ट, बुद्धिमान पण हृदयहीन प्राध्यापकाचा उपदेश आठवला. चटकन त्यानें घरून काढून आणलेलें चित्र मुलांच्या पुढ्यांत मांडलें. चित्र चित्ताकर्षक होतें भिकारीण आपल्या तान्ह्यास पाठीशीं घालून दाराशीं उभी होती. दारांत मुलगा उभा होता. त्याच्या आईचा मात्र कोठेंच पत्ता नव्हता. शिक्षकानें प्रश्न विचारला ' कुणी दीनेची कींव येऊ द्या कांहीं, मज भिक्षा घाला बाई ' असा भिकारणीनें शेवटीं टाहो फोडला तेव्हां भिकारीण कोठें होती, माई कोठें होती ! डबडबलेल्या डोळ्यांनीं चित्राकडे न पाहतां खालीं पाहूनच उत्तर आलें. भिकारीण दाराशींच पडलेली होती, माई दारांत भाकरीचा तुकडा घेऊन केविलवाणें तोंड करून उभी होती. पाठाच्या यशाचा कळस झाला. जातिवंत शिक्षकाच्या कौशल्याचा बोलबोला झाला. पण या यशाला निरर्थक साहित्य वापरल्याचें गालबोट लागलें. शिक्षकांच्या कीर्तीला अध्यापन शास्त्रांतील खोट्या कल्पनांनीं कलंक लाविला. अध्यापकाचें हंसें झालें. अध्यापनशास्त्राचें बुजगावणें उघडें पडलें. अध्यापन-शास्त्र हें साधन आहे, साध्य नव्हे हें स्पष्ट झालें.

वरील उदाहरण चित्रांच्या विफलतेची साक्ष आहे, त्यांच्या फोलपणाचा पुरावा आहे. तेव्हां चित्रांचा उपयोग पद्य-पाठांत करूं

नये असेंच कोणीही म्हणेल. पण या विधानास एक अपवाद अधून मधून करावयास हरकत नाहीं. अगदीं खालचे वर्गांत म्हणजे इ. १, २ व ३ मध्यें पद्य-पाठास चित्रें दाखविणें क्षम्य मानावयास हरकत नाहीं. कारणें स्पष्ट आहेत. खालचे वर्गांत पद्य-पाठास हवी इतकी शांतता व शिस्त लाभत नसल्यामुळें मुलांचें लक्ष एके ठिकाणीं केंद्रित होत नाहीं. त्यामुळें त्यांच्या मन:चक्षुपुढें पद्यांतील चित्रें रेखाटणें शक्य होत नाहीं. म्हणून हातांनीं काढलेलीं चित्रें दाखविल्यास चालण्यासारखें आहे. पण वरचे वर्गांत मात्र पद्य-पाठांत चित्रें न दाखविण्याचा नियम करून तो कसोशीनें पाळला पाहिजे.

खालचें वर्गांत चित्रें दाखवितांना कांहीं नियम पाळावे लागतात. दाखवावयाचें चित्र फार मोठें असू नये किंवा लहानही असूं नये. चित्र लहान असल्यास न दिसल्यामुळें मुलांमध्यें गडबड होते, तें मोठें असल्यास त्यांतील बारीक बारीक गोष्टीवर चर्चा होऊन गोंगाट माजतो. म्हणून चित्र मध्यम आकाराचें असावें. तसेंच तें भडक रंगाचें असूं नये व अस्पष्ट रंगांतही असूं नये. त्यामुळेंही गोंधळ माजण्याचा संभव असतो. चित्र प्रासंगिक असावें. चित्र केवळ एखाद्या कृतिहीन व्यक्तीचे, वस्तुचें किंवा प्राण्याचें असल्यास मुलें त्यांत रमत नाहींत. अशा चित्रामुळें पद्य-पाठाची गति वाढविण्याकरतांही त्याचा कांहीं उपयोग होत नाहीं.

खालचे वर्गांत चित्रें दाखविण्यास मुभा असल्यामुळें वाटेल तितकीं चित्रें दाखविण्याचा मोह टाळला पाहिजे. एखादें दुसरेंच अत्यावश्यक असलेलें चित्र तेवढें दाखवावें. अधिक चित्रें दाखविल्यास पद्य-पाठाचें स्वरूपच बदलतें. त्याला चित्रदर्शनाच्या पाठाची कळा येते. तेव्हां पद्य-पाठांतील चित्रांच्या संख्येवरील बंधन न विसरतां पाळलें पाहिजे. चित्रांचें बाबतींत आणखीही एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे. ती म्हणजे चित्रावर विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांविषयीं. ' या चित्रांत तुम्हास काय दिसतें '

असा हमखास विचारण्यात येणारा सर्वसाधारण प्रश्न केव्हांही विचारूं नये. चित्राच्या प्रसंगास अनुसरून योग्य प्रश्न विचारावेत. पण अशा प्रश्नांची संख्या मोजकीच असावी. अधिक प्रश्न विचारून पद्य-पाठास चित्रदर्शन-पाठाचें ( Picture Composition ) स्वरूप येऊं देतां कामा नये पद्य-पाठ शेवटपर्यंत पद्यमयच राहिला पाहिजे, तो सुरवातीपासून अखेरपर्यंत काव्यमयच झाला पाहिजे.

# १. पद्याचा इतर विषयांशीं समन्वय

वर्गांत अनेक विषय शिकविले जातात या विषयांचें स्वरूप भिन्न असतें. या निरनिराळ्या विषयांचा परस्पर संबंध कांहीं असतो कीं नाहीं याची कल्पना विद्यार्थ्यांना नसते. या विषयांचा एकमेकांशीं निकटचा संबंध असूं शकतो असें त्यांना नुसतें सांगितल्यास तें त्यांना पटत नाहीं. हें सांगणें त्यांना एक प्रकारचें कोडें आहे असें वाटतें. हें कोडें त्यांना सहजासहजीं सोडवितां येत नाहीं. विद्यार्थ्यांच्या पुढें हें कोडें उकलावयाचें असेल, त्यांना तें खुलासेवार समजावून द्यावयाचें असेल तर शिक्षकानें पाठपद्धतीनुसार निरनिराळे विषय शिकवितांना त्यांचा एकमेकांशीं समन्वय साधला पाहिजे. असा समन्वय साधला गेल्यास विद्यार्थ्यांना कळून येईल कीं शिकविल्या जाणाऱ्या विषयांत बरीच सूत्रबद्धता असूं शकते. मानवी जीवनांतून विषयांचा उगम झालेला आहे व त्याच मानवी जीवनास समृद्ध करण्यासाठीं त्यांचा अभ्यास करावयाचा आहे ही महत्त्वाची कल्पना देखील विद्यार्थ्यांच्या मनास समन्वयाच्या तंत्रामुळें सहज पटून जाण्यासारखी आहे. समन्वयामुळें अनेक फायदे होतात. समन्वयामुळें ज्ञानाचे पाडलेले कृत्रिम कप्पे खुले होतात. त्या कप्प्यांचा एकमेकांशीं असलेला संबंध स्पष्ट झाल्यामुळें विद्यार्थ्यांना मिळालेलें ज्ञान सहजासहजीं विसरलें जात नाहीं. तें पक्कें होतें, लोणच्याप्रमाणें मुरतें. तसेंच असा समन्वय साधला जात असतांना पाठाची मनोरंजकता वाढून तो परिणामकारक होतो.

एक विषय शिकवीत असतांना त्याचा इतर निकटच्या विषयांशीं संबंध फार पूर्वीपासून जोडला जात आहे. इतिहास शिकवीत असतांना त्याचा संबंध भाषा, भूगोल, चित्रकला, हस्तव्यवसाय वगैरे विषयांशीं लाविला जात असे. भूगोलाचा संबंध इतिहास व शास्त्र यांचेशीं जोडला जात असे. अंकगणिताचा संबंध पदार्थ-विज्ञान-शास्त्र व अर्थशास्त्र

यांचेशीं जोडण्याची संवय सर्वांना झालेलीच आहे. तसेंच पद्याचा समन्वय गद्य, इतिहास, चित्रकला, गायनादि विषयांशीं साधण्याची प्रथा बरेंच कालापासून पडली आहे.

पद्याचा समन्वय साधण्याची पडत चाललेली प्रथा बरी आहे कीं वाईट आहे, योग्य आहे कीं अयोग्य आहे, ग्राह्य आहे कीं त्याज्य आहे याचा विचार व्हावयास पाहिजे हा विचार करतांना पद्याचा समन्वय सध्यां कोणकोणत्या विषयांशीं कसा साधला जातो याचा सूक्ष्म अभ्यास करणें आवश्यक आहे. अशा अभ्यासानें स्पष्ट दिसून येईल कीं पद्याचा निरनिराळया विषयांशीं घालण्यांत येणाऱ्या समन्वयांत त्याचा गद्याशीं व इतिहासाशीं साधण्यांत येणारा समन्वय निकटचा समजला जातो. असा समन्वय साधणें कितीं नैसर्गिक व उपयुक्त आहे हें दाखविण्याकरतां पुढीलप्रमाणें विचार नेहमीं कानीं आदळतात. गद्य, व्याकरण व कविता ही भाषा शिक्षणाचीं तीन अंगें आहेत. व्याकरण हें भाषेचें शास्त्र सांगतें, तर गद्य व कविता भाषेचें सौंदर्य दाखवितात. मानवी मनोव्यापारांचा, विचारांचा, भावनांचा व जीवनाचा अविष्कार गद्य व पद्य या दोहोंतही झालेला आपणास आढळतो. गद्य व पद्य यांचे विषय एकच. ते विषय रंगविण्याची पद्धति मात्र वेगळी. विचारांचा कीस काढून त्यांतून तत्वनिष्कर्ष काढण्याचें प्रमाण गद्यांत अधिक आढळून येतें, तर भावनेची उत्कटता पद्यांत अधिक प्रमाणांत रंगविलेली आपणास दिसून येतें. परंतु या पद्धति प्रमाणाच्या फरकामुळें त्यांच्या समान विषयाकडे व सहोदरत्वाच्या नात्याकडे आपणास दुर्लक्ष करून चालणार नाहीं. कविता 'गद्य' असल्याचें आपण म्हणतो व गद्यांत मुर्तिमंत 'काव्य' असल्याचीही आपण ग्वाही देतो. गद्यकाव्या-सारखे वाङमप्रकार तर गद्य व काव्य यांतील आंतरिक भेद नष्ट करून त्यास एकत्रित करण्याचा प्रयत्न करतात. म्हणून गद्य-पद्याचा समन्वय

स्वाभाविकपणें साधतां येतो. वरील विचारसरणींत खरेंखोटें कितपत आहे याचा उहापोह येथें करण्याची जरूरी नाहीं. त्या विधानात तथ्यांश किती आहे याचा शोध करण्याचीही आवश्यकता नाहीं. गद्य-पाठ शिकवीला जात असतांना त्याचा समन्वय पद्यांशीं घातला जात असेल तर त्याबाबतींतही आमचें कांहीं म्हणणें नाहीं. आमचा विरोध आहे तो एका गोष्टीस, पद्याचा गद्यांशीं समन्वय साधण्याच्या प्रयत्नास. या विरोधास केवळ तात्त्विक बैठक नसून व्यवहाराचाही त्याला आधार आहे. पद्य-शिक्षणाचा हेतु आल्हाददान आहे हें पूर्वींच स्पष्ट केलेलें आहे. पद्याचा गद्यासारख्या रूक्ष विषयांशीं संबंध साधतांना आल्हाददानांत कमतरता येते हें नाकबूल करून चालणार नाहीं. समन्वय साधतांना पद्याचें शिक्षण हेतुस बाध येत असेल, पाठाची मनोरंजकता कमी होत असेल, पाठांतील आत्मा नाहींसा होत असेल तर तो समन्वय न साधलेला बरा असेंच कोणीही म्हणेल. म्हणून पद्याचा गद्यांशीं कदापि समन्वय न साधणें श्रेयस्कर असें मला वाटतें.

समन्वयाच्या छंदानें वेडे झालेले लोक कवितेचा समन्वय नुसता गद्यांशीं जोडून थांबत नाहींत तर त्याचा व्याकरणाशींही समन्वय घालतात. हा समन्वय घालतांना ते एक विलक्षण विचारसरणी पुढें मांडतात. ' व्याकरणांतील अलंकार, छंद, वृत्त वगैरे कवितेवरच आधारलेलें असतात. कविता शिकवितांना अलकार वृत्तछंदांची चर्चा केल्यास योग्य समन्वय घडून येईल व दोन्ही विषयांचें ज्ञान अधिक परिणामकारक होईल.' जीवन सुखदायी करणाऱ्या कवितेचा व्याकरणासारख्या रूक्ष विषयांशीं निका लावतांना चांगला परिणाम कसा होईल हेंच कळत नाहीं. व्याकरणाच्या रखरखीनें काव्यकलिका कोमेजेल, करपेल आणि त्यामुळें विद्यार्थ्यांचीं तोंडें काळवंडतील हें स्पष्ट आहे. नव्हे तसा अनुभवच असल्यामुळें विजोड वधुवरांची काडीमोड झालेलीच बरी.

इतिहास हा एक काव्याचा अत्यंत जिव्हाळ्याचा विषय आहे. ऐतिहासिक व्यक्तींच्या पराक्रमाचीं, त्यांच्या शौर्य, धैर्य, औदार्यादि गुणांचीं वीरश्रीयुक्त मनाला चटका लावणारीं वर्णनें काव्यांत पदोपदीं आढळतात. ' मराठेशाहीच्या गतवैभवाचीं सुखस्वप्नें पाहाण्यांत कवि ग. ह. पाटील यांची प्रतिभा रंगून गेली आहे. मराठ्यांची संग्राम-गीतें गाण्यांत कवि तिवारी दंग झाले आहेत. रजपूत वीरांगनांच्या सत्त्वशील, पराक्रमी व त्यागी जीवनाची हृदयस्पर्शी चित्रें रंगविण्यांत कवि विनायक गुंगून गेले आहेत. मराठ्यांच्या पराक्रमाच्या तिखट तलवारी नाचविण्यांत अज्ञात-वासीची कविता धुंद झाली आहे. ब्रिटिशांच्या दास्यांतून भारतभूमीची सुटका करण्यासाठीं अनेक आधुनिक कवींची कविता क्रांतीचा जयघोष करीत आली आहे, ' हें सगळें खरें आहे. पण हें सगळें खरें आहे म्हणून पद्य शिकवितांना कोणी इतिहासावर प्रश्न विचारूं लागला कीं काव्याचा हिरा हरपला म्हणून समजा, काव्याचा आत्मा लोपला म्हणून समजा, पाठाचा आनंदनिधी निमाला म्हणून समजा. पद्याचा इति-हासाशीं अशा तऱ्हेनें समन्वय जोडणें गैर आहे. या उलट इतिहासाचा पाठ चालू असतां त्यांत प्रसंगोचित, ऐतिहासिक प्रसंगावरील कविता गाऊन दाखविली तर इतिहासाचे पाठांत प्राण ओतल्यासारखें होईल. ' वीरमती महाराष्ट्रलक्ष्मी ' ' तळपती तिखट तलवारी ' ' हुतभागिनी ' ' शनवारवाडा ' या व अशासारख्या कवितांचा उपयोग इतिहासाचे पाठांत केल्यास दुधांत साखर घातल्यासारखेंच होणार आहे. पद्य-पाठांत मात्र इतिहासाचें चऱ्हाट वळल्यास दुधांत मीठाचा खडा टाकण्यासारखें आहे. म्हणून असा समन्वय साधण्याचा प्रयत्न न करणें बरें.

हीच विचारसरणी अधिक स्पष्टपणें मांडण्याकरितां असें म्हणतां येईल कीं 'ऋतूंचें गाणें', 'दिवस आणि रात्र', 'सुएझचा कालवा', 'कोलंबसाचें गाणें', 'गौरीशंकर व मानव', 'भारती सृष्टीचें सौंदर्य खेळे', अशासारख्या

कवितांचा उपयोग करून सृष्टिनिरीक्षण व भूगोल या विषयांचे पाठ मनोरंजक व परिणामकारक करावेत. या उलट कवितेच्या पाठांत समुद्राची खोली किंवा पर्वताची उंची शोधण्यांत बुद्धि खर्च करून नीरस जीवन करून घेऊं नये. कवितेचा समन्वय भूगोलाच्या पाठाशीं जोडणें नैसर्गिक आहे असें सांगणारे कित्येक लोक भेटतील. या लोकांना काव्य कशाशीं खातात हें माहीत नाहीं, काव्य शिक्षणाच्या हेतुशीं ओळख नाहीं, काव्य शिक्षणाच्या परिणामाची ददात नाहीं असेंच निदर्शनास येण्याचा संभव आहे

कवितेचा गायनाशीं समन्वय जोडावा असें म्हणणारेही हरीचे लाल आहेत. कारण काय, तर म्हणे कविता गायची असते, कवितेची ओळख तिच्यांतील नाद माधुर्यानेंच प्रथम होते. कविता गायची असते हें खरें आहे. पण कविता गायची आहे म्हणून कोणी गायन शास्त्रावर कवितेच्या पाठांत प्रश्न विचारूं लागला तर हास्यास्पद होईल, वेडेपणाचें होईल, खुळेपणाचें होईल. असल्या खुळेपणास पद्य-पाठांत स्थान नाहीं. हें वेगळें सांगण्याची जरूरी आहे असें मला वाटत नाहीं.

कवितेचा चित्रकलेशीं फार निकटचा संबंध दाखविण्यांत येतो. कवितेमध्यें शब्दचित्रें असतात. चित्रकलेमध्यें रेखाचित्रें असतात. म्हणून कोणी म्हणेल कीं पद्य-पाठांत शिकवीत असतांना पद्यांतील काल्पनिक चित्रें फळ्यावर रंगवावीं तर तें योग्य होणार नाहीं. कवितेमधील चित्रें मनःचक्षुंनीं पाहावयाचीं असतात. फळ्यावरील चित्रें मनःचक्षुनीं बघावयाचीं असतात. पद्य-पाठांत चित्रांना किती मज्जाव आहे याची सकारण चर्चा पद्याचें पाठसाहित्यांत केली असल्यामुळें त्याची पुनरावृत्ति येथे करणें बरें दिसणार नाहीं, आणि त्याची आवश्यकताही नाहीं. कवितेचा चित्रकलेशीं अशा तऱ्हेचा समन्वय जोडणें अविचारीपणाचें आहे, अशास्त्रीय आहे, अयोग्य आहे, अनाठायीं आहे एवढें लक्षांत धरलें म्हणजे पुरें.

सर्वच विषयांच्या बाबतींत समन्वय साधण्याचा प्रयत्न केल्याचें अनेक वेळां हष्टोत्पत्तीस येतें. अशावेळीं अंकगणित, भूमिति यासारखे विषयही समन्वयाच्या तावडींतून सुटत नाहीं.

एक दोन तीन चार । सत झाले गोळा फार ।

पाच सहा सात आठ । धरा पंढरीची वाट ।

नऊ दहा अकरा बारा । वाटीं आहे मेळावा सारा ।

तेरा चौदा पधरा सोळा । सत वाळवटी झाले गोळा ।

अशा तऱ्हेचें काव्य रचून अंकगणिताशीं त्याचा समन्वय घालून विद्यार्थ्यांना अकज्ञान देण्याचा प्रयत्न कैक ठिकाणीं केला जातो. 'त्रिकोणास बाजू तीन । चार बाजूचा चौकोन' अशा तऱ्हेनें काव्य रचून भूमितीशींही पद्याचा संबंध दाखविला जातो. केवळ ट ला ट व प ला प जोडून काव्यनिर्मिति होत नाहीं. हें काव्य नसून काव्याची थट्टा आहे, चेष्टा आहे, विडंबन आहे हें कोणाच्याच ध्यानांत येत नाहीं. त्यामुळें पाठांत कृत्रिमता येते, निर्जिवता येते. त्याची मनोरंजकता वाढण्याऐवजीं कमी होते. पाठांतील वातावरण बिघडतें. विषय ग्रहण करण्याकडे दुर्लक्ष होऊन टिवल्याबावल्या करण्यास मुलांना संधि मिळते, त्यांच्या विदुषकी चाळ्यांना ऊत येतो.

पद्याचा कधीं कधीं शारीरिक शिक्षणाशीं समन्वय घातला जातो, आणि असा समन्वय शक्य तेथें घालावा असाही प्रचार केला जातो. कारण काय तर म्हणे अभिनय-गीताचे प्रकारामध्यें मुलांना हावभाव करावयाचे असतात आणि ते करीत असतांना मुलांना साहजिकच व्यायाम होतो. हें स्पष्टीकरण ऐकल्यानंतर हसून हसून पोट दुखल्याशिवाय राहात नाहीं. असें म्हणणाऱ्याच्या ज्ञानाची कींव केल्याशिवाय राहावत नाहीं. पण लगेच शिक्षण क्षेत्रांतील बाजारी स्वरूपाचें चित्र डोळ्यापुढें येतें आणि मन विषण्ण होतें.

वरील विवेचनावरून एक सूत्र सर्वांचें ध्यानांत आलें असेल तें म्हणजे निरनिराळे विषय मनोरंजकतेनें शिकविण्याकरितां पद्याचा उपयोग जरूर करावा. पण पद्य-पाठांत इतर विषयांनीं कधींही लुडबुड करू नये. या सूत्राची निर्मिति सकारण आहे. जीवन हें एक काव्य आहे, गीत आहे. या जीवन-गीताचा निर्भेळ आनंद लुटावयाचा असेल तर त्यांत कोणतीही भेसळ होऊं देतां कामा नये.

पद्याचा निरनिराळया विषयांशीं समन्वय घालणें कसें अयोग्य आहे हें पाहिल्यानंतर त्याचें समवायपद्धतीमध्यें स्थान काय आहे याचा विचार केल्यास अनाठायीं होणार नाहीं. समवाय पद्धतीनें शिक्षण-क्षेत्रांत वावरणाऱ्या कित्येक लोकांना हादरे दिले आहेत, त्यांच्या विचारचक्रांना चांगलीच गति दिली आहे. केवळ भारतापुरतें बोलावयाचें झाल्यास समवायपद्धतीनें जेवढी क्रांति शिक्षण-क्षेत्रांत केली आहे तेवढी पूर्वीं कधीं झाली नव्हती, आणि पुढेंही होईल कीं नाहीं याची शंका वाटते. समवायपद्धतींची स्थापना शिक्षणशास्त्र व मानसशास्त्र यांतील अनुभवानें पटलेल्या महान तत्त्वांवर झालेली आहे. हीं तत्त्वें पूर्णपणें ओळखून, अभ्यासून समवायपद्धति अमलांत आणण्याचा मनापासून प्रयत्न झाल्यास यश दूर नाहीं असें वाटतें पण दुःखाची गोष्ट ही कीं कसलाच अभ्यास न करतां बरेचसे विरोधक तिच्यावर ताशेरे ओढतात आणि अभ्यासाचें वावडें असणारे बरेचसे ग्राहक तिची स्तुति करतात. अशा ग्राहकांचें ज्ञान इतकें अगाध असतें कीं, ते अभ्यासक्रमालाच पद्धति म्हणून संबोधतात. वर्धा शिक्षण योजनेलाच समवाय पद्धति म्हणून मानतात. वास्तविक वर्धा शिक्षण योजनेंत शाळांचा अभ्यासक्रम काय असावा हें मुख्यत्वेंकरून सांगितलें आहे आणि या योजनेंतील अभ्यासक्रम समवाय पद्धतीनें अमलांत आणावयाचा आहे याची पूर्ण कल्पना फार थोड्यांना असल्याचें दिसतें.

वर्धा-शिक्षण योजनेंतील बारीक सारीक गोष्टींच्या तपशिलात जाण्याचें येथें कारण नाहीं. जीवन-शिक्षण ( Basic Education ) सध्या मुख्यतः विणकाम, शेतीकाम, सुतारकाम या तीन मूलोद्योगाचें द्वारें द्याव-याचें असे या योजनेंत म्हटलें आहे, एवढेंच लक्षांत ठेविल्यास पुरें आहे. जीवन-शिक्षण द्यावयाचें तें यांपैकीं जो मूलोद्योग शाळेमध्यें सुरू केला असेल त्या मूलोद्योगातून समवाय पद्धतीनें द्यावयाचें. शाळेंतील भाषा, अंकगणित, इतिहास, भूगोल वगैरे विषय मूलोद्योगातून शिकवावयाचे. जीवनांत विविधता असूनही त्याच्या तळाशीं जशी एकता आहे, तशीच या सर्व विषयांमध्यें एकमेकांत व मूलोद्योगांत एकता आहे. या परस्पर एकात्मक नित्यसंबंधास अनुबंध किंवा समवाय संबंध ( Correlation ) असें म्हणतात. मूलोद्योग मध्यबिंदू कल्पून अनुबंधाच्या त्रिज्येनें काढ-लेल्या वर्तुळांत सर्व विषय समाविष्ट करून अनुबंधाच्या जोरावर त्याचें शिक्षण देणें म्हणजे समवायपद्धति आचरणांत आणणें होय. टकळीवर सूत काढण्याचाच पाठ घ्या. या पाठांत सूत कातणें या मुख्य धाग्याच्या आधारानें इतर विषयाची वीण वठवून जीवन-शिक्षणाचें वस्त्र विणावें लागणार. सूत कसें कातावयाचें याची माहिती अगोदर दिली जाईल. नंतर सूत कातावयास लागणारा कापूस कोठें पिकतो, त्याच्या पिकास हवा, पाणी, पाऊस, जमीन कशीं असावीं लागतात हें भूगोलाशीं संबंध जोडून सांगावयाचें. फार पूर्वींपासून सुताचा व कापडाचा धंदा कसा उर्जिता-वस्थेस होता, पुढें साळ्या-कोष्ट्याची बोटें तोडलीं गेल्यामुळें हा धंदा कसा बसला वगैरे इतिहास म्हणून सांगावयाचें. सुताची लांबी, जाडी सूतगुंड्यांची संख्या वजन यावरून सुताचा नंबर, सुताचा कस, सुताची समानता काढायास शिकवून अंकगणिताची ओळख करून द्यावयाची. टकळीच्या तबकडीवरून वर्तुळाची, तिच्या दांड्यावरून सरळ रेषेची, दांडा ज्या ठिकाणीं तबकडींत बसविलेला असतो त्यावरून वर्तुळाच्या मध्यबिंदूची ओळख करून देऊन भूमिति शिकवावयाची सूत काढीत असतां हवेंत

उडणाऱ्या कापसाच्या अणुपरमाणुवरून शास्त्र शिकवावयाचें. अणुपरमाणुचा घातक परिणाम सांगून आरोग्यशास्त्र शिकवावयाचें. तसेंच स्वच्छता सफाईवरून नागरिकशास्त्र शिकवावयाचें, 'टकळी फिरे गरागरा, सूत निघे भराभरा' अशा सारख्या कवितावरून सुताच्या धाग्याचा संबंध भाषेशीं जोडावयाचा. असे अनुबंध पद्धतीच्या द्वारा विद्यार्थ्यांना ज्ञान दिलें म्हणजे तें वज्रलेप होतें, टिकाऊ होतें, हें महान् तत्त्व या पद्धतीच्या बुडाशीं आहे.

वरील विवेचनावरून स्पष्ट झालेंच असेल कीं अध्यापनांतील सर्वसाधारण समन्वय किंवा अनुबंध व समवाय पद्धतीमधील अनुबंध यांमध्यें जमीन अस्मानाचा फरक आहे. अध्यापनांतील संबंध साधतांना निरनिराळ्या विषयांशीं बरोबरीच्या नात्यानें तो साधला जातो. त्यांत एखादा मुख्य विषय किंवा एखादा गौण विषय असा उच्च नीच भाव नाहीं. एका विषयाचा दुसऱ्या विषयाशीं जेथें जेथें संबंध येत असे तेथें तेथें असा अनुबंध व्यवस्थितपणें दाखविला जाई. समवाय पद्धतीमधील अनुबंधाचें स्वरूप वेगळें आहे. तें अनियंत्रित राजसत्तेमधील वटहुकुमाप्रमाणें आहे. त्यामुळें तो जाचक वाटण्याचा संभव आहे. त्यांत मूलोद्योगास प्राधान्य देऊन त्याच्या अनुबंधानेंच इतर विषयांचें जमेल असें अध्यापन करावयाचें आहे. त्यामुळें मूलोद्योगाशिवाय इतर सर्व विषयांच्या अस्तित्त्वावरच गदा आली आहे असें वाटतें. या पद्धतीनें पद्यांचें स्वतंत्र अस्तित्त्वच नाहींसें झाल्याचा भास होतो. सूर्य-कुटुंबमालीकेंत सूर्यास जसें स्थान आहे तें अध्यापन-क्षेत्रांत समवाय पद्धतीस आलें आहे. सूर्याच्या तेजामुळें इतर ग्रह जसे निष्प्रभ झाले आहेत, निर्माल्यवत झाले आहेत तसेंच समवाय पद्धतीमुळें इतर अध्यायनपद्धति संपुष्टांत आल्या आहेत. सूर्य जसा चंद्राला तेज देऊन त्याचें जीवन समृद्ध करतो, तसा मूलोद्योग त्याच्या भोंवतालच्या विषयांना अनुबंधाचे करवीं संजीवनी देतो. समवाय पद्धतीचें हें वैशिष्ट्य समजल्यास त्यांच्या शिक्षणशास्त्रांचें मूळ समजलें असें मानणारे

विचारवंत पुष्कळ सांपडतात. समवायपद्धतीमधील अनुबंधाचा आततायीपणा चालूं देणें योग्य कीं अयोग्य याची चर्चा करण्याची येथें जरूरी दिसत नाहीं. कोणत्याही नवीन गोष्टीस सुरवातीस स्तुतिपाठक व विरोधक कमी अधिक प्रमाणांत असतातच. नवीन गोष्ट पटू लागली, पचनीं पडूं लागली म्हणजे आपोआप तिचा स्वीकार होऊन ती अजरामर होते. या उलट नवीन गोष्टीची बैठक एकांगी विचारसरणीवर अधिष्ठित असली, तिला नाविन्याचा नुसता बेगडी मुलांमा असला म्हणजे सरळपणानें विचार सुचू लागल्यानतर खोटा मुलामा उडून गेल्यानतर तिचें सत्यस्वरूप उघडें पडून तिचा योग्य तो सोक्षमोक्ष होणें अपरिहार्यच होऊन बसतें. समवायपद्धतीचें अध्यापन शास्त्रांतील भवितव्य निसर्गनियमानें ठरणारें असल्यामुळें त्याविषयीं अधिक ऊहापोह करण्याची आवश्यकता नाहीं.

समवाय पद्धतीनें खालचे वर्गांत घेतलेले बरेच पाठ मीं पाहिले. त्यांतील कांहीं पाठ उत्कृष्ट झाल्याचें निदर्शनास आलें. त्यांत दिलेलें ज्ञान मुलें कधींही विसरणार नाहींत अशी माझी ठाम समजूत आहे. पण बाकींच्यापैकीं बहुतेक पाठ निकृष्ट दर्जाचे झाले व त्यामुळें मुलांना ज्ञान न मिळतां त्यांच्या मनाचा गोंधळ उडाला असें प्रत्ययास आलें. असें होण्याचें कारण शोधू गेल्यास तें या पद्धतीच्या अवघड तत्रांत व शिक्षकाच्या कमी कुवतीमध्यें सांपडतें. समवायपद्धतीनें शिकविणें अतिशय अवघड आहे, त्याकरितां पहिल्या दर्जाची बुद्धिमत्ता लागते, अभ्यासू वृत्ति लागते, सतत उद्योग करण्याची संवय लागते. या गोष्टी सर्व शिक्षकांत हमखास आहेत असें छातीठोकपणे सांगतां येत नाहीं. ज्यांच्यामध्यें त्या आहेत त्यांचे समवाय पद्धतीचे पाठ उत्कृष्ट होऊन त्याबद्दल ते या पद्धतीची प्रशंसा करतात. ज्यांना या पद्धतीनें शिकविणें जमत नाहीं त्यापैकीं कांहीं आपल्यांतील वैगुण्य दडविण्याकरितां तिचें स्तोम माजवितात. स्तोम माजवतांना योग्य अनुबंध साधला जातो कीं नाहीं एवढें पाहण्याचें सुद्धां भान त्यांना राहात

नाहीं. कधीं कधीं यशस्वी शिक्षकही स्तोम माजविण्याच्या भरांत कशा घोडचुका करतात याच्या अनेक उदाहरणांपैकीं एखादें दिल्यास माझ्या म्हणण्याचा आशय चटकन् लक्षांत येईल. तुकारामाच्या अभंगावर पाठ होता तो. योग्य वातावरणांत पाठ घेतला जावा म्हणून शाळा सोडून मुलांना विठोबाच्या देवळांत आणलें होतें. फुलें, माळा, कापूर, उदबत्ती, झाडू, खादीचें पांढरें कापड वगैरे साहित्य पाठांत वापरलें गेलें. साफसफाईस वाव ठेवण्याकरितां देवाच्या गाभाऱ्यांत मुद्दाम थोडीशी घाण ठेवण्याची तजवीज अगोदरच झाली होती. साफसफाईनंतर टकळीनें आपलें भ्रमण सुरू केलें. देवळाच्या साफसफाईपासून अध्यात्माच्या तत्त्वज्ञानापर्यंत विषय हाताळले गेले. शिक्षक जन्मजात होता. पाठ उत्तम झाला. पण रसग्रहण करतांना 'गळा तुळशी माळा । कासे पितांबर' या ओळीवर 'विठोबा कोणतें वस्त्र नेसला होता ?' असा प्रश्न विचारला गेला. एका मुलानें तावडतोब उत्तर दिलें, 'पिवळें वस्त्र' म्हणून. त्याचें उत्तर चूक म्हणून सांगण्यांत आलें. मुलें गोंधळलीं, तरी त्यांनीं तेंच उत्तर पुन्हां पुन्हां दिलें. पीतांबराचा अर्थ मुलांना येत होताच. शिवाय पाठ इतका रंगला होता कीं पीतांबर परिधान केलेली विठोबाची मूर्ति मुलांच्या मनःचक्षुपुढें उभी राहिली असावी. अशा परिस्थितींत दुसरें उत्तर देणें अशक्य होतें. या चमत्कारिक अवस्थेंतून शिक्षकानें सुटका करून घेण्याकरितां, 'अरे वेड्यांनो, विठोबा पिवळें वस्त्र नेसला होता काय ! बघा तरी विठोबाकडे कोणतें वस्त्र नेसला आहे तो ! खादीचें पांढरें वस्त्र नेसला आहे ना !......इत्यादि' स्तोम माजविल्यामुळें उत्तम पाठ घसरला असा निरीक्षकांत सूर निघाला. तो अयोग्य होता असें म्हणतां यावयाचें नाहीं.

समवाय-पद्धतीविरुद्ध अनेक आक्षेप घेतल्याचें आढळून येतें. त्यांतील बरेचसे आक्षेप या पद्धतीची पुरेशी ओळख नसल्यामुळें घेतलेले

असावेत असा संशय येतो. हे आपोआप नाहींसें होण्याचा दाट संभव आहे. म्हणून त्यांची चर्चा येथें करण्याचें प्रयोजन नाहीं. सर्व आक्षेपांचें खंडन केलें तरी एका आक्षेपाचें खंडन करणें कठीण आहे. मूलोद्योग शिकविण्याच्या ओघांत संबंध येईल तसे इतर विषय पूर्णपणें शिकविणें शक्य आहे काय ? हाच तो आक्षेप आहे. या आक्षेपांत बरेंच तथ्य आहे असें अनुभवास येतें. खालच्या वर्गांत विषयाचें ज्ञान प्राथमिक स्वरूपाचें असल्यामुळें तेथें समवाय-पद्धति एखादेवेळीं यशस्वी होण्याचा संभव आहे पण वरचे वर्गांत जगाच्या जन्मापासून सांचलेलें ज्ञान द्यावयाचें असल्यामुळें तें मूलोद्योगाचे मार्फत देणें शक्य होईल कीं नाहीं याची शंका वाटते. अशा तऱ्हेनें ज्ञान देण्याचा प्रयत्न झाला पाहिजे असें वाटतें. या दिशेनें प्रयत्न न करतां जे टीकाकार बोचक भाषेंत बोलतात, वाक्प्रहार करतात, त्यांना त्यांच्याच भाषेंत सांगतां येईल कीं, जगाची निर्मिति शून्यांतून झाली आहे हें विसरतां कामा नये. शून्यापेक्षां समवाय-पद्धति कितीतरी पटीनें दृश्य व सुलभ गोष्ट आहे. प्रयत्न केल्यास काय साध्य होणार नाहीं ! निदान अशा प्रयत्नांना पूर्णपणें अपयश येईपर्यंत तरी टीकाकारांनीं सबूरीचें धोरण ठेवावें, गुपचुप बसावें.

समवाय-पद्धतीचें भवितव्य कांहीं ठरो. एक गोष्ट मात्र निश्चितपणें सांगितली पाहिजे कीं पद्य-पाठांत समवाय-पद्धतीस स्थान नसणें अधिक शास्त्रीय आहे, श्रेयस्कर आहे. पद्य जीवनाचा आनंद आहे, आल्हाद आहे, सौख्य आहे. हा आनंद पूर्णपणें चाखावयाचा असेल, हें सौख्य शेवटपर्यंत भोगावयाचें असेल तर पद्य-पाठांतील भेसळ थांबविली पाहिजे, समवायानें त्यांत उडवून दिलेला कहर कमी केला पाहिजे, त्याचा उडणारा बोजवारा संपुष्टांत आणला पाहिजे. हें इच्छित साध्य अनुबंधाच्या हकालपट्टीनें सुलभ होण्यासारखें आहे. अनुबंधाची हकालपट्टी पद्यांतून झाल्याशिवाय, शुद्ध पद्य-पाठपद्धतीचा पाठपुरावा केल्याशिवाय पद्याचें शिक्षण-क्षेत्रांतील स्थान सुरक्षित राहाणार नाहीं, त्याचें जीवनांतील स्थान अबाधित राहाणार नाहीं.

# १०. पद्याच्या आवडीचा विकास कसा करावा.

माणसास पद्याची आवड जन्मतःच असते. बाजेवरील मुलाचें लक्ष प्रकाशाकडे आपोआप वेधलें जातें. तसेंच तें आवाजामुळें चलविचल होऊन इकडेतिकडे बघून कान टवकारतें. आवाज फार मोठा असल्यास रडायास लागतें. मोठ्या आवाजास मुलानें भिऊ नये म्हणूनच कीं काय मूल जन्मल्याबरोबर ताट मोठ्यानें वाजविण्याची प्रथा बऱ्याचशा कुटुंबांत आढळून येते. मूल जरासें मोठें झाल्यानंतर गाणें म्हटल्यास तें ऐकत असतांना तें हातपाय नाचवतें, हातापायांनीं ठेका धरतें याचा अनुभव कित्येकांना असेल. मुलाचें कर्णेंद्रिय तें जन्मल्याबरोबर काम देऊं लागतें असें नाहीं तर तें गर्भाशयांत असतांना काम देत असतें असें दिसतें. गरोदर स्त्रीनें एकदम एखादा कर्कश आवाज ऐकला तर तिच्या पोटांतील जीव हालचाल करावयास लागतो. सुभद्रेला पहिल्या बाळंतपणाकरितां श्रीकृष्ण रथांतून आपलें घरीं आणीत असतांना ते तिला तिच्या विनतीवरून भारतीय युद्धाची गोष्ट सांगूं लागले. चक्रव्यूहाच्या भेदापर्यंत त्यांनीं गोष्ट सांगून सुभद्रा झोपली आहे असें पाहून ती मध्येंच थांबविली. गर्भाशयांतील अभिमन्युनें ती ऐकली, पण ती अर्धवटच ऐकल्यामुळें पुढें युद्धांत त्याला चक्रव्यूह भेदतां आला, पण त्यांतून बाहेर पडतां आलें नाहीं, ही गोष्ट प्रसिद्ध आहे. गर्भाशयांतील जीवावर आवाजाचा परिणाम होतो याचें हें एक ठळक व असामान्य उदाहरण आहे. जीवाच्या इच्छतीशीं स्मृतीचाही संबंध जोडलेला आहे. जीवाला ही स्मृति राहाते किंवा नाहीं याबद्दल प्रश्न असून त्यावर संशोधन करणें आवश्यक आहे. पण गर्भाशयांतील जीवावर आवाजाचा परिणाम होतो हें मानसशास्त्रज्ञांनीं सिद्ध केलें आहे. संशोधनाचा हा निर्णय पाहिल्यानंतर डोहाळीं गीतें गरोदरपणीं म्हटलीं जाण्याची प्रथा कां पडली असावी याचा उलगडा होतो. तसेंच गरोदरपणांत स्त्रीस होडीवर बसवून गाणीं म्हणणें किंवा

चादर्णे जेवण करून गाणीं म्हणणें या चालीरीतींची उपयुक्तता ध्यानांत येते. यावरून जीव पोटांत सामावल्याबरोबर त्याच्यामध्यें गीताची आवड उत्पन्न होते, माणसांत गाण्याची आवड उपजतच असते, हें स्पष्ट होतें. माणसामध्यें ही आवड नव्यानेंच उत्पन्न करावयाची नसते, ती त्याच्यामध्यें मूळचीच असते.

माणसामधील गीताविषयींची ही नैसर्गिक आवड केव्हां वाढीस लावावयाची, तिचा विकास केव्हां करावयाचा हा प्रश्न शिक्षकांपुढें प्रथम उभा राहातो. या प्रश्नाचें उत्तर फार सोपें आहे. पद्याच्या आवडीचा विकास करण्यास बाल्यावस्था हा फार अनुकूल व सोईचा काळ आहे. कवितेमधील कल्पना बालकांच्या कल्पनाशक्तीस रिझवितात, तिच्यांतील भावना त्यांच्या भावनाविवश अंतःकरणाचा ठाव घेतात. कवितेंतील नादमाधुर्यानें त्यांचीं बालमनें हर्षभरानें डोलूं लागतात. बाल्यावस्था ही माणसाच्या जीवनांतील अतिशय सुखदायी अवस्था आहे. तिला आईबापाच्या सानिध्याची सावली असते, बहीण-भावाच्या प्रेमाची पाखर असते, मित्रांच्या निर्व्याज प्रेमपूर्ण मैत्रीचा ओलावा असतो. पुढें येणाऱ्या हालअपेष्टांची, खाव्या लागणाऱ्या ठेंचांची व टक्या-टोणप्यांची या वयांत त्यांना कांहींच कल्पना नसल्यामुळें बाल्यावस्थेंतील सौख्य द्विगुणीत होतें. बाल्यावस्था जीवनाची पहाट आहे. या पहाटेच्या कोंवळ्या किरणांत, शीतळ झुळकींत जीवनाची किलबिल गोड लागते, जीवनाची कुजबुज मधुर वाटते. म्हणून पद्याच्या आवडीचा विकास करण्यास बाल्यावस्था हाच योग्य काळ आहे असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं.

पद्याच्या आवडीचा विकास बाल्यावस्थेंत करावयाचें ठरल्यानंतर तो विकास कसा करावयाचा हा प्रश्न सोडविणें आवश्यक आहे. पद्याच्या आवडीचा विकास अनेक उपायांनीं करतां येण्यासारखा आहे. पण ते सर्वच मार्ग सारखेच परिणामकारक असतील असें नाहीं, ते सर्वच उपाय

व्यवहार्य ठरतील असें नाहीं. म्हणून शालेय वातावरणांत शिक्षकांनीं कोणत्या मार्गांचा अवलंब करावा, कोणत्या उपायांची योजना करावी हेंच प्रामुख्यानें आपण पाहिलें पाहिजे. या दृष्टीनें पाहिल्यास शिक्षकानें योग्य वेळीं योग्य कविता आकर्षक चालीवर नमुनेदार पद्धतीनें म्हणून मुलांवर अविस्मरणीय परिणाम घडवून आणणें हा सर्वांत उत्तम मार्ग. पालकांचें खालोखाल शिक्षक मुलांचें सांनिध्यांत मोठ्या प्रमाणांत असतो. मुलें आईबापाइतकेंच शिक्षकावर प्रेम करीत असतात, कांहीं बाबतींत तर तीं आईबापापेक्षांही शिक्षकावर अधिक प्रेम करतात. त्याला देवासमान लेखून त्याच्या वाटेल त्या शब्दावर विश्वास ठेवतात. तो सांगेल तसें करावयास तयार असतात. त्याचें अन्धानुकरण कळत न कळत तीं करीत असतात. या योग्य परिस्थितीचा शिक्षकानें फायदा घेतल्यास मुलांमधील पद्याच्या आवडीचा विकास हां हां म्हणतां होईल.

शिक्षकाच्या गाण्याचा जेवढा परिणाम मुलांवर होतो जवळ जवळ तेवढाच परिणाम मित्रांच्या गाण्याचा त्यांचेवर होत असतो. मुले मित्रांना जितकें मानतात तितकें इतरांना क्वचितच मानत असतील. मित्रांच्या गुणाची ते जितकी वाहवा करीत असतील तितकी इतरांच्या गुणांची क्वचितच करीत असतील. मित्रांच्या यशानें त्यांना जेवढा अभिमान वाटत असेल तेवढा इतरांचे बाबतींत कदापि वाटत नाहीं. तेव्हां मित्रांच्या तोंडून सुस्वर, सुमधुर गीतें त्यांनीं ऐकलीं तर त्यांच्यामधील पद्याची आवड सहजासहजीं विकसीत होईल याकरितां शिक्षकानें वर्गांतील गोड गळा असणाऱ्या मुलांना मधून मधून कविता म्हणण्यास सांगणें योग्य होईल.

शिक्षकानें कविता म्हटली काय किंवा मुलांनीं कविता म्हटली काय ती दुसऱ्यांनीं केलेली कविता असते हें विसरतां येत नाहीं. दुसऱ्याची कविता कितीही चांगली गायली, कितीही तन्मय होऊन म्हटली, तरी

तिच्यांतील भाव ती कविता कवीनें म्हटल्यानंतर जितके उत्कटतेनें उठतील तितके तें इतरांना उठवतां येतील असें वाटत नाहीं. कवितेला जन्म देणाऱ्यास जितकी तिची पूर्ण कल्पना असते तितकी इतरांना असणें संभवत नाहीं. पद्याच्या प्रसूती वेदना ज्यांनीं भोगल्या आहेत, सहन केल्या आहेत त्यांनाच त्याच्या प्रकृतीचा अंदाज पुरेपुर येतो, त्याचें महत्त्व पूर्णपणें कळतें. इतरांना नाहीं. म्हणून कविमुखांतून कविता ऐक-ल्यास तिचा परिणाम ऐकणारांवर विशेष होतो. कवीला गोड गळा असो वा नसो त्याच्या काव्यगायनाचा परिणाम ऐकणाऱ्यावर झाल्याशिवाय राहात नाहीं. अंतरीचे बोल अंतःकरणाला हालवून सोडल्याशिवाय राहात नाहींत. तेव्हां संधि मिळेल तेथें कवीच्या तोंडून मुलांना कविता ऐकवि-ल्यास त्यांची कवितेविषयींची उपजत आवड वाढीस लागल्याशिवाय राहात नाहीं.

कवींच्या काव्यगायनाचे कार्यक्रम शाळांतून वरचेवर व्हावयास पाहिजेत. त्याकरितां काव्यमंडळाची आवश्यकता आहे. काव्य-मंडळामार्फत असे कार्यक्रम सहजासहजीं उरकतां येतात. म्हणून काव्यमंडळाची स्थापना शाळांतून व्हावयास पाहिजे. काव्य-मंडळें स्थापण्यांत शिक्षकांनीं अगोदर भाग घ्यावयास पाहिजे. अशीं मंडळें स्थापून झाल्यावर शिक्षकांनीं आणखी एक मोठी कामगिरी बजावली पाहिजे. त्यांनीं आपल्या ओळखी पाळखीचा उपयोग करून नामांकित कवींना काव्यमंडळामध्यें आणलें पाहिजे. मुलें लहान असल्यामुळें व त्यांची ओळख बाहेरच्या जगांत कमी असल्यामुळें भीड खर्चून कवींना आणण्याची कामगिरी शिक्षकांनींच मुख्यत्वेंकरून पार पाडली पाहिजे.

काव्य-मंडळें स्थापल्यानंतर त्यांत काव्य-गायनाचे कार्यक्रम होतीलच. पण केवळ अशा मंडळांत काव्य गायनाचे कार्यक्रम करून भागणार नाहीं. इतर ठिकाणींही असे कार्यक्रम होणें अत्यावश्यक आहे.

सभासमारंभांतून असे कार्यक्रम व्हावयास पाहिजेत. पुष्कळवेळां सभा-संमेलनांतून झालेल्या काव्यगायनाचा परिणाम काव्यमंडळांत झालेल्या काव्यगायनापेक्षां अधिक खोल व टिकाऊ झाल्याचा अनुभवास येतें. या इष्ट परिणामाचीं कारणें उघड आहेत. एकतर अशा सभा-समेलनांतून श्रोतृगण मोठ्या समुदायानें हजर असतो. मनुष्यप्राणी जात्याच सङ्घप्रिय आहे, समाजप्रिय आहे. आनंदाची लयलूट त्याला समाजाच्या सान्निध्यांतच मन मानेल तशी करतां येतें; एकट्याला मोठ्या प्रमाणांत ती करतां येत नाहीं. म्हणूनच मोठ्या समुदायांत बसून ऐकलेल्या गाण्याची गोडी अवीट ठरते. दुसरें असें कीं अशा सभा-समेलनांतून गाणें म्हणणाऱ्यांचे चाहातेही असतात. ते आपल्या मित्रांच्या काव्य-कसबाची तारीफ करतात. अशी तारीफ झाल्यानंतर, वाहवा झाल्यानंतर गाणें म्हणणाऱ्यांना तर प्रोत्साहन मिळतेंच, पण न म्हणणाऱ्यांनाही तें म्हणण्याची आवड उत्पन्न होते. अशी आवड उत्पन्न झाल्यानंतर ते कळत न कळत गाणें गुणगुणूं लागतात.

पद्याची आवड वाढीस लावण्यासाठीं ग्रामोफोन व रेडिओ यांचाही उपयोग करतां येण्यासारखा आहे. ग्रामोफोन व रेडिओ यांचा प्रसार मोठ्या प्रमाणांत होत आहे. ग्रामोफोन जरी शाळांतून कमी प्रमाणांत दिसत असले तरी रेडिओ बहुतेक शहरीं शाळांतूनच नव्हे तर खेड्यांतील मोठ्या शाळांतून झळकूं लागले आहेत. ग्रामविकास योजना जसजशी यशस्वी होईल तसतसे रेडिओ खेड्यापाड्यांतून अधिक प्रमाणांत दिसून येतील. रेडिओवर काव्यगायनाचे कार्यक्रम अधूनमधून होतातच. असें कार्यक्रम मुलांना ऐकविले पाहिजेत. त्याकरितां रेडिओवर होणाऱ्या काव्यगायनाच्या कार्यक्रमाची संख्या वाढवावी लागेल. तसेंच अशा कार्यक्रमांची वेळ शाळेस सोईची होईल अशी ठेवावी लागेल. रेडिओवर काव्यगायनाच्या ध्वनिमुद्रिकाही योग्य वेळीं लावतां येण्यासारख्या आहेत.

ज्या शाळेंत ग्रामोफोन आहेत त्यांत काव्यगायनाच्या ध्वनिमुद्रिकांचा उपयोग शाळेच्या सोईनुसार केव्हांही करतां येईल.

काव्यगायन ऐकून काव्याच्या आवडीची एकदां वाढ होऊं लागली कीं तिची पूर्ण वाढ होण्याकडे दृष्टि वळविली पाहिजे. अशी वाढ अनेक प्रकारांनीं करतां येण्यासारखी आहे. पण त्यांतील दोन प्रकार शाळेंत अनुसरण्यासारखे आहेत. त्यांतील पहिला प्रकार म्हणजे मुलांना कवितांचा संग्रह करावयास सांगणें. कवितांचा संग्रह करण्यास सांगतांना कांहीं गोष्टी लक्षांत ठेवणें आवश्यक आहे. केवळ कवितांचा संग्रह करावयाचा म्हणून तो करण्यास सांगणें योग्य होणार नाहीं. त्यांत मुलें रमणार नाहींत. कवितांचा संग्रह करण्यास सांगतांना मुलांना त्याबद्दल गोडी वाटली पाहिजे. मुलांना त्याबद्दल पोटतिडिक उठली पाहिजे. अशी पोटतिडिक उठावी असें वाटत असेल तर मुलांना ज्याच्याविषयीं प्रेम वाटतें, सहानुभूति वाटते अशा विषयांवरील कवितांचा संग्रह प्रथम करावयास सांगितला पाहिजे आईसारखी अधिक प्रिय वस्तु जगांत दुसरी नाहीं. तेव्हां 'आईवर' निरनिराळ्या कवींनीं केलेल्या कविता मुलांना गोळा करण्यास सांगितल्यास तीं हां हां म्हणतां तें काम करतील. तसेंच जरा जाणत्या मुलांस 'मायभूमी'वरील कवितांचा संग्रह करावयास सांगितल्यास तींहि त्या कविता शोधण्याकरितां शेंकडो काव्यसंग्रह पालथे घातल्याशिवाय राहाणार नाहींत.

काव्य-संग्रह करीत असतांना अनेक कविता मुलांच्या वाचनांत येतात, त्यांतील खाचाखोंचा त्यांना कळतात, त्यांचें रसग्रहण तें सहजासहजीं करतात. असें होऊं लागल्यानंतर त्यांना काव्य करण्याची खुमखुमी येते, सुरसुरी येते. काव्य करण्याची इच्छा त्यांच्यांत उत्पन्न झाल्यानंतर त्यांच्या इच्छापूर्तीची सोय करणें आवश्यक होऊन बसतें. अशी सोय वर्गाच्या किंवा शाळेच्या हस्तलिखित मासिकांतून सहज

होण्यासारखी आहे. अर्थात् अशा हस्तलिखितांतून सर्व मुलांच्या कविता येण्याची अपेक्षा करणें योग्य होणार नाहीं. काव्याचा परिणाम सर्व मुलांवर सारखा होणें शक्य नाहीं. ज्या प्रमाणांत काव्यशक्ति त्यांच्यामध्यें असेल त्या प्रमाणांतच ती प्रत्ययास येईल. तसेंच मुलांच्या या कविता मोठया उच्च काव्याचे नमुने म्हणून पुढें मांडण्याची हौव कोणी धरू नये. काव्य करण्याची सवय लावण्यापुरताच हस्तलिखिताचा उपयोग आहे हे डोळ्यांआड होतां कामा नये.

शिक्षकानें स्वतः कविता म्हणणें, मुलांना कविता म्हणावयास लावणें, कवीच्या तोंडून कविता ऐकविणें, हस्तलिखित मासिकांतून कविता करण्यास मुलांना प्रोत्साहन देणें, वगैरे कवितेच्या आवडीच्या विकासाचे सर्वमान्य प्रकार आहेत. या शिवाय दुसऱ्या अनेक प्रकारांनीं कवितेच्या आवडीची वाढ करतां येते असें अनेकवेळां प्रतिपादिलें जातें. पण हे दुसऱ्या तऱ्हेचे प्रकार बरेच वेगडी स्वरूपाचे असल्यामुळें, नाटकी असल्यामुळें त्याज्य वाटतात. यांपैकीं एका प्रकारांत असें सांगितलें जातें कीं कविता गायनाबरोबर नाट्याभिनयाचे प्रकार विद्यार्थ्यांकडून करवून घ्यावेत. कविता गायनाबरोबर नाट्याभिनय विद्यार्थ्यांकडून करून घेण्यास हरकत नाहीं. पण असा नाट्याभिनय सर्व कवितांच्या बाबतींत करतां येईलसें दिसत नाहीं. तसेंच लहानमोठया सर्व बाबतींतही तो करतां येणें अशक्य आहे. दुसरें असें कीं असा नाट्याभिनय जरी सर्व कवितांच्या बाबतींत व सर्व विद्यार्थ्यांच्या बाबतींत शक्य कोटींतला आहे असें मानलें तरी त्यामुळें कवितेच्या आवडीचा विकास कसा होईल तें कळत नाहीं. अशा नाट्याभिनयामुळें फार तर नाट्याविषयींची मुलांची आवड द्विगुणित होईल, नाट्यीकरण मुलांना प्रिय वाटेल; कवितेची आवड द्विगुणित होण्याचें कारण नाहीं.

कवितेची आवड निर्माण करून ती वाढीस लावण्यासाठीं मुलांना

कवीबद्दल माहिती सांगावी, त्यांना कवि-चरित्र सांगावें असेंही कांहींच्या कडून म्हटलें जातें. कवि-चरित्रानें कवितेच्या आवडीची वाढ कशी होईल हा मोठा विवाद्य प्रश्न आहे. कवीची माहिती ऐकल्यानें त्याची कविता वाचण्याचा मोह मुलांना होईलच असें वाटत नाहीं. दुसरें असें कीं सर्वच कवींच्या आयुष्यांत विशेष घटना घडलेल्या असतीलच असें नाहीं. आणि ज्या कांहीं घटना घडल्या असतील त्यामुळें कवींबद्दल जिव्हाळा, प्रेम, आपलेपणा निर्माण होईलच असेंही नाहीं. तसेंच कवीच्या आयुष्यांतील सर्वच घटना मुलांना सांगण्यासारख्या असतील असेंही नाहीं. कथा-कादंबऱ्या-नाटकें वगैरे ललित वाङ्मयाचे प्रकार चाळले तर त्यांतून बऱ्याच ठिकाणीं कवि हा टिंगलीचा विषय झाला असल्याचें निदर्शनास येतें, तो चेष्टेचा विषय बनल्याचें दिसतें, तो टीकेचें स्थान झाल्याचें प्रत्ययास येतें. व्यवहारांत सुद्धां कवीविषयीं उपहासात्मक बोललें जातें, कुटाळकीच्या सुरांत बोललें जातें असें असतांना कवि-चरित्राचा परिणाम मुलांच्या मनांवर फारसा होईल असें वाटत नाहीं. कवीविषयीं माहिती सांगत असतां कोणती माहिती सांगावयाची व कोणती सांगावयाची नाहीं, फार सांगावयाची कीं कमी सांगावयाची, या सांगण्याचा परिणाम इष्ट होईल कीं अनिष्ट होईल याविषयीं विचार करून वेळ वाया दवडण्याऐवजीं त्याच्या कवितेचें गायन करून मुलांची कवितेची आवड वाढीस लावणेंच श्रेयस्कर.

कवितेची आवड वाढीस लावण्यासाठीं आणखी एक ठोकळेबाज उपाय सुचविला जातो. तो म्हणजे कविता-खोलीची निर्मिति. या उपायास ठोकळेबाज म्हणण्याचें कारण असें कीं तो विचारपूर्वक सुचविलेला नाहीं. इतिहासाचे अध्यापक-प्राध्यापक इतिहास खोलीची सूचना करतात. भूगोलाचे अध्यापक-प्राध्यापक भूगोल-खोलीची तरफदारी करतात. म्हणून कविता-प्रिय शिक्षकांनीं कविता-खोलीची मागणी करावी

यांतलाच हा प्रकार दिसतो. थोडा बारकाईनें विचार केला तर आम्ही शिक्षणतज्ज्ञ म्हणविणारे लोक किती विचारहीन असतो, किती बिनडोकपणें वागतो व बोलतो, किती कमालीच्या मूर्खपणाच्या सूचना करतो हें या मागणीवरून सहज स्पष्ट होतें. विषयाच्या स्वतंत्र खोलीचें खूळ हें एक-प्रकारें आमच्या शिक्षणाच्या होत चाललेल्या खेळखंडोबाचें ठळक उदाहरण आहे, असें म्हटल्यास अतिशयोक्ति होईलसें वाटत नाहीं. विषयांच्या स्वतंत्र खोल्यांची मोजदाद केली तर शाळेची एक मोठी वसाहत होईल. आणि या स्वतंत्र खोल्यांच्या गलबल्यांत वर्ग-खोल्यांना कोणीच धनी उरणार नाहीं. चित्रकला अगदींच वेगळा विषय अस-ल्यामुळें आणि त्याच्या साधनसामुग्रीमध्यें कमालीचा फरक असल्यामुळें त्याला शालागृहांतील हवेशीर व सुप्रकाशित हॉल केव्हांच बहाल केलेला आहे. शास्त्राची जात जरा उच्च व भिन्न मानली गेल्यामुळें त्याची सोयही भव्य व सोईस्कर हॉलमध्यें होऊन त्याला लॅबोरेटरी असें नामा-भिधान प्राप्त होऊन त्याचा सवतासुभा सर्वांनीं मान्य केला आहे. इतिहास व भूगोल यांच्या स्वतंत्र खोलीच्या मागणीची पिपाणी वर्षानुवर्षें वाजत राहिल्यामुळें शक्य तेथें त्यांनाही निरनिराळ्या ठिकाणीं जानोसा मिळाला आहे. शिवणकला, गानकला आणि सूतकातकाम, वीणकाम, सुतारकाम वगैरे मूलोद्योगांचें स्थान आधुनिक शिक्षण-क्षेत्रांत एखाद्या लाडक्या जावईबुवाप्रमाणें असल्यामुळें त्यांचा संसार निरनिराळ्या खोल्यांमध्यें बिनबोभाट थाटला जात आहे. मूलोद्योगाचा हा सुखाचा संसार सहन होत नाहीं म्हणूनच कीं काय अंकगणित-भूमिती सारख्यांच्या पोटांत दुःखाचा गोळा उठून तीं आपल्या कमतरतेची टिमकी वाजवीत आहेत. त्यांत आणखी भर पडली कवितेची. कवितेलाही गद्यापासून फारकत घेऊन वेगळा संसार थाटण्याची इच्छा झाली आहे. कारण गद्यांत काव्यात्मक कांहींच नाहीं. अर्थात्‌च गद्याला आपोआप वेगळी खोली मिळण्याचा संभव आहे; निदान तशी मागणी होण्याचा संभव आहे.

गद्याच्या या मागणीची पूर्तता होते न होते तोंच व्याकरणासही आपल्या हक्काची जाणीव होणें साहजिक आहे. नव्हे गद्यालाच त्याचें सानिध्य पसंत पडणार नाहीं. कारण व्याकरण फार दक्ष आहे. शिवाय व्याकरणालाही आपल्या विद्वत्तेचा आणि मोठेपणाचा तोरा मिरवावयाची लहर येणारच. अशा सर्व विषयांना व पोटविषयांना स्वतंत्र खोल्या बांधावयाच्या झाल्यास शालागृहाला एखाद्या ओसाड गांवाचें स्वरूप यावयास उशीर लागणार नाहीं. कारण या ओसाड गांवांतील कित्येक घरांत कधींकाळींच दिवा लागावयाचा. आणि कांहीं घरांत तो कधींच लागण्याची आशा नाहीं. वर्ग-खोल्यांत असा दिवा कधींच लागणार नाहीं. कारण त्यांचा उपयोगच राहणार नाहीं. सर्व विषयांना स्वतंत्र खोल्या झाल्यानंतर वर्ग-खोल्या धूळ खात रिकाम्याच पडणार. वर्ग-खोल्यांची दैन्यावस्था काल-महिमाच्या फसव्या चौकटींत जरी बसविली तरी असा प्रश्न उपस्थित होतो कीं हें आम्हाला परवडणारें आहे काय ! एकीकडे विद्वान् व जबाबदार शिक्षणतज्ज्ञांनीं म्हणावयाचें कीं आमचा भारत गरीबांचा देश आहे, आम्हाला भव्य शालागृहें परवडणार नाहींत, आम्ही झोपडींतून शिक्षण देऊं. चावडी, धर्मशाळा, देवळें, मशिदी यांच्यांत शाळा भरवूं, एवढेंच काय पण झाडाखालीं वर्ग शिकवूं. आणि दुसरीकडे त्याच तोंडानीं म्हणावयाचें कीं आम्ही गरीब असलों तरी आम्हाला प्रासादतुल्य शालागृहें पाहिजेत, त्यांत प्रत्येक विषयाचें बादशाही थाटाचे दिवाणखाने पाहिजेत, ते नानाविध, आवश्यक व अनावश्यक साहित्यांनीं सजविले पाहिजेत. असे आम्ही विचारी शिक्षणतज्ज्ञ, विद्वान् शिक्षणतज्ज्ञ, मुलांना मार्गदर्शन करणार, राष्ट्राचा उद्धार करणार, जगाला सुखी करणार !

आम्हा शिक्षणतज्ज्ञांच्या विचारांतील ही विसंगतता केवळ पैशाच्या अभावीं आलेली आहे असें नाहीं. तत्त्वांचाही त्यांत अभाव आहे. हे

विचारवंत म्हणवून घेणारे शिक्षणाचे रखवालदार व बाटाडे एकदां असें म्हणतात कीं शिक्षण हें एक आहे. तें अनुबंधानें गुफलें आहे. त्यांत विषयांचे कप्पे पाडतां कामा नये. असे कप्पे पाडल्यास शिक्षणाच्या एकतेस बाध येतो. त्यामुळें खऱ्या शिक्षणाची ओळख होण्यास कठीण जाते. आणि दुसऱ्याच क्षणीं हेच विचारवंत शिक्षणाच्या एकतेची चिरफाड करून त्याचे कृत्रिम कप्पे पाडण्याचा कटाक्षानें प्रयत्न करतात. शिक्षणतज्ज्ञांची तत्त्वनिष्ठा ही अशी आहे !

कविता-खोलीची नुसती सूचना करून आम्ही शिक्षणतज्ज्ञ गप्प बसलों असतो तर निदान झाकली मूठ सव्वा लाखाची तरी राहिली असती. पण पांडित्याच्या फापड पसाऱ्यांत ज्ञानाचा एवढा कैफ आम्हांला चढलेला आहे कीं या खोलीच्या सजावटीची बारीक सारीक माहिती द्यावयाचा मोह आवरता आला नाहीं. आणि त्यामुळेंच आम्ही पुरे उघडे पडलों, आमच्या पांडित्याची पूर्ण कल्पना येण्यास मदत झाली, आमच्या बुद्धिमत्तेची महति कळली, आमच्या अभिजात विचारसरणीची पातळी समजली. कवितेच्या खोलीची सजावट करण्याकरितां आम्हास फक्त दोन गोष्टी सुचल्या. एक कवींचीं छायाचित्रें व दुसरा काव्य-ग्रंथ-संग्रह. या दोन गोष्टी सोडल्यास तिसरी गोष्ट सुचली नाहीं. बरें या सुचलेल्या गोष्टी वाजवी असत्या तर तक्रारीचें कांहीं कारण नव्हतें. पण तशाही त्या नाहींत. कवींचीं छायाचित्रें भिंतीवर टांगल्यानें खोलीची सजावट कितपत चांगल्या तऱ्हेची होईल हा मोठाच प्रश्न आहे. कवींच्या छायाचित्रांची सूचना करतांना सगळेच कवि मदनाचे पुतळे असतात असें गृहीत धरलें असल्यास न कळे. तसे ते असले तर खोलीला कांहींशीं शोभा येईल हें नाकबूल करून चालणार नाहीं. पण अशीं छायाचित्रें वर्ग-खोल्यांत टांगलीं तर तेथेंही तीं चांगलीं दिसतील; इतर विषयांच्या पाठसाहित्याच्या सांनिध्यांत त्यांचें सौंदर्य कमी होण्याचें कारण नाहीं. पण निर्जीव

छायाचित्रांनासुद्धां जगापासून दूर दूर स्वतंत्रपणें विहार करण्याची आवड असल्यास त्याविरुद्ध कोणालाच कांहीं म्हणतां येणार नाहीं. काव्य-ग्रंथ-संग्रहाची तीच गत. काव्य-ग्रंथांना शाळेच्या वाचनालयांत मानाचें स्थान आहे. त्यांचें तें स्थान हिरावून घेण्याचा कोणी प्रयत्न करीत नाहीं. उलट अल्पसंख्यांकाला दिलेल्या विशेष हक्कांनीं त्यांचें मानाचें स्थान अढळ झालें आहे. इतर विषयांच्या ग्रंथ-संपत्तीच्या मानानें काव्य-संपत्ति फारच तोकडी पडते. या संपत्तीची वाढ पूर्वीपेक्षां झपाट्यानें होत असल्याचें दिसत असलें तरी इतर विषयांच्या संपत्तीची वाढ इतकी अमाप आहे कीं तिची बरोबरी काव्याला कधींकाळीं करण्याची आशा करणें म्हणजे स्वतःची फसवणूक करून घेण्यासारखें आहे. अशा या नाजुक परिस्थितीमुळें काव्यग्रंथ शाळेच्या सर्वसामान्य वाचनालयांतच शोभून दिसतात, उठावदार दिसतात. इतर ग्रंथांपासून त्यांची फारकत करून कविता-खोलीचा एखादा कोपरा त्यांना दाखविला तर त्या कोपऱ्याच्या शोभेंत भर न पडतां काव्यग्रंथांचें वैभव मात्र कमी होण्याचा संभव आहे. कितीही मोठ्या माणसाला समाजानें एकदां झिडकारलें, वाळींत टाकलें, राष्ट्रानें हद्दपार केलें कीं त्याची किंमत शून्य होते. तद्वतच काव्यसंपत्ति कितीही मौल्यवान् असली तरी तिची किंमत ती सामान्य ग्रंथकोशांत राहिल्यानेंच टिकणार आहे. ती ज्ञान-भांडारापासून अलग केल्यानें तिच्या चाहत्यांना तिचा विशेष उपयोग न होतां तिचें मोल मात्र कमी होईल

वरील विचारसरणी शिक्षण-क्षेत्रांत वावरणाऱ्या विद्वानांना पसंत पडण्यासारखी असली तरी ते एकदम ती स्वीकारतील असें वाटत नाहीं. आणि असें होणें साहजिकच आहे. कोणाच्याही स्वत्वावर गदा आली म्हणजे असें होणें अपरिहार्य आहे. जीवापेक्षांही अधिक प्रेम आपल्या विचारांवर करणारे लोक आहेत जीवासाठीं प्रत्येकजण हातपाय खोडतो.

मग आपल्या विचारांचें मरण उघड्या डोळ्यांनीं पाहाण्याचें नशिबीं आलेल्या दुर्दैवी जीवांना तें कसें रुचेल! आपले विचार जगविण्याचा अट्टाहास ते जरूर करतील, त्यांना अमर करण्याची धडपड ते निश्चितपणें करतील. त्यांच्या पोतडींतील वातावरण निर्मितीरूपी सुठशेखरच्या मात्रेचा उपयोग गांगरलेल्या परिस्थितींत विशेष विचार न करतां ते बिनधोकपणें करतील. पण तिचा परिणाम होण्यासारखा नाहीं. कारण केवळ कवींचीं चित्रें लावल्यानें व चारदोन काव्यग्रंथ कपाटांत ठेवल्यानें योग्य वातावरण निर्मिति होते असें म्हणणें हास्यास्पद आहे. वर्गांच्या विविधरंगी जीवनांतून कवितेला उठवून बाजूस बसविणें म्हणजे काव्याच्या वातावरणाची निर्मिति न करतां अस्तित्वांत असलेल्या वातावरणास मूठमाती देण्यासारखें आहे. तेव्हां अशा मालेनें वातावरण मुळांतूनच उखडून टाकण्यापेक्षां निसर्ग-नियमापुढें मान तुकवून शांत राहाणें शहाणपणाचें होणार नाहीं काय ?

# ११. पद्याचा शिक्षक कसा असावा.

पद्याचा शिक्षक स्वतंत्र असावा. त्यानें निरनिराळ्या वर्गांना फक्त पद्य शिकवावें. पद्याच्या शिक्षकालाच पद्य परिणामकारकपणें शिकवितां येईल, इतरांना नाहीं. कारण पद्याचा शिक्षक व प्रत्यक्ष कवि यांच्यामध्यें फारच थोडें अंतर असतें. अशा तऱ्हेची भाषा शिक्षणतज्ज्ञांच्या तोंडीं रुजलेली दिसते. अशी भाषा वापरतांना सारासार विचार करून ती वापरली जात आहे असें अनुभवास येत नाहीं अशी भाषा वापरणें म्हणजे विषय-पद्धतींची नुसती तरफदारी करणेंच नव्हे तर तिचा बागुलबोवा केव्हांही आणि कोठेंही उभा करण्यासारखें आहे वर्गपद्धतीशीं तुलना करतांना विषय-पद्धतीमध्यें कांहीं फायदे आहेत हे निर्विवाद आहे. पण त्याबरोबरच त्यांत तोटेही आहेत हें विसरतां कामा नये. इतिहास, भूगोल, अंकगणित, शास्त्र, भाषा इत्यादि विषयांना स्वतंत्र शिक्षक वरचे वर्गांत असणें केव्हांही योग्य. पण पोटविषयांना ते असावेत असें प्रतिपादणें मनाला पटण्यासारखें नाहीं. आणि तसें तें पटलें तरी व्यवहारांत सहजासहजीं उतरवण्यासारखें नाहीं. भाषाविषयापुरतेंच बोलावयाचें झाल्यास गद्य, पद्य, व्याकरण, लेखन, वगैरे प्रत्येक पोटविषयाला त्यांतील स्वतंत्र तज्ज्ञ शिक्षक प्रत्येक शाळेंत नेमणें अशक्य कोटींतील वाटतें. कारण असे तज्ज्ञ शिक्षक मोठ्या संख्येनें उपलब्ध होणार नाहींत. पद्याच्या शिक्षकाचीच गोष्ट घ्या. पद्याच्या शिक्षकाला कवीचें हृदय पाहिजे, पद्याचा शिक्षक व कवि यांच्यामध्यें फार थोडें अंतर असलें पाहिजे, हें पद्य परिणामकारकपणें शिकविण्यासाठीं ठीक आहे. पण असे कवि-हृदय असलेले किती शिक्षक मिळू शकतील ? लाखों लोकांत हाताच्या बोटांवर मोजण्याइतके कवि आढळतात. कवीचें हृदय असणारे लोक कवींच्या संख्येच्या फार तर चौपट सांपडतील. हे सर्वच कवि-हृदयाचे लोक

शिक्षक बनतील असेंही नाहीं. आणि सर्व जरी शिक्षक झाले तरी ते हजारों शाळांमधून पद्य कसें शिकवूं शकतील ?

दुसरें असें कीं कांहीं शाळांना असे शिक्षक सुदैवानें लाभले तरी अशा शाळांतून पद्य परिणामकारकपणें सदासर्वकाळ शिकविलें जाईलच याची खात्री देतां येत नाहीं. कारण स्पष्ट आहे. माणूस कांहीं यंत्र नाहीं कीं त्यानें वाटेल तितक्या वेळां तेंच तेंच काम करीत राहावें शाळेच्या पांच सात तासांत निरनिराळ्या वर्गांत वर्षानुवर्षें केवळ पद्यच शिकवीत राहिल्यास शिक्षकास त्याचा कंटाळा येईल, त्याचा जीव आंबेल, त्याला शालेय जीवन असह्य होईल. असें झालें म्हणजे पद्याचें अध्यापन यशस्वी होण्याऐवजीं अव्यवस्थित होण्याचाच अधिक संभव आहे.

पद्याचे शिक्षक हजारोंनीं मिळतील व ते परिणामकारकपणें शिकवतील असें जरी थोडा वेळ मानलें तरी त्यांचा प्राथमिक शाळेंतील इ. १ ते ४ या खालचे वर्गांत कांहींच उपयोग होणार नाहीं. खालचे वर्गांत विषय-पद्धतीस स्थान नाहीं. तेथें वर्ग-पद्धतीच पाहिजे. तेव्हां पद्याच्या स्वतंत्र शिक्षकांविषयीं सूचना सर्व दृष्टींनीं सदोष आहे, अव्यवहार्य आहे, आणि म्हणून अग्राह्य आहे.

पद्य बहुतांशीं भावनांचा खेळ आहे. म्हणून तें शिकविणें इतर विषयांच्या अध्यापनाच्या दृष्टीनें अधिक अवघड आहे. आणि त्याकरितां योग्य शिक्षक पुरेसे मिळणेंही कठीण. मग ही कोंडी फोडायची कशी ? ही कोंडी फोडणें फारसें अवघड काम नाहीं. पद्य-पाठाचा बाऊ जरासा कमी केला, पद्याच्या शिक्षकाचा बागुलबोवा जरासा कमी केला कीं कोंडी फुटलीच म्हणून समजा. कवि किंवा कवि-हृदयाचीं माणसें कमी असलीं तरी माणसाला काव्याची आवड जन्मतःच असते. प्रत्येक माणसास कविता करतां येत नसल्या तरी दुसऱ्यांनीं केलेल्या कविता ऐकून तो आनंदीत होतो. दुसऱ्यांनीं केलेल्या कविता म्हणण्यांत तो कवीशीं

समरस होतो. या अर्थानें प्रत्येक माणूस कमी-अधिक प्रमाणांत कवि आहे. तेव्हां कोणीही कविता शिकवूं शकेल असें म्हटल्यास त्यांत फारसें चुकेल असें वाटत नाहीं. कोणीही कविता शिकविण्यासारखा असला तरी ती उत्कृष्टपणें शिकविण्यास माणसास कांहीं दक्षता घ्यावयास पाहिजे, कांहीं गोष्टी पाळल्या पाहिजेत, कांहीं गुण कमावले पाहिजेत. म्हणून कोणते गुण पद्याच्या शिक्षकामध्यें असले पाहिजेत याचाच विचार करणें श्रेयस्कर होईल.

माणसाची काव्याविषयींची आवड वृद्धिंगत करणारा पद्याचा शिक्षक असावा. त्यानें मुलांची कवितेविषयींची आवड तर वृद्धिंगत केलीच पाहिजे पण त्याबरोबरच स्वतःचीही आवड वाढीस लावली पाहिजे. पद्याच्या आवडीची वाढ गुरुशिष्यांत झाली तर नुसतें पद्याचें अध्यापन परिणामकारकपणें होईल असें नाहीं, तर गुरु-शिष्यांमधील अंतर कमी होऊन ते एकमेकांच्या जवळ येतील. असें झालें म्हणजे त्याचा इष्ट तो परिणाम शालेय वातावरणांत झाल्याशिवाय राहाणार नाहीं.

काव्याविषयींची आवड वृद्धिंगत करण्याकरितां पद्याचे शिक्षकानें प्रथम काव्यशास्त्राचा मनःपूर्वक अभ्यास करावयास पाहिजे. पद्याचें प्रयोजन काय, काव्यापासून निर्माण होणाऱ्या आनंदाचें स्वरूप कोणते, कवितेचे नवनवीन प्रकार कोणते, त्यांचें रचनात्मक वैशिष्ट्य काय वगैरे गोष्टींचा यथाशक्ति अभ्यास त्यानें केला पाहिजे. तसेंच अलंकार व वृत्तशास्त्र यांची त्यास आवश्यक तेवढी माहिती हवी. काव्याचा इतिहास व त्यांत बदलत्या काळाबरोबर होत गेलेले फरक यांचे, स्थूलमानानें का होईना, पण त्यास ज्ञान हवें. प्राचीन व अर्वाचीन कवींच्या काव्याचा तुलनात्मक दृष्टीनें अभ्यास करून त्यांतील वैशिष्ट्यें त्यास उमगलीं पाहिजेत. तसेंच कवि-सम्राटांच्या चरित्रांचा परिचय त्यानें करून घेतला पाहिजे.

नुसता काव्यशास्त्राचा अभ्यास करून भागणार नाहीं कीं कवींच्या चरित्रांचीं पारायणें करून यशसिद्धी मिळणार नाहीं. यशाच्या प्राप्तीकरितां त्यानें शेंकडों काव्यें हाताळलीं पाहिजेत, हजारों कविता वाचल्या पाहिजेत. आणि त्यांतील कांहीं मुखोद्गत केल्या पाहिजेत, कांहींचा संग्रह केला पाहिजे. अशा कवितांचा संग्रह करण्यास सुदैवानें मराठी काव्यसमृद्धिमुळें फार मोठी जागा आहे. मराठीमध्यें कविता केलेल्या किती तरी नामवंत कवींचीं नांवें देतां येतील. केशवकुमार, दत्त, तांबे, यशवंत, गिरीश, मायदेव, श्री पडीत, ग. ह. पाटील, ग. ल. ठोकळ, के. नारखेडे, कुसुमाग्रज, अशा किती तरी नांवाजलेल्या कवींच्या कृति एकत्रित गोळा करतां येण्यासारख्या आहेत. कविता संग्रहाचा उपयोग स्वतःचा छंद पुरा करण्याकरितां, स्वतःचें मन रिझविण्याकरितां होतो तसा वर्गांत शिकविण्यासाठींही होतो. वर्गांत बाहेरील पद्याचा पाठ विशेष खुलतो असें अनुभवास येतें. या पाठाकरितां पद्य निवडावयाचें झाल्यास कविता-संग्रहाचा चांगला उपयोग होतो. मोठ्या प्रयासानें कविता संग्रह केला असल्यामुळें, त्यांतील कोणती कविता उत्कृष्ट आहे, कोणती कविता कोणत्या मुलांच्या आवाक्यांतील आहे, कोणती कविता कोणाला आवडेल, कोणत्या कवितेला कोणती आकर्षक चाल लावतां येईल हें शिक्षकास माहीत असतें. या ज्ञानाचा अध्यापनावर इष्ट परिणाम साहजिकच होतो.

कवितेच्या गोड चालीबरोबर कविता शिक्षकास अभिनयाची जोड मिळाल्यास कवितेमधील अभिप्रेत अर्थ विद्यार्थ्यांच्या ध्यानांत चटकन् येण्यास मदत होते. कविता शिक्षकानें योग्य ते हावभाव केल्यास त्याचा परिणाम खालचे वर्गांतील मुलांवर चांगला होऊन त्यांना कविता समजण्यास सुलभ जातें. हे हावभाव करतांना शिक्षकानें थोडा संयम बाळगला पाहिजे. हे हावभाव राणा भीमसिंही थाटाचे होता कामा नयेत, किंवा गवई थाटाचे होता कामा नयेत. तसे ते झाले तर मुलांवर त्यांचा अनिष्ट

परिणाम होण्याचा संभव अधिक असतो. अशा हावभावामुळें त्याच्यांत कवितेविषयीं गोडी निर्माण होण्याऐवजीं किळस मात्र निर्माण होईल. नाटकी थाटाच्या अभिनयानें पद्य-पाठाची सर्वच मधुरा पाण्यांत जाईल. काव्य विषयास, भावनेस व रसास पोषक असा आवाजाचा चढउतार करून त्यास साजेसे विकार चेहऱ्यावर दाखविल्यास चालण्यासारखें आहे. कवितेंतील वर्ण्य विषयास अनुरूप असा समयोचित मुद्राभिनय व किंचित अवयवांची हालचाल असें अभिनयाचें स्वरूप पाहिजे. थोडी कल्पकता आणि कसब शिक्षकाच्या अंगीं असलें म्हणजे ही गोष्ट सहजच अंगीं बाणता येण्यासारखी आहे.

पद्याचे पाठांत चित्रकलेस फार मोठें मानाचें स्थान आहे असें प्रतिपादिलें जातें. कविता शिक्षकास चित्रकलेचें अंग असल्यास त्याची कवितेच्या अध्यायनांत त्यास चांगलीच मदत होते, कवितेंतील शाद्बिक वर्णनाचें एकादें सुदरसें रेखाचित्र काढल्यास त्याचा ठसा मुलांचे मनावर चांगला उमटतो, कवितेंतील निरनिराळ्या अमूर्त प्रतिमास मूर्त स्वरूप देऊन त्या अधिक स्पष्ट करतां येतात वगैरे शेरे मारून काव्यांतील चित्र कलेच्या स्थानाची बरीच तरफदारी केली जाते. काव्यांतील चित्रकलेची ही महति जरा वेगळी वाटते. खऱ्या कवितेच्या शिक्षकास खरोखर चित्र-कलेचा आधार घेण्याची आवश्यकता भासूं नये. कवितेमधील शब्दचित्रें जातिवत कविता शिक्षक मुलांच्या मनःश्चक्षुंपुढें सहज खेळवूं शकतो अशीं चित्रें खेळविण्यातच पाठाची यशस्विता पुरेपूर भरलेली आहे. हें करण्याचें सोडून कविता शिक्षक जर चित्रकलेच्या साह्यानें तीं फळयावर रेखाटून मुलांच्या चर्मचक्षुंपुढें आणील तर त्याला कविता कशाशीं खातात हें माहीत नाहीं असेंच म्हणावें लागेल. वरचे वर्गांतील मुलांची कल्पनाशक्ति चांगलीच वाढलेली असल्यामुळें त्यांच्याकरितां पद्य-पाठांत फळयावर चित्रें काढणें निषिद्ध मानलें पाहिजे. खालचे वर्गांतील मुलांची कल्पनाशक्ति

बाल्यावस्थेंत असते. त्यांना अमूर्त गोष्टी तितक्याशा कळत नाहींत. म्हणून खालचे वर्गांत फळ्यावर चित्रें रेखाटल्यास चालण्यासारखें आहे.

कवितेच्या शिक्षकानें काव्याचा अभ्यास करावयास पाहिजे, कवितांचा संग्रह करावयास पाहिजे, त्याला अभिनय व चित्रकलेचें थोडेसें अंग असावयास पाहिजे. पण यापेक्षांही महत्वाची गोष्ट म्हणजे त्याला गोड गळा असावयास पाहिजे. पद्य-पाठांत मुलांच्या मनाची पकड घेण्यास कोणी समर्थ असेल तर गोड गळाच फक्त. पाठाची प्रस्तावना अयोग्य झाली, प्रतिपादन बिघडलें, रसग्रहण पडलें तर या संकटांतून यशाचा मार्ग काढण्यास गोड गळाच फक्त धावून येतो. केवळ गोड गळ्यावर वेळ मारून नेल्याचीं अनेक उदाहरणें देतां येतील. गोड गळ्याचें इतकें महत्व आहे म्हणूनच कीं काय तो फार थोड्या लोकांमध्यें आढळून येतो. गोड गळा ही निसर्गाची देणगी आहे हें निर्विवाद आहे. पण ही निसर्गाची देणगी आपल्याजवळ नाहीं म्हणून कविता शिक्षकानें रडत बसतां कामा नये. गोड गळा कमावितां येतो ज्या कविता शिक्षकांना गोड गळा उपजतच आहे त्यांनीं त्याची गोडी वाढवावी. ज्यांना असा गळा मिळाला नाहीं त्यांनीं तो कमवावा. वरचेवर कविता म्हटल्यास, गाणें म्हटल्यास, दुसऱ्याचें गाणें ऐकून त्याप्रमाणें म्हणण्याचा प्रयत्न केल्यास गळा कमावितां येण्यासारखा आहे. 'गाता गळा' हाच यावर एकमेव उपाय आहे.

यावर कोणी असें म्हणेल कीं गोड गळा कमावितां येत असला तरी स्वाभाविक गोड गळा व कमाविलेला गळा यामध्यें फरक राहाणारच. स्वाभाविक गोड गळ्याची मोहिनी कमाविलेल्या गळ्यापेक्षां मुलांवर अधिक पडेल. या म्हणण्यांत अगदींच तथ्यांश नाहीं असें नाहीं. स्वाभाविक गोड गळा मुलांच्या मनाची पकड चटकन् घेईल यांत शंका नाहीं. कमाविलेला गळा या बाबतींत थोडासा तोकडा पडेल यांतही शंका नाहीं. पण याबरोबरच हेंही लक्षांत ठेविलें पाहिजे कीं गोड गळ्याच्या प्रभाचा

विचार पद्य–पाठाच्या अनुषंगानें व्हावयास पाहिजे. पद्य-पाठांत अवास्तव गोड गळा असलाच पाहिजे असें नाहीं. तसा असला तर दुधांत साखर पडेल. पण तसा तो नसला तर सर्वसाधारण गळयावर भागण्यासारखें आहे. पद्य–पाठांत नाद माधुर्यास उच्च स्थान आहे, तसें अर्थ माधुर्यासही आहे. पराकोटीचें नादमाधुर्य दुसऱ्याचें स्थान डळमळीत करीत असेल तर तें बरें नव्हे. नादमाधुर्य व अर्थमाधुर्य एकमेकांचे विरोधक न बनतां पुरक बनले पाहिजेत. कमाविलेल्या गळयांत कवितेंतील भावना स्पष्ट झाल्या, त्या ऐकणाऱ्यांच्या हृदयाशीं जाऊन भिडल्या कीं काम झालें. कमा-विलेल्या गळयांनीं कवितेंतील रसास पोषक असें वातावरण निर्माण केलें, हृदयाच्या सारंगीवर त्याचे स्वर उमटविले कीं त्यांनीं मोठी कमाई केली असें म्हणण्यास हरकत नाहीं. कमाविलेल्या गळयाला अशी कमाई करणें अवघड नाहीं याची ग्वाही कोणीही देण्यास हरकत दिसत नाहीं.

कवितेच्या शिक्षकास इतर गोष्टीबरोबर गोड गळा असावयास पाहिजे, नसला तर तो त्यानें कमाविला पाहिजे हें वरील विवेचनावरून स्पष्ट झालें आहेच. पण गोड गळयाबरोबरच त्याला संवेदनक्षम अंतःकरण पाहिजे. संवेदनक्षम अंतःकरणाची महती गोड गळयापेक्षांही अधिक आहे. एवढेंच नव्हे तर कविता शिक्षकास नुसतें संवेदनक्षम अंतःकरण असलें आणि दुसरें कांहीं नसलें तरी चालेल असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. संवेदनक्षम अंतःकरणाबरोबर इतर गोष्टी आपोआप येतात. अभिनय, चित्रकला, गोड गळा वगैरे सहृदयतेचींच निरनिराळीं स्वरूपें आहेत. म्हणून कवितेचा शिक्षक संवेदनक्षम अंतःकरणाचा असला पाहिजे, सहृदय असला पाहिजे. दुःखी जीवांचे हाल पाहून त्याचें अंतःकरण सहानुभूतीनें द्रवलें पाहिजे, विरघळलें पाहिजे. जगांतील अन्याय, जुलूम, जबरदस्ती पाहून त्याचे डोळे त्वेषानें लाल झाले पाहिजेत, त्याचें अंग तिरस्कारानें थरथर कांपलें पाहिजे. धर्माचें ढोंग, अन्यायमूलक रूढी,

समाजांतील अनीति, विषमता, मानवाची अमानुषता यांनीं त्याचें मस्तक खालीं लवलें पाहिजे. कोवळ्या जीवांच्या निर्व्याजतेनें त्याचें मन कौतुकानें बहरलें पाहिजे, त्यांच्या निरागसतेनें त्याचें मन आनंदानें बेहोश झालें पाहिजे. सृष्टिशोभेनें, निसर्ग सौंदर्यानें त्याचें अंतःकरण आनंदाच्या भरतीनें उचंबळून आलें पाहिजे; आणि या विश्वाच्या अनंतत्वाच्या विचारानें परमेश्वराच्या चराचरांत भासमान होणाऱ्या रूपामुळें त्याचें मस्तक भक्तिभावानें विनम्र झालें पाहिजे. कवीच्या भावनांशीं समरस होण्यास, त्याच्या कल्पनांशीं तादात्म्य पावण्यास, विचारांशीं एकरूप होण्यास, कवितेचें स्वारस्य चाखण्यास सहृदयतेची आत्यंतिक आवश्यकता आहे आणि ही सहृदयता कविता शिक्षकास असलीच पाहिजे याबद्दल कोणाचें दुमत होणार नाहीं याची खात्री वाटते.

कविता शिक्षक कसा असावा याचें विवेचन थोडक्यांत वर केलें आहे. पण एवढ्यानें भागणार नाहीं. कविता शिक्षक कसा असावा या बरोबरच तो कसा नसावा याचाही उहापोह झाला पाहिजे. कोणत्याही प्रश्नाला दोन बाजू असतात एका बाजूचें स्पष्टीकरण करीत असतांना दुसऱ्या बाजूची अंधुक कल्पना येत असली तरी तिची पूर्ण समजूत करून घेण्यास स्पष्टीकरणाची जरूरी असते. कविता शिक्षकाच्या बाबतींत ही नकारात्मक बाजू समजावून घेणें अतिशय मोलाचें आहे. ही बाजू समजावून घेतली नाहीं तर लहानशा दोषामुळें सबंध पद्य-पाठावर विरजण पडण्याचा संभव आहे. म्हणून कविता शिक्षकाचे अंगीं कोणते अवगुण नसले पाहिजेत याची रूपरेषा पुढें मांडली आहे.

कविता शिक्षक उदासीन नसावा. तो उदासीन असला तर कविता शिकविण्यांत तो रमणार नाहीं, तिच्यांतील भावनांशीं तो समरस होणार नाहीं, तिच्यांतील रस-सागरांत तो डुबणार नाहीं. असें झालें म्हणजे कविता-शिक्षणाचा हेतु साध्य होणार नाहीं, मुलांना आनंद लुटतां येणार

२०९८५ दि
२३८

नाहीं मनुष्याच्या जीवनांत उदासीनतेची छटा केव्हां ना केव्हां येतेच, नाहीं असें नाहीं. शिक्षकाच्या जीवनांत उदासीनतेचा पगडा हमखास बसण्याची परिस्थिति आहे हें नाकबूल करून चालणार नाहीं. पण केवळ उदासीनतेच्या आहारीं पडून ही परिस्थिति बदलण्यासारखी नाहीं. उदासीनतेमुळें कर्तव्यास बाध येऊन त्यापासून परावृत्त होण्याचाच अधिक संभव आहे. उलट कर्तव्य चोख बजावल्यास कर्तव्यपालनाचें तेज तोंडावर चमकून उदासीनता कमी होण्याचा मोका आहे. कांहीं वेळां पद्य-शिक्षणाच्या पाठ-पद्धतीच्या भीतीमुळें ही उदासीनता आलेली कांहीं शिक्षकांमध्यें आढळून येते. अशा शिक्षकांना एवढेंच सांगावेंसें वाटतें कीं पाठ-पद्धतीचा कोणी बाऊ करीत असल्यास तिकडे दुर्लक्ष करणेंच बरें. पाठाची तयारी व्यवस्थित केल्यास, कविता स्वतास पुरेपूर समजल्यास पाठाच्या यशाविषयीं भीति बाळगण्याचें कारण नाहीं.

कविता शिक्षक उदासीन नसावा; तसाच तो बेफिकीर वृत्तीचाही नसावा. अमुक कविता सोपी आहे, ती मी तयारीशिवायसुद्धां व्यवस्थित शिकवीन, तमुक कविता मी दोन वर्षांपूर्वी परिणामकारकपणें शिकविली, तेव्हां तिच्या पाठाची तयारी करण्याची जरूरी नाहीं, या कवितेला मी हां हां म्हणता आकर्षक चाल लावीन; त्या कवितेची चाल तर केव्हांच बसवून ठेविली आहे, असें म्हणून बेफिकीर वृत्तीनें पाठाची तयारी न केल्यास कविता शिक्षक कितीही कसबी असो त्याचा पाठ अयशस्वी झाल्याशिवाय राहाणार नाहीं. कविता सोपी असो अगर अवघड असो, ती शिकविलेली असो अगर शिकविलेली नसो तिचा अभ्यास सूक्ष्मपणें पाठ घेण्यापूर्वी शिक्षकानें केला पाहिजे. कवितेचें सार त्यानें काढलें पाहिजे. तिच्या भाषासौंदर्याची ओळख त्याने करून घेतली पाहिजे. मुलांना अडणाऱ्या गोष्टींची अटकळ त्यानें बांधली पाहिजे. कवितेला आकर्षक चाल लावून ती त्यानें घटविली पाहिजे. इतकी काळजी शिक्षकानें घेतली तर बेफिकिर वृत्तीचा लवलेशही त्याच्यामध्यें राहाणार नाहीं.

शिक्षकाच्या बेफिकिर वृत्तीचा उगम त्याच्या आळसांत आहे असें नेहमींच प्रत्ययास येतें. आळशी शिक्षक स्वत: अभ्यास न करतां मुलांना मोकळें सोडतो. कवितेच्या तासाला नुसत्या कविता तो म्हणवून घेतो. एखाद्या तासाला लहर लागलीच तर तो कवितांचा अन्वयार्थ मुलांकडून लावून घेतो. बाकी इतर वेळां मंजिऱ्यांचा उपयोग करण्यास तो सर्रास उत्तेजन देतो. पद्याच्या अध्यापनाचे असे धिंडवडे काढण्यापेक्षां पद्य शाळेंत न शिकविलें तर बरें असें पुष्कळांना वाटतें. पद्याच्या अध्यापनाचे अभावीं मुलें जीवनांतील आनंदास अंतरण्याचा संभव आहे. म्हणून काव्य हें शाळेंत शिकविलें गेलेंच पाहिजे. आणि त्याकरितां उमद्या कविता शिक्षकांची योजना होऊन आळशी शिक्षकाची हकालपट्टी झाली पाहिजे.

कित्येक वेळां बेफिकीर वृत्तीचा उगम आळसांत न सांपडतां शिक्षकांतील आत्मविश्वासाच्या अभावांत आढळतो. कविता शिकविण्याची तयारी करूनही पुष्कळ वेळां पाठ घसरतो. असें वारंवार घडलें म्हणजे शिक्षकांत एक प्रकारचा न्यूनगंड उत्पन्न होतो. आणि मग तो असा विचार करतो कीं पाठाची तयारी करूनही त्यांत यश मिळत नसेल तर तयारीची यातायात तरी नको. आणि मग तो पाठाविषयीं बेफिकीर बनतो. पण अशी बेफिकीर वृत्ति चांगली नाहीं हें शिक्षकानें उमगलें पाहिजे. ती घालवून देण्याकरितां त्यानें प्रयत्न केले पाहिजेत. अपयशाची तमा न बाळगतां त्यानें पुन्हां यत्न करून पाहिले पाहिजेत. त्याकरितां त्यानें आत्मविश्वास अंगीं बाणायला पाहिजे.

कवितेचा शिक्षक अस्पष्ट बोलणारा नसावा. शब्दांचे उच्चार अस्पष्ट झाले तर मुलांना कवितेचा अर्थ नीट समजत नाहीं व वर्गांत गोंधळ माजतो. म्हणून स्पष्ट शब्दोच्चार करण्याची खबरदारी कविता शिक्षकानें विशेषत: घेतली पाहिजे.

कविता शिक्षक अशुद्ध बोलणारा नसावा. याचा अर्थ असा नव्हे कीं इतर विषयांच्या शिक्षकांनीं अशुद्ध बोलल्यास चालेल. याचा अर्थ एवढाच कीं कविता शिक्षक अशुद्ध बोलल्यास इतर पाठांपेक्षां कवितेचा पाठ लौंच पडण्याचा संभव असतो. कवितेचा पाठ पडल्यास त्यापासून होणाऱ्या आनंद निर्मितीस मुलें पारखीं होतात. शिवाय अशुद्ध बोलण्यानें वर्गात माजणाऱ्या गोंधळामुळें मुलांच्या शिस्तीवर वाईट परिणाम होतो तो वेगळाच. अशुद्ध बोली बऱ्याच वेळां खेड्यांत वाढलेल्या शिक्षकांच्या तोंडीं असल्याचा अनुभव येतो. ण, च, ज, झ, ळ, क्ष, ष, ल, र, श वगैरे मुळाक्षरांचे अशुद्ध उच्चार हटकून त्यांचें तोंडांतून बाहेर पडतात. असें होण्याचीं कारणें अनेक असतील. या कारणांचा दोष शिक्षकांकडे नसेलही तरी पण शुद्ध बोलण्याची संवय शिक्षकानें कटाक्षानें लावून घेतली पाहिजे.

कांहीं शिक्षकांना हेल काढण्याची सवय असते. हेल प्रांतिक स्वरूपाचे असतात. सातारा प्रांतांतील शिक्षक 'काय वेतुया, काय खातुया,' असें बोलून शेवटच्या अक्षरावर जोर देऊन त्याचा उच्चार लांबवितात तर खानदेशांतील शिक्षक 'काय रे ऽ ऽ भाऊ ऽऽ' असें ग्रामळू भाषेंत बोलून हेल काढतात. असे हेल काढल्यानें वर्गात एकच हशा पिकतो व काव्याचा रसभंग होतो. म्हणून कविता शिक्षक हेल काढणारा नसावा.

कविता शिक्षक अशुद्ध भाषा बोलणारा जसा नसावा तसा तो अकारण कृत्रिम भाषा बोलणाराही नसावा. कृत्रिम भाषा वापरण्याची संवय कांहीं विवक्षित प्रांतांत दिसून येते. कोंकणांत कृत्रिम भाषेचा वापर असल्याचें पदोपदीं दृष्टोत्पत्तीस येतें. कोंकणांतील लोक जसें लिहीतात तसेंच बोलतात. अनुच्चारित अनुस्वारांचा उच्चार त्यांचेकडून झाल्याशिवाय कधींच राहाणार नाहीं. सिंह या शब्दाचा उच्चार ते 'सिंह' च

करतील, 'सिव्ह' करणार नाहींत. कोंकणांतील शिक्षक देशावरच्या शाळांत शिकवीत असतांना पुष्कळ वेळीं मुलांमध्यें यामुळें मजा उडालेली अनुभवास येते. भाषेच्या कृत्रिमतेचें दुसरें एक कारण आहे. अशिक्षित घराण्यांतील मुलगा प्रथमच शिकला तर तो आपण इतरांपेक्षां वेगळे आहोंत, शहाणे आहोंत हें दाखविण्याकरितां पुस्तकी भाषेचा वापर सरास घरांत करतो. घरांतील मंडळीस याची कल्पना नसल्यामुळें आपला मुलगा आपल्यापेक्षां वेगळें बोलतो म्हणूनच ते त्याचें कौतुक करतात. या कौतुकामुळें पुस्तकी भाषा वापरण्याची संवय मुलांस पूर्णपणें जडते. ही जडलेली सवय इतकी घट्ट होते कीं ती पुढील आयुष्यांत त्याला टाकून सुद्धां देतां येत नाहीं. आणि कित्येक वेळां ही सवय सदोष आहे असें संवय जडलेल्या माणसास वाटतही नाहीं. इतका तो संवयीशीं एकरूप होतो. या सर्व गोष्टींची जाणीव ठेवून कविता शिक्षकानें कृत्रिम भाषा वापरतां कामा नये. त्यानें बोलभाषेंतच बोलावें.

कविता शिक्षकामध्यें आवश्यक असणाऱ्या गुणांची मालिका लांबवतां येण्यासारखी आहे. तसेंच त्याच्यामधील अनावश्यक गुणांचा पाढाही सविस्तर वाचतां येण्यासारखा आहे. हे सर्वच गुण कविता शिक्षकामध्यें असतील असें नाहीं. पण जे असतील त्यांचा विकास करण्याचा प्रयत्न मात्र झाला पाहिजे. तसेंच सर्व अवगुण त्याच्यामध्यें आढळतील असेंही नाहीं. पण जे असतील ते नाहींसे करण्याचा जोरदार प्रयत्न झाला पाहिजे. या सर्व प्रयत्नांचें उद्दिष्ट एकच असावें. तें म्हणजे काव्यानंदाची निर्मिती वर्गांत करणें. वर्गांत अशी आनंद निर्मिती झाल्यास मुलें आनंदित होतील आणि शिक्षकही सुखी होईल शालेय जीवनांतील ही सुखाची सावली काय कमी कमाई आहे !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे स्थळप्रत.
अनु. क्र. 20964 वि. साहित्य
क्रमांक २३९ नों. दि. १८.८.१९५८

— IN PRESS —

## "Educational Problems and Administration in the Bombay State"

— by —

Shri. S. M. Thlgale
Shri. S. A. Paranjape

USEFUL TO STUDENTS OF EDUCATION.

---

शिक्षक जीवनाचीं शब्दचित्रें

## माझे आवडते शिक्षक

—: लेखक :—

**श्री. श्री. मा. ठिगळे**

एम्. ए., एल् एल् बी., बी टी.
डिप् एड् (एडिंबरो)

मानवी जीवनाचीं हीं शब्दचित्रें तुमच्या अंतःकरणाला जाऊन भिडतील.

**किंमत २ रुपये**

---

पुणें विश्वविद्यालयानें बी. टी. व टी. डी., परिक्षेकरितां क्रमिक पुस्तक नेमलेला ग्रंथ

## इतिहास कसा शिकावा व शिकवावा

लेखकः— **श्री. श्री. मा. ठिगळे**

एम्. ए., एल्एल् बी., बी. टी.
डिप् एड्. (एडिंबरो)

नवीन दृष्टीचा लाभ, माणुसकीची ओळख, विश्वशांतीच्या ध्येयाप्रत नेणारा अमोल ग्रंथ.

**किंमत ५॥ रुपये**